**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला**

**संशोधन प्रबंध**

# ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव’’

**(इ.स. १९५६ ते इ.स. २००६)**


संशोधिका

**प्रा. कल्पना सुरेश चव्हाण**

इतिहास विभाग,

एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅण्ड एस.सी.बी. कॉलेज ऑफ कॉमर्स,

अ‍ॅन्ड सायन्स फॉर विमेन्स, मुंबई-२०

**मार्गदर्शक**

**डॉ. दीपक गायकवाड**

एम.ए., एम.फिल., पीएच.डी. (JNU, New Delhi)

प्रोफेसर,

इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे-७.


**जुलै २०११**

# प्रतिज्ञापत्र

मी, **प्रा. कल्पना सुरेश चव्हाण**, प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, **''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव'' (इ.स. १९५६ ते इ.स. २००६)** हा संशोधन प्रबंध स्वतः लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या समाजशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केला आहे.

हा संशोधन प्रबंध या पूर्वी कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

**संशोधिका**
**प्रा. कल्पना सुरेश चव्हाण**

स्थळ :

दिनांक :

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **प्रा. कल्पना सुरेश चव्हाण** यांनी, **''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव'' (इ.स. १९५६ ते इ.स. २००६)** या विषयावर संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या समाजशास्त्र विषयांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतः लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. संशोधिकेच्या संशोधन कार्याबाबत मी समाधानी आहे.

**मार्गदर्शक**
**प्रो. डॉ. दीपक गायकवाड**
इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे-७

स्थळ :

दिनांक :

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव'' (इ.स. १९५६ ते इ.स. २००६) या विषयावर संशोधन कार्य पूर्ण करून संशोधन प्रबंध सादर करण्यासाठी अनेकांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हे माझे कर्तव्य समजून प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार मानते.

माझे संशोधक मार्गदर्शक आदरणीय डॉ. दीपक गायकवाड, प्रोफेसर, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, यांचे योग्य मार्गदर्शन व सहकार्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकले. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, उपयुक्त सल्ला, तसेच जमा केलेली माहिती त्वरित तपासून देऊन त्यावर चर्चा करून संकलित माहितीची संयुक्तिक मांडणी करण्यात मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी आहे.

आदरणीय डॉ. दीपक टिळक, कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, प्रा. विजय कारेकर, अधिष्ठाता, सामाजिक शास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर, प्रमुख, इतिहास विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, अधीक्षक, आर. एस. हिले, पीएच.डी. विभागातील डॉ. पाटील सु. गो. या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करते.

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी शिक्षक शिष्यवृत्ती (Teacher Fellowship) मान्य केल्याबद्दल विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांचे आभार मानते. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू मा. चंद्रगणेश, रजिस्ट्रार मधुमदन यांनी अभ्यासरजा मंजूर केल्याबद्दल मी या सर्वांची अत्यंत ऋणी आहे.

संशोधन कार्याची प्रेरणा देणारे आमचे प्राचार्य डॉ. बी. बी. प्रधान यांनी या संदर्भात बहुमूल्य मार्गदर्शन आणि सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचे ऋण मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मला आवडेल.

संशोधन करताना अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्था, संघटनांमधील कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले. अखिल भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय अध्यक्षा मीराताई आंबेडकर, राष्ट्रीय

सचिव अघाणे काका, बौद्ध पंचायत समितीचे अध्यक्ष आनंदराजे आंबेडकर, समता सैनिक दलाचे शाखाप्रमुख आयु. वीर, सर्वोदय महाबुद्ध विहाराचे संस्थापक आणि चालक, भंतेजी राहूल बोधी, त्रैलोक्य बौद्ध महासभेचे धम्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, डॉ. लंकेश्वर, शिक्षण अधिकारी मा. आयु. देठणकर, आर.पी.आय. बहुजन संघाचे मा. अध्यक्ष आयु. बाळासाहेब आंबेडकर, बुद्धभूषण प्रिंटींग प्रेसचे प्रमुख आयु. भीमराव आंबेडकर, इ. अनेक मान्यवरांची कृतज्ञता व्यक्त करते.

मुंबई शहर आणि उपनगरांची पाहणी करताना प्रत्येक ठिकाणची महिला मंडळे, युवामंडळे नेते यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. विवेक साळवी, सुरेंद्र बनसोडे, बबन सोनावणे यांनी स्वतः माझ्याबरोबर राहून संशोधन क्षेत्राची वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्याच्या कार्यात सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे ऋण मानणे क्रमप्राप्त ठरते.

मुंबई पुराभिलेखाचे अधीक्षक मा. धटावकर, तसेच कर्मचारी वर्ग यांनी संदर्भ कागदपत्रे उपलब्ध करून देऊन सहकार्य केले त्याच्या सहकार्याबद्दल ऋण व्यक्त करते. तसेच टाटा सामाजिक शास्त्रे संस्था (TISS) चेंबूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व संदर्भ ग्रंथ संग्रहालय, पुणे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई निर्मला निकेतन सामाजिक शास्त्रशाळा, मुंबई, जागतिक लोकसंख्या अभ्यास संस्था (IIPS) गोवंडी, ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, भारत सरकार गॅझेटिअर डिपार्टमेंट बेलार्ड रोड, एशियाटिक लायब्ररी, मुंबई, सिद्धार्थ महाविद्यालय ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, इतिहास विभाग, ग्रंथालय, यांनी आवश्यक संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते. तसेच एन.एन.डी.टी. विद्यापीठ, ग्रंथालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल मी सर्वांची ऋणी आहे.

संशोधनाचे कार्य चालू असताना सतत मार्गदर्शन करणाऱ्या एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या माजी मराठी विभागप्रमुख डॉ. सई देशपांडे यांचे बहुमोल मार्गदर्शन सतत मिळत होते. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते. माझ्या मागणीनुसार आवश्यक पुस्तके, ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल सुगावा आणि लोकवाङ्मय प्रकाशनाचे आभार मानते.

संशोधनाची प्रेरणा माझे पती मध्यवर्ती कारागृह अधीक्षक तथा प्राचार्य, तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे-६, आयु. सुरेश चव्हाण यांच्याकडून सतत मिळत गेली.

त्यांच्या या सहकार्यामुळे हा प्रबंध मी पूर्ण करू शकले. तसेच माझी मुले ॲड. सूरज आणि समीर यांचे सहकार्य अमूल्य आहे.

अतिशय सूचक व वेळेमध्ये संगणकीय जुळणी व मुद्रणाची सर्व जबाबदारी श्री. अशोक कुडले व सौ. राजश्री कुडले यांनी केल्याबद्दल त्यांची मी ऋणी आहे.

शेवटी अनेक अज्ञात सहकाऱ्यांचे निर्देश करणे शक्य झाले नाही तरी त्यांचे ऋण मी व्यक्त करते.

**संशोधिका**

**प्रा. कल्पना सुरेश चव्हाण**

# विषय परिचय (प्रास्ताविक)

**संशोधनाचा विषयनिवडीमागील उद्देश :**

भौगोलिकदृष्ट्या मुंबई शहर भारताच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्याला १८.५३ अक्षास व ७२.५४ रेखांश या भागात वसलेले आहे. इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीज लष्करी अधिकारी अलबुकर्क याने हा भाग आपल्या ताब्यात घेतला. इ.स. १६६५ मध्ये पोर्तुगीजांनी मुंबई हे बेट इंग्रजांना दिले.

इंग्रजांनी मुंबई बंदर हे व्यापारासाठी विकसित केले. थोड्याच वेळात या भागातून कच्चा माल इंग्लंडला नेणे व बनविलेला पक्का माल विक्रीसाठी येणे सुरू झाले. याच काळात येथे सूत गिरण्यांची, शाळा व महाविद्यालये यांची स्थापना झाली. या सर्व कारणांमुळे मुंबई एक औद्योगिक शहर म्हणून पुढे आले. औद्योगिकरणासोबतच या भागाचे नागरीकरण झपाट्याने झाले. अठराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीने या भागाला प्रेसिडेन्सीचा दर्जा दिला. या प्रेसिडेन्सीचे मुंबई प्रमुख केंद्र म्हणून पुढे आले. एकोणिसाव्या शतकात दळणवळणासाठी ट्राम व रेल्वे आल्याने मुंबईचा विकास आणखीनच झपाट्याने झाला. विसाव्या शतकात भारताला स्वातंत्र्य मिळाले. मुंबईच्या औद्योगीकरणासोबतच या भागात अस्पृश्य समाज बऱ्यापैकी ग्रामीण भागातून स्थलांतरित झाला होता. त्यामुळे हा भाग दलित चळवळीचा सक्रिय भाग गणला गेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मॅट्रिक व बी.ए.पर्यंतचे शिक्षण मुंबईतच घेतले त्यांची चळवळही मुंबईतूनच सुरू झाली.

**प्रबंधाचे नाव :**

प्रस्तुत प्रबंधात इ.स. १९५६ ते इ.स. २००६ या वैशिष्ट्यपूर्ण कालखंडातील मुंबई शहरातील आंबेडकरी बौद्ध चळवळीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितांच्या उद्धारासाठी चळवळ येथे सुरू झाली. म्हणून मुंबई शहर आणि उपनगरांवर पडलेला प्रभाव हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. मुंबईतील धर्मांतराच्या प्रभावाचा इतिहास जाणून घेण्याच्या कुतुहलामुळे हा विषय निवडला आहे. तसेच या विषयावर या अगोदर सखोल असा अभ्यास झालेला नाही.

**संशोधनाचा कालावधी :**

मानवी जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीला धर्माची आवश्यकता असते कोणत्याही व्यक्तीचा अथवा समाजाचा विकास हा त्या धर्मावर अवलंबून असतो. आजपर्यंतचा

इतिहास पाहिला तर अनेक धर्मांतरे झालेली आढळतात. म्हणून धर्मांतराचा अभ्यास करताना काळाच्या मर्यादा पडतात. विषयाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन इ.स. १९५६ या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले. इ.स. २००६ हे वर्ष धम्मचक्र प्रवर्तनाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. इ.स. १९१९ ते इ.स. १९५६ या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या उत्थानासाठी भरघोस प्रयत्न केले. या मुक्तिलढ्याचे पर्यवसन पुढे धर्मांतरात झाले. या धर्मांतराचा मुंबई शहर व उपनगरांवर जो प्रभाव पडला, त्याचा सखोल अभ्यास करुन धर्मांतराच्या पन्नास वर्षांचा आढावा घेतला आहे.

**संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र (व्याप्ती) :**

सर्वेक्षणाच्या भौगोलिक क्षेत्राची निवड संशोधनाचा हेतू सफल करण्याच्या दृष्टीने केलेली आहे. मुंबई प्रांतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीची सुरुवात केली. त्यांच्या चळवळींना मुंबईमधून भरपूर पाठिंबा मिळाला होता. मुंबईतील आंबेडकरी चळवळींचे बालेकिल्ले म्हणून प्रसिद्ध असलेल्या नायगाव, वरळी, चेंबूर, वडाळा, माटुंगा व भायखळा ही ठिकाणे यासाठी निवडण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरांतील बौद्धवस्त्या, धारावी, बांद्रा, खार, घाटकोपर व गोवंडी क्षेत्रांना भेटी दिल्या आहेत. या ठिकाणी बौद्ध विहारे व समाजमंदिरे यांनाही भेटी दिल्या आहेत. या ठिकाणी नेते, कार्यकर्ते, महिला मंडळे, युवक मंडळे यांच्याशी चर्चा करून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत. यामध्ये प्रत्येक वस्तीचे वेगळे वैशिष्ट्य असून त्या वैशिष्ट्यांनुसार सर्वेक्षण क्षेत्राची निवड करण्यात आली.

**संशोधनाचा उद्देश :**

१. भारतीय समाजरचना आणि अस्पृशयवर्गाचा उदय कसा झाला याचा आढावा घेणे.

२. या काळातील मुंबई मधील अस्पृश्यांची राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिती कशी होती हे जाणून घेणे. त्या संदर्भात ब्रिटिशांनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

३. मुंबईतील अस्पृश्योद्धाराच्या कार्यात समाजसुधारकांच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकणे.

४. ब्रिटिशांनी मुंबईमध्ये केलेल्या विविध अस्पृश्योद्धारासाठी केलेल्या सुधारणांचा शोध घेणे. त्यांनी केलेल्या घटनात्मक कायद्यांच्या अस्पृश्यांच्या चळवळीवर कसा परिणाम झाला त्यांची प्रगती आजमावणे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची सविस्तर चर्चा करणे तसेच या चळवळीत मिळालेल्या प्रतिसादाचा शोध घेणे.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेवर आणि त्यांच्या धर्मांतरावर प्रकाश टाकणे.

७. धर्मांतराचा मुंबईच्या जनतेवर घडलेला प्रभाव याचे संशोधन करणे.

८. धर्मांतर चळवळीच्या परिणामांचे मूल्यमापन करणे

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. धर्मांतराच्या पन्नास वर्षातील स्थित्यंतराचा आढावा घेणे

२. धर्मांतराच्या प्रभावाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहचविणे.

३. धम्म चळवळीतील विविध संघटनांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

४. धम्म चळवळीतील सर्वसामान्य माणसांचा सहभागाचा आढावा घेणे

५. धम्मस्वीकारानंतर झालेल्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा शोध घेणे.

**संशोधनाच्या साधन संकलनांची माहिती (गृहीते) :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरावर बरेच लिखाण झालेले आहे. वैचारिक भूमिकेतून अभ्यास झाले आहेत. परंतु मुंबईच्या संदर्भात नव बौद्धांच्या वास्तववादी जीवनाचे चित्र तपासण्याचे काम फार कमी झाले आहे.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण आणि भाषणे, सरकारी दस्तऐवज, जनगणना रिपोर्ट, गॅझेटिअर, गृह खात्याच्या फाईल, तसेच वृत्तपत्रे, स्मरणिका, शताब्दी विशेषांक, विश्वकोष, इत्यादींचा विषयाशी संबंधित लिखाण करताना उपयोग केला आहे.

दुय्यम संदर्भ साधनांमध्ये डॉ. आंबेडकर चरित्र ग्रंथ, चरित्र ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित अप्रकाशित पीएच.डी. व एम.फिल. प्रबंध इत्यादींचा उपयोग केला आहे. प्राथमिक आणि दुय्यम साधने संकलित करुन उपलब्ध माहितीचे योग्य ते विश्लेषण करुन त्या आधारे निष्कर्ष काढून मुंबई शहर व उपनगरांवरील धर्मांतर प्रभावाचे क्षेत्र स्पष्ट केले आहे.

धर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत, सर्वेक्षण, तसेच प्रश्नावली या पद्धतींचा वापर करण्यात आला होता. सर्व्हेक्षण मुलाखती साधारण २००९ ते २०११ या कालखंडात घेण्यात आलेल्या आहेत. संशोधनाच्या (गृहितकांची) उद्दिष्टांचा विचार समोर ठेवून मुलाखती व सर्वेक्षण करण्यात आले आहे. संशोधन विषयाची माहिती जेथे जेथे मिळेल त्या त्या स्थळांना भेट देऊन आवश्यक ती माहिती जमा केली आहे. बौद्धवस्त्यांना भेटी दिल्या आहेत. तेथिल बुद्धविहारे, महिला मंडळे व युवा मंडळे यांना भेटी देऊन माहिती मिळविली आहे.

संबंधित संशोधन विषयाची माहिती असणाऱ्या व्यक्तीच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. यामध्ये इ.स. १९५६ धर्मांतरास हजर राहिलेल्या व्यक्ती तसेच सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांतील महत्त्वाच्या व्यक्तींच्याही मुलाखती घेण्यात आल्या आहेत. मुलाखत घेणाऱ्यांची निवड करताना जुन्या अनुभवी व वैचारिक बैठक असलेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींची निवड करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रबंधाचा हेतू साध्य करण्यासाठी प्रश्नावली या पद्धतीचा उपयोग केला होता. यामध्ये प्रत्यक्ष प्रश्नावली भरुन न घेता प्रत्यक्ष भेट घेऊन विचारून माहिती मिळविली आहे.

**गृहित कृत्ये :**

प्रस्तुत अभ्यास ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव'' या विषयाद्वारे धर्मांतराच्या प्रभावक्षेत्राचा अभ्यास केला आहे. इ.स. १९३५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली होती. इ.स. १९३६ मध्ये त्यांनी धर्मांतराचे उद्देश जाहीर केले होते. त्यानंतर इ.स. १९५६ मध्ये त्यांनी बौद्ध धर्मांताराचा स्वीकार करून धर्मांतराची उद्दिष्टे साध्य केली. धर्मांतराच्या पन्नास वर्षांमध्ये मुंबई शहर व उपनगरांतील बौद्धांच्या जीवनामध्ये विविध क्षेत्रांत जे बदल झाले ते विविध मुद्द्यांच्या आधारे, सर्वेक्षणाद्वारे अभ्यासले आहेत. त्यातून निघालेले निष्कर्ष व डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला बदल लक्षात घेऊन तुलनात्मक विश्लेषण केले आहे. प्रस्तुत अभ्यासातून मिळालेले निष्कर्ष सादर करून काही सूचना केल्या आहेत.

## प्रबंधातील प्रकरणे (सारांश/आकृतीबंध)

**प्रबंधाचा सारांश :**

यामध्ये प्रथम प्रबंधाची प्रस्तावना दिलेली आहे. त्यामध्ये नाव, संशोधनाचा कालावधी, संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र, संशोधनाचा उद्देश, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाच्या साधन संकलनाची, माहिती (गृहीते), संशोधनाची गृहित कृत्ये, प्रबंधातील प्रकरणे आणि भारतीय समाजातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांची चर्चा प्रस्तावनेत दिली आहे.

**प्रबंधाचा आकृतिबंध :**

प्रस्तुत संशोधनाचा विषय एकूण सहा प्रकरणांतून अभ्यासला आहे. प्रबंधाचे पहिले प्रकरण प्रस्तावनेच्या स्वरूपात मांडण्यात आले आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळीची पार्श्वभूमी ठरलेल्या भारतातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता या घटकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**प्रकरण पहिले**

जातिव्यवस्था हे भारतीय समजाव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य असून याच जातिव्यवस्थेतून अस्पृश्यतेचा जन्म झाला. जातिव्यवस्थेची निर्मिती आर्यांच्या वर्णाश्रम म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून झाली आहे. आर्य स्वतःला श्रेष्ठ समजत. त्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या संघर्षातून चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा जन्म झाला. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या उगमाविषयीचे सिद्धांत ऋग्वेद, भगवत गीता, मनुश्रुती इ.सारख्या धर्मग्रंथांत मांडले आहेत. सुरुवातीच्या काळात ही वर्णाश्रम व्यवस्था कर्मावर अवलंबून होती. नंतरच्या काळात मात्र ती जन्मावर आधारित झाली. त्यामुळे वर्णानुसार श्रमविभागणी करण्यात येऊ लागली. अशा प्रकारे समाजात श्रमाचे विभाजन न होता श्रमिकांचे विभाजन झाले आणि त्यातुन जातिव्यवस्थेचा जन्म झाला. या जातिव्यवस्थेतून अस्पृश्यतेचा जन्म केव्हा झाला याविषयी इतिहासकारांमध्ये विभिन्न मतप्रवाह आहेत. याच अस्पृश्य जातीतील महार समाजाने विसाव्या शतकात धर्मांतर केले आहे.

प्राचीन काळापासून ते विसाव्या शतकापर्यंत मुंबईवर अनेक देशी-विदेशी राजवटी होऊन गेल्या. त्यामध्ये आधुनिक काळातील ब्रिटिश राजवट वैशिष्ट्यपूर्ण ठरली. या काळात मुंबईचे रूप पूर्णपणे बदलले गेले. मुंबईच्या राजकीय इतिहासावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ब्रिटिश

राजवटीत अस्पृश्योद्धाराच्या चळवळीला पोषक वातावरण मिळाले. ब्रिटिशांनी केलेले कायदे, राजकीय, सामाजिक सुधारणा अस्पृश्यांच्या सर्वांगीण विकासास कारणीभूत ठरल्या यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये मॉन्टेग्यू यांची घोषणा, साऊथब्युरो कमिटी, सायमन कमिशन, गोलमेज परिषदा, इ.स. १९१९ व इ.स. १९३५ चे कायदे या सर्व गोष्टी अस्पृश्यांच्या विकासास कशा कारणीभूत ठरल्या, याचे विवेचन करण्यात येऊन ब्रिटिश सरकारचे धोरण अस्पृश्य समाजाच्या विकासास कसे कारणीभूत झाले याची चर्चा करण्यात आली आहे.

ब्रिटिश काळात भारतात प्रबोधनाची सुरुवात झाली होती. सामाजिक सुधारणांमध्ये अस्पृश्योद्धाराचे कार्यसुद्धा सुरू झाले होते. मुंबईतील समाजसुधारकांनी काही सामाजिक संस्थांची स्थापना केली होती. या संस्थामार्फत तसेच वैयक्तिकरित्या अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांनी सुरू केले होते. त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. यामध्ये दादोबा पांडुरंग, विष्णु भिकाजी गोखले, आत्माराम पांडुरंग, विठ्ठल रामजी शिंदे, रावबहादूर बोले, तात्या पडवळ, लोकहितवादी, केळुस्कर गुरुजी, गोपाळबुवा पलंकर इ. समाजसुधारकांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकण्यात आला आहे.

अस्पृश्यांची मुंबईतील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक, परिस्थिती ब्रिटिश काळात कशी होती यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. प्रकरणाच्या शेवटी मुंबईमधील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्यावर तसेच अस्पृश्यांच्या लष्करी पेशावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या सर्व घटकांमुळे मुंबईतील अस्पृश्यांची स्थिती इतर ठिकाणच्या अस्पृश्यांपेक्षा चांगली होती. हे घटक त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक जीवनात कसे बदल घडवून आणणारे ठरले याची चर्चा केली आहे.

**प्रकरण दुसरे**

प्रबंधातील दुसरे प्रकरण ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय आणि धर्मांतर'' हे असून यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. त्यांच्या या कार्याचे स्पष्टीकरण दोन विभागात मांडले आहे.

प्रकरणाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईतील बालपण आणि त्यांच्या शैक्षणिक जीवनाची माहिती देताना त्यांना आलेल्या अस्पृश्यतेच्या अनुभवाची चर्चा करण्यात आली

आहे. तसेच मुंबईमध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत असताना त्यांना मिळालेल्या सहकार्याची नोंद की घेण्यात आली आहे. ज्यामुळे पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नावलौकिक देशाच्या प्रथम श्रेणीत होण्यास मदत मिळाली. यामध्ये प्रामुख्याने दादा केळुस्कर, शिवराम जानबा कांबळे, आर. के. बोले, सयाजीराव गायकवाड, राजश्री शाहू महाराज, इत्यादींचा उल्लेख करण्यात आला आहे.

इ.स. १९१९ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम चळवळीस सुरुवात केली. इ.स. १९१९ ते इ.स. १९३५ या काळात त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी अनेक सामाजिक चळवळी केल्या त्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला. याच काळात सामाजिक समानता प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न केले. या सत्याग्रहांमध्ये इ.स. १९२७ चा महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि इ.स. १९३० या वर्षी सुरू करण्यात आलेला नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह या गोष्टींना अस्पृश्यांच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून या सत्याग्रहांची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय पटलावर देखील उदय झालेला होता. त्यांची साऊथब्युरो कमिशन आणि सायमन कमिशनसमोरील साक्ष तसेच गोलमेज परिषदेसमोर मांडलेला अस्पृशांचा खलिता यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सर्व राजकीय घटनांचा आढावा घेण्यात आला आहे. अस्पृश्यांच्या सामाजिक आणि राजकीय हक्कांसाठी लढत असतानाच डॉ. आंबेडकरांचे समाजसुधारणेचे कार्यदेखील या काळात सुरू होते. यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. या सर्व कार्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची भूमिका, त्यांचे विचार स्पष्ट होतात. कारण हीच भूमिका पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळीची पार्श्वभूमी ठरलेली आहे. अस्पृश्यांच्या मुक्ती संग्रमातील त्यांचे शेवटचे पाऊल म्हणजे धर्मांतर होय. इ.स. १९१९ ते इ.स. १९३५ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जवळ जवळ सोळा वर्षाच्या कालखंडात हिंदू धर्माच्या अंतर्गत राहून समाजसुधारणेचे प्रयत्न केले. अस्पृश्यांच्या हक्कासाठी त्यांनी लढा दिला. परंतु या प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही स्पृश्य लोकांनी त्यांना मानवतेचे हक्कदेखील दिले नाहीत. त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. म्हणून त्यांनी इ.स. १९३५ मध्ये धर्मांतराची घोषणा केली. धर्मांतराच्या या घोषणेनंतर धर्मांतराला पाठिंबा देणाऱ्या विविध परिषदा भरविण्यात आल्या होत्या. त्या सर्वांमध्ये इ.स. १९३६ मध्ये मुंबईतील नायगांव मैदानावर झालेली परिषद ऐतिहासिक ठरली. या प्रसंगी डॉ. आंबेडकरांनी केलेले भाषण, मुक्ती कोन पंथे ? हे

ऐतिहासिक भाषण ठरले या भाषणामध्ये डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराच्या कारणांची सविस्तर चर्चा केली आहे.

धर्मांतराच्या घोषणेनंतर वीस वर्षांनी म्हणजे इ.स. १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले आणि बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या प्रसंगी त्यांनी आपल्या पाच लाख अनुयायांना देखील धम्मदीक्षा दिली. त्यांच्या या धर्मांतराव प्रकाश टाकण्यात आला आहे.

दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार आपल्या लाखो अनुयायांसोबत केला. भारताता बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. २५०० वर्षापूर्वी भगवान बुद्धांनी प्रचलित समाजव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले होते. भगवान बुद्धानंतर सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून बौद्ध धर्माचा प्रसार भारतामध्येच नव्हे तर भारताबाहेरही केला. त्यानंतर विसाव्या शतकात डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि धम्मप्रसाराचे कार्य केले.

**प्रकरण तिसरे**

प्राचीन काळात मुंबई हे बौद्धांचे महत्त्वाचे केंद्र होते इ.स.पूर्व तिसऱ्या शताकापासून ते इ.स. अकराव्या शतकापर्यंत येथे बौद्ध धमाचा प्रभाव होता. याचे अनेक पुरातत्त्वीय तसेच वाङ्मयीन पुरावे उपलब्ध आहेत. या प्रदेशात बौद्ध धर्माचा उदय आणि प्रसार याचा मर्यादित ऐतिहासिक आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी या स्थळांना भेटी देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार मुंबई मध्ये केव्हा व कसा झाला याची माहिती मिळविण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांरापूर्वी मुंबईमध्ये बौद्ध धर्माविषयीची पार्श्वभूमी कशी होती याचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईमधील नवदीक्षित बौद्धांना उच्चकोटीचा प्राचीन वारसा प्राप्त झाला आहे. मुंबईतील बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची सुरुवात अकराव्या शतकापासून झाली.

पुढे मुंबईच्या या प्रदेशातून बौद्ध धर्माचा पूर्ण ऱ्हास सोळाव्या शतकात आलेल्या पोर्तुगीजांमुळे झाला. पुरातत्त्वीय अवशेष तसेच वाङ्मयीन पुराव्यावरून मुंबईतील बौद्ध धर्मचे प्रभाव क्षेत्र यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यानंतर जवळजवळ सात ते आठ शतकानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईतून कालबाह्य झालेल्या बौद्ध धर्मचे पुनरुज्जीवन केले. हे त्यांच्या कार्याचे विशेष आहे.

**प्रकरण चौथे**

प्रकरण चार मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केल्यानंतर त्यांच्या या धर्मांतराचा मुंबई शहर आणि उपनगरांवर पडलेल्या प्रभावाचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. हे प्रकरण संशोधनाचा गाभा आहे. दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि अवघ्या दीड महिन्यात त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे धर्मांतर चळवळीचे पुढे काय ? असा प्रश्न निर्माण झाला. त्यांच्या पश्चात महाराष्ट्रात धर्मांतराची लाट निर्माण झाली. त्याला मुंबई अपवाद नव्हती. नवदीक्षित समाजाने धर्मांतराची चळवळ तशीच पुढे चालू ठेवली. या धर्मांतरानंतर मुंबईमध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक जीवनावर धर्मांतराचा जो प्रभाव पडला, त्याचा शोध घेण्यात येऊन धर्मांतराच्या प्रभावामुळे जे बदल घडून आले, त्याचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे.

या प्रकरणाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या आणि आजही कार्यरत असरणाऱ्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांनी या संस्था कोणत्या उद्देशाने स्थापन केल्या होत्या ते उद्देश साध्य झाले का ? याचे निरीक्षण करण्यात आले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचे प्रभावाचे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्र होय. नवदीक्षित बौद्धांमध्ये झालेल्या सांस्कृतिकीकरणाचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. मुंबईमध्ये विविध धार्मिक संस्था नवे संस्कार समजावर घडवित आहेत. नवे धार्मिक संस्कार, चालीरीती व रूढी समाजात जाणीवपूर्वक रुजविल्या जात आहेत. या सर्वांचा परामर्श येथे घेण्यात आला आहे.

इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर मुंबईमध्ये दीक्षा समारंभ होऊन लाखो लोकांनी धम्मदीक्षा घेतल्या आहेत. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर पहिला दीक्षाविधी समारंभ मुंबईमध्ये दादर चौपाटीवर झाला. तर धम्मचक्र परिवर्तनदिनाच्या सुवर्णमहात्सवी वर्षातील सर्वात मोठा सामुदायिक धम्मदीक्षा समारंभदेखील मुंबईतच झाला. इ.स. १९५६ नंतर मुंबईची बौद्ध लोकसंख्या सतत वाढताना दिसते. इ.स. १९५६ ते इ.स. २००६ या पन्नास वर्षांत बौद्धांच्या लोकसंख्येत आश्चर्यकारक वाढ झालेली आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त बौद्धांची लोकसंख्या मुंबई शहर आणि उपनगरात आढळते.

इ.स. १९५६ च्या धर्मांतराचा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेले आणखीन एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे साहित्य आणि कला क्षेत्र होय. मुंबईमध्ये साठच्या दशकात मराठी साहित्यात जे नवीन दलित साहित्य पुढे आले. ते प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. त्यामुळे या साहित्यावर आंबेडकरी चळवळीचा प्रभाव दिसतो. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या प्रभावामुळे दलित साहित्यात वैचारिक स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. त्याचा प्रभाव दलित साहित्यनिर्मितीवर झालेला आहे याची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. धर्मांतरानंतर दलित साहित्यात जे प्रमुख तीन प्रवाह निर्माण झाले. त्याची चर्चा करण्यात येऊन उदाहरणासहित स्पष्टीकरण करण्यात आले आहे. धर्मांतराच्या मुंबईतील नियतकालिकांवर प्रभाव पडलेला असून मुंबईतील तीनही नियतकालिके धम्म प्रसार-प्रचाराचे कार्य आपापल्या पद्धतीने करत आहेत.

धर्मांतराचा अत्यंत स्पष्ट प्रभाव पडलेले क्षेत्र म्हणजे स्थापत्य आणि कला हे क्षेत्र होय. मुंबईमध्ये जगातील सर्व धर्मियांची उपासना स्थाने आहेत. त्यात बौद्ध धर्माची उपासना स्थाने देखील आहेत. इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर मुंबईमध्ये विहार संस्कृती स्थापन झाली. धर्मांतराअगोदर मुंबई शहर आणि उपनगरात फक्त चार ते पाच बौद्ध विहारे होती. तीही प्रामुख्याने चीन, श्रीलंका, जपान येथे बांधलेली होती.

धर्मांतरानंतर शेकडो बौद्ध विहारे बांधण्यात आलेली आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात जेथे जेथे बौद्धधर्मियांच्या वस्त्या आहेत, तेथे तेथे बौद्ध विहारे आढळतात. या बौद्ध विहारांचे वैशिष्ट्य म्हणजे ही विहारे फक्त उपासना स्थाने नाहीत तर ती वैचारिक, सांस्कृतिक व सामाजिक चळवळींची केंद्रे आहेत. ही बौद्ध विहारे धम्मप्रचार-प्रसार कार्याबरोबरच शैक्षणिक व सामाजिक कार्यात विशेष रस घेते. मुंबईतील सर्व विहारे बौद्ध पंचायत समिती, भारतीय बौद्ध महासभा या धार्मिक संघटनांमार्फत चालविली जातात. काही ठिकाणी भिक्खु संघ किंवा युवक मंडळे विहारांचे कामकाज पाहतात. यामध्ये मुंबईतील प्रसिद्ध सर्वोदय महाबुद्ध विहार पूज्य भंतेजी राहूल बोधी चालवतात. तर त्रैलोक्य महासहाय्यक गण बुद्ध विहार धम्मचित्र चालवितात. बौद्ध महासभेची बौद्ध विहारे बौद्धाचार्य चालवितात, तसेच बौद्ध पंचायत समितीची विहारे बौद्धाचार्य काम बघतात.

इ.स. १९५६ पूर्वी अस्पृश्य समाजात निरक्षरता मोठ्या प्रमाणात होती. इ.स. १९५६ नंतर मात्र साक्षरतेचे प्रमाण सतत वाढताना दिसते. इ.स. १९७१ च्या जनगणनेमध्ये मुंबईमधील साक्षरतेचे प्रमाण महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांत जास्त आहे. साक्षरतेच्या प्रमाणाबरोबरच माध्यमिक आणि उच्च

माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांतून शेकडो विद्यार्थी पदवीधर होऊन बाहेर पडत आहेत. शिवाय मुंबईतील इतर विद्यापीठांतही शिक्षण घेत आहेत. मुंबईतील काही वस्त्यांमध्ये जरी महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी सरासरी शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे.

इ.स. १९५६ च्या काळात या समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण फक्त ३ टक्के होते. इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार ७२.७ टक्के एवढे प्रमाण झाले आहे. शिक्षणामुळे या समाजात पांढरपेशा वर्ग निर्माण झाला आहे. अनेक व्यक्ती मोठमोठ्या हुद्द्यांवर विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहेत.

शिक्षण क्षेत्राप्रमाणेच आर्थिक क्षेत्रावरदेखील धर्मांतराचा प्रभाव पडलेला दिसतो. इ.स. १९५६ नंतर मुंबईमध्ये जी स्थलांतरे झालेली आहेत, त्या सर्व लोकांनी बाबासाहेबांच्या 'खेडी सोडा शहराकडे चला' या आदेशाचे पालन केलेले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अनुत्पादित वर्ग म्हणजे महार समाज होय. ब्रिटिश रेकॉर्डमध्ये महारांचा उल्लेख (village servant) म्हणून केलेला आढळतो. गावची सेवा करणे हा त्यांचा परंपरागत व्यवसाय होता. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे जातिव्यवस्थेच्या चौकटीतून ते बाहेर पडलेले आहेत. गावगाड्यातील वंशपरंपरागत व्यवसाय त्यांनी सोडून दिले आहेत. मुंबईकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर करून ते कापड गिरण्या, डॉक यार्ड, पालिका इ. अशा ठिकाणी काम करून अभिमानाचे जीवन जगत आहेत. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध झालेले आहे. मुंबईमध्ये बी.डी.डी. चाळ, बी.आय.टी. चाळ, माहनगरपालिका वसाहती, लेबर कॅम्प व रेल्वे वसाहतीमध्ये ते मोठ्या संख्येने राहात आहेत.

धर्मांतरानंतर सर्वच बौद्धांची आर्थिक परिस्थिती चांगली झाली असे नाही. अजूनही हा समाज घाटकोपर, चेंबूर, धारावी इ. सारख्या झोपड्यांमध्ये राहतो आहे. परंतु गरिबी, दारिद्र्य हा अस्पृश्यांच्या कधीच प्रश्न नव्हता. त्यांचा लढा होता मानवी अधिकारासाठी व आत्मसन्मानासाठीच.

महाडच्या समता संग्रामापासून ते नागपूरच्या धम्म क्रांतीपर्यंतच्या सर्व लढ्यांमध्ये महिलांचे योगदान होते. इ.स. १९३५ या वर्षी डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली. त्यावेळी मुंबईमधील महिलांनी धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देण्यासाठी सभा आणि संमेलनाचे आयोजन केले होते. इ.स. १९३६ मध्ये अखिल मुंबई महार परिषदेत महिलांनी बाबासाहेबांना सांगितले होते

की, जो धर्म आम्हाला आमच्या बंधुवर्गाप्रमाणेच समाजात स्वातंत्र्याने वावरू देईल तोच धर्म आम्हाला द्यावा. मुंबईतील देवदासी, मुरळ्या व जोगतिणी यांनी धर्मांतराला पाठिंबा दिला होता. धर्मांतरानंतर या महिलांनी विवाह केले होते व चारित्र्यसंपन्न जीवन जगण्यास सुरुवात केली.

नागपूरच्या दीक्षा समारंभात हजर राहून दीक्षा घेतलेल्या महिलांनी मुंबईला परत आल्यानंतर धम्मप्रसाराचे कार्य केले होते. या महिलांमध्ये मीराताई आंबेडकर यांनी इतिहास घडविला. आजही त्या धम्मकार्याची धुरा संभाळत आहेत. धम्मकार्याबरोबर राजकारण व समाजकारणात महिला सहभागी होतात. रिपब्लिकन पक्षामध्ये आज जरी गटाचे राजकारण असले तरी प्रत्येक गटातून स्त्रिया आंबेडकरी चळवळीचे प्रतिनिधित्व करत आहेत.

मुंबईमधील प्रत्येक बौद्ध वसाहतींमध्ये महिला मंडळे स्थापन झालेली आहेत. बहुतेक सर्व महिला मंडळे तेथील बौद्ध विहारांशी संलग्न काम करतात. या सर्व महिला मंडळामध्ये डॉ. आंबेडकर जयंती, बुद्ध जयंती व वर्षावासाचे कार्यक्रमांचे आयोजन केले जातात. तसेच सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमही येथे राबविले जातात. बचतगट चालविले जातात. धम्मप्रचारासाठी धम्म परिषदांचे आयोजन काही महिला मंडळे करत आहेत. मुंबईमध्ये महिला समता सैनिक दलाच्या काही शाखा आहेत. या महिला भीमा कोरेगांव स्मृतिदिन, चैत्यभूमी येथे महापरिनिर्वाण दिन, दीक्षाभूमी, धम्मचक्रपरिर्वन दिन या प्रसंगी विविध कार्य पार पाडतात.

**प्रकरण पाचवे**

या प्रकरणामध्ये धर्मांतराचे जे परिणाम मुंबई शहर आणि उपनगरांवर झाले त्या परिणामांचे, प्रभावाचे मूल्यमापन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्देशाने धर्मांतर केले होते तो उद्देश साध्य झाला की नाही याचे परिक्षण केले आहे. धर्मांतराचा उद्देश सफल करण्यासाठी राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते काय कार्य करत आहेत याचे विवेचन केले आहे. एकंदरीत धर्मांतराचा मुंबई व तिच्या उपनगरावर नेत्रदीपक प्रभाव पडला आहे. बौद्ध समाज बुद्धाने दिलेल्या मार्गाने मार्गक्रमण करीत आहे.

**प्रकरण सहा**

या प्रकरणात संशोधनाची सारांशरूपाने मांडणी करण्यात आली आहे.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भ साधने आणि परिशिष्टे जोडण्यात आली आहेत.

❑❑

# अनुक्रमणिका


**पृष्ठ क्रमांक**

प्रमाणपत्र ii

प्रतिज्ञापत्र iii

ऋणनिर्देश iv-vi

विषय परिचय vii-xviii

**प्रकरण पहिले**

**प्रस्तावना** **१ ते ३१**

१.१ भारतीय समाजातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता

१.२ मुंबईचा राजकीय इतिहास

१.३ ब्रिटिश मुंबईतील राजकीय परिस्थिती

१.४ ब्रिटिश सरकारचे धोरण आणि अस्पृश्य समाज

१.५ मुंबईतील समाजसुधारक आणि सामाजिक संस्था

१.६ मुंबईतील अस्पृश्यांची सामाजिक परिस्थिती

१.७ मुंबईतील अस्पृश्यांची आर्थिक स्थिती

१.८ मुंबईतील अस्पृश्यांची शैक्षणिक स्थिती

१.९ मिशनरींचे मुंबईतील शैक्षणिक कार्य

१.१० अस्पृश्यांचा लष्करी पेशा

१.११ सारांश

१.१२ संदर्भ

**प्रकरण दुसरे**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय आणि धर्मांतर** **३२ ते ५९**

२.१ बालपण आणि शिक्षण

२.२ अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम

२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजसुधारणेचे कार्य

२.४ धर्मांतराची घोषणा

२.५ धर्मांतर

२.६ डॉ. आंबेडकर आणि मुंबई

२.७ सारांश

२.८ संदर्भ

**प्रकरण तिसरे**

**मुंबईत बौद्ध धर्माचा प्रसार** **६० ते ८०**

३.१ प्रस्तावना

३.२ मुंबईचे प्राकृतिक स्थान

३.३ उत्तर कोकण

३.४ मुंबईचा प्राचीन इतिहास

३.५ उत्तर कोकणातील बौद्ध धर्माचा ऱ्हास

३.६ मुंबई परिसरातील बौद्ध धर्मचे प्रभावक्षेत्र

३.७ सारांश

३.८ संदर्भ

**प्रकरण चौथे**

**धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव** **८१ ते १८७**

४.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या राजकीय संघटना आणि त्यावरील धर्मांतराचा प्रभाव

- अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष

४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सामाजिक संस्था आणि त्यावरील धर्मांतराचा प्रभाव

- समता सैनिक
- बौद्ध पंचायत समिती
- दि पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट

४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था आणि त्यावरील धर्मांतराचा प्रभाव

- पीपल्स एज्युकेशन ट्रस्ट

४.४ धर्मांतरानंतर धम्मक्षेत्रात कार्य करणारी संस्था

- अखिल भारतीय बौद्ध महासभा

४.५ धम्मस्वीकाराचा सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव

- धर्मांतराचा अर्थ
- बौद्ध धम्माची दीक्षा

- धम्मदीक्षेचे महत्त्व
- धम्मस्वीकार एक सांस्कृतिक चळवळ
- मुंबईतील धम्म परिषदा आणि अधिवेशने
- दि. १४ ऑक्टोबर १९५६ नंतरचे मुंबईतील दीक्षा समारंभ
- इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर वाढलेली मुंबईतील बौद्धांची लोकसंख्या
- धर्मांतराच्या प्रभावाने झालेली दलित साहित्यातील स्थित्यंतरे
- धर्मांतराचा स्थापत्य आणि कला क्षेत्रावर पडलेला प्रभाव
- धर्मांतराचा शैक्षणिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव
- धर्मांतराचा आर्थिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव
- धर्मांतराचा महिलांवर पडलेला प्रभाव

४.६ सारांश

४.७ संदर्भ

**प्रकरण पाचवे**

**मूल्यमापन** **१८८ ते २०९**

**प्रकरण सहावे**

**सारांश** **२१० ते २१५**

**संदर्भ साधने** **२१६ ते २२५**

**परिशिष्टे** **२२६ ते २७५**

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## प्रकरण दुसरे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय आणि धर्मांतर

## प्रकरण तिसरे

# मुंबईत बौद्ध धर्माचा प्रसारपूर्व इतिहास

## प्रकरण चौथे

# धर्मांतराचा मुंबई शहर व तिच्या उपनगरांवर पडलेला प्रभाव

# प्रकरण पाचवे

# मूल्यमापन

## प्रकरण सहावे

# सारांश

# संदर्भ साधने

# परिशिष्टे

## परिशिष्टे

१. मुक्ती कोन पथे ?

२. प्राचीन काळातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेण्या

३. बावीस प्रतिज्ञा

४. धर्मांतरापूर्वीचे संस्कार

५. धर्मांतरानंतरचे बौद्ध समाजातील संस्कार-विधी

६. वधू-वर प्रतिज्ञा

७. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील नवबौद्धांची लोकसंख्या

८. मुंबई शहर आणि उपनगरातील प्रत्येक वॉर्डमधील मागासवर्गीय जातीची टक्केवारी

९. १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वाधिक बौद्धांची लोकसंख्या मुंबईमध्ये आढळते.

१०. १९६१ ते २००१ या काळातील मुंबईतील सर्व धर्मियांनी लोकसंख्या

११. १९६१ ते २००१ या काळातील भारतातील बौद्धांची लोकसंख्या

१२. मागासवर्गियांमध्ये एकूण एकोणसाठ जाती असून मुंबईमध्ये प्रमुख मागसवर्गिय जातींची लोकसंख्या १९८१-१९९१

१३. मुंबई परिसरातील नवीन विकसित होणाऱ्या धम्मकेंद्रांतील बौद्धांच्या टक्केवारीचे विभाजन, १९९१

१४. दलित साहित्यिक

१५. आंबेडकरवादी साहित्यिक

१६. इ.स. १८६६ ते इ.स. २००६ बहुजन समाजाची काही महत्त्वाची नियतकालिके

१७. मुंबईतील काही महत्त्वाची प्रातिनिधिक बौद्ध विहारे

१८. १९९१ च्या जनगणनेनुसार मागासवर्गीय जातींचे मुंबईतील साक्षरतेचे प्रमाण

१९. महाराष्ट्रातील मागासवर्गीय जातींची शैक्षणिक आकडेवारी १९९९ ते २०००

२०. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील प्रमुख मागासवर्गीय जातींची शैक्षणिक स्थिती

२१. मुंबई विद्यापीठातील मागासवर्गीयांची महाविद्यालयीन विद्यार्थिसंख्या २००० ते १९९६

२२. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची महाविद्यालये

२३. मुलाखती

२४. प्राचीन बौद्ध लेण्या आणि धर्मांतरानंतरच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची छायाचित्रे

## प्रकरण १

# प्रस्तावना

### १.१ भारतीय समाजातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता :

भारतीय समाजव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे जातिव्यवस्था होय. या जातिव्यवस्थेतूनच अस्पृश्यतेचा जन्म झालेला दिसतो. ही अस्पृश्यता भारतीय समाजात केव्हा निर्माण झाली? हे अभ्यासणे आवश्यक आहे, कारण विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी जी चळवळ केली तिची कारणे आपल्याला या समाजव्यवस्थेतून दिसून येतात. त्यांच्या धर्मांतर चळवळीची ती पार्श्वभूमी ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जाती, रचना, उत्पत्ती आणि वाढ यावर संशोधन करून प्रकाश टाकला होता. त्यांच्या मते, ''भारतीय समाज हा आर्य, द्रविड, मांगोनियन, सिंधियन या लोकांच्या मिश्रणाने तयार झाला''[१] असून तो वनावस्थेतून सुधारत असतांना त्यांच्यात रक्तमिश्रणाची कल्पना अमान्य होत गेली व पुढे जमात-जमातीतून बेटीव्यवहार केला गेला. बेटीव्यवहाराची ही प्रथा दृढ होत गेली. आणि त्यातून निरनिराळे समाज परस्परांपासून विलग होत गेले. एवढेच नव्हे तर त्याच्या रोटीव्यवहारसुद्धा बंद झाले. समाजातील बंधने कडक होत गेली आणि ही बंधने तोडणारा वाळीत टाकला जाऊ लागला. येथूनच समाजात जातिव्यवस्थेचा उगम होऊन श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना दृढ होत गेली. ''आर्य व अनार्य यांच्यातील स्पष्ट भेद हाच चातुर्वर्णीच्या जातिभेदाचा आरंभ होय.''[२]

जातिव्यवस्थेची निर्मिती आर्यांच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून झाली. ''आर्यांचे भारतात जेव्हा आगमन झाले तेव्हा वांशिक आणि राजकीय प्रवाह असे प्रश्न निर्माण झाले. या आर्य लोकांनी येथील मूळ अनार्य लोकांचा पराभव करून आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले. आर्य जेते होते तर अनार्य जीत होते, त्यामुळे आर्य स्वत:ला श्रेष्ठ समजू लागले. या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या संघर्षातून चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा जन्म झाला.''[३] हिंदू धर्मग्रंथामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या उगमाविषयी सिद्धांत मांडलेला आहे. त्यानुसार ''ब्राह्मणांचा जन्म ब्रह्माच्या मुखातून, क्षत्रियाचा जन्म ब्रह्माच्या बाहुतून, वैश्याचा जन्म ब्रह्माच्या मांडीतून, आणि शुद्राचा जन्म ब्रह्मांच्या पायातून झाला''[४] असे ऋग्वेदामध्ये

पुरुषसुत्रात सांगितले आहे. म्हणून ब्राह्मण हे सर्वश्रेष्ठ तर शुद्र सर्वात कनिष्ठ ठरले. वर्णव्यवस्थेच्या या सिद्धांताला धर्मग्रंथाचा आधार देऊन हे धर्मग्रंथ अपौरुषेय ठरविले. ही चातुर्वर्ण्य व्यवस्था सुरुवातीला कर्मावर आधारित होती. भगवतगीतेमध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेबद्दल ''सृष्टं गुणकर्म विभागश:''[५] असे सांगितले आहे. वेदानंतर स्मृतीच्या काळात मात्र वर्णव्यवस्थेला कर्माचा आधार न देता जन्माधिष्ठित आधार दिला. स्मृतीमध्ये सर्वश्रेष्ठ स्मृती म्हणून मनुस्मृती मानली जाते. मनू नावाच्या या ऋषीने वर सांगितल्याप्रमाणे जातिव्यवस्थेच्या उगमाचा सिद्धांत मान्य केला असून कर्मसिद्धांत न मानता त्याने जन्मसिद्धांत मांडला आणि वर्णानुसार श्रमविभागणी केली. त्यामुळे श्रमाचे विभाजन न होता श्रमिकांचे विभाजन झाले. त्यातून जातिव्यवस्थेचा उदय झाला. ''या श्रमविभागणी तत्त्वानुसार शिकणे - शिकविणे हे ब्राह्मणाचे काम, प्रजेचे रक्षण करणे क्षत्रियाचे काम, व्यापार व पशुपालन करणे वैश्याचे काम आणि या तिनही वर्गाची सेवा करणे शुद्राचे काम''[६] असे ठरवून देण्यात आले. म्हणजेच चातुर्वर्ण्य व्यवस्था कर्मावर अवलंबून न राहाता ती जन्मावर आधारित करण्यात आली. या व्यवस्थेमुळे समाजात विषमतेचे बीज पेरले जाऊ न श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना पराकोटीला गेली. प्रत्येकामध्ये एकमेकांविषयी द्वेष निर्माण झाला. अस्पृश्यतेचा उदय वर्णव्यवस्थेतून केव्हा निर्माण झाला याविषयी इतिहासकारांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आहेत. आर्यांच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत अस्पृश्य जातीचा वर्णच नव्हता. मनुस्मृतीमध्ये सुद्धा ''ब्राह्मण: क्षत्रिये: वैस्यस्त्रयो वर्णा द्वीजाताप: चतुर्थ एक जातिस्तु शुद्रो नास्ति तु पंचम ।''[७] असे स्पष्ट केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे या विषयीचे विचार पाहणे उद्‌बोधक ठरतील. त्यांनी हिंदू समाजाचे वर्गीकरण करतांना अस्पृश्य हे हिंदू नसून अहिंदू कसे आहेत हे संशोधनात्मकरित्या पटवून दिले आहे. त्यांच्या मते, चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील ब्राह्मण क्षत्रिय वैश्य हे द्विज आहेत. ''(द्विज म्हणजे दुसऱ्यांदा जन्म) आणि दुसरा वर्ग हीन जातीचा म्हणजे शुद्रांचा आहे. हे सर्व हिंदू आहेत. अहिंदूंचा तिसरा वर्ग म्हणजे आदिवासी व गुन्हेगारी जाती असून चौथा वर्ग अस्पृश्यांचा वर्ग आहे.''[८] ''आर्यांनी हिंदुस्थानात आपल्या वसाहती स्थापन केल्या. त्यांनी येथील मूळ रहिवाशांना आपल्या वस्तीपासून दूर गावाच्या सीमेबाहेर जंगलात-डोंगरात हाकलून लावले व त्यांच्या माथी अत्यंत गलिच्छ व हलक्या दर्जाची कामे लादली. त्यामुळे हे लोक या कामामुळेच अस्पृश्य वर्गात ढकलेले गेले.''[९] हे मूळ रहिवासी नागवंशीय असून ते बौद्ध धर्माचे उपासक होते, हे संशोधनाच्या सहाय्याने

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्ध केले आहे. अस्पृश्यतेचा उदय हा ब्राह्मण आणि बौद्ध यांच्या संघर्षाची परिणीती समजली जाते. ब्राह्मण बौद्धांचा अत्यंत द्वेष करीत. या संघर्षामुळे अस्पृश्यांचा पाचवा वर्ग पुढे निर्माण झाला.

अस्पृश्यतेचा जन्म केव्हा झाला याविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही, ते शोधण्याचे काम अनेकांनी केलेले आहे. धर्मशास्त्रात अथवा पुराणात अस्पृश्यतेचा उल्लेख आढळत नाही. मुंबई इलाख्यातील अस्पृश्यांचे पहिले अस्पृश्योधारक बाबा वलंगकर यांनी या संदर्भात खूप शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना तसा एकही पुरावा मिळाला नाही. वैदिक काळात चांडाळ, अत्यंत असे शब्द प्रयोग केलेले दिसतात. अस्पृश्य हा शब्द कोठेच आढळत नाही. ''धर्मसूत्रामध्ये दोनदा अस्पृश्य हा शब्द आला आहे. विष्णु पुराणात ५.१०४ आणि स्मृतीमध्ये काव्यायत श्लोक ४३३-७८३ मध्ये अस्पृश्य शब्द आला आहे,''[१०] अस्पृश्यांमध्ये कोणत्या जातीचा समावेश होतो, याचा उल्लेख नाही. बऱ्याचदा चांडाळ म्हणजे अस्पृश्य असे समजले जाते. ''चांडाळांचा जन्म धर्मसूत्राच्या काळात झाला आहे. मिश्रविवाह पद्धतीतून चांडाळाचा वर्ग निर्माण झाला आहे.''[११] ''शुद्रादायोगव: क्ष-ता चांडाळोस्वाधमो नृणाम् वैश्य राजन्य विप्रासू जायन्ते वर्गसंकरा''[१२] म्हणजेच प्रतिलोम जातिव्यवस्थेची किल्ली जातीअंतर्गत विवाह ही होती. जिच्यामुळे जातिव्यवस्था प्रबळ बनून हिंदू समाजाचे ते एक महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले.

महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र अस्पृश्यतेचा उदय केव्हापासून झाला याचे पुरावे उपलब्ध आहेत. इतिहासकारांच्या मते यादवकाळात अस्पृश्यता उदयास आली. इ.स. चौथ्या शतकात लिहिलेल्या ''ज्ञानेश्वरीमध्ये अस्पृश्य जातीतील महार जातीचा उल्लेख आलेला आहे.''[१३] याच अस्पृश्य जातीतील महार जातीने सर्वात जास्त प्रमाणात इ.स. १९५६ मध्ये धर्मांतर केलेले आहे व आजही सातत्याने त्यांची धर्मांतरे चालू आहेत. महारांचे हे धर्मांतर महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ''अस्पृश्य समाजामध्ये महार, मांग, चांभार, ढोर, भंगी इ. जातींचा समावेश होतो. १९३१ मध्ये ब्रिटिशांनी जेव्हा मुंबई प्रांताचे वर्गीकरण केले होते. त्यामध्ये पुढारलेल्या जाती, आदिवासी आणि दलित असे वर्गीकरण केले होते.''[१४] अर्थात सवलती देण्यासाठी हे वर्गीकरण केले होते. स्टार्ट कमिटीने (फ्रँचाईस कमिटी) ''ज्यांना देवळात घेत नाहीत ज्यांच्या स्पर्शाने किंवा अंतरावरूनही विटाळ होतो ते अस्पृश्य''[१५] असे म्हटले आहे. त्याअगोदर

''१९ व्या शतकात महात्मा फुले यांनी अस्पृश्य ही संज्ञा न वापरता महार व मांग ही संज्ञा वापरली होती''[१६] महाराष्ट्रात दलित पँथरने अस्पृश्य या शब्दाऐवजी दलित हा शब्द प्रचारात आणला. त्यांच्या मते ''दलित म्हणजे आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे, तो समाज.''[१७] साहित्यिक नामदेव ढसाळ यांनी 'दलित' हा शब्द व्यापक अर्थाने वापरला. त्यांचे मते, ''अनुसूचित जाती, आदिवासी, भूमिहीन, मजूर, आर्थिकदृष्ट्या पिळवूणक झालेले सर्व दलित''[१८] आहेत. ''महात्मा गांधीजींनी इ.स. १९३० मध्ये अस्पृश्यांना 'हरिजन' या नावाने संबोधित केले होते.''[१९] इ.स. १९३५ च्या कायद्यात अस्पृश्यांसाठी केंद्रिय आणि प्रांतिक कायदेमंडळात राखीव जागा ठेवलेल्या होत्या. त्या कायद्याअंतर्गत सरकारने काढलेल्या हुकूमामध्ये अस्पृश्य वर्गात गणल्या गेलेल्या जातींची अनुसूची (Schedule) तयार केली होती. म्हणजेच ''१९३५ नंतर अस्पृश्यांची नोंद (शेड्यूल्ड कास्ट) अनुसूचित जाती अशी होऊ लागली.''[२०] ''स्वातंत्र्योत्तर काळात या जमातींना भारत सरकारच्या इ.स. १९५६ च्या कायद्यानुसार अनुसूचित जाती पत्रामध्ये समाविष्ट करण्यात आले.''[२१] स्वातंत्रोत्तर काळात अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा आहे. या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा निर्णय ''दि. १९ एप्रिल, १९४७ रोजी घटना समितीच्या तिसऱ्या अधिवेशनात घेण्यात आला होता. त्यानुसार कायद्याने अस्पृश्यता बंद करण्याचा ठराव मांडण्यात आला. या कायद्यानुसार अस्पृश्यता पूर्णपणे नष्ट करण्यात आली.''[२३] परंतु आजही समाजात अप्रत्यक्षरित्या जातीयवादी लोक या समाजाला त्रास देतांना दिसतात. म्हणूनच या समाजामध्ये धर्मांतरे अजूनही होत आहे. याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे दि. १४ ऑक्टोंबर, १९५६ चे बौद्ध धम्म स्वीकार हे होय. अस्पृश्य समाजातील महार समाजाने मोठ्या प्रमाणात धर्मांतर केलेले आहे. प्रस्तुत ग्रंथात या जातीचा उल्लेख वारंवार आलेला आहे. तसेच मुंबई शहर व उपनगर यांचाच येथे विचार करण्यात आला आहे. धर्मांतरांच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या प्रसंगी मुंबईतील एका प्रमुख घटकाच्या जीवनात धर्मांतरामुळे झालेल्या स्थित्यंतरांची नोंद घेणे हा या विषयाचा हेतू असून त्या अनुषंगाने मुंबईतील अस्पृश्य वर्गाची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती कशी होती याचा अभ्यास येथे करण्यात आला आहे. तसेच अस्पृश्योद्धारासाठी त्या काळात ब्रिटिश सरकार, मिशनरी आणि समाजसुधारक यांनी कोणते प्रयत्न केले याचा आढावा घेण्यात आला आहे. कारण अस्पृश्यांच्या धर्मांतर चळवळीची ती पार्श्वभूमी ठरली आहे. या सर्व घटकांवर प्रकाश टाकण्यासाठी मुंबईची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे.

## १.२ मुंबईचा राजकीय इतिहास :

प्राचीन काळापासून मुंबईवर अनेक देशी-परदेशी लोकांनी राज्य केले. या राजकीय स्थित्यंतराचा परिणाम मुंबईवर होऊन आजची बहुरंगी मुंबई विकसित झाली आहे. पुरातन काळात मुंबईचा अंतर्भाव उत्तर कोकण प्रांतात केला गेला होता. ''मुंबई म्हणजे कोळी लोकांची वस्ती असलेला लहान सात बेटांचा प्रदेश होय. मुंबईच्या नावावरून अनेक संशोधकांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आढळतात. ऐतिहासिक पुराव्याच्या कसोटीला ते उतरत नाहीत.''[२३] ''आज शासकीय दृष्टीने बृहन्मुंबई या नावाने ती ओळखली जाते.''[२४] दि. १५ एप्रिल, १९५० मध्ये बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेचा विस्तार अंधेरीपर्यंत झाला. पुढे दि. १ फेब्रुवारी, १९५७ मध्ये बोरिवली तालुका देखील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आला व ही नगरे मुंबईची उपनगरे म्हणून उदयास आली. मुंबई महाराष्ट्रातील तीस जिल्ह्यांपैकी एक महत्त्वाचा जिल्हा समजला जातो. तिचे भौगोलिक स्थान, इतिहास, राजकीय महत्त्व, आर्थिक विकास, व्यापार, शिक्षण, नागरी सोयी इत्यादी विविध वैशिष्ट्यांमुळे ती इतरांपासून भिन्न आहे. प्राचीन काळापासून अनेक शासक या ठिकाणी येऊन गेले, परंतु मुंबईचा विकास ब्रिटिश सत्तेच्या काळात खऱ्या अर्थाने झाला.

ब्रिटिश काळात ''मुंबई हे भारतातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र व पश्चिम हिंदुस्थानची राजधानी बनली.''[२५] तसेच भारतात मुंबईने औद्योगिक क्षेत्रात खूप प्रगती केली आहे.

उत्तर कोकण-प्राचीन काळात कोकण भाग अपरांत या नावाने ओळखला जात असे. अपरांताच्या सरहद्दीचा भाग म्हणजे मुंबईची सात बेटे होती, १) कुलाबा, २) छोटा कुलाबा, ३) मुंबई, ४) माझगांव, ५) वरळी, ६) परळ, ७) माहीम, 'कोकणातील पहिला राज्यकर्ता मौर्य घराण्यातील सम्राट अशोक होता. इ.स. २६३-२२९ या काळात मुंबई विभाग त्यांच्या साम्राज्याचा भाग होता. ''मौर्याच्या काळात त्यांची राजधानी घारापूरी होती.''[२६] मौर्यानंतर इसवी सनाच्या पहिल्या शतकात या भागाव सातवाहनांचे राज्य होते. इ.स.च्या चौथ्या शतकात कोकण कलचुरी घराण्याकडे गेले. यानंतर चालुक्य व शिलाहारांनी इ.स. आठ ते तेराव्या शतकापर्यंत येथे राज्य केले. सन १२६० ते १३१८ पर्यंत देवगिरीच्या यादवांची येथे सत्ता होती. त्यांच्याच काळात अल्लाउद्दिन खिलजी याने दौलताबाद (देवगिरी) किल्ल्यावर आक्रमण केले. रामदेवरायाच्या मुलगा बिंबदेव (भिमदेव) याने उत्तर कोकणात आपली सत्ता स्थापन केली होती. माहीम ही त्याची

राजधानी होती. भिमदेवाचा मुलगा नागरदेव याच्या जुलमी राजवटीला कंटाळून त्याचाच एका सरदाराने गुजरातच्या सुलतानाची मदत घेऊन इ.स. १३३४ मध्ये नागरदेवाचा पराभव केला. आणि एका हिंदू सत्तेचा नाश झाला. त्यानंतर कोकणावर मुस्लीम सत्ता स्थापन झाली. त्यांनी येथे दोन शतके राज्यकारभार केला. १७ व्या शतकात गुजरातच्या बहादूरशहाचा पोर्तुगीजांनी लष्कराच्या बळावर पराभवर केला आणि मुंबई इ.स. १५३४ मध्ये पोर्तुगीजांच्या ताब्यात गेली. त्यावेळी मुंबईचे स्वरूप एखाद्या गावाप्रमाणे होते. पोर्तुगीजांनी इ.स. १६६५ पर्यंत मुंबईवर राज्य केले. ''पुढे पोर्तुगीज राजकन्या कॅथरिन ब्रिगेन्सा हिचा विवाह ब्रिटनचा राजा चार्ल्स दुसरा याच्याबरोबर १६६५ मध्ये झाला. या विवाहात चार्ल्स याला मुंबई बेट आंदण म्हणून मिळाले.''[२७] इ.स. १६६८ मध्ये इंग्लडच्या राणीने हे बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले. सन १८५७ पर्यंत हे बेट ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात होते. सन १८५७ नंतर हे बेट कंपनीच्या ताब्यातून घेण्यात आले व ते ब्रिटिश राणीच्या नियंत्रणाखाली गेले. येथूनच मुंबईच्या विकासाला सुरुवात झाली.

ब्रिटिशांच्या राजवटीविषयी प्रसिद्ध इतिहासकार रियासदकार स. गो. सरदेसाई म्हणतात, ''हिंदुस्थानात इंग्रजी सत्तेची प्रतिष्ठापना ही जागतिक घडामोड होय. या घडामोडीने, नवीन मनू या देशात निर्माण झाला.''[२८] मुंबई ही त्यांची सर्वात मोठी वखार होती. त्यामुळे या शासनव्यवस्थेचा मुंबईवर परिणाम होणार हे अपरिहार्य होते. मुंबईचे जुने रूप पूर्णपणे बदलले गेले. या बदलाचा पैलू म्हणजे येथे सहजीवनाचा पाया रोवला गेला. मुंबईची संस्कृती प्रथमपासूनच व्यापारी होती. ती, सरंजामशाही व भांडवलदारी यांच्या प्रभावापासून मुक्त होती. आधुनिकीकरण व औद्यागिकरण याचा लाभ मुंबईला सतत झाला. मुंबईचे वर्णन करतांना प्रा. शरावर्ती शिरगावकर लिहितात, ''मराठ्यांच्या अध्यात्मप्रधान, कृषिप्रधान, मध्ययुगीन ग्रामीण संस्कृतीचे चित्र महाराष्ट्रात दिसत असतांना, युरोपच्या विज्ञाननिष्ठ, भौतिकदृष्ट्या प्रगतशील अशा वर्धिष्णू आणि जयष्णू संस्कृतीची चिन्हे मुंबईत दिसत होती.''[२९] कायद्याचे राज्य ही ब्रिटिशांनी मुंबईला दिलेली देणगी आहे. न्याय खाते, पोलीस खाते, नगरपालिका, विद्यापीठ यामुळे मुंबईत स्वच्छ कारभाराची परंपरा निर्माण झाली. त्यातूनच एक तडफदार शासन मुंबईने दिले. समाजात निधर्मवादाची, जातीविरहीत समाजाची कल्पना प्रस्थापित केली. या वसाहतवादाने मुंबईचे स्वरूप बदलले, याच पार्श्वभूमीवर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाची सुरुवात केली. मुंबई

ही त्यांची कर्मभूमी होती. त्यांनी विविध पातळ्यांवर लढा दिला. या लढ्याचे अखेरचे पर्व म्हणजे त्यांचे धर्मांतर होय. या धर्मांतरापूर्वी येथील अस्पृश्य समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे. कारण धर्मांतरापूर्वीची पार्श्वभूमी समजल्याशिवाय धर्मांतराचा विविध क्षेत्रांवर पडलेला प्रभाव समजणार नाही. बौद्ध धम्म समाजात किती रूजला आहे हे पाहण्यासाठी पूर्वीची सामाजिक, राजकीय व धार्मिक जीवन पाहणे आवश्यक असून तरच मूल्यमापन होऊ शकते.

**१.३ ब्रिटिश मुंबईतील राजकीय परिस्थिती :**

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काळात भारताच्या राजकारणात महत्त्वपूर्ण घडामोडी झाल्या. ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचा संबंध देशाशी जोडला गेला. त्यामध्ये मुंबई शहर महत्त्वाचा भाग बनली. देशातील महत्त्वाची घटना म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. या सभेची स्थापना मुंबईत झाली आणि देशाला एक राजकीय व्यासपीठ मिळाले. या व्यासपीठावरून ज्याप्रमाणे राजकीय लढे लढले गेले त्याचप्रमाणे सामाजिक बदलाचे विचारही पुढे आले. सामाजिक प्रबोधनाची सुरुवात ब्रिटिश राजवटीमुळे झाली हे सत्य नाकारता येणार नाही. ब्रिटिशांनी केलेले विविध कायदे, त्यांचे शिक्षणक्षेत्रातील धोरण, औद्योगिकीकरण, व्यापार, दळवळणाची साधने आणि सामाजिक सुधारणा यामुळे प्रबोधनाची सुरुवात झाली. त्यांच्या या सर्व सुधारणांचा फायदा अस्पृश्य वर्गानेही घेतला आणि आपल्याला आलेल्या संधीचा उपयोग करून घेतला. या काळात मोठ्या प्रमाणात अस्पृश्य समाज मुंबईत मोठ्या प्रमाणात एकत्र झालेला होता. त्यांच्यात राजकीय जाणिवेचा विकास झाला होता. अर्थातच त्यांचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते.

**१.४ ब्रिटिश सरकारचे धोरण आणि अस्पृश्य समाज :**

दि. २० ऑगस्ट, १९१६ मध्ये भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी एक घोषणा केली होती. त्यानुसार भारतात जबाबदार शासन पद्धती क्रमशः लागू करून भारतातील स्वायत्त शासनसंस्थांचा हळूहळू विकास घडवून आणणे आणि शासनव्यवस्थेत हिंदी लोकांना अधिक अधिकार द्यायचे ठरले. या घोषणेनुसार भारतातील संस्थानांचा विचार घेण्यात येणार होता.

त्यासाठी मॉन्टेग्यू स्वतः नोव्हेंबर, १९१६ मध्ये भारतात आला. त्यावेळी भारतातील

वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्यासमोर आपले विचार मांडले. मुंबईत अस्पृश्यांच्या वतीने डिप्रेस क्लासेस मिशन ऑफ इंडिया या संस्थेने आपल्या समस्या मांडल्या. ''१९१७ च्या कलकत्ता अधिवेशनात अस्पृश्यता निवारण्याचा ठराव पास करून घेतला होता.''[३०] तसेच ''दि. ८ फेब्रुवारी, १९२० रोजी सोमवंशीय निराश्रित मित्र समाजासमोर कायदे कौन्सिलमध्ये बहिष्कृत वर्गास त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळावेत असे ही विचार प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते सर नारायण चंदावरकर यांनी मांडले होते.''[३१] त्यांचे मते ''जोपर्यंत खालच्या वर्गाचा तिरस्कार होत आहे तोपर्यंत वरच्या वर्गाची उन्नती होण्याची आशा नाही.''[३२]

याच काळात आणखी एक महत्त्वाची घटना घडली. मुस्लीम लीग आणि कॉंग्रेस यांच्यात इ.स. १९१७ मध्ये एक करार झाला होता. या कराराला अस्पृश्यांचा पाठिंबा मिळविणे आवश्यक होते. म्हणून त्यांच्यात अस्पृश्यांविषयी आपुलकीची भावना जागी झाली. यावेळी कॉंग्रेसचे अधिवेशन कलकत्ता येथे भरले होते. या अधिवेशनात असा ठरावा मान्य करण्यात आला की, ''हिंदुस्थानातील मागासवर्गीयांवर जी सामाजिक धार्मिक बंधने लादली आहेत, ती दूर करण्यासाठी प्रत्येक हिंदी माणसाने व कॉंग्रेसच्या प्रत्येक अनुयायाने प्रयत्न केले पाहिजेत. रूढी आणि परंपरानुसार पददलित वर्गावर लादण्यात आलेली सर्व बंधने माणुसकीच्या दृष्टिकोनातून त्वरित दूर करणे आवश्यक आहे. ही सर्व बंधने या वर्गासाठी अत्यंत उद्वेगजनक व क्लेशकारक असून, त्या बंधनामुळे पददलितांचे जीवन असह्य झाले आहे. या लोकांच्या मुलांना शाळेत प्रवेश नाकारण्याची विवेकशून्य बंधने आपण दूर केली पाहिजेत. त्यांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरू दिले जात नाही. ही बंधने आपण दूर केली पाहिजेत.''[३३] कॉंग्रेसच्या इतिहासात पहिल्यांदाच मागासवर्गीयांसाठी ठराव मंजूर करण्यात आला होता. याच काळात हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड आणि भारत मंत्री मॉन्टेग्यू यांनी हिंदुस्थानचा दौरा केल्यानंतर पार्लमेंटने लॉर्ड साउथब्युरो यांच्या अध्यक्षतेखाली मतदान कमिटी फ्रँचाइस कमिटी हिंदुस्थानात पाठविली. या कमिटीने भारतात फिरून लोकांच्या साक्षी जमा केल्या होत्या. त्यात मुंबई प्रांतातून अस्पृश्यांचे नेते विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. आंबेडकर यांनी साक्षी दिल्या होत्या. ''कायदेमंडळ, म्युनिसिपालिटी आणि लोकल बोर्ड यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी असावेत तसेच मुंबई कायदेमंडळात अस्पृश्यांसाठी किमान पाच जागा असाव्यात असे वि. रा. शिंदे यांनी सांगितले होते.''[३४]

इ.स. १९१९ मध्ये जो कायदा झाला, त्यान्वये ''अस्पृश्यांना समान नागरिकत्व, कायदे मंडळात प्रतिनिधित्व, समान हक्क, विषमतेविरूद्ध संरक्षण, राजकीय सत्ता, लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व देण्यात आले, परंतु या सुधारणा कागदोपत्रीच राहिल्या.''[३५] पुढे या कायद्यानुसार दहा वर्षांनी म्हणजे १९२८ मध्ये सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक रॉयल कमिशन नेमण्यात आले होते. राष्ट्रीय कॉंग्रेसने यावर बहिष्कार टाकला होता. इंग्रजांनी भारताची भावी राज्यघटना बनविण्यासाठी भारतीय प्रतिनिधींना आमंत्रित केले होते. अस्पृश्यांच्या दृष्टीने ही घटना महत्त्वाची ठरली. कारण अस्पृश्यांना प्रथमच प्रतिनिधित्व मिळणार होते. या परिषदेला डॉ. आंबेडकर, दिवाणबहादूर आणि श्रीनिवासन हे अस्पृश्यांचे प्रतिनिधी होते. याप्रसंगी डॉ. आंबेडकरांनी एक निवेदन सादर केले. त्यानुसार, ''समान नागरिकत्व, मूलभूत अधिकार, समान अधिकार, सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण, विधान मंडळ व नोकऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व, विशेष विभागीय दक्षता यावर भर देण्यात आला.''[३६] इ.स. १९३१ मध्ये मागासवर्गीयांच्या हिताचा रक्षणासाठी वेगळा शासकीय विभाग काढण्यात आला होता. तर १९३८ मध्ये जातीय निवाड्यानुसार कायदे मंडळात राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या.

अशा तऱ्हेने इ.स. १९१९ ते इ.स. १९३२ पर्यंत ब्राह्मणेतरांनी राजकीय क्षेत्रात हक्क मिळविण्यासाठी जिल्हा, तालुका प्रांतिक कायदेमंडळ आणि कौन्सिल पातळीवर प्रयत्न केले होते. ''मुंबई कायदेमंडळ ही सर्वात जास्त शक्तिशाली आणि प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाची संस्था होती.''[३७] याच कायदेमंडळात सन १९२६ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सरकार नियुक्त सभासद होते. सन १९३५ च्या कायद्यान्वये ''मुंबई विधिमंडळ द्विसभागृही बनविण्यात आले. मुंबई विधान परिषदेतील सभासदांची संख्या तीन आणि विधान सभेत १७५ सभासद असतील अशी तरतूद करण्यात आली. या १७५ जागांपैकी ११५ जागा सर्वसाधारण लोकांसाठी होत्या. त्यात पंधरा जागा या अस्पृश्यांसाठी होत्या.''[३८] डॉ. आंबेडकरांनी याच कायदेमंडळातून आपल्या राजकीय हक्कांची मागणी केलेली दिसते. त्यांच्या कायदेमंडळातील सहभागाची माहिती पुढील प्रकरणात अनुषंगाने येईल.

ब्रिटिशांच्या अगोदर भारतात मुस्लीम राजवट होती. जवळजवळ सातशे वर्षे त्यांनी येथे राज्य केले. राज्य करत असतांना या सत्ताधीशांनी अस्पृश्यांचा उपयोग करून घेतला. परंतु अस्पृश्यता निवारण करण्याचे कोणतेच कार्य केले नाही, किंवा त्यांना कोणत्याही जहागिरी दिल्या

नाहीत. याला अपवाद म्हणजे सन १५२९ मध्ये त्यांना मिळालेली बावन्न हक्क होय. ''मध्ययुगीन काळात बिदरच्या शहाने ते दिले होते. हेच बावन्न हक्क अस्पृश्यांना गावात वंशपरंपरेने डांबून ठेवणारे पाश ठरले.''[३९] परंतु ब्रिटिशांच्या आगमनामुळे ग्रामीण वंशपरंपरागत व्यवस्थेला धक्का बसला आणि यातून सबंध भारतीय समाज ढवळून निघाला. यावेळी भारतीय समाज शेतीप्रधान होता. याला महाराष्ट्र अपवाद नव्हता. याच काळात मुंबईसारख्या शहरात मात्र औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झालेली होती. औद्योगिकरणाबरोबर येणाऱ्या सर्व गोष्टी इथे आल्या. त्यामुळे इतर प्रांतांच्या तुलनेत येथे सामाजिक सुधारणांना अनुकूल वातावरण मिळाले. सामाजिक प्रबोधनाला येथे सुरुवात झाली. मुंबईत अनेक सामाजिक संस्था स्थापन झाल्या. अनेक समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतले. या सामाजिक सुधारणांमध्ये अस्पृश्यतानिवारण हा महत्त्वाचा कार्यक्रम मुंबईत राबविण्यात आला होता. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**१.५ मुंबईतील समाजसुधारक - आणि सामाजिक संस्था :**

**दादोबा पांडुरंग तर्खडकर :** यांनी इ.स. १८४९ मध्ये मुंबईत परमहंस नावाची सभा स्थापना केली होती. ही सभा गुप्तपणे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करीत असे. ''जातीयतेचा विध्वंस हा या सभेचा मुख्य उद्देश होता.''[४०] ''या सभेच्या शाखा मुंबई व पुणे येथे स्थापन झाल्या होत्या. परंतु काही वर्षांनी, इ.स. १८६० मध्ये ही संस्था बंद झाली. कारण या सभेतील त्यांच्याच जातीतील लोकांनी सभेचे गुपित फोडले.''[४१]

**विष्णू भिकाजी गोखले :** सन १८२५ ते १८७२ या काळात त्यांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. प्रचलित जातिभेद हा वेदकालीन वर्णव्यवस्थेला धरून नाही, जातिभेदामुळे आणि सामाजिक विषमतेमुळे हिंदी समाजाची अवनती झाली आहे, सार्वजनिक जीवनात प्रत्येक घटक सारख्या दर्जाचा असून उच्चनीच भाव आणू नये, असे विचार यांनी मांडले. त्यांनी स्वत:च्या आयुष्यात कधीच जातिभेद पाळला नाही. अतिशुद्रांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. दलित वर्गाच्या मागसलेपणाला उच्चवर्णीय जबाबदार आहेत, तसेच त्यांची अवहेलना न करता त्यांना समानतेच्या नात्याने वागविले पाहिजे असे ते म्हणत. त्यांचा सांस्कृतिक विकास करावा, त्यांच्या मंदिर प्रवेशादी न्याय हक्कांना मान्यता द्यावी असे त्यांचे मत होते. मुंबईत जी ख्रिश्चन धर्मांतरे झाली. त्यांना पुन्हा आपल्या धर्मात घेण्याचे कार्य त्यांनी केले.

**आत्माराम पांडुरंग तर्खडकर :** सन १८६४ ते १८६८ या काळात मुंबईत ब्राह्मो समाजाचे प्रसारक म्हणून केशवचंद्र विद्यासागर यांनी कार्य केले. त्यांची भारदस्त व्याख्याने ऐकून, लोक भारावून जात. एवढेच नव्हे तर या काळात परमहंस सभेच्या लोकांनाही वाटले की, आपण ही नवा पंथ स्थापन करावा. त्यातूनच प्रार्थना समाजाची स्थापना झाली. ही सभा दादोबा पांडुरंग याचे बंधू डॉ. आत्माराम पांडुरंग आणि परमहंस सभेचे सभासद मिळून इ.स. १८६७ मध्ये स्थापन झाली. या सभेची चळवळ सुधारणावादी आणि सुशिक्षित लोकांपुरती मर्यादित राहिल्यामुळे ती तळागाळापर्यंत पोहोचू शकली नाही. असे असले तरी या सभेने मुंबईत जे कार्य केले त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. उदा. इ.स. १८७० मध्ये ब्रह्मानंद केशव चंद्रसेन यांनी मुंबईत अस्पृश्यांच्या विकासासाठी काही गोष्टी सुचविल्या होत्या. त्यानुसार ''प्रार्थना समाजाच्या कार्यकर्त्यांनी मुंबईत अस्पृश्यांच्या विकासासाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या होत्या.''[४२] सन १८७० मध्ये मुंबईत प्रार्थना समाजाच्या विद्यमाने अस्पृश्यांसाठी काही शाळा काढल्या होत्या. ''प्रार्थना समाजातील एक श्रीमंत गृहस्थ शेट दामोदर दास सुखवाड यांनी इ.स. १८९१ मध्ये भायखळा येथे एक शाळा स्वखर्चाने काढली होती.''[४३] परंतु ती शाळा फार दिवस चालली नाही. कारण बहुजन समाजाचे सहकार्य त्यांना मिळाले नाही. शिवाय अस्पृश्य समाजाचे देखील फारचे सहकार्य मिळाले नाही.

**महात्मा जोतिबा फुले :** ''इ.स. १८७३ मध्ये महात्मा फुले यांनी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. मुंबईत या सभेची एक शाखा उघडण्यात आली होती.''[४४] मुंबईमध्ये गिरणी व गोदीमधील कामगारांची एक संघटना त्यांनी केली होती व त्यामार्फत कामगारांच्या समस्या सोडविण्याचे यशस्वी प्रयत्न केले होते. ''त्यांच्या या कार्यामुळेच इ.स. १८८३ मध्ये जनतेने त्यांचा सत्कार करून 'महात्मा' ही पदवी दिली होती.''[४५] शिवाय महात्मा फुले हे किसान कामगारांचे पहिले संघटना पुढारी होते. दि. १९ ऑक्टोंबर, १८८२ मध्ये महात्मा फुले, हंटर कमिशनसमोर साक्ष देताना सरकारने बहुजन समाजाच्या शिक्षणाची जबाबदारी उचचली पाहिजे व मुंबई इलाख्यात प्राथमिक शिक्षणाची जी आबाळ होते ती थांबविली पाहिजे असे सांगितले होते. स्त्रीशिक्षण आणि अस्पृश्योद्धार हे त्याचे प्रमुख कार्य होते. पुण्यात त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी इ.स.१८५२ मध्ये शाळा काढली होती. तर इ.स.१८५३ मध्ये महार-मांग इत्यादींना विद्या शिकविण्यासाठी एका मंडळाची स्थापना केली होती. महात्मा फुले १९ व्या शतकातील पहिले कृतिशील समाजसुधारक ठरले.

**ब्राह्मण सभा :** इ.स. १८८४ मध्ये मुंबईत ब्राह्मण सभेची स्थापना झाली होती. या सभेने इ.स. १९२७ मध्ये असा ठराव केला होता की, ''ब्राह्मण सभेच्या मार्फत होणाऱ्या उत्सव समारंभात, व्याख्यान वगैरे प्रसंगी अखिल हिंदू समाजास स्पृश्य-अस्पृश्य इत्यादी भेद न मानता उपस्थित राहण्यास मोकळीक राहिल.''[४६] परंतु हा ठराव पास होण्यासाठी सभेला वीस वर्षाचा काळ लागला. त्यासाठी बरीच तडजोड करून शेवटी ''इ.स. १९४६ या वर्षी हा ठराव पास झाला.''[४७]

**थिऑसफी सोसायटी :** ''ही सोसायटी इ.स. १८७९ मध्ये मुंबईत स्थापन झाली होती. या पंथात सर्वधर्मीय लोक होते. या सुधारणावादी पंथाची धोरणे उच्च व उदात्त होती. परंतु तिचे लोण बहुजनापर्यंत पोहचले नाही.''[४८]

**लोकहितवादी :** महाराष्ट्रातील आणखी एक महत्त्वाचे विचारवंत म्हणजे गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी. ते मुंबई इलाखा सरकारचे व मुंबई कायदेमंडळातील सभासद होते. तसेच ते मुंबई विद्यापीठाचे सिनेट सभासदही होते. त्यांनी प्रभाकर या साप्ताहिकातून इ.स. १८४८ ते १८५० या काळात शतपत्रे लिहिली. ''ब्राह्मणी वर्चस्वावर त्यांनी टीका करून जातिव्यवस्था देशाच्या अधोगतीस कारणीभूत आहे, म्हणून जातिव्यवस्था आणि वर्गव्यवस्थेला विरोध केला होता.''[४९]

**कृष्णराव अर्जुन केळुसकर उर्फ केळुसकर गुरुजी :** प्रार्थना समाजाप्रमाणेच मुंबईतील आणखी एक मोठी संस्था म्हणजे ''मराठा ऐक्येच्छु संस्थाही होती''. इ.स. १८८७ मध्ये या संस्थेची स्थापना केळुसकर गुरुजींनी केली. ''इ.स. १९०४ मध्ये मुंबईत काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. तेव्हा या अधिवेशनात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे असा ठराव मांडण्यात आला होता.''[५०] अस्पृश्य वर्गात जागृती करणे, त्यांना सल्ला देऊन योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य त्यांनी केले. या संस्थेने मागासलेल्या जातीमध्ये परस्परांविषयी समता, प्रेम व ऐक्य निर्माण केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर केळुस्कर गुरुजी यांच्या विचारांचा प्रभाव होता.

**गोपाळ बाबा वलंगकर :** अस्पृश्योद्धाराचे कार्य करणारे गोपाळ बाबा वलंगकर हे अस्पृश्य चळवळीचे पहिले अस्पृश्य समाजातील पुढारी ठरले आहे. ''मुंबई इलाख्यातील अस्पृश्य समाजातील सार्वजनिक काम करणाऱ्या ज्या संस्था कालपरत्वे स्थापन झाल्या, त्यात अनार्य दोषपरिहार मंडळ हिचाही उल्लेख करावा लागेल.''[५१] या संस्थेचे संस्थापक गोपाळ बाबा वलंगकर होते. इ.स. १८८३

मध्ये जेव्हा ब्रिटिश सरकारने अस्पृश्य लोकांना लष्करात भरती करण्यास बंदी घातली तेव्हा त्यांनी सरकारकडे त्याबद्दल अर्ज करून अस्पृश्यांना पुन्हा लष्करात भरती करावे असे सांगितले होते. सामाजिक सुधारणा केल्याशिवाय राजकीय सुधारणा मागण्याचा अधिकार कॉंग्रेसला नाही, असे विचार मांडले होते.

**विठ्ठल रामजी शिंदे :** इ.स. १९०३ ते १९१० या काळात वि .रा. शिंदे हे मुंबई शहरात प्रार्थना समाजाचे प्रसारक म्हणून काम करीत होते. इ.स. १९०६ मध्ये त्यांनी डिप्रेस क्लास मिशन ही संस्था स्थापन केली. मुंबईत परळ, देवनार, मदनपुरा व कामाठीपुरा या भागात त्यांनी शाळा उघडल्या. या संस्थेत शालेय शिक्षण आणि व्यावहारिक शिक्षण यावर भर देण्यात आला होता. उदा. शिवणकाम, विणकाम, सुतारकाम, बुकबाइंडिंग इत्यादी शिक्षण देण्यात येत असे. त्यांनी मागासवर्गीयासाठी वसतिगृहे, सेवासदन व दवाखाने काढले. इ.स. १९१७ च्या कलकत्ता कॉंग्रेस अधिवेशनात अस्पृश्यताबंदीचा ठराव त्यांनी मांडला होता. त्यामध्ये अस्पृश्यांचे किती हाल होतात हे त्यांनी नमूद केले होते. दि. २२ आणि २३ मे, १९१८ या वर्षी मुंबईत अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद भरली होती, ती वि. रा. शिंदे यांच्या प्रयत्नांमुळेच. या परिषदेत लोकमान्य टिळकांनी म्हटले होते की, ''अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी देवास मानणार नाही.''[५२] या परिषदेत अस्पृश्यता निवारण कार्यक्रमाचा जाहीरनामा करण्यात येऊन त्यावर अनेक पुढाऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या होत्या. त्यावर सर्वांत प्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी सही केली होती. लोकमान्य टिळकांनी मात्र सही करण्यास टाळाटाळ केली होती. वि. रा. शिंदे यांनी इ.स. १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहून अस्पृश्यतेवर प्रकाश टाकला होता.

**रावबहादूर सीताराम केशवराव बोले :** मुंबईच्या जडणघडणीमध्ये भंडारी समाजाचा मोठा वाटा आहे. त्यापैकी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे सी. के. बोले होय. मुंबईतील राजकारण, समाजकारण व धर्मकारण यांचा इतिहास रावबहादूर सीताराम केशवराव बोले यांचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय होण्यापूर्वी बोले यांनी अस्पृश्य वर्गाची तन-मन-धन खर्च करून अनेक वर्षे सेवा केली होती. महात्मा फुलेंपासून नेताजी सुभाषचंद्र बोसपर्यंत सर्व नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. सी. के. बोले यांचे समाजकार्य बघून ब्रिटिश सरकारांनी त्यांची मुंबई राज्याच्या कौन्सिलवर निवड केली

होती. कौन्सिलचे सदस्य असतांना त्यांनी इ.स. १९२६ मध्ये ग्रामजोशीच्या बंधनातून समाजाला मुक्त करणारे जोशीवतन विधेयक मांडले व ते मान्य करून घेतले होते. ''इ.स. १९३४ मध्ये देवदासी प्रथा बंद करणारे विधेयक ही मान्य करून घेतले होते.''[५३] त्यांनी मांडलेले सर्वात ऐतिहासिक बिल म्हणजे इ.स. १९२३ सालचे मांडलेले बिल होय. ''अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये, न्यायालये इथे मुक्तदार प्रवेश असावा''[५४] असे ते बिल होते. हे बिल मंजूर करून त्यांनी भारतीय समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेला धक्का दिला. यावेळेस त्यांनी अशी भविष्यवाणी केली होती की, अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणांचा उपभोग घेण्याचा हक्क नाकारला तर हे लोक सामाजिक समतेसाठी बंड करतील, देवळात व पाणवठ्यांसाठी सत्याग्रह करतील. त्यांची ही भविष्यवाणी खरी ठरली. ''याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेचा लढा उभा केला. त्याचप्रमाणे सार्वजनिक विहिरीवर पाणी काढण्यास ज्या नगरपालिका आणि लोकल बोर्ड नकार देतील. त्यांच्या ग्रॅण्ड्स बंद कराव्यात असेही बिल त्यांनी मांडले होते.''[५५] त्यांनी कामगार आणि शेतकरी यांच्या प्रश्नांना विधीमंडळात वाचा फोडली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शालेय जीवनापासून ते त्यांच्या मृत्युपर्यंत त्यांनी बाबासाहेबांच्या सर्व सार्वजनिक कार्याला त्यांनी पाठिंबा दिला होता.

**तुकाराम तात्या पडवळ :** सत्यशोधक समाजाचे मुंबईतील एक महत्त्वाचे कार्यकर्ते तुकाराम तात्या पडवळ. हे भंडारी समाजातील कार्यकर्ते होते. १८६५ मध्ये त्यांनी 'जातिभेद विवेकसार' नावाचा ग्रंथ लिहिला होता. त्याचे प्रकाशन महात्मा फुलेंनी केले होते. त्यांनी परमहंस सभा आणि प्रार्थना समाज या दोन्ही संस्थामध्ये कार्य केले होते. ''जोपर्यंत जातिभेदनिर्मूलन होत नाही तोपर्यंत कनिष्ठ वर्गाची दु:खे नाहीशी होणार नाहीत, असे त्याचे मत होते.''[५६] मुंबईमध्ये महार लोकांची वसति जास्त होती व त्यांना हिंदुंच्या देवळात जाण्यास प्रतिबंध होता. म्हणून महार लोकांसाठी मंदिर बांधण्यासाठी त्यांनी जाहीर सभा घेऊन, निधी गोळा करण्याचे काम केले. ''दि. १० नोव्हेंबर, १९१७ रोजी मुंबईतील महार मंडळींनी लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांना मंदिरप्रवेशासाठी अर्ज केला होता.''[५७] अर्थात हे कृतीत आले नव्हते.

**राजर्षी शाहू महाराज :** अस्पृश्योद्धाराचे कार्य करणारे आणखीन एक कृतिशील कार्यकर्ते म्हणजे राजर्षी शाहू महाराज. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानामध्ये केलेल्या कार्याला तोड नाही.

आरक्षण व मोफत शिक्षण यांच्या सहाय्याने अस्पृश्यांचा विकास केला पाहिजे असे त्यांचे मत होते त्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात ५०% आरक्षण ब्राह्मणेतरांसाठी केले होते. गरीब मुलांना शिष्यवृत्ती देऊन त्यांच्यासाठी वसतिगृहे बांधली. इ.स. १८८७ या वर्षी मुंबईत मराठा ऐक्य सभेमार्फत अस्पृश्यांना शिष्यवृत्ती दिली. तसेच ''इ.स. १९०१ मध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगमध्ये अस्पृश्य मुलांची राहण्याची सोय केली.''[५८] ''विसाव्या शतकातील अस्पृश्यांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मागासवर्गीयांचे उद्धारकर्ते होतील, ही भविष्यवाणी शाहू महाराजांनी माणगाव परिषदेत केली होती.''[५९]

मुंबईतील अस्पृश्य चळवळीचे आणखीन एक कार्यकर्ते म्हणजे रा. वाघमारे. अस्पृश्यांना हिंदूंच्या देवळात जाण्यास व देवाला स्पर्श करून पूजा करण्याची मोकळीक द्या. म्हणजे समाजातील स्पृश्य-अस्पृश्य ही भावना नष्ट होईल असे त्यांचे मत होते. इ.स. १९२३ मध्ये त्यांना लोकप्रिय ही पदवी लोकांनी दिली होती. त्यानंतर १० ते १२ वर्षांनी अस्पृश्यांनी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मंदिरप्रवेशाची चळवळ सुरू केली होती.

अशा प्रकारे समाज सुधारकांनी आपापल्या परीने अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. परंतु त्यांचे प्रयत्न अस्पृश्य आणि उच्चवर्गीय स्पृश्य समाजात एकता निर्माण करू शकले नाहीत. कारण ब्रिटिश राजवटीमुळे ब्राह्मणांच्या हातातून सत्ता गेली होती. परंतु सामाजिक व आर्थिक सत्ता त्यांच्याच हातात होती. त्यामुळे जातिभेदांचे निर्बंध याही काळात होतेच, म्हणून डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''भारतात अनेक महात्मा आले आणि गेले पण अस्पृश्यता मात्र तशीच राहिली.''[६०] अर्थात याला मुंबईसारखे शहरही अपवाद नव्हते. अंधश्रद्धा, बुवाबाजी, स्त्री-अत्याचार, अस्पृश्यता इत्यादी प्रश्न थोड्याफार फरकाने येथेही होतेच.

या काळात प्रत्येक जातीच्या संघटना होत्या. आपापल्यापरीने त्या कार्य करत होत्या. उदा. डेक्कन मराठा असोसिएशन (१८८३), पाठारे क्षत्रिय समाज (१८८५), पाठारे प्रभू क्लब (१८८६), ब्राह्मण सभा (१८१८), स्वारस्वत ब्राह्मण सभा (१८९६), देवज्ञ समाजोन्नती परिषद (१९०८), सोमवंशीय क्षत्रिय समाजोन्नती संघ (१९२०) इत्यादी या संस्थांनी बदलत्या काळाची गरज ओळखून सनातनी विरुद्ध पुरोगामी असा लढा पुकारला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** अस्पृश्यता मुळासकट नष्ट करणारा, त्यांच्यात प्रतिष्ठेची आणि हक्काची जाणीव निर्माण करणारा नेता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. संपूर्ण समाजाला एकत्र आणण्याचे प्रयत्न त्यांनी केले. या कार्याची सुरुवात मुंबईपासूनच सुरू केली व नंतर त्याची चळवळ महाराष्ट्रात, अखंड भारतात पसरली. भारतीय अस्पृश्यांचा ते उद्धारक बनले. त्यांच्या या कार्याची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणात करण्यात आली आहे.

**१.६ मुंबईतील अस्पृश्यांची सामाजिक परिस्थिती :**

भारतीय समाजातील जातिव्यवस्था मुंबईसारख्या शहरातही होती. अर्थात खेड्याप्रमाणे येथील जातिव्यवस्था कठोर नव्हती. म्हणूनच अस्पृश्यांचा मोठा वर्ग येथे स्थलांतरित झालेला होता मुंबईसारख्या शहरात त्यांना अनेक अधिकारांपासून वंचित केलेले होते. हिंदूंच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळत नसे. मुंबादेवा, महालक्ष्मी इत्यादी मंदिरांत लोक आपली जात लपवून जात असत. मुंबईत सार्वजनिक गणेश उत्सवात महार मुलांना मेळाव्यात येऊ देत नसत. अस्पृश्यांना लांबूनच दर्शन घ्यावे लागे. ''दि. १६ ऑक्टोबर, १९२९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भुलेश्वर मंदिरात प्रवेश करण्यासाठी भुलेश्वर मंदिर ट्रस्टीशी पत्रव्यवहार केला होता.''[६१] अर्थात तो प्रयत्न अयशस्वी झाला होता. मुंबईमध्ये म्युनिसीपालटीच्या मराठी शाळांमध्ये पाणी पिण्यासाठी जी भांडी ठेवली जात होती, ती अस्पृश्य मुले, शिक्षक यांना वापरू दिली जात नसत, म्हणून मुंबई मधील कॉर्पोरेशनमधील काही सुधारणावादी सभासदांनी एक ठराव पास केला होता. त्यानुसार ''मुंबई म्युनिसिपल शाळेतील अस्पृश्य विद्यार्थी, शिक्षक आणि स्पृश्य असा भेदभाव करू नये हा ठराव मांडण्यात आला होता.''[६२] तो बहुमताने मान्य झाला होता. मुंबईमध्ये शाळांमध्ये असणारे हेडमास्टर हे उच्चवर्णीय असत. त्यामुळे बऱ्याचदा ही बंदी चालूच होती. त्या काळात दादरला सगळ्या हिंदू समाजाचा सार्वजनिक गणेश उत्सव होत असे, परंतु अस्पृश्यांना त्यात भाग घेता येत नसे. बाबासाहेबांनी तेव्हा एक घोषणा केली होती की, ''तशीच वेळ आली तर आम्ही धर्म सोडू पण आता आम्ही अत्याचार सहन करणार नाही.''[६३] याला उत्तर म्हणून त्यावेळचे ब्राह्मण पत्रकार भालाकार भोपटकर यांनी एका अग्रलेखात लिहिले की, ''उद्यचा कशाला आजच जा.''[६४] हिंदू उपहारगृहांमध्ये अस्पृश्यांना घेण्यात येत नसत. त्यामुळे त्यांना मुसलमानांच्या किंवा इराण्यांचा हॉटेलमध्ये जावे लागे.''[६५] बी. जे. देवरूखकर यांच्या नेतृत्वाखाली हॉटेलमध्ये प्रवेश

मिळविण्यासाठी सत्यागृह करण्यात आला होता. तेव्हा मुंबई महानगर पालिकेने आदेश काढला होता कि, ''जे हॉटेल अस्पृश्यांना प्रवेश देणार नाही, त्याचे परवाने रद्द केले जातील.''[६६] जातीयतेचा संपर्क नसलेल्या तीन संस्था मात्र दादर येथे होत्या. त्या म्हणजे दादरच्या दोन रेल्वेमधील शंकराचे देऊळ, समर्थ व्यायामशाळा, आणि दादर स्टेशनसमोरील दादा काग्यांचे हॉटेल. मुंबईत परळ भागात पोयबावडी, धडिवाली हॉल, येथे अस्पृश्य मुलांचे कसे हाल होतात, त्यांचे वर्णन मूकनायक पत्रात केलेले दिसते. असे असले तरी मुंबईत मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता पाळली जात नसे. ब्रिटिश शासनव्यवस्थेमुळे मुंबईचे वातावरण खेड्यांपेक्षा तसेच इतर शहरांपेक्षा वेगळे होते. अस्पृश्यांना अनेक सवलती येथे उपलब्ध झालेल्या होत्या. त्यामुळे त्यांचा विकास होण्यास तसेच त्यांच्यात चळवळी निर्माण होण्यास अनुकूल परिस्थिती येथे निर्माण झाली होती. या परिस्थितीमुळेच खेड्यातील जातिव्यवस्थेला कंटाळून हजारो लोक महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून येथे स्थलांतरित झाले होते. ब्रिटिशांनी आपल्या राज्यात शांतता, सुव्यवस्था व न्याय प्रस्थापित केला होता. त्यामुळे पोर्तुगीज अंमलाखालील प्रदेशातूनही लोक येथे येऊ लागले. ब्रिटिशांच्या मुंबई इलाख्याचे मुंबई हे शहर राजधानीचे शहर होते. त्यामुळे मुंबई शहर या काळात भरभराटीला आले होते. ब्रिटिशांनी आधुनिक पद्धतीने मुंबईची आखणी केली होती. मुंबई हे बंदर असल्यामुळे विविध उद्योगधंदे येथे स्थापन करण्यात आले होते. तार खाते, रेल्वे, कारखाने, गोदी, पोस्ट खाते, कापड उद्योग अशा अनेक क्षेत्रांत हजारो लोकांना काम मिळाले होते. पोलीस, उच्च न्यायालय, नगरपालिका यांच्या स्थापनेमुळे लोकांना सुरक्षित जीवनाची हमी मिळाली होती. या सर्वांचा परिणाम म्हणजे हजारो लोकांचा लोंढा येथे येऊ लागला. त्यात अनेक धर्मांचे, पंथांचे, जातींचे लोक एकत्र येऊ लागले होते.

महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, नगर कोकण, इ. विविध भागांतून लोक मुंबई शहराकडे येऊ लागले होते. खेड्यांतील पाटील, कुलकर्णी व खोत यांची वेठबिगारी करण्यापेक्षा कष्टाचे मोल करणारी शहरातील मजुरी बरी, असा विचार करून अनेकांनी खेडी सोडली. खेडी ही जातिव्यवस्थेचे अड्डे होते. स्थलांतरित लोकांनी गोदी, कारखाने, म्युनिसिपालिटी, रेल्वे, गिरण्या, दवाखाने, इ. ठिकाणी काम करण्यास सुरुवात केली. इथल्या, खेड्यातील वर्णव्यवस्थेच्या वातावरणापेक्षा जातीविरहित वातावरणात त्यांना वेगळे अनुभव आले. झोपड्यांमधून

किंवा चाळीमधून मिळेल तेथे हे लोक वस्ती करू लागले. त्यांच्या वसाहती आकार येऊ लागल्या. शहरातील विविध सुखसोयी, सुधारणांचा फायदा ते घेऊ लागले. पुरुषांबरोबर स्त्रियासुद्धा घराबाहेर पडू लागल्या होत्या. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारू लागली होती. शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळू लागले होते. याच वसाहतींमधून डॉ. आंबेडकरांना भविष्यकाळात पाठिंबा मिळाला. याच वसाहती त्यांच्या सर्व चळवळीच्या प्रसारास कारणीभूत ठरल्या. या वसाहती म्हणजे डॉ. आंबेडकरांची कर्मभूमी ठरली. येथेच त्याचे शैक्षणिक जीवन सुरू झाले होते. त्याचे नेतृत्व येथेच उदयास आले. मुंबई शहराने त्यांना अनुकूल वातावरण दिले. अस्पृश्य समाजाप्रमाणेच स्पृश्य समाजातील लोकांनीही त्यांना सहकार्य केले, हे सत्य नाकारता येणार नाही. मुंबईत जातीयतेची बंधने जास्त नसल्यामुळेच बाबासाहेब हे सर्व करू शकले. आपली सामाजिक चळवळीचे लढे सत्याग्रह मुंबईबाहेर त्यांनी केले, हे त्याचे प्रमाण आहे.

**१.७ मुंबईतील अस्पृश्यांची आर्थिक स्थिती :**

''अस्पृश्यांचा स्पृश्य हिंदूबरोबर चाललेला लढा बाह्यतः जातीय असला तरी त्याचे मूळ अस्पृश्यांच्या आर्थिक गुलामगिरीत आहे, हे बाबासाहेबांनी ओळखले होते आणि जोपर्यंत हिंदू शासक राजकर्ते आहेत तोपर्यंत अस्पृश्यांची गुलामगिरी दूर होणे शक्य नव्हते. तसेच पोर्तुगीज काळातही त्यांचा विकास झाला नव्हता. कारण त्यांनी ख्रिस्ती प्रार्थनास्थळे व ख्रिश्चन धर्माचे शिक्षण देण्यावर भर दिला होता, आणि तशा शिक्षणसंस्था मुंबईत स्थापन केल्या होत्या.''[६७] ब्रिटिशांनी मात्र स्वतःच्या स्वार्थासाठी का होईना मुंबईचा विकास घडवून आणण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नामुळेच मुंबई हे वसाहतीचे शहर म्हणून ओळखले जाऊ लागले.

अठराव्या शतकापासून मुंबईची आर्थिक भरभराट होण्यास सुरुवात झाली होती. एकोणिसाव्या शतकात आणखी एक महत्त्वाची घटना घडली, ती म्हणजे इ.स. १८१८ मध्ये इंग्रज-मराठा युद्धामध्ये मराठ्यांचा पराभव होऊन पेशवाईचा अंत झाला. यामुळे पुणे शहराचे महत्त्व कमी झाले. त्यानंतर दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे सन १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता बरखास्त होऊन भारताचा राज्य कारभार ब्रिटिश पार्लमेंटकडे गेला. तेव्हा मुंबई प्रातांत महाराष्ट्र, गुजरात, सिंध व कर्नाटकाचा काही भाग होता. मुंबईचा विकास होण्याचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे १९ व्या शतकात ब्रिटिशांनी मुंबईत केलेला औद्योगिक विकास होय. त्यांनी मुंबईला

आर्थिक विकासाचे केंद्र बनविले होते. प्रथम त्यांनी मुंबईत लोकवस्ती वसवून व्यापार-उद्योगधंदे वाढविण्यास सुरुवात केली. कापडउद्योग हा सर्वात मोठा उद्योग व्यवसाय मुंबईत सुरू केला. कापूस व अफू यांच्या व्यापाराला चालना दिली. जहाज बांधणीचा उद्योग त्यांनी सुरतवरून मुंबईला आणला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात येथे रोजगार उपलब्ध होऊन भारतातून हजारो लोक येथे येऊ लागले. रोजगाराप्रमाणेच नागरी सोयी येथे उपलब्ध केल्या. सार्वजनिक दवाखाने, शाळा, रेल्वे, बस, वीज इत्यादी सुविधा तत्परतेने येथे मिळू लागल्या. शिवाय मुंबईत खेड्यातील रूढी-चालीरीती इथे नव्हत्या. त्यामुळे अस्पृश्यांचे मोठ्या प्रमाणात येथे स्थलांतर झाले, त्यांच्या गुणांना येथे वाव मिळला. ब्रिटिश लष्करात मोठ्या संख्येने त्यांनी काम करण्यास सुरुवात केली.

**गिरणी कामगार :** ''सन १८५० ते १९५० या काळात कोकणातून व घाटमाथ्यावरून जे लोक रोजगारासाठी मुंबईत आले, त्यांपैकी ३:२ प्रमाणात लोक गिरणीमध्ये काम करत होते.''[६८] १८६४ च्या जनगणेनुसार मुंबईत ३.९% दलित होते. १८६२ मध्ये ४.८६% होते, १९०१ मध्ये मुंबईमध्ये याच काळात जास्त स्थलांतर झालेले आहे. ९.३८% एवढे प्रमाण वाढले. यावेळी गिरणी कामगात असलेली टक्केवारीसुद्धा वाढली. ''१९७२ मध्ये .०९९%, १९११ मध्ये ९.०५%, १९२१ मध्ये १९.११%, १९४१ मध्ये १३.८१%, १९२१ पासून दलित गिरणी कामगाराचे प्रमाण त्यांचा एकूण लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक दिसू लागले.''[६९] या गिरणी कामगारांमध्ये सर्वात जास्त अस्पृश्यांचा भरणा होता. गावाबाहेर रहाणारी ही माणसे मुंबईत मात्र वाड्यांमधून, चाळीमूधन राहू लागली. या चाळ पद्धतीतून त्यांची संस्कृतीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. अर्थात येथेही जात त्यांच्या आर्थिक विकासाच्या आड येत होती. उदा. गिरणीमध्ये त्यांना मोठ्या पगाराच्या, हुद्याच्या जागा मिळत नसत. अस्पृश्यतेमुळे त्यांना विव्हिंग खात्यात कामावर घेत नसत. या खात्यात जास्त पगार असे. अस्पृश्य कामगार त्या कामात हुशार असूनही त्याला ते काम दिले जात नसे. अस्पृश्य कामगार त्या कामात हुशार असूनही त्यांना ते काम दिले जात नसे. अस्पृश्य कामगाराला मोठ्यात मोठी नोकरी मिळत असे. ती म्हणजे तेलवाल्यांची (जॉबर) मास्तरची नोकरी[७०] कापड खात्यात सुद्धा जेथे पगार जास्त असे तेथे अस्पृश्यांना नोकरी दिली जात नसे. ''गिरणीत बऱ्याचदा स्पृश्य-अस्पृश्य असा भेद केला जाई. त्यामुळे कापड खात्यात अस्पृश्य कामगारांना घेत नसत, कारण कापड खात्यात सूत तोंडाने धरावे लागे.''[७१] स्पर्शाच्या भीतीमुळे अस्पृश्यांना कापड खात्यात घेत

नसत. फक्त सूतकताई विभागात काम करण्यास देण्यात येई व येथे सर्वांत कमी पगार असत. विशेष म्हणजे यात गिरणी मालकाचा स्पृश्य-अस्पृश्यतेच्या बाबतीत काहीच प्रश्न नव्हत. जेव्हा गिरणीमध्ये नोकर कपात केली जाई, तेव्हा तेव्हा अस्पृश्य वर्गातील कामगारांनाच सर्वप्रथम कामावरून काढले जाई. उदा. सन १९२९ मध्ये जेव्हा कापडमंदी भारतात आली तसेच याच वर्षी जागतिक मंदीचा तडाखा बसला, तेव्हा गिरणी मालकांनी नोकरकपातीचे व बोनस देण्याचे तसेच महागाई भत्ता व वेतनकपातीचे धोरण स्वीकारले होते. तेव्हा गिरणी कामगारांनी आपला निषेध म्हणून संप केला होता. हा संप अनेक वर्षे चालला. ''या संपात बहिष्कृत वर्गाचे व मुसलमान वर्गाचे कामगार सामील नव्हते.''[७२] परंतु जेव्हा नोकरकपात करण्याची वेळ आली तेव्हा मात्र अस्पृश्य वर्गाच्या लोकांना कमी करण्यात आले. कामगारांवर होणाऱ्या या अन्यायाला वाचा फोडण्याचे काममुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. मुंबईतील कापड उद्योगामुळे दलितांना लाभ मिळाला. त्यामुळे येथील दलितांची चळवळ अधिक बलशाली आणि प्रभावशाली झाली. औद्योगिक कामगारांच्या लढ्यामुळे दलित चळवळ महाराष्ट्रात मुंबईमध्ये फोफावली.

**रेल्वे कामगार** : गिरणीप्रमाणेच रेल्वे खात्यातही अस्पृश्यांचा मोठा भरणा होता. याही ठिकाणी त्यांना वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळत नसत. उच्चवर्णीय लोक जाणूनबुजून त्यांना अडथळे निर्माण करीत. अस्पृश्यांना गँगमनच्या हुद्यापलीकडे क्वचितच नोकरी मिळत असे. त्यांना पोर्टरच्या जागा दिल्या जात असे. बऱ्याचदा स्टेशन मास्तर या पोर्टरला नोकरीवर ठेवत नसे. कारण स्टेशन मास्तर बहुतेक ब्राह्मण असत. त्यामुळे तो अस्पृश्य पोर्टरला विरोध करत असे. कारण पोर्टरला स्टेशन मास्टरच्या घरी कामे करावी लागत असत. त्यामुळे तो पोर्टरच्या जागेवर स्पृश्य माणसाची नेमणूक करीत असे.

रेल्वेमध्ये कारकुनाची निवड करताना त्या काळात पात्रता परीक्षा नसे. मॅट्रिक पास नसलेल्या व्यक्तीचीसुद्धा नेमणून करण्यात येत असे. ख्रिश्चन, ॲग्लो इंडियन, उच्चवर्णीय हिंदू असे शेकडो नॉनमॅट्रिक लोक रेल्वेत काम करीत असत. परंतु अस्पृश्यांना पद्धतशीरपणे डावलण्यात येई. क्वचित प्रसंगी एखाद्याला संधी मिळत असे.

अशीच परिस्थिती रेल्वे वर्कशॉपमध्येही होती. मेकॅनिकच्या जागा खालच्या जातीतील व्यक्तींना क्वचित मिळत असत. फोरमनसारख्या जागा क्वचितच मिळे. त्यामुळे अस्पृश्य हे केवळ

हमालच असत. अशा प्रकारे अस्पृश्य समाजाच्या लोकांना नोकरी देतांना शेवटचा नंबर असे. परंतु नोकरीवरून काढताना मात्र पहिला नंबर असे.

**महानगरपालिका कामगार :** मुंबई महानगरपालिकेत अस्पृश्य वर्गाचा फार मोठा भरणा सफाई कामगार म्हणून होता. हे कर्मचारी बाहेरून मुंबईत आलेले होते. गिरणी, रेल्वे, गोदी याप्रमाणेच येथील कामगार ही उपेक्षितच होता. संपूर्ण मुंबईचे आरोग्य स्वच्छ ठेवण्याचे काम ते करत असत. परंतु त्यांच्या मात्र साध्या जीवनावश्यक गरजा सुद्धा भागविल्या जात नसत. काम करतांना त्यांच्या सुरक्षिततेची कोणतीही साधने उपलब्ध नसत. काम करतांना एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला कोणतीच मदत मिळत नसे. हे सफाई कामगार गलिच्छ झोपडयामध्ये रहात असत. जिथे पिण्याच्या पाण्याची, सांडपाण्याची कोणतीच सोय नसे. बऱ्याचदा त्यांना झोपडीसुद्धा नसे. पालिकेच्या या चतुर्थ वर्गाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागे. याउलट महानगरपालिकेतील इतर लोकांना चांगली घरे, इतर सोयी मिळत असत. या सर्व कामगारांना संघटित करण्याचे प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केले. सन १९३७ मध्ये त्यांनी मुंबईत कामगार संघाची स्थापना केली. तर सन १९४२ मध्ये भारतातील सर्व कामगारांना संघटित करण्यासाठी ऑल इंडिया म्युनिसिपल वर्कर्स फेडरेशनची स्थापना केली.

अशा प्रकारे मुंबईतील अस्पृश्य वर्गाची अवस्था होती. मग ते महानगरपालिकेतील सफाई काम करणारे कामगार असोत, गिरणीत तारण खात्यातील कामगार असो अथवा रेल्वेतील हमाल असो, त्यांना गलिच्छ वस्तीतून राहणे, अर्धपोटी जीवन जगणे, तुटपुंजा पगार घेणे, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता, अनारोग्य अशा विविध समस्यांना तोंड द्यावे लागे. राज्यकर्ते मात्र सार्वजनिक सुरक्षिततेच्या तसेच अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली कायद्यांचा वापर करून अस्पृश्यांकडून सेवा करवून घेत होते.

### १.८ मुंबईतील अस्पृश्यांची शैक्षणिक स्थिती :

मुंबई इलाख्याचा सर्व कारभार मुंबईतून गव्हर्नर जनरल पाहत असे. मुंबईमध्ये विविध प्रकारचे बदल त्यांनी घडवून आणले. शिक्षण क्षेत्रातही आमूलाग्र बदल त्यांनी केला. शैक्षणिक क्षेत्रात ब्रिटिशांनी उचलले महत्त्वाचे पाऊल म्हणजे त्यांनी शिक्षण धर्मापासून वेगळे केले. शिक्षणात भौतिक व वैज्ञानिक दृष्टिकोन आणला. त्यामुळे भारतीय तरुणांना हे ज्ञान मिळू लागले. या

ज्ञानामुळे भारतात वैचारिक क्रांती घडून आली. ''सन १८१५ मध्ये मुंबई बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली.''[७३] या संस्थेच्या शाळा फक्त युरोपियन लोकांसाठी होत्या. या सोसायटीच्या देखरेखीखाली दि. १० ऑगस्ट सन १८१८ रोजी खास नेटिव्ह लोकांसाठी शाळा काढण्यात आल्या. सन १८२३ मध्ये एलफिन्स्टन यांच्या प्रेरणेने खास नेटिव्ह लोकांची सोसायटी स्थापना झाली. तिचे नाव बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी असे होते. या शाखेच्या अनेक शाळा मुंबईत सुरू झाल्या. ''ब्रिटिश सत्ता स्थापन होण्याअगोदर ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटिशन पार्लमेंटने सन १८१३ च्या सनदी कायद्यानुसार भारतीयांच्या शिक्षणावर प्रतिवर्ष एक लाख रुपये खर्च करावे असे बंधन घातले होते.''[७४] सन १८२४ मध्ये मुंबईत इंग्रजी शाळेची स्थापना झाली. ती एलफिन्स्टन या नावाने ओळखली जाते. सन १८३४ मध्ये एलफिन्स्टन यांच्या नावाने महाविद्यालय काढण्यात आले. एलफिन्स्टन याने मुंबईत आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. या संस्थेमध्ये गरीब मुलांना नोकरी दिली जात असे.

सन १८४० या वर्षी बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली. सन १८५५ पर्यंत त्यांच्या इंग्रजी माध्यमाच्या पंधरा शाळा होत्या. हे बोर्ड बरखास्त करण्यात आले व त्यांच्या जागी एका स्वतंत्र शिक्षण खात्याची निर्मिती करण्यात आली. या काळातील महत्त्वाची घटना म्हणजे ऑगस्ट १८५५ मध्ये अहमदनगर येथील एका रहिवाशाने बोर्डाकडे निवेदन पाठविले होते. त्यामध्ये दलितांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन करण्यासाठी विनंती केली होती. ही विनंती बोर्डाने मान्य केली आणि दलितांसाठी शाळा स्थापन करण्यात आली. ''दलितांसाठी खास शाळा स्थापन करण्याचा हा एक महत्त्वाचा टप्पा होता.''[७५]

मुंबई प्रांतामध्ये मात्र सन १८५५ पूर्वी अस्पृश्यांसाठी कोणतीही शाळा उघडण्यात आली नव्हती. उलट शिक्षणाचा लाभ अस्पृश्यांना होऊ नये म्हणून त्यांना हेतूपुरस्सर दूर ठेवले जाई. कारण त्यांच्या शिक्षणामुळे हिंदू समाजाची मने दुखवली जातील, तसेच त्यांच्या प्रस्थापित मानसिकतेला धोका पोहोचल्यास ब्रिटिशांना राजकारण करणे कठीण होईल, म्हणून अस्पृश्यांना शिक्षणापासून दूर ठेवले जाई. हे एलफिन्स्टन यांच्या विधानावरून समजले. एलफिन्स्टन लिहितो की, ''ख्रिश्चन मिशनरींना दलित जातीतील मुले ही शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त असलेले सर्वोत्कृष्ट विद्यार्थी वाटतात.''[७६] ''पण आपले राज्य व्यापक पायावर उभे राहावे असे वाटत असेल तर

दलितांच्या शिक्षणाच्या प्रसाराचे धोरण या आपल्या राजवटीला आधार देण्याच्या विरोधी आहे.''[७७] असे असले तरी ''एलफिन्स्टनच्या कर्तबगारीमुळे सन १९२० नंतर सरकारने अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविण्यास सुरुवात केली''[७८] हे सत्य नाकारता येणार नाही.

मुंबई इलाख्यात सरकारी शाळांमध्ये अस्पृश्यांना प्रवेश देण्यात येऊ लागला. परंतु याला ब्राह्मण शिक्षकांनी विरोध केला. ''हे शिक्षक अस्पृश्य विद्यार्थांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देत असत. त्यांना स्पृश्य मुलांबरोबर बसता येत नसे, पाणी पिता येत नसे, काही शिक्षक अस्पृश्यांना छडीने सुद्धा मारत नसत, कारण विटाळ होईल म्हणून. विद्यार्थ्याला शिक्षा देण्यासाठी मातीचे गोळे फेकून मारत असत.''[७९] १९२८ मध्ये एक ठराव करण्यात आला होता. त्यानुसार स्पर्शास्पर्श भेद बाजूला सारून मुंबईच्या महानगरपालिकेतील प्रत्येक शाळेत कोणालाही मज्जाव मिळावा व शिक्षणाचा उपयोग सर्वांना सारखा मिळावा, असा तो ठराव होता. शाळेत लोटीबंदीचा ठरावही झाला होता.

### १.९ मिशनरीचे मुंबईतील शैक्षणिक कार्य :

शैक्षणिक क्षेत्रात मिशनरीचे योगदान आहे. सन १८१५ ते १८५० हा काळ मिशनरींचा कर्तबगारीचा काळ आहे. ख्रिस्ती धर्मप्रसार करत असतांनाच त्यांनी शिक्षण क्षेत्रालाही महत्त्व दिले. त्यांच्या आगमनाने भारतीय समाजात धार्मिक व सामाजिक क्षेत्रात खळबळ निर्माण झाली. मुंबईतील सर्वात पहिला मिशनरी डॉ. टेलर सन १८०७ मध्ये मुंबई बेटावर उतरला होता. त्यांच्या नंतर सन १८२२ मध्ये स्कॉटिश मिशनरी सोसायटीने आपले मिशनरी मुंबईत पाठविले होते. सुरुवातीला ब्रिटिश सरकारने मिशनरींना विरोध केला होता. कारण त्यांना भारतावर राज्य करायचे होते. भारतीयांच्या भावना दुखविल्या जातील असे कोणतेच काम त्यांना करायचे नव्हते. परंतु ''१८१३-१८१८ या काळात मिशनरींनी मुंबईत येऊन गिरगावात खेतवाडी येथे मराठी लोकांसाठी शाळा काढल्या. त्यांनी सन १८२४ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढली.''[८०] मुंबईतील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे नाव म्हणजे डॉ. विल्सन. यांनी आपल्या पत्नीसमवेत मुंबईत शाळा काढल्या. मुलांप्रमाणेच मुलींच्या देखील शाळा काढल्या. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी मराठीत वृत्तपत्रे व नियतकालिके काढून भारतीय समाजातील अनिष्ठ चालीरीती, रूढी-परंपरा व जातिव्यवस्था यावर प्रहार केला. गरीब व अस्पृश्य लोकांसाठी शाळांबरोबर,

दवाखाने उघडून तेथे मोफत उपचार करण्याची सोय केली होती. दुष्काळ, महापूर, रोगराई अशा प्रसंगी मदत केली. अस्पृश्यांच्या शिखणाकडे जरी सरकारने फारसे लक्ष दिले नसले तरी मिशनरींनी मात्र अनेक गावात अस्पृश्यांच्या वस्ती शेजारी शाळा सुरू केल्या होत्या. अस्पृश्यांच्या वस्त्यामध्ये जाऊन त्यांच्याशी ते एकरूप होत, ज्यांच्या स्पर्शानेही विटाळ होत असे. अशा बहिष्कृत समाजाला मानवतावादी दृष्टीने त्यांनी जवळ घेतले. धर्मांतर हा त्यांचा जरी उद्देश असला तरी त्याबरोबर लोकोपयोगी कार्य मिशनऱ्यांनी केले आणि अस्पृश्यांच्या विकासाच्या सर्व वाटा त्यांनी मोकळ्या केल्या होत्या.

**१.१० अस्पृश्यांचा लष्करी पेशा :**

चातुर्वर्ण्य व्यवस्थेत फक्त क्षत्रियांना शस्त्र धरण्याचा अधिकार होता. शुद्र, अस्पृश्य यांनी शस्त्र हातात धरणे म्हणजे धर्म भ्रष्ट करणे समजले जाई आणि जर तसा कोणी प्रयत्न केलाच तर त्याला शिरच्छेदासारखी शिक्षा दिली जाई. त्यामुळे हे धार्मिक कायदे तोडण्याचे कोणी धाडस करत नसत. परंतु मध्ययुगात मुस्लीम शासनकर्त्यांनी मात्र आपल्या सैन्यात शुद्रांना व अस्पृश्यांना भरती केले होते. तसेच शिवाजी महाराजांच्या सैन्यातदेखील त्यांचा समावेश होता. आधुनिक काळात ब्रिटिशांनीसुद्धा त्यांचा लष्करात भरणा केला. सन १८५७ पर्यंत आणि नंतर त्यांनी ज्या पलटणी उभ्या केल्या होत्या त्यात अस्पृश्य समाजातील महार जमातीचा मोठा भरणा होता. त्यांची खास महार बटालियन होती. परंतु याही ठिकाणी अस्पृश्यांच्या वाटेत जात आडवी आलेली दिसते. सन १८५८ ते १८९० या काळात सैनिकांच्या मनात जातीयतेची लाट उसळली. लष्करातील स्पृश्य लोकांना अस्पृश्यांच्या बरोबरीने तसेच अस्पृश्य अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणे कमीपणाचे वाटू लागले. त्यातूनच स्पृश्य-अस्पृश्य संघर्ष निर्माण झाला. ''ही परिस्थिती अशीच राहिली तर हिंदी सैनिकांना सन १८५७ च्या उठावाची पुनरावृत्ती करण्याची बुद्धी होईल आणि तसे झाले तर आपले साम्राज्य धोक्यात येईल, अशी भीती ब्रिटिश मिलिटरी लोकांना वाटू लागली.''[८१] ''म्हणून ब्रिटिशांनी आपल्या लष्कराची पुनर्रचना सन १८८५ मध्ये केली. त्यावेळी ब्रिटिशांनी सर्वात प्रथम अस्पृश्यांची लष्करात भरती बंद केली. तसेच लष्करात अस्पृश्यांचा ज्या पलटणी होत्या व जे अस्पृश्य अधिकारी होते त्यांना नोकरीतून काढून टाकले.''[८२] अशा प्रकारे येथेसुद्धा ही जातिव्यवस्था अस्पृश्यांच्या विकासाच्या आड आली होती.

अशा असले तरी लष्करी पेशा अस्पृश्यांच्या स्थितीत सुधारणा घडविण्यास कारणीभूत ठरला, हे सत्य नाकारता येणार नाही. कारण इंग्रजांच्या सैन्यात त्यांना आधुनिक पद्धतीचे लष्करी शिक्षण मिळाले. शहरात आल्यावर त्यांना नोकरी, चांगले शिक्षण व प्रतिष्ठा मिळू लागली. त्यांचे राहणीमान चांगले झाले. या सेवानिवृत्त सैनिकांच्या वसाहती निर्माण झाल्या. गावगाड्याचे चाकोरी बंद जीवन संपले. त्यांच्या संस्कारात बदल होऊन त्यातून सामाजिक जागृती निर्माण झाली. ''अस्पृश्यांच्या ज्या चळवळी उदयास आल्या त्यात प्रामुख्याने सेवानिवृत्त अधिकारी पुढे होते. याच लष्करी पेशाची परंपरा असणाऱ्या कुटुंबात डॉ. आंबेडकरांचा जन्म झाला होता.''[८३]

**१.११ सारांश :**

अशा प्रकारे भारतीय समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची पार्श्वभूमी ठरली आणि त्यांच्या चळवळीचे मुख्य केंद्र मुंबई झाले. कारण ब्रिटिश शासन हे त्यांच्या चळवळीला पोषक वातावरण निर्माण करू शकले.

## १.१२ संदर्भ :


१. Moon Vasant, edited, Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches, Vol. I, Gove. of Maharashtra, Mumbai, 1979, Page No. 6.

२. नेहरू जवाहरलाल, साने गुरुजी, (अनु.), भारताचा शोध, कॉन्टिनेंटल, पुणे, १९८९, पृष्ठ क्र. ८४-८५.

३. मून वसंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १७/२, भाग १, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृष्ठ क्र. ६.

४. भट्टाचार्य श्री. श./बळेकर दा. सा., ऋग्वेद संहिता मंडळ, १०, सुत्त ९०, श्लोक १२, महाराष्ट्र विविध विज्ञान संशोधन, १९४०, पृष्ठ क्र. ७०७.

५. माटे श्री. म., भगवत गीता परामर्श, श्लोक १३, अध्याय ४, ठोकळ, पुणे, पृष्ठ क्र. ११.

६. जोशी रा. अं. संपा., श्री सार्थ मनुस्मृती अध्याय ३, गुरुदेव, पुणे क्र. १७.

७. कित्ता, पृष्ठ क्र. २५७.

८. पवार दया (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९९, पृष्ठ क्र. ३०.

९. कालेलकर गो. म. (संपा.), मुंबई इलाख्यातील जाती, श्री लक्ष्मीनारायण छापखाना, मुंबई, १९२८, पृष्ठ क्र. ३६४.

१०. डॉ. आंबेडकर बी. आर., खैरमोडे चां. भ. अनु., अस्पृश्य पूर्वी कोण होते ? आणि ते अस्पृश्य कसे बनले ? सुधीर, वर्धा, पृष्ठ क्र. १४७.

११. डॉ. आंबेडकर बी. आर., खैरेमोडे, चां. भ. अनु., शुद्र पूर्वी कोण होते ? क्षितिज, नागपूर, १९९८, पृष्ठ क्र. २१३.

१२. शिंदे वि. रा., भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्य, आवृत्ती दुसरी, औरंगाबाद, २००३, पृष्ठ क्र.२१३.

१३. Narke Hari, edited, Dr. Ambedkar Writings and Speeches, Vol. 1712, Govt. of Maharashtra, Mumbai, 2003, Page No. 138.

१४. ऑमव्हेट गेल, दिघे पी.डी., वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र. २५.

१५. माटे श्री. म., अस्पृश्यांचा प्रश्न, लोकसंग्रह, पुणे, १९३३, पृष्ठ क्र. १६.

१६. ऑमव्हेट गेल, दिघे पी.डी., वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र. ३०.

१७. मुरुगकर लता, दलित पँथर चळवळ, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र. ९६.

१८. तत्रैव, पृष्ठ क्र. ९६.

१९. Prasad Vijay, Untouchable Freedome Story of a Dalit Community, Oxfort University, New Delhi, 2000, Page No. 13.

२०. महास्थाविर संघरक्षीत, धम्मचारी विमलकिर्ती, अनु. डॉ. आंबेडकर आणि बौद्ध धम्म, दि कॉर्पोरेशन बॉडी ऑफ दी बुद्धा एज्युकेशन फाऊंडेशन, तैवान, २००६ पृष्ठ क्र. ३६.

२१. Patawardhan Sunanda, Changes Among Indian Harijan, Orient Logman, 1973, Page No. 25.

२२. कांबळे बबन, संपा., दैनिक सम्राट, दि. २३ जानेवारी २००६, पृष्ठ क्र. ४.

२३. गुळवणे वा. रा., ब्राह्मण सभेची साठ वर्षे, ब्राह्मण सभा, गिरगांव, मुंबई, १९४९, पृष्ठ क्र. २.

२४. चौधरी के. के., संपा., गॅझेटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य, गॅझेटियर डिपार्टमेंट, १९८६, मुंबई, पृष्ठ क्र. २.

२५. नाईक बापूराव, संपा., मुंबईचा वृत्तांत, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८०, पृष्ठ क्र. २०.

२६. बाळ प्रकाश (संपा.), मुंबई कालची आणि आजची, न्यू प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९९७, पृष्ठ क्र. २०.

२७. चौधरी के. के., गॅझेटिअर ऑफ इंडिया, ग्रेटर बॉम्बे, डिस्ट्रीक, भाग ३, महाराष्ट्र गर्व्हमेंट, मुंबई, १९८६, पृष्ठ क्र. ८९.

२८. सरदेसाई गो. स., ब्रिटिश रियासद, के. बी. ढवळे, मुंबई, १९३९, पृष्ठ क्र. ९.

२९. शिरगांवकर श., प्रोटेस्टंट ख्रिस्ती मिशनऱ्यांची महाराष्ट्रातील चळवळ, अप्रकाशित, पीएच.डी. प्रबंध, १९७२, पृष्ठ क्र. १४.

३०. गरुड अण्णासाहेब/सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, कैसास, औरंगाबाद, पृष्ठ क्र. १३.

३१. मून वसंत, संपा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र शासन शिक्षण मंडळ, १९९०, पृष्ठ क्र. ३६४.

३२. वैद्य द्वा. गो., नारायण, गणेश चंदावरकर, कर्नाटक, पब्लिशींग हाऊस, मुंबई, १९३७, पृष्ठ क्र. ३३६.

३३. डॉ. आंबेडकर बी. आर., घोडेस्वार देवीदास (अनु.), काँग्रेस आणि गांधीनी अस्पृश्यांप्रती काय केले? क्षितीज, नागपूर, १९९८, पृष्ठ क्र. १९.

३४. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र-खंड ९, सुगावा, पुणे, २००५, पृष्ठ क्र. २५७.

३५. Narke Hari, editor Dr. Ambedkar Writings and Speeches, 17/12, Govt. of Maharashtra, Mumbai, 2003, Page No. 74.

३६. डॉ. आंबेडकर बी. आर., घोडेस्वार देवीदास (अनु.), काँग्रेस आणि गांधीनी अस्पृश्यांप्रती काय केले ? क्षितिज, नागपूर, १९९८, पृष्ठ क्र. ५७.

३७. ऑमवेट गेल, दिघे पी. डी. (अनु.), वासाहतिक काळातील सांस्कृतिक बंड, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र. १९३.

३८. फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९९०, पृष्ठ क्र. ८९.

३९. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र-खंड १, सुगावा, पुणे, २००२, पृष्ठ क्र. १३८.

४०. फाटक न.र., न्या. महादेव रानडे चरित्र, नीलकंठ, पुणे, १९५६,आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र.८१.

४१. फाटक न. र., न्या. महादेव गोविंद रानडे, चरित्र, श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, प्रकाशन तारीख नाही, पृष्ठ क्र. १२५.

४२. वैद्य द्वा. गो., नारायण गणेश चंदावरकर, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९३७, पृष्ठ क्र. ३३७.

४३. Kayakani L. V. (editor), The Speeches and Writing of Shri. Barayan J. Chandawarka Manoranjan Granth Prakashan Mandal, Girgaon, Mumbai, 1911, Page No. 148.

४४. Chaudhari K. K., Gazzetteers of India, Maharashtra State, Mumbai District, Vol. I, Gazzeetters Dept., Mumbai, 1986, Page No. 326.

४५. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र ग्रंथ, खंड १, सुगावा, पुणे, आवृत्ती ५, २००२, पृष्ठ क्र. १६४.

४६. गुळवणे वा. रा., ब्राह्मण सभेची साठ वर्षे, ब्राह्मण सभा, गिरगांव, मुंबई, १९४९, पृष्ठ क्र. ३३०.

४७. कित्ता, पृष्ठ क्र. ३३१.

४८. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र ग्रंथ, खंड १, सुगावा, पुणे, २००२, पृष्ठ क्र. १६४.

४९. सहस्त्रबुद्धे (संपा.), लोकहितवादीची शतपत्रे, कॉन्टिनेंटल, पुणे २००४, आवृत्ती ७ , पृष्ठ क्र. २८७ ते २९७.

५०. कीर धनंजय (संपा.), कृष्णराव अर्जुन केहुस्कर, आत्मचरित्र व चरित्र, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९७७, पृष्ठ क्र. १४१.

५१. निकुंभ सी. एच., आद्य अस्पृश्योद्धारक गोपाळबाबा वलंगकर, सुगावा, पुणे २००६, पृष्ठ क्र. प्रस्तावना पृष्ठ

५२. रायकर यशवंत, मुंबई ज्ञात अज्ञात, राजहंस, पुणे, १९९९, पृष्ठ क्र. ८७.

५३. काळे शरद, (संपा.), बृहन्मुंबई महानगरपालिका शताब्दी विशेषांक, मुंबई महानगरपालिका, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र. १४.

५४. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र ग्रंथ, खंड २, आवृत्ती ३, सुगावा २००३, पुणे, पृष्ठ क्र. ४४.

५५. ऑमव्हेट गेल, दिघे पी. डी. (अनु.), वासाहतिक समाजातील सांस्कृतिक खंड, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र. २१४.

५६. कीर धनंजय, लोककर्ते बाबासाहेब बोले, पॉप्युलर, मुंबई, १९७८, पृष्ठ क्र. १७.

५७. कित्ता, पृष्ठ क्र. ५३.

५८. Narke Hari, editor Dr. Ambedkar Writings and Speeches, Vol. X, Govt. of Maharashtra, Mumbai, 2010, Page No. 39.

५९. खैरमोडे चां. भ., आंबेडकर चरित्र, सुगावा, पुणे, खंड १,आवृत्ती ५, २००२,पृष्ठ क्र. २२७.

६०. Narke Hari, editor, Dr.Babasaheb Ambedkar Writings and Speeches, Vol. X, Govt. of Maharashtra, Mumbai, Page No. 409/27.

६१. मून वसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र सरकार, शिक्षण विभाग, मुंबई, १९९०, पृष्ठ क्र. ३४४.

६२. कित्ता, पृष्ठ क्र. २६३.

६३. सामंत बाळ, (संपा.), बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय शताब्दी विशेषांक, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र. २५.

६४. कित्ता, पृष्ठ क्र. २५.

६५. मून वसंत, (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, मुंबई, १९९०, पृष्ठ क्र. २३७.

६६. Home-spl. 355 (64) V 1930-M-123, Untouchable and Temple Entry.

६७. फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९९०, पृष्ठ क्र. २२.

६८. बाळ प्रकाश (संपा.), मुंबई कालची आणि आजची, न्यू एन. प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९९७, पृष्ठ क्र.१२

६९. आगरकर नीरा, मेनन मीना, कथा मुंबईच्या गिरणगावची, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती दुसरी, २००९, पृष्ठ, क्र. ३१.

७०. फडके य. दि., आंबेडकर चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९९०, पृष्ठ क्र. १०९.

७१. गायकवाड प्रदिप, (संपा.), डॉ. बी. आर. आंबेडकर कामगार चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९५० पृष्ठ क्र. १०९.

७२. फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, श्री. विद्या, पुणे १९९०, पृष्ठ क्र. ११५.

७३. वाळिंबे रामचंद्र, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग एक प्रतिभा मुद्रणालय, पुणे, १९६२, पृष्ठ क्र. १२.

७४. हाडेकर डी. वाय., डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान, सुगावा, पुणे, २००५, पृष्ठ क्र. २०३.

७५. डॉ. आंबेउकर बी. आर., गायकवाड प्रदिप (अनु.), दलितांचे शिक्षण, क्षितीज, आवृत्ती चौथी, २००४, पृष्ठ क्र. १०१.

७६. कित्ता, पृष्ठ क्र. १०९.

७७. तत्रैव, पृष्ठ क्र. १०९.

७८. वाळिंबे रामचंद्र, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग एक, प्रतिभा मुद्रणालय, पुणे, १९६२, पृष्ठ क्र. १४०.

७९. महास्थवीर संघरक्षित, धम्मचारी विमल किर्ती (अनु.), डॉ. आंबेडकर आणि बौद्ध धम्म, दि कार्पोरेशन बॉडी ऑफ बौद्ध एज्युकेशन फाऊंडेशन, तैवान, २००६, पृष्ठ क्र. ४२.

८०. वाळिंबे रामचंद्र, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना भाग एक, प्रतिभा मुद्रणालय, पुणे, १९६२, पृष्ठ क्र. १४२.

८१. खैरमोडे चां. भ., डॉ. बी. आर. आंबेडकर, खंड आठवा, आवृत्ती दुसरी, सुगावा, पुणे, ३०, १९१९, पृष्ठ क्र. २२३.

८२. तत्रैव, पृष्ठ क्र. २२३.

८३. पंडित नलिनी, स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना, पुणे, १९७७, पृष्ठ क्र. १०.

❑❑

**प्रकरण २**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय आणि धर्मांतर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म अस्पृश्य समाजातील महार या जातीमध्ये झाला होता. हजारो वर्षांपासून या जातीच्या वाट्याला आलेली दुःखे त्यांनाही अनुभवास आली होती. जातिव्यवस्थेच्या या गुलामगिरीतून या वर्गाला बाहेर काढण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मुक्तिसंग्रामाचा लढा उभा केला होता. हा लढा फक्त सामाजिक पातळीवर नव्हता तर धार्मिक, राजकीय, व आर्थिक पातळीवरही होता. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी जो लढा दिला, त्या कार्याचा संक्षिप्त परिचय या प्रकरणात देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या मुक्तिसंग्रामाचे शेवटचे पाऊल म्हणजे त्यांचे धर्मांतर होय. याचाही ऊहापोह येथे करण्यात आला आहे.

**२.१ बालपण व शिक्षण :**

दि. १४ एप्रिल १८९१ या वर्षी मध्यप्रदेशातील महू या गावी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे तेव्हा ब्रिटिश लष्करात सुभेदार होते. लष्करी सेवेत त्यांना जातीयतेचे चटक फारसे अनुभवास आले नाहीत. रामजी सकपाळ सेवानिवृत्त होऊन साताऱ्याला आले तेव्हा त्यांना अस्पृश्यतेचे कटू अनुभव येऊ लागले. ''साताऱ्याला अनेक न्हावी होते. परंतु ते अस्पृशांचे केस कापत नव्हते''[१] हे त्यांना प्रथमच समजले. गोरेगावला ते आपल्या वडिलांना भेटण्यासाठी जाताना आलेल्या अनुभवामुळे त्यांना समजले की, आपल्या स्पर्शाने देखील विटाळ होतो. या सर्व अनुभवांचा त्यांच्या बालमनावर परिणाम होत होता. पुढे रामजी सकपाळ यांनी इ.स. १९०१ मध्ये सातारा सोडले व ते मुंबईला परळ येथील डबक चाळीत राहू लागले. बाबासाहेब तेव्हा चौथी पास झाले होते. त्यांना मुंबईतील मराठा हायस्कूल, परळ येथील शाळेत दाखल करण्यात आले. त्यानंतर इ.स. १९०५ मध्ये त्यांना इंग्रजी शिक्षणासाठी एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश देण्यात आला. या ठिकाणी त्यांना आलेला अस्पृश्यतेचा अनुभव त्यांनी स्वतः सांगितला आहे. ते सांगतात, ''इतर विद्यार्थी मला जवळ बसू देत नसत, त्यामुळे मला पाठीमागच्या बाकावर बसावे लागे. एकदा शिक्षकाने प्रश्न विचारला असता वर्गात माझा

एकट्याचाच हात वर होता, म्हणून शिक्षकाने मला फळ्यावर लिहिण्यास बोलविले. पण मुलांनी एकच गोंधळ केला. एकजण म्हणाला, सर, त्याला फळ्यावर हात लावू देऊ नका कारण तो महार आहे. त्या फळ्यामागे आमचे डबे आहेत. ते विटाळतील, परंतु सरांनी सांगितले तुमचे डबे वेगळे ठेवा तो फळ्यावर लिहिलंच, बाबासाहेबांनी या फळ्यावर लिहिलेच. पण ते म्हणतात, 'माझ्या मनावर एक घाव पडला, कधीच न पुसणारा.''[२] अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. सन १९०९ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. महार समाजातील पहिला मॅट्रिक झालेला विद्यार्थी म्हणून त्यांचा गौरव करण्यांत आला. या प्रसंगी दादा केळूसकरांनी बाबासाहेबांना स्वतः लिहिलेल्या बुद्धचरित्र या ग्रंथाची प्रत भेट दिली. त्याअगोदर लहानपणी रामजी सकपाळांनी बाबासाहेबांकडून रामायण व महाभारत यांची पारायणे करून घेतलेली होती. जेव्हा बुद्धचरित्र त्यांनी वाचले तेव्हा ते रामायण, महाभारत व बुद्धचरित्र यांचे तुलनात्मकदृष्ट्या मनन करू लागले, आणि अवघ्या चौदाव्या वर्षी ते बुद्धांच्या शिकवणुकीने भारावून गेले होते.

मुंबईतील शालेय जीवनातील आणखी एक महत्त्वाचा अनुभव म्हणजे बाबासाहेबांना संस्कृत शिकायचे होते, परंतु नाईलाजास्तव त्यांना पर्शियन भाषा शिकावी लागली, कारण संस्कृत भाषा देवांची भाषा असल्यामुळे ती शिकण्याचा हक्क फक्त ब्राह्मणांनाच होता. नंतरच्या काळात स्वतःच्या कर्तृत्वावर संस्कृत भाषा त्यांनी शिकून घेतली होती.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बाबासाहेबांनी इ.स. १९०९ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणास सुरुवात केली. परंतु रामजींची आर्थिक परिस्थिती यावेळी खालावलेली होती. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च त्यांना पेलवण्यासारखा नव्हता. दादा केळुस्कर आणि शिवराम जानबा कांबळे यांच्या मदतीमुळे ते शक्य झाले. ''या काळात मुंबईमध्ये बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांना उत्तेजनार्थ साहाय्य करण्याची घोषणा केली होती. केळुस्कर गुरुजींनी बाबासाहेबांना सयाजीराव गायकवाड यांचेकडे नेले. त्यांनी बाबासाहेबांना पंचवीस रुपये दरमहा शिष्यवृत्ती देण्याचे कबूल केले. यासाठी शिवराम जानबा कांबळे हे देखील सयाजीरावांना भेटले होते.''[३] अशा प्रकारे या दोन व्यक्तींच्या प्रयत्नांमुळे बाबासाहेबांना शिष्यवृत्ती मिळाली आणि ते एलफिन्स्टन महाविद्यालयात जाऊ लागले. या ठिकाणी त्यांनी राज्यशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय घेऊन इ.स. १९१३ मध्ये बी.ए.ची पदवी मिळविली. त्यानंतर बाबासाहेब बडोद्याला सयाजीराव

गायकवाड यांचे संस्थानात नोकरीला गेले. या ठिकाणीही बाबासाहेबांना अस्पृश्यतेचे कटू अनुभव आले. याच काळात त्याचे वडील रामजी सकपाळांचे निधन झाले. बाबासाहेब पुन्हा मुंबईला आले. याच वर्षी सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचा प्रदीर्घ अभ्यास करून त्यांनी १९१५ मध्ये एम.ए.ची पदवी संपादन केली. (इ.स. १९१६ मध्ये याच विद्यापीठात त्यांनी पीएच.डी. केली.) ''भारतात परत आल्यानंतर बडोदा सरकारच्या करारानुसार १९१७ मध्ये ते बडोद्याला नोकरीला गेले. परंतु या ठिकाणी गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपण कितीही शिकलो, चांगले राहिलो, तरी हा समाज आपल्याला माणूस म्हणून जवळ घेणार नाही. या ठिकाणी त्यांना जी वाईट वागणूक देण्यात आली, तिचे वर्णन बाबासाहेबांनी केलेले आहे. बडोदा सरकारच्या शिष्यवृत्तीच्या अटीप्रमाणे त्यांना बडोदा संस्थानात नोकरी करणे भाग होते. बडोदा शहरात एकही घर मिळेना म्हणून एदलजी सोराबजी असे पारशी नाव बदलून ते पारशी धर्मशाळेत राहू लागले. परंतु जेव्हा बडोद्यात, सरकारने अस्पृश्य तरुणास येथे आणले आहे असे लोकांना समजले, तेव्हा वीस पारशी त्यांना मारण्यासाठी आले. बाबासाहेबांनी या प्रसंगाचे गांभीर्य ओळखून खोली खाली करण्यासाठी आठ दिवसांची मुदत घेतली. त्यांना कोणीही बडोद्यात राहण्यासाठी जागा देईना, शेवटी बाबासाहेबांना नाईलाजाने बडोदा सोडावे लागले.''[४] बडोद्यात काम करताना त्यांना बरेच वाईट अनुभव आले होते. कचेरीत हाताखाली काम करणारे कारकून त्यांच्याकडे फाईल फेकून देत व बाबासाहेबांना टेबलालाही हात लावू देत नसत. त्यांचे सहकारी हेतूपुरस्सर त्यांचा अपमान करत असत.

''बडोदा सोडल्यानंतर बाबासाहेबांनी मुंबईत सिडनॅहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. येथेही त्यांची मानखंडना थांबली नाही. या ठिकाणी ठेवलेल्या पाण्याच्या भांड्याला आंबेडकरांनी हात लावू नये याची दक्षता घेतली जाई.''[५] अशा प्रकारे बालवयापासून तरुण वयापर्यंत त्यांना अस्पृश्यतेचे कटू अनुभव आले. त्यांना पदोपदी अपमान सहन करावा लागला, बाबासाहेब अशा प्रतिकूल परिस्थितीत, आर्थिक परिस्थिती चांगली नसताना, तसेच राजकीय पाठबळ नसताना ते सामाजिक विपरीत परिस्थितीशी सतत लढत राहिले, आणि देशाच्या प्रथम श्रेणीत नावलौकिक मिळविला, ही गोष्ट अनन्यसाधारण आहे.

**२.२ अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला हा लढा प्रामुख्याने दोन टप्प्यांमध्ये मोडतो.

१) इ.स. १९२० ते १९३५

२) इ.स. १९३५ ते १९५६

**१) इ.स. १९२० ते इ.स. १९३५ चा कालखंड :**

या कालखंडात बाबासाहेबांनी सामाजिक आणि राजकीय मुक्तिसंग्रामाचा लढा पुकारला होता.

**सामाजिक चळवळ :** अस्पृश्यांची समाजात स्वातंत्र्य व समता प्राप्त करून घेण्यासाठी बाबासाहेबांनी सामाजिक चळवळ सुरू केली. हजारो वर्षांच्या सामाजिक गुलामगिरीतून अस्पृश्यांची सुटका करण्यासाठी या चळवळीला त्यांनी लढ्याचे स्वरूप दिले. त्यासाठी प्रथम त्यांनी अस्पृश्यांना संघटित करण्यासाठी दि. २० जुलै १९२४ या दिवशी मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून अस्पृश्यांचे सामाजिक व शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी आपले कार्य सुरू केले. जातिव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्यता या गोष्टींमुळे या समाजाचे किती नुकसान झाले आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सामाजिकदृष्ट्या इतर हिंदूंप्रमाणे त्यांना समानतेचे हक्क नाहीत. सार्वजनिक पाणवठे, प्रार्थना स्थळे, रस्ते इ. अशा अनेक सार्वजनिक स्थळांचा ते उपयोग करू शकत नाहीत. आर्थिकदृष्ट्याही त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. व्यापार, नोकरी, शेती व धनसंचयाचे मार्ग त्यांना खुले नाहीत. ''स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे त्यांना खालच्या दर्जाची कामेसुद्धा मिळत नाहीत. त्यामुळे गावात भीक मागून जगण्यापलीकडे त्यांचेकडे दुसरा कोणताच मार्ग नव्हता.''[६] हे सर्व सामाजिक हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी सत्याग्रह या शस्त्राचा वापर करण्यास सुरुवात केली होती.

**१. महाडचा सत्याग्रह :**

मुंबई प्रांताचे विधी मंडळाचे सदस्य एस. के. बोले यांनी ४ ऑगस्ट १९२३ मध्ये मुंबई विधीमंडळात एक ठराव मांडला होता. या ठरावानुसार ''सरकारी पाणवठे, विहिरी, तळी जी सरकारच्या स्वखर्चाने चालविली जातात ती सर्व जातीधर्मांच्या लोकांसाठी वापरासाठी खुली करावीत.''[७] हा ठराव विधीमंडळात पासही झाला होता. तरीही सवर्ण हिंदूंनी मात्र असे पाणवठे खुले केले नव्हते. ५ जानेवारी १९२५ रोजी एस. के. बोले यांच्या ठरावानुसार महाड नगरपालिकेने

महाडचे तळे सर्वांसाठी खुले केले. तरीही अस्पृश्य लोक या तळ्यावर पाणी भरण्यास जात नसत. स्पृश्य हिंदूंच्या भीतीमुळे तलावातील पाण्याला स्पर्श करण्याचे धैर्य कोणालाही झाले नव्हते.

सन १९२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुंबई विधीमंडळाचे सभासद म्हणून नेमणूक झाली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली १९ व २० मार्च १९२७ या दिवशी ''महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह.''[८] सुरू झाला. या सत्याग्रहाद्वारे महाड हे स्थळ निवडण्याचे कारण म्हणजे या विभागातील अस्पृश्य समाज शिक्षणामुळे पुढे गेलेला होता. तसेच ब्रिटिश लष्करातून निवृत्त झालेले बरेच महार सैनिक येथे स्थायिक झाले होते. हा सत्याग्रह यशस्वी झाला, परंतु यावेळी स्पृश्य लोकांच्या विलक्षण मनोवृत्तीचे रुप पाहण्यास मिळाले, या ठिकाणी अस्पृश्यांनी आपला समानतेचा हक्क बजावल्यानंतर स्पृश्य लोकांनी हे तळे लगेचच ''२१ मार्च रोजी शुद्ध करून घेतले. त्यासाठी १०८ घागरी पाणी तळ्यातून काढून टाकण्यात आल्या व पंचगाव्य (गाईचे दूध, तुप, दही, शेण व मूत्र) मिसळून तळ्यात टाकण्यात येऊन तळे शुद्ध झाले असे जाहीर करण्यात आले.''[९]

या घटनेची डॉ. आंबेडकरांना मनस्वी चीड आली. आपल्याच धर्मातील काही माणसांनी पाण्याला स्पर्श करताच ते अपवित्र होते, विटाळले जाते आणि जनावरांच्या शेण, मुत्राने ते शुद्ध होते. केवढा मोठा हा अन्याय होता. आपल्याच एका वर्गाने आपल्याच वर्गाची केलेली ही केवढी विटंबना होती. बाबासाहेब म्हणतात, आम्हाला सांगावयाचे आहे की, आजवर गांधींप्रमाणे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे असे आम्ही मानीत होतो. पण आता हा कलंक आम्हाला धुवून काढावयाचा आहे. हा आमच्यावरील कलंक असल्यामुळे तो आम्हालाच धुवून काढाला पाहिजे. या कार्यासाठी कित्येकांना आत्मयज्ञ करावा लागणार आहे. तरी आम्ही मागेपुढे पाहणार नाही. ''तळे शुद्ध करून आमची अपवित्रता सिद्ध करण्याचा महाड येथे जो नीचतम प्रयत्न केला, असा आणखीन करा. पण आम्ही पवित्र आहोत हे तुमच्या मुखे वदवून घेतल्याखेरीज आमची शांती होणार नाही.''[१०] या सत्याग्रहात स्पृश्य लोकांनी सत्याग्रहींना मारझोड केली. परंतु सत्याग्रही मात्र अहिंसेच्या मार्गाने लढत होते. हे प्रकरण पुढे कोर्टात गेले. त्यामुळे काही काळ हा सत्याग्रह स्थगित करावा लागला. ''सन १९२७ मध्ये महाडच्या दिवाणी कोर्टात हा खटला दाखल करण्यात आला. शेवटी दि. १७.०३.१९३७ रोजी या दाव्याचा निकाल लागला. हे तळे कोणाच्याही मालकीचे नसून सार्वजनिक आहे, असे जाहीर करण्यात येऊन हे तळे अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले.''[११]

**सत्याग्रहाचे महत्त्व :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मुक्तिसंग्रामातील समतेच्या लढ्याचा हा पहिला विजय होता. सतत दोन वर्षे झालेल्या या लढ्याचा यशस्वी अंत झाल्यामुळे अस्पृश्य समाजात एक स्फूर्ती निर्माण झाली. आणि सत्याग्रहाची एक शृंखला सुरू केली. या सत्याग्रहामुळे स्पृश्य लोकांना पहिल्यांदा अस्पृश्य लोकांच्या ऐक्याची आणि सामर्थ्याची जाणीव झाली. तसेच या सत्याग्रहामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नेतृत्व भारतभर निर्माण झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली नंतर मंदिरप्रवेश सत्याग्रह सुरू करण्यात आले. हे मंदिरप्रवेश सत्याग्रह हिंदूधर्मियांना एक आवाहन ठरले. पुणे, अमरावती, नाशिक मंदिरप्रवेश सत्याग्रह म्हणजे हिंदूमनाची ती एक कसोटी होती. उच्चवर्णीय हिंदू लोकांच्या हृदयात परिवर्तन घडविण्याचा सत्याग्रह हा एक मार्ग होता. म्हणून मंदिरप्रवेश सत्याग्रह अस्पृश्यांच्या मुक्तिलढ्यातील महत्त्वाचा लढा होता. अर्थात मंदिरप्रवेशामुळे अस्पृश्यांचे प्रश्न सुटणार नव्हते. परंतु हिंदूमनाची ती एक कसोटी होती. म्हणून या सत्याग्रहाचा थोडक्यात आढावा येथे घेण्यात आलेला आहे.

**पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह :**

दि. १३ ऑक्टोबर १९२९ या दिवशी पा. ना. राजभोज, शिवराम कांबळे, कदम इत्यादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली पेशव्यांची ऐतिहासिक राजधानी पुणे येथे पर्वतीच्या डोंगरावरील मंदिरप्रवेश सत्याग्रह सुरू झाला. या सत्याग्रहामागचा उद्देश म्हणजे पुणे येथील या प्रसिद्ध मंदिरातील देवताची पूजाअर्चा करण्याचा अधिकार अस्पृश्यांना मिळावा हा होता. परंतु देवाचे दर्शन तर सोडाच पण स्पृश्य लोकांनी सत्याग्रहीना मंदिराच्या पायरीवरच मारझोड सुरू केली. हे मंदिर खाजगी आहे, असा दावा करून मंदिराचे दरवाजे बंद करण्यांत आले. ''शेवटी हा सत्याग्रह २० नोव्हेंबर १९३० रोजी तहकूब करण्यात आला.''[१२]

**नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह :**

डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली हा सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रथम एक सभा घेण्यात येऊन सत्याग्रहाची उद्दिष्टे प्रथम ठरविण्यात आली. व त्याप्रमाणे कार्यकर्त्यांना सूचना देण्यात आल्या होत्या. या सभेत बाबासाहेबांनी सांगितले होते की, ''मंदिरात प्रवेश मिळाल्याने आपले प्रश्न सुटणार नाहीत. हिंदूंच्या मनात परिवर्तन घडवून

आणण्याचा हा प्रयत्न आहे.''[१३] ३ मार्च १९३० रोजी सुरू झालेला हा सत्याग्रह १९३५ पर्यंत म्हणजे जवळजवळ पाच वर्षे चालू होता. परंतु स्पृश्य लोकांवर याचा काहींच परिणाम झाला नाही. उलट अस्पृश्यांना मारझोड केली, मंदिराचे दरवाजे बंद केले. सत्याग्रहाच्या काळात अस्पृश्यांवर सामाजिक बहिष्काराचे हत्यार उचलले. त्यांच्या मुलांना शाळेत जाणे बंद केले, रस्त्यावरून जाणे-येणे बंद केले. त्यांच्यावर सामूहिक बहिष्कार घालण्यात आले. हेही प्रकरण पुढे कोर्टात गेले.

**मुखेडचा सत्याग्रह :**

नाशिकचा सत्याग्रह चालू असतानाच मुखेडचा सत्याग्रह करण्यात आला. सन १९३२ साली येवला जिल्ह्यातील मुखेड या गावात महारवाड्यात श्रावण महिन्यात महोत्सव सुरू होता. या ठिकाणी लोकांनी पांडवप्रतापाचे पारायण सुरू केले होते. पारायणाच्या शेवटी पांडवप्रताप ग्रंथाची पोथीची मिरवणूक काढण्यात आली होती. ही मिरवणूक वाजतगाजत सार्वजनिक वेशी जवळ येताच स्पृश लोकांनी ती अडविली. वास्तविक पाहता पांडवप्रताप हा ग्रंथ सर्व हिंदूंचा आहे. परंतु तरीदेखील महारांचा पांडवप्रताप म्हणून त्याची गावातून मिरवणूक काढण्यास स्पृश्यांनी विरोध केला. गावचा रस्ता सार्वजनिक. त्याच रस्त्यावरून गावातील गुरे-ढोरे जातात. पण पांडवप्रतापाची पोथी मात्र या रस्त्यावरून जाण्यास स्पृशांनी विरोध केला. ''एकच ग्रंथ, एकच तत्त्वज्ञान, पण स्पृशांनी त्यातही भेद केला. देव एकच, भाव एकच, पण हिंदूच्या मनातील उच्चनीच भावाने तोही डागळला.''[१४]

पांडवप्रतापाची मिरवणूक काढता यावी म्हणून या लोकांनी सत्याग्रह सुरू केला. शांततामय मार्गाने सत्याग्रह चालू असताना स्पृश्य लोकांनी या सत्याग्रहींना मारहाण केली. त्यांची पांडवप्रतापाची पोथीदेखील जाळून टाकली. या वेळी रणखांबे या नेत्याला मारण्याचा कट करण्यात आला. परंतु सुदैवाने ते या हल्ल्यातून बचावले. हा सत्याग्रह चालू होता तेव्हा बाबासाहेब लंडनला गोलमेज परिषदेसाठी गेलेले होते. या घटनेची तेथे त्यांना माहिती समजताच ते खूप चिडले. ते म्हणाले, ''पांडवप्रताप हा ग्रंथ जरी हिंदूंचा असला तरी तो माझ्या लोकांजवळ आहे. म्हणून हिंदूंनी त्यावर घासलेट टाकून त्याची होळी करावी व माझे लोक हिंदूधर्मियांच्या पांडवप्रताप ग्रंथाची मिरवणूक काढतात म्हणून त्यांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारायचे, या मार्गाने आमचा हे लोक उद्धार करणार आहेत ?''[१५]

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करून आपले समतेचे हक्क मागण्याचा प्रयत्न केला. या सत्याग्रहींना मदत करण्याऐवजी त्यांचा अमानुष असा छळ करण्यात आला. याची सविस्तर माहिती डॉ. आंबेडकरांनी ''स्टार्ट कमिटीसमोर मांडली.''[१६] या कमिटीसमोर खालील शिफारशी मांडण्यात आल्या होत्या. ''१) अस्पृश्य मुलांना शाळेत प्रवेश देउन शिष्यवृत्ती द्यावी. २) यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करावे ३) त्यांना सरकारी नोकरीत आरक्षण द्यावे.''[१७] इत्यादी.

**२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे समाजसुधारणेचे कार्य :**

सत्याग्रहाची चळवळ चालू असतानाच डॉ. आंबेडकरांनी अस्पृश समाजातही सुधारणाचे कार्य चालू ठेवले होते. शेकडो वर्षे अस्पृश्यांवर लादलेल्या गुलामगिरीला विरोध करून जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी वृत्तपत्रे काढली अनेक ग्रंथ लिहिले. आणि त्याद्वारे या समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. या वृत्तपत्राद्वारे या समाजावर होणारे अत्याचार सरकारसमोर मांडले. यामध्ये त्यांच्या हिताची चर्चा केली. यासाठी त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' नावाचे वृत्तपत्र काढले. ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' आणि २९ जून १९२८ साली 'समता' पाक्षिक काढले. या वृत्तपत्रांनी जनजागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणात केले.

डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अनेक सभा/परिषदा भरविण्यात आल्या. या सभा/परिषदांमधून बाबासाहेब आपल्या समाजाला कसे राहावे, कसे वागावे, काय खावे, काय नेसावे यांसारख्या साध्या गोष्टीसुद्धा समाजावून सांगत असत. अस्पृश्यांनी आपल्या मुलांना शाळेत घातले पाहिजे, स्वच्छ राहिले पाहिजे असा ते उपदेश करत. त्यांच्या या उपदेशात्मक भाषणांचा लोकांवर मोठा परिणाम होत असे. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळेस डॉ. आंबेडकरांनी महिलांना उद्देशून केलेले भाषण ऐतिहासिक भाषण ठरले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, ''अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न हा फक्त पुरुषांचा नाही तर पुरुषांएवढाच त्यांचाही या कार्यात वाटा आहे. तुम्ही स्त्रिया पुरुषांना जन्म देता, आज समाजात अस्पृश्यांची सावलीसुद्धा पडू देत नाहीत. नोकरीच्या बाबतीही तेच आहे. कोर्ट-कचेऱ्यामध्ये मानसन्मानाच्या जागा तर नाहीच, परंतु साधा पोलीस खात्यातील शिपायाची ही जागाही तुमच्या मुलांना मिळत नाही. अशी जर परिस्थिती असेल तर तुम्ही आम्हाला जन्म कशाला देता ? दलित स्त्रिया इतर स्त्रिया यांच्यामध्ये असा काही

फरक नाही, इतर उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये जे शील आहे, तेवढेच शील तुमच्यातही आहे. याउलट तुमच्यामध्ये जे मनोधैर्य आहे, करारीपणा व धमक आहे तेवढे इतर स्त्रियांमध्ये नाही. तरीदेखील तुमच्या मुलांना अपमानित जीवन जगावे लागते. असे का व्हावे याचा विचार करा, आणि आपले कर्तृत्व सिद्ध करून आपल्याला लागलेला कलंक आधी पुसून काढा. तेवढे सामर्थ तुमच्यामध्ये नक्की आहे. तुम्ही जर मनात आणले, याचा विचार केला तर अस्पृश्यतेचा लागलेला कलंक तुम्ही धुवून काढाल.''[१८] बाबासाहेब आपल्या भाषणात पुढे म्हणतात, ''तुम्ही आता पूर्वीची राहणी सोडून दिली पाहिजे. जुन्या चालीरीती सोडायला हव्यात. तुमचे राहणीमान बदलले पाहिजे. अस्पृश्यतेची ओळख ही त्यांच्या राहणीमानावरून होते. म्हणून दलितांनी राहणीमान बदलले पाहिजे.''[१९] बाबासाहेबांच्या या प्रभावी भाषणाचा जनतेवर मोठा परिणाम झाला. अस्पृश्य स्त्रियांनी आपल्या राहणीमानात सुधारणा केली. तसेच दररोजची गुलामगिरीची कामे बंद केली आणि स्वाभिमानाचे जीवन जगण्यास सुरुवात केली.

अस्पृश्यांच्या या स्वाभिमानी जगण्याला उच्चवर्णीयांनी साथ दिली नाही. उलट अस्पृश्यांचे स्वावलंबी वागणे त्याना बोचू लागले. अस्पृश्य समाजाने आपल्या पायरीप्रमाणे वागले पाहिजे, आपली पायरी सोडू नये. आपल्या वाडवडिलांप्रमाणे गावची सर्व गुलामगिरीची कामे केली पाहिजे. आमच्या गावात राहवयाचे असेल तरी तुम्ही अस्पृश्य म्हणून वागले पाहिजे, अशी दहशत स्पृश्य मंडळीनी निर्माण केली. बहिष्काराचे शस्त्र दाखवून त्यांच्या दैनंदिन जीवनावर दबाव टाकला. त्यांचे जीवन असह्य करून टाकले. त्यामुळे कित्येक अस्पृश्यांवर गाव सोडून जाण्याचा घोर प्रसंग आला. हा सर्व अन्याय अस्पृश्यांनी सहन केला मात्र त्यांनी आपले स्वाभिमानी जीवन जगण्याचे सोडले नाही.

**डॉ. आंबेडकरांचे राजकीय सुधारणा चळवळीचे कार्य :**

अस्पृश्यांना राजकीय सत्ता प्राप्त झाल्याखेरीज त्याचे प्रश्न सुटणार नाहीत, हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते. त्या दृष्टीने त्यांनी आपली पाऊले उचलली आणि राजकीय चळवळीला सुरुवात केली.

**साऊथब्युरो कमिटी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

दि. २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतमंत्री माँटेग्यु याने भारतीयांना जादा हक्क देण्याची घोषणा केली होती. त्यासाठी लॉर्ड साऊथब्युरो मताधिकार समिती नेमण्यात आली होती, ही

समिती फ्रँचाईस कमिटी म्हणून ओळखली जाते. या कमिटीने भारतीय लोकांच्या साक्षी घेण्यास सुरुवात केली होती. अस्पृश्यांच्या वतीने साक्षी देण्यासाठी उच्चवर्णीय नेते होते. या वेळी डॉ. आंबेडकर मुंबईत सिडनॅहॅम महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी करत होते. बाबासाहेबांनी मुंबईच्या गव्हर्नरशी पत्रव्यवहार करून आपण अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी आहोत हे सिद्ध करून दिले. बाबासाहेबाची मागणी गव्हर्नरने मान्य केली. अशा तऱ्हेने अस्पृश्यांच्या राजकीय चळवळीत डॉ. आंबेडकरांचे पहिले पाऊल पडले.

दि. १७ जानेवारी १९१९ रोजी बाबासाहेबांनी साऊथब्युरो कमिशनसमोर जी साक्ष दिली तिला अस्पृश्यांच्या राजकीय चळवळीत महत्त्वाचे स्थान आहे. या प्रसंगी बाबासाहेबांनी कमिशन समोर एक अहवाल सादर केला. त्यानुसार ''अस्पृश्यांसाठी विधीमंडळात नऊ जागा मागितल्या. तीन सदस्य संघाची मागणी केली. अस्पृश्य वर्गाचा मताधिकार अधिक विस्तृत करावा असे प्रतिपादन केले तसेच अस्पृश्य वर्गात विस्तृत मतदार संघ निर्माण करण्याची सूचना मांडली.''[२०] आपली साक्ष देतांना बाबासाहेबांनी सांगितले की, अस्पृश्यांना मतदानाचा व उमेदवारीचा हक्क देऊन त्यांना वेगळा मतदार संघाची मागणी करून या जागा लोकसंख्येच्या प्रमाणात असाव्यात अशी सूचना केली. १९१९ च्या सुधारणा कायद्यान्वये अस्पृश्यांचे प्रतिनिधी कायदेमंडळात घेण्याचे अधिकार गव्हर्नरला देण्यात आले होते. त्यानुसार श्री. घोलप, श्री. निकाळजे, डॉ. सोळंकी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायदेमंडळात शिरकाव मिळाला होता.

**सायमन कमिशन - डॉ. आंबेडकर :**

१९१९ च्या कायद्याची फेरतपासणी करण्यासाठी आणि आणखी राजकीय सुधारणा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने एक आयोग नेमला होता. सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली हे कमिशन इ.स. १९२८ मध्ये भारतात आले होते. परंतु भारतात या कमिशनचे स्वागत 'सायमन परत जा' या निषेधदर्शक फलकांनी करण्यात आले. कारण या कमिशनमध्ये एकही भारतीय सभासद नव्हता. कॉंग्रेसनेदेखील कमिशनवर बहिष्कार टाकला होता. या कमिशनला सहकार्य करण्यासाठी सरकारने केंद्रिय समिती नेमली होती. त्याचप्रमाणे प्रांतिक विधिमंडळांनी आपापल्या समित्या नेमल्या होत्या. ३ ऑगस्ट १९२८ रोजी मुंबई प्रांतिक समितीवर इतर सभासदांबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची नेमणूक झाली होती. त्यावेळी बाबासाहेब सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक

होते. बाबासाहेबांनी स्वतः एक अहवाल तयार केला होता. २३ ऑक्टोबर १९२८ रोजी पुणे येथे बाबासाहेबांनी कमिशनसमोर साक्ष दिली होती. त्यात त्यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, ''अस्पृश्य वर्ग शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला, राजकीयदृष्ट्या दुर्बल, आर्थिकदृष्टीने दरिद्री आणि सामाजिकदृष्ट्या गुलाम आहे.''[२१] सायमन कमिशनने भारतभर दौरा केल्यानंतर अहवाल तयार केला होता. त्यानुसार तीन गोलमेज परिषदा लंडनमध्ये होणार होत्या. या परिषदेसाठी ब्रिटिश सरकारने भारतातील सर्व प्रमुख पंथ, अल्पसंख्याक जमाती यांना निमंत्रणे पाठविली होती. अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मद्रासचे श्रीनिवासन यांची निवड करण्यात आली. या परिषदेद्वारे अस्पृश्यांचे दुःख जगासमोर मांडण्याची संधी त्यांना मिळाली. त्या दृष्टीने या परिषदेला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

**गोलमेज परिषद आणि डॉ. आंबेडकर :**

दि. २० नोव्हेंबर १९३० रोजी डॉ. आंबेडकर गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले होते. या ठिकाणी त्यांनी सांगितले की, अस्पृश्य वर्गाला कोणीही साहाय्य करत नाही. प्रत्येक सरकारने (राज्यकर्त्यांनि) आपले स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी अस्पृश्यांचा उपयोग करून घेतला. मात्र त्यांना कोणतेच हक्क दिले नाहीत. हिंदूप्रमाणेच मुस्लीम राज्यकर्त्यांनीदेखील त्यांना अधिकार दिले नाहीत. ''हा वर्ग सरकारकडून दुर्लक्ष केला गेलेला, हिंदू समाजाकडून दडपला गेलेला, मुसलमानांनी उपेक्षा केलेला आहे. या वर्गाच्या अशा असहाय्य परिस्थितीत त्यांना त्यांचे हक्क मिळणे फार महत्त्वाचे आहेत.''[२२] या परिषदेत बाबासाहेबांनी एक खलिता सादर केला होता. त्याद्वारे अस्पृश्यांचे प्रश्न त्यांनी जगासामोर मांडून त्यावर उपाययोजना सुचविल्या. भारतातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ब्रिटिश सरकारला हा खलिता मान्य करावा लागणार होता. बाबासाहेबांच्या मते अस्पृश्यता संपूर्णपणे नष्ट करायची असेल तर या खलित्यातील सर्व योजनांना मान्यता देणे क्रमप्राप्त होते. कारण या योजनांशिवाय अस्पृश्यतानिवारण होऊ शकत नाही व अस्पृश्यांचे प्रश्न सुटू शकत नाहीत. एवढे महत्त्व या खलित्यातील शिफारशींना होते. त्यामुळे यातील शिफारशी पाहणे उद्‌बोधक ठरेल. या शिफारशी खालीलप्रमाणे होत्या.

१) अस्पृश्यांना समान नागरिकत्व

२) समान हक्क

३) जातिद्वेषमूलक वागणूक प्रतिबंध,

४) प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळात प्रतिनिधित्व,

५) सरकारी नोकरीत प्रतिनिधित्व,

६) पूर्वग्रह दूषितकृत्य या हलगर्जीपणा यासंबंधी संरक्षण,

७) सरकारी खाते अस्पृश्यासाठी,

८) गव्हर्नर जनरलला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व'[२३], इत्यादी.

अशा प्रकारे बाबासाहेबांनी या खलित्याद्वारे अस्पृश्यांचे राजकीय प्रश्न, सामाजिक दर्जा आणि आर्थिक उन्नती या मूलभूत प्रश्नांचा विचार मांडला. या खलित्यातील अस्पृश्यता निवारण्याचे मूलभूत विचार, उपाय आणि अस्पृश्य वर्गाच्या मागण्या हाच डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा मूलभूत पाया ठरला होता.

पहिल्या गोलमेज परिषदेचे महत्त्व म्हणजे, भारतीय घटना तयार करण्याकरिता मूळ भारतीयांचा विचार व सल्लामसलत घेतली पाहिले हे अतिमहत्त्वाचे तत्त्व ब्रिटिश सरकारने प्रथम मान्य केले. ''अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधीला भारताचे भविष्य घडविण्याच्या कामी विचारविनिमयासाठी प्रथमच निमंत्रण देण्यात आले, त्यामुळे अस्पृश्यांना आपले प्रश्न आपापल्या स्वतंत्र प्रतिनिधीमार्फत मांडण्याची प्रथमच संधी मिळाली. यावरून भारतीय राजकीय जीवनात अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले व त्याचबरोबर भारतीय राज्यघटना लिहिताना सल्लामसलत करून हिंदुंबरोबर अस्पृश्यांचाही हक्क आहे हे तत्त्वतः मान्य केले गेले.''[२४]

याच खलित्यातील चौथ्या कलमानुसार बाबासाहेबांनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. या परिषदेवर काँग्रेसने बहिष्कार टाकला होता. सप्टेंबर १९३१ मध्ये दुसरी गोलमेज परिषद लंडनला भरविण्यात आली तेव्हा आंबेडकरांच्या पहिल्या गोलमेज परिषदेतील अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला म. गांधीनी विरोध केला. गांधीजींच्या मते, ''अस्पृश्य समाज हा हिंदू समाजाचा अभिन्न भाग आहे. त्याला राजकीयदृष्ट्या हिंदूंपासून वेगळे करण्याच्या मी विरुद्ध आहे.''[२५] या परिषदेत अल्पसंख्याकांचा प्रश्न आणि अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदार संघ यामध्ये कोणताच निर्णय घेतला गेला नाही. अशा अर्धवट अवस्थेत ही परिषद संपली. भारतीय नेते निराश होऊन भारतात परतले. या परिषदेत जातीय प्रश्नांवरून कोणताच निर्णय घेता आला

नाही. म्हणून या जातीच्या प्रश्नावर ब्रिटनचे पंतप्रधान रेम्से मॅकडोनाल्ड यांनी दि. १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर केला या निवाड्याद्वारे बाबासाहेबांची स्वतंत्र मतदार संघाची आणि सर्वसाधारण मतदार संघामध्ये मताधिकार मिळण्याची शिफारस मान्य करण्यात आली. बाबासाहेबांच्या राजकीय लढ्याचा हा फार मोठा विजय होता. ''जातीय निवाड्यामुळे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळून कायदेमंडळात स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्यानुसार मध्यवर्ती कायदेमंडळात अस्पृश्यांना ७१ जागा मिळाल्या. शिवाय संयुक्त मतदार संघात मताधिकाराचा अधिकारही मिळाला.''[२६]

रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला तेव्हा गांधीजी पुण्याच्या येरवडा तुरुंगात होते. त्यांनी जातीय निवाड्यातील अस्पृश्यांच्या वेगळ्या मतदार संघाला विरोध केला होता. गांधीजींनी रॅम्से मॅकडोनाल्ड यांना पत्र पाठवून हा अस्पृश्यांना मिळालेला मतदार संघ रद्द करावा असे सुचविले. नाहीतर मी आमरण उपोषण करणार असेही कळविले होते, परंतु रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी गांधीजींना कळविले की मी हा निर्णय बदलणार नाही. गांधीजींना हे समजताच त्यांनी तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले, त्यांच्या या उपोषणामुळे संपूर्ण देशात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातूनच महात्मा गांधीजींचे प्राण वाचविण्याचे प्रयत्न सुरू झाले. डॉ. आंबेडकरांसमोर गांधीजींचे प्राण की अस्पृश्य समाजाचे हक्क असा बिकट प्रश्न उभा राहिला होता. या संदर्भात देशातून अनेक पत्रे व तारा बाबासाहेबांना येऊ लागल्या होत्या. गांधीजींचे प्राण बाबासाहेबांच्या हातात आहे, असे सर्वांना वाटू लागले होते. त्यातूनच समेटाचे प्रयत्न सुरू झाले. पंडित मालवीय, तेज बहादूर सप्रु, जयकर, एम. आर. राजगोपालाचारी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. त्यातूनच 'पुणे करारा'ची निर्मिती झाली.

जातीय निवाड्यामुळे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळाला व त्यानुसार त्यांना कायदेमंडळात ७१ जागा मिळाल्या होत्या. पुणे करारामुळे हे रद्द होऊन त्याऐवजी अस्पृश्यांना संयुक्त मतदार संघात १४८ जागा देण्यात आल्या. हा वरवरचा दिसणारा फायदा झाला, परंतु अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदारसंघ पुणे करारामुळे कायमचा घालवावा लागला.

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१९ च्या साऊथब्युरो कमिटीच्या साक्षीपासून इ.स. १९३२ च्या पुणे करारापर्यंत विविध पातळ्यांवर लढे दिले. जवळजवळ तेरा ते चौदा वर्षे हा

लढा चालू होता. परंतु त्याच्या या मुक्तिलढ्याला स्पृश्य समाजाने साथ दिली नाही. उलट त्यांना विरोधच केला. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यानी लढा चालू ठेवला. त्यांच्या या मुक्तिलढ्याचे शेवटचे पर्व म्हणजे धर्मांतर होय.

**२.४ धर्मांतराची घोषणा :**

दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला, जिल्हा नाशिक या ठिकाणी मुंबई इलाख्यातील दलितांची सभा भरविण्यात आली होती. ही परिषद अस्पृश्य वर्गाच्या गेल्या दहा वर्षांच्या चळवळीचा आढावा घेण्यासाठी, तसेच माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणेच्या दृष्टीने आपले धोरण ठरविण्याच्या उद्देशाने भरविण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. परिषदेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. याच परिषदेत डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराच्या ऐतिहासिक घोषणेचा उच्चार केला की, ''मी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.''[२७] असा संकल्प केला. ते म्हणतात, ''आठ कोटी अस्पृश्यांना गुलामगिरीत ठेवून बहुजन समाजाला अज्ञान, दारिद्र्य, रूढी-परंपरेच्या अंधारात दडपणारा, असंख्य स्त्रियांना माणुसकीतून उठवणारा हा हिंदू धर्म, धर्म नाही. हिंदू असूनही हिंदूंच्या देवळात जायचे नाही, तळ्याचे पाणी प्यायचे नाही, इतकेच काय परंतु इतरांना स्पर्शदिखील करावयाचा नाही. मग हा धर्म तरी काय कामाचा ? असून नसून सारखाच आहे. दहा वर्षे चळवळ करूनही हिंदू लोक अस्पृश्यांना कोणतेच हक्क, सवलती देण्यास तयार नाहीत. ते म्हणतात, की थोडे दमाने घ्या. हजारो वर्षे चालत आलेली ही पद्धत एकदम मोडणार नाही, परंतु त्यांना विचारा की, अस्पृश्यांच्या स्थितीत तुम्ही फक्त एक दिवस राहून पाहा. एक ना दोन दिवस, युगे लोटली, परंतु अस्पृश्यांच्या मागचा हा वनावास कधी मिटला नाही आणि या धर्मात राहून तो कधीही संपणार नाही. म्हणूनच मी हिंदू धर्मात जन्माला आलो हे मी माझे दुर्दैव समजतो. मी अशी प्रतिज्ञा करतो की, मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मुळीच मरणार नाही.''[२८]

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी धर्मांतर करणे हा एकच शेवटचा उपाय त्यांना सापडला होता. कारण हिंदू लोकांच्या आचारविचाराचे एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे जोपर्यंत एखादा माणूस हिंदू समाजाचा घटक असतो तोपर्यंतच त्याला हिंदू धर्माचे श्रेय. निश्रेयाचे, पाप-पुण्याचे व स्पर्श-अस्पर्शाचे नियम लागू पडतात. परंतु त्याच व्यक्तीने जर दुसरा धर्म स्वीकारला तर त्या व्यक्तीला

हिंदू धर्माचे कोणतेही श्रेयनिश्रेय, पाप-पुण्य अथवा स्पर्शा-अस्पर्शाचे नियम लागू होत नाहीत. उलट त्या व्यक्तीला मानवधर्माने घालून दिलेल्या मानवतावादी नियमाने वागविण्यात येते. उदा. ''एखादा अस्पृश्य जर हिंदू धर्मात राहिला तर त्याला हिंदूंकडून हीन लेखण्यात येते, परंतु त्याच व्यक्तीने जर ख्रिश्चन अथवा मुस्लीम धर्म स्वीकारला तर मात्र तेच हिंदू लोक त्याला आपल्या समानतेने वागवितात.''[२९] अस्पृश्यता निवारण्याचा जर एवढा सोपा मार्ग असतानाही बाबासाहेबांनी त्याचा लगेचच स्वीकार केला नाही, कारण हिंदू धर्माबद्दल त्यांना द्वेष नव्हता तर त्यातील चालीरीती, रूढी, चातुर्वर्ण्य जातिव्यवस्थेला त्यांचा विरोध होता. स्पृश्य हिंदूंनी जर अस्पृश्यांना हिंदूधर्मीय मानून तशी वागणूक दिली असती तर धर्मांतराची घोषणा करण्याची वेळ आली असती का ? अस्पृश्यांचे दु:ख स्वकियांनी कधीच ओळखले नाही. परकीय लोकांनी ते ओळखले आणि अस्पृश्यांना माणुसकीचे अधिकार देण्यास भाग पाडले. हिंदू समाजातील जातिभेदामुळे या समाजाचे ऐक्य नष्ट झाले आहे. आणि म्हणूनच परकीय लोक येथे अनेक वर्षे राज्य करू शकले.

येवल्याच्या या परिषदेत एक ठराव मांडण्यात आला. त्यानुसार आता पुन्हा सत्याग्रह करायचा नाही, असे ठरविण्यात आले. सत्याग्रहामध्ये शक्ती नष्ट करण्यापेक्षा सर्वांनी संघटित होऊन आपल्या समाजाला मानाचे स्थान स्वतःच प्राप्त करून घ्यायचे असे ठरले. यापुढे आपल्याला ''हिंदूच्या देवदेवतांविषयी, मंदिराविषयी अगर रथाविषयी काहीच कर्तव्य नसून हिंदूंच्या कोणत्याही समारंभात यापुढे भाग घ्यायचा नाही असा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.''[३०]

**पुणे ठराव :**

येवला परिषद झाल्यानंतर दि. १२ जानेवारी १९३६ रोजी पुण्यात एक परिषद भरविण्यात आली. ही परिषद धर्मांतराच्या निर्णयाचा सविस्तर विचार करण्यासाठी घेण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष एन. शिवराजन हे होते. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणता धर्म स्वीकारावा याचा निर्णय घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य बाबासाहेबांना देण्यात आले होते. याच सभेत डॉ. पुरुषोत्तम सोळंकी यांनी सांगितले की, ''अस्पृश्यांना वेद नको, गीता नको, शंकराचार्य नको, संत नको, कुणी देवदूत नको. त्यांना फक्त डॉ. आंबेडकर हवे आहेत.''[३१]

**मुंबई परिषद :**

येवला धर्मांतर घोषणेला पाठिंबा देण्यासाठी व धर्मांतराच्या विषयाचा गांभीर्याने विचार करण्यासाठी मुंबईमध्ये नायगाव येथे दि. ३० मे १९३६ ते दि. २ जून १९३६ अशी चार दिवसांची परिषद घेण्यात आली होती. ही परिषद फक्त महार जातीची असल्यामुळे तिला 'अखिल मुंबई इलाखा महार परिषद' असे संबोधण्यात आले होते. ही परिषद फक्त महार जातीचीच का घेण्यात आली, याची कारणमीमांसा देताना बाबासाहेब म्हणतात, ''या परिषदेत कुठल्याही प्रकारच्या मागण्या मागायच्या नाहीत तर धर्मांतरासारखा प्रश्न प्रत्येक जातीने स्वतः सोडविला पाहिजे. शिवाय अशा प्रकारच्या परिषदांमुळे जनमत काय आहे हे समजण्याचा सोपा मार्ग आहे.''[३२] यावरून लक्षात येते की, धर्मांतरासारख्या विषयावर बाबासाहेबांनी कोणावरही दडपण आणले नव्हते, उलट लोकमताला प्राधान्य दिले. या परिषदेत बाबासाहेबांनी केलेले भाषण जनता पत्राच्या दि. २० जून १९३६ च्या अंकात 'मुक्ती कोण पथे ? अर्थात धर्मांतर का ?' या नावाने प्रसिद्ध झाले. यामध्ये बाबासाहेबांनी निदर्शनास आणून दिले की, ''व्यक्तीच्या विकासास आवश्यक असणाऱ्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सहानुभूती या चारही बाबी या धर्मात नाहीत.''[३३] या प्रसंगी केलेल्या भाषणात बाबासाहेबांनी धर्मांतराच्या विविध कारणांची सविस्तर चर्चा केली होती. धर्मांतर केल्याशिवाय अस्पृश्यांचे कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत, हे त्यांनी दाखवून दिले होते.

**लखनौ परिषद :**

मुंबई परिषदेनंतर लगेचच लखनौ येथे सर्वधर्म परिषद घेण्यात आली. त्यामध्ये बौद्ध भिक्खू, मुस्लीम, ख्रिश्चन, जैन व्यापारी आणि आर्य समाजाचे लोक उपस्थित होते. या सर्वांनी बाबासाहेबांच्या धर्मांतराला पाठिंबा दिला होता. तसेच देशातून-परदेशातूनही धर्मांतराला प्रतिसाद मिळाला होता. बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख इत्यादी नेत्यांनी बाबासाहेबांना आपल्या धर्मात येण्याची विनंती केली होती. त्यांपैकी ''इटलीतील बौद्ध तत्त्वचिंतक लोकनाथ यांनी दि. १० जून १९३६ रोजी आंबेडकरांची मुंबईत भेट घेतली होती. त्यांनी डॉ. आंबेडकर आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार करतील असा विश्वास संपादन करून,''[३४] भारतातील अस्पृश्यांना बौद्ध धर्मात येण्याचा सल्ला दिला होता.

आंतरराष्ट्रीय इस्लामी व्यासपीठाकडूनही बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेला चांगलाच प्रतिसाद दिला होता. उदा. हैद्राबादच्या निजामाने देखील बाबासाहेबांना आपल्या धर्मात येण्याबद्दल सुचविले आणि रु. ४०,००,०००/- देण्याचे कबूल केले. परंतु आंबेडकरांनी निजामाला नकार दिला आणि त्यांना कळविले की, ''माझे लोक म्हणजे शेळ्या, मेंढ्या नाहीत की ज्यांना कोणीही खरेदी करावे.''[३५]

''शीखधर्मीय नेत्यांनीसुद्धा बाबासाहेबांच्या धर्मांतर घोषणेचा विचार केला होता. दि. १३ व १४ एप्रिल या दोन दिवशी शीखांचे एक अधिवेशन अमृतसर येथे भरले होते. त्या अधिवेशनास बाबासाहेब स्वतः हजर राहिले होते. यावेळी शीख नेत्यांनीही बाबासाहेबाना शीख धर्म स्वीकारावा असे सुचविले होते. ख्रिश्चनांचे गुरू बिशन जे. डब्ल्यू फिकेट आणि स्टॅन्ले जोन्स हे बाबासाहेबांना अनेकदा भेटले होते. त्यांनीही बाबासाहेबांना ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची विनंती केली होती.''[३६] अशा प्रकारे जगातील सर्व प्रमुख धर्मीयांनी बाबासाहेबांना आपापल्या धर्मात येण्याचे आवाहन केले होते. परंतु बाबासाहेबांनी कोणालाही लगेचच आश्वासन न देता प्रथम त्यांनी सर्व धर्मांचा सखोल अभ्यास करून मग शेवटी ते बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या निर्णयाकडे ते वळले. त्यासाठी त्यांनी वीस वर्षे सर्व धर्मांचा अभ्यास केला होता आणि मग बौद्ध धम्माचा स्वीकार केला. हा धर्म २० शतकात भारतातून पूर्णपणे कालबाह्य झालेला होता. ज्यांचे फक्त अवशेष भारतात शिल्लक होते. हा धर्म बाबासाहेबांना श्रेष्ठ वाटला. हिंदू धर्माला पर्याय म्हणून नव्हे तर समाजातील सर्व धर्मांना पर्याय म्हणून हा एक नवा जीवनमार्ग, या दृष्टीने त्यांनी बौद्ध धर्माकडे पाहिले. सन १९३५ ते १९५० या काळात सर्व धर्मांचा अभ्यास केल्यानंतर १९५० पासून मात्र बाबासाहेब जाहिररीत्या बौद्ध धर्माविषयी बोलू लागले. बौद्ध धर्माविषयी त्यांना ओढा होता. हे काही प्रसंगांवरून गोष्टींवरून समजते. बाबासाहेबांनी मुंबईमध्ये इ.स. १९४८ मध्ये जे महाविद्यालय स्थापन केले त्याला सिद्धार्थ नाव दिले. त्यानंतर १९५० मध्ये औरंगाबाद या ठिकाणी स्थापन केलेल्या महाविद्यालयाला बौद्धधर्मीय राजा मिलिंद यांचे नाव दिले, त्याअगोदर इ.स. १९३५ मध्ये मुंबईला त्यानी बांधलेल्या आपल्या घराला राजगृह हे नाव दिले होते. राजगृह येथे तथागत बुद्धांनी आपले पहिले व्याख्यान दिलेले होते.

सन १९५० नंतर बाबासाहेब बौद्ध धम्माविषयी जाहीर भाषणात बोलू लागले. महाबोधी

मासिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी भारतातील चार प्रमुख धर्मांचा उल्लेख करून बौद्ध धर्म कसा श्रेष्ठ आहे हे जाहीरपणे मांडले होते. दि. १५.०१.१९५१ रोजी वरळी बुद्धविहारात बौद्ध श्रेष्ठत्व सांगतांना हा धर्म पुन्हा देशाचा धर्म होईन, असे भाकित केले होते. आणि आपण पुढील आयुष्य बौद्ध पुनरुज्जीवनासाठी घालवू अशी घोषणा केली होती. त्यासाठी बुद्ध मंदिर (विहारे) उभारण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर १९५६ पर्यंत त्यांनी बौद्ध धर्मचे श्रेष्ठत्व सांगणारी अनेक भाषणे दिली. त्यामुळे बाबासाहेब बौद्ध धर्माचाच स्वीकार करतील हे निश्चित झाले होते.

**२.५ धर्मांतर :**

१९३५ च्या येवला धर्मांतर घोषणेनंतर १९५६ पर्यंत, वीस वर्षांच्या कालखंडात बाबासाहेबांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. त्यांनी धर्माचे चार आधारस्तंभ ठरविले होते. हे आधारस्तंभ म्हणजे धर्माच्या कसोट्या होत्या. या कसोट्यांमधून जो धर्म जाईल तोच अखिल मानवजातीचा उद्धार करू शकतो, असे त्यांचे मत होते. या चार कसोट्या म्हणजे,

१) धर्म हा शास्त्रीय ज्ञानाशी विसंगत नसावा.

२) धर्म व नैतिक आचरण यांची सांगड अभेद्य असावी,

३) समता आणि बंधुत्व यांचा समावेश असावा आणि

४) धर्माने दारिद्र्याचे गोडवे गाऊ नयेत.''[३७]

या सर्व कसोट्यांमधून जाणारा एकच धर्म बाबासाहेबांना दिसला तो म्हणजे बौद्ध धर्म होय. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, आणि लोकशाही ही सर्व तत्त्वे त्यांना या धर्मात सापडली आणि म्हणून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. तथागत बुद्धांविषयी, पॉल कॅरस म्हणतात, "Buddha was the first prophet to proclaim the importance of the morality in religion at same time it was the first positivessts the first radical free thinker, the first inconoclastiand and the first prophet of the religion of science."[३८]

सर्व धर्मांचा अभ्यास केल्यानंतर बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचे ठरविले. परंतु लगेचच त्यांनी धर्म स्वीकारला नाही, कारण धर्म पटवून देणे एवढे सोपे नाही. ते एका माणसाचे काम नाही म्हणून बाबासाहेब म्हणत, ''माझ्यावर जेवढी जबाबदारी आहे तेवढी जबाबदारी

जगातील कोणत्याही माणसावर नाही.''[३९] सन १९५६ पर्यंत त्यांनी बौद्ध धर्मावर अनेक भाषणे दिली. या भाषणाद्वारे बौद्ध धर्म त्यांनी लोकांना समजावून दिला. अस्पृश्यता निवारण्याचा एकमेव मार्ग बौद्ध धर्म आहे, हे पटवून दिले. त्यांनी महाबोधी मासिकासाठी इ.स. १९५० 'बुद्ध धर्म आणि त्याचे भवितव्य' हा लेख लिहिला होता. या लेखात ते म्हणतात, ''जगात जनतेला भावून टाकणारे चारच धर्मसंस्थापक आहेत. ते म्हणजे भगवान बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर आणि श्रीकृष्ण यांनी स्वतःस श्रेष्ठ समजले आहे. परंतु बुद्धांनी अशी कोणतीच भूमिका घेतली नाही. त्यांनी स्वतःला एक मानवपुत्र मानले आणि शेवटपर्यंत मनुष्य म्हणूनच जगले.''[४०] दि. २ मे १९५० रोजी दिल्लीमध्ये पहिल्यांदा जाहीर भाषणात बौद्ध धर्माचा उल्लेख करताना बाबासाहेब म्हणाले, ''बुद्ध हा सामान्य मनुष्य होता, त्याने जाती व वर्गाविरुद्ध पहिल्यांदा लढा पुकारला आणि मानवी दृष्टिकोनातून जनतेची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न केला.''[४१] बुद्ध धर्म हा सर्वांना समानतेची वागणूक देतो. शिवाय विकासाची समान संधी देतो. म्हणूनच ''बाबासाहेबांनी अस्पृश्यांना बौद्ध होण्याचे आवाहन केले होते. अस्पृश्यांनी बौद्ध धर्माचा आश्रय घ्यावा.''[४२] तसेच ''बौद्ध धर्म नुसत्या अस्पृश्यांनी स्वीकारून चालणार नाही तर साऱ्या भारताने व त्याचबरोबर साऱ्या जगाने बौद्ध धर्म स्वीकारावा.''[४३] कारण ''स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या गोष्टी जगाला उद्धारासाठी आवश्यक असतील तर त्या बुद्धधर्मात सापडतील''[४४] असे त्याचे विचार होते.

दि. १२ मे, १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्रिटिश ब्रॉड कार्पोरेशनने बौद्ध धर्मावर प्रवचन देण्यास बोलविले होते. विषय होता 'तुम्हाला बौद्ध धम्म का आवडतो?' त्या प्रसंगी बाबासाहेबांनी उत्तर दिले होते की, ''मला बौद्ध धर्म आवडतो कारण कुठल्याही धर्मात जी तीन तत्त्वे मला सापडत नाहीत. ती मला बौद्ध धम्मात सापडतात, ती तत्त्व म्हणजे प्रज्ञा, करुणा आणि समता होय.''[४५] बुद्धांच्या शिकवणुक व विचारप्रणालीमुळे, बाबासाहेब प्रभावित झालेले होते. बुद्ध धर्माचे श्रेष्ठत्व सांगताना ते म्हणतात, ''हा धर्म मानव धर्म आहे, या धर्मात कोणताही भेदभाव नसून सर्वांना समानता आहे. मित्रत्वाच्या नात्याने सर्व लोक एकत्र येतात. ज्याप्रमाणे अनेक नद्या समुद्राला मिळाल्यानंतर आपले स्वतःचे वेगळे अस्तित्व विसरतात, त्याप्रमाणे बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर सर्व लोक समान होतात. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची विषमता राहत नाही.''[४६] म्हणून ''मानवतेचे संरक्षण करण्यासाठी, साऱ्या जगाला बौद्ध धर्माची कास धरावी

लागेल.''[४७] ''जागतिक ऐक्याचा एकच मार्ग असून बौद्ध धर्माशिवाय जगाला तरणोपाय नाही.''[४८] त्यासाठी ''बौद्ध धर्मचे पुनरुत्थान करा''[४९] असा संदेश बाबासाहेबांनी दिला.

बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर बाबासाहेब काठमांडूला नोव्हेंबर १९५६ मध्ये गेले होते. तेव्हा आपण बौद्ध धर्म का स्वीकारला हे सांगताना ते म्हणाले होते, की ''या धर्मात ईश्वर नाही. माणसाच्या उन्नतीला आवश्यक असणारी तत्त्वे या धर्मात आहेत. जगामध्ये दुःख आहे, या तत्त्वावर बुद्ध धर्माचे अधिष्ठान आहे आणि हे दुःख निवारण्याचा मार्ग बुद्धांनी सांगितला आहे.''[५०] याच बौद्ध परिषदेत तेथील अफाट समुदायीने त्यांना बोधिसत्व म्हणून गौरवले होते.

**धर्मप्रसाराचे प्रयत्न :**

१४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी बाबासाहेबांनी नागपूर येथे बौद्ध धम्माचा जाहीररीत्या स्वीकार केला. आणि भविष्यकाळात आपण बौद्ध धम्माच्या प्रसाराचे कार्य करणार आहोत हे जाहीर केले. बौद्ध धर्माचा प्रसार व्हावा म्हणून बाबासाहेबांनी भारताच्या राज्यघटनेत तशी तरतूद केलेली आहे. स्वातंत्र्य, समता, बधुत्व आणि लोकशाही या बुद्धांच्या तत्त्वांवर आधारित राज्यघटना त्यांनी बनविली आहे. राज्यघटनेची उद्देशांमध्ये बौद्ध धर्मचे सार आहे. (परिशिष्ट) राष्ट्रपती भवनाच्या दर्शनी भागावर बौद्ध धर्मचे सुभाषित कोरले आहे. तसेच ''भारताच्या राष्ट्रध्वजावर बौद्ध धर्म प्रसारक सम्राट अशोकाचे प्रतीक अशोकचक्र विराजमान आहे.''[५१] बौद्ध धर्मप्रसारासाठी त्यांनी बौद्ध विहाराची स्थापना करण्यास प्रारंभ केला. २५०० वर्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम दि. २५.१२.१९५३ मध्ये पुण्यात देहूरोड येथे बौद्ध विहार स्थापन केला. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले होते की, मी आता उरलेले आयुष्य बौद्ध धर्मांच्या प्रसारासाठी घालविणार आहे. तसेच बौद्ध धर्मावर साध्या व सोप्या भाषेत एक ग्रंथ लिहिणार आहे. आपल्या या भाषणात ते पुढे म्हणतात की, ''बुद्ध धर्म हा भारतातील प्राचीन धर्म आहे. प्रारंभीच्या काळात तो अत्यंत प्रभावी होता. नालंदा हे पहिले विश्वविद्यालय बौद्ध लोकांनीच सुरू केले.''[५२] याच पातळीवर दुसरे विद्यापीठ निर्माण करण्याची घोषणा त्यांनी या वेळी केली होती. या विद्यापीठाचा मुख्य उद्देश बौद्ध धर्माचा प्रसार सर्वसामान्य लोकांपर्यंत करणे हा होता. आणि ''त्या दृष्टीने बंगलोर येथे बौद्ध सेमिनरी काढण्याचे बाबासाहेबांनी ठरविले होते''[५३] व तशी मुलाखत त्यांनी पी.टी.आय.ला दिली होती. म्हैसूर सरकारने या कामासाठी पाच एकर जमीन दिली होती. या

विद्यापीठात जात, धर्म, राष्ट्र असा कोणताही भेदभाव न मानता सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल, तसेच सर्व धर्मांचे ज्ञान येथे देण्यात येईल असे जाहीर केले.

धर्मप्रसारासाठी व तो समजण्यासठी धर्मग्रंथाची आवश्यता आहे, म्हणून बाबासाहेबांनी नोव्हेंबर १९५१ मध्ये ग्रंथ लिहिण्यास घेतला. हा ग्रंथ बाबासाहेबांनी १९५६ मध्ये लिहून पूर्ण केला. ''या ग्रंथाला प्रथम त्यांनी 'बुद्ध अॅण्ड गॉस्पल' असे नाव देण्याचे ठरविले होते. परंतु नंतर 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हे नांव देण्यात आले.''[५४] ''धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्षुसंघाने ख्रिश्चन पाद्री लोकांसारखे कार्य करावे असे मत बाबासाहेंबांनी प्रतिपादन केले होते.''[५५] अशा प्रकारे बौद्ध धर्म समजावून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रसारासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले होते. डॉ. आंबेडकरांनी नागपूर मुक्कामी १४ ऑक्टोबर १९५६ अशोका विजयादशमीच्या दिवशी लाखो बांधवांसह धर्मांतर केले. धर्मांतरानंतर अवघ्या दीड महिन्यात त्यांचे महापरिनिर्वाण झाले. परंतु धर्मांतराची ही चळवळ त्यांना आदर्श मानून आजही सातत्याने चालू असल्याचे दिसते. भारतीय राज्यघटना आणि बौद्ध धम्माची चळवळ परस्परपूरक आहेत. भारतातील सर्व जनता याकडे आकर्षित होत आहे.

**२.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मुंबई :**

मुंबई डॉ. आंबेडकरांची कर्मभूमी मानली जाते. त्यांचे शालेय जीवन, महाविद्यालय शिक्षण येथेच पूर्ण झाले. त्यांच्या समाजकारण, राजकारण, पत्रकारिता, धर्मकारण या विविध क्षेत्रांतील चळवळीची सुरुवात मुंबई शहरातून झाली. म्हणून मुंबई ही त्यांच्या सर्व कार्याची कर्मभूमी ठरली. त्यांच्या मुंबईतील या चळवळीचा थोडक्यात आढावा.

**मुंबईतील सामाजिक चळवळ :**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तिलढ्याची जी आंदोलने सुरू केली, त्याची सुरुवात मुंबईत झाली. मार्च १९२४ मध्ये त्यांनी परळ येथील दामोदर हॉलमध्ये सभा घेतली होती आणि बहिष्कृत हितकारिणी सभेच्या स्थापनेची रूपरेषा ठरविली होती. या काळात बाबासाहेब परळ येथील बी.आय.टी. चाळीत राहात होते. तेथेच त्यांचे स्वतःचे ऑफिसही होते. ही इमारत सोशल लीग सर्व्हिस या नावाने ओळखली जाई. डॉ. आंबेडकरांनी जे विविध सत्याग्रह केले त्या सर्वांची पूर्वतयारीची बैठक याचा कार्यालयात होत असे.

१९ मार्च १९२८ रोजी डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधीमंडळात प्रसिद्ध 'महार वतन विधेयक'[५६] मांडले होते. १८७४ च्या महार वतनाच्या कायद्यात सुधारणा करणे हा या बिलामागचा उद्देश होता. या महार वतनाच्या विरोधी जे पहिले आंदोलन बाबासाहेबांनी उभे केले, त्याची प्रचारसभा मुंबईत कामाठीपुरा येथे घेण्यात आली होती. ''इ.स. १९२८-२९ या काळात मुंबईच्या सार्वजनिक गणेश उत्सवात, गणेश पूजेत, अस्पृश्यांना भाग मिळावा म्हणून संघर्ष केला होता. तसेच डॉ. आंबेडकरांच्या मार्फत मुंबईतील भुलेश्वर मंदिरात प्रवेश मिळण्याचे प्रयत्न झाले होते. डॉ. आंबेडकरांनी मंदिराच्या ट्रस्टीबरोबर पत्रव्यवहार केला होता. अशाच प्रकारे गिरगाव येथील राममंदिर प्रवेशासाठी प्रयत्न करण्यात आले. परंतु हे मंदिर खाजगी मालकाचे असल्यामुळे मंदिराच्या ट्रस्टीने अस्पृश्यांना मंदिर प्रवेशास नकार दिला होता.''[५७]

कोकणात प्रचलित असलेल्या खोती या जमिनदारीच्या प्रकारात गरीब शेतकऱ्यांची जी पिळवणूक होत असे, त्याच्या विरोधात १० जानेवारी १९३८ रोजी हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा काढून शासनाकडे एक निवेदन बाबासाहेबांनी सादर केले होते. त्यांच्या मागण्या मांडल्या होत्या.

**कामगार चळवळ :**

डॉ. आंबेडकर हे बॉम्बे म्युनिसिपल कामगार संघाचे अध्यक्ष होते. या संस्थेची स्थापना इ.स. १९३६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी केली होती. मुंबईत १९२४, १९२५, १९२८ व १९२९ या वर्षामध्ये गिरणी कामगारांचे अनेक संप झाले होते. यावेळी हजारो कामगार संपात उतरले होते. या सर्व कामगारांना संपापासून परावृत्त करण्यासाठी बाबासाहेबांनी दि. २९ एप्रिल १९२९ रोजी दामोदर हॉलमध्ये सभा घेतली होती. परंतु जेव्हा १९३८ साली कामगारांच्या संप करण्याचे हक्क काढणारे विधेयक प्रांतिक लोकनियुक्त शासनाकडे आले तेव्हा मात्र बाबासाहेबांनी या बिलाला विरोध केला. त्या वेळेस त्यांनी अशी भूमिका घेतली होती की, ''संप हे नागरी अपकृत्य असू शकेल पण तो काही गुन्हा नाही. स्वतःच्या इच्छेविरुद्ध कोणाला काम करायला भाग पाडणे म्हणजे त्याला गुलाम करणे होय. संप करणे म्हणजे स्वतःच्या अटीनुसार काम पत्करण्याच्या स्वातंत्र्याचा हक्क बजावणे होय. संपाच्या हक्काला स्वातंत्र्याला हक्काइतकेच पवित्र मानतो.''[५८] १९३८ च्या संपामुळे संपूर्ण मुंबई ढवळून निघाली होती. ६ नोव्हेंबर रोजी कामगार मैदानात प्रचंड सभा घेण्यात येऊन एक मोर्चा काढण्यात आला होता. वरळीच्या जांबोरी मैदानात या मोर्चाचे विसर्जन झाले होते. या संपामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'कामगार नेता' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**राजकीय आंदोलन :**

१९२६ साली डॉ. आंबेडकरांची नियुक्ती मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे सदस्य म्हणून झाली होती. तेव्हा विधीमंडळात महार वतन विधेयक, खोती निर्मूलन विधेयकाप्रमाणेच सावकारांच्या कर्जबाजारी जोखडातून गिरणी कामगारांना मुक्त करण्यासाठी १९३८ मध्ये विधेयक मांडले होते.

इ.स. १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना बाबासाहेबांनी मुंबईत केली. याच पक्षाचे उमेदवार म्हणून ते परळ-भायखळा भागातून इ.स. १९३७ साली निवडून आले होते. तेव्हा त्यांच्या विजयाप्रित्यर्थ कामगार मैदानावर सभा घेण्यात आली. दि. २ जुलै १९४२ रोजी व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात पहिले मजूरमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांची नियुक्ती झाली आणि मे १९४६ पर्यंत त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मंत्री म्हणून कामकाज केले होते. मजूरमंत्री असताना देशभरात एम्प्लॉयमेंट एक्सचेंजचे (सेवायोजन कार्यालय) जाळे पसरविण्याची कल्पना बाबासाहेबांनी मांडली होती. मुंबई महानगरीत रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे मुंबईचे सेवा योजना कार्यालय आजही देशात अग्रेसर आहे. डॉ.आंबेडकरांनी दि. १९ जुलै १९४२ रोजी मुंबईत शेडयुल कास्ट फेडरेशनची स्थापना करून या फेडरेशनच्या माध्यमातून अनेक राजकीय आंदोलने केली. या आंदोलनाचा केंद्रबिंदू मुंबई होता. मंत्रिपदाच्या या काळात त्यांनी विविध योजना राबविल्या होत्या. उदा. सरकारी खात्यात राखीव जागा ठेवण्याचे तत्त्व मान्य करून घेतले होते. अस्पृश्य विद्यार्थांना तांत्रिक-वैज्ञानिक क्षेत्रात शिष्यवृत्ती मिळवून देण्याचे प्रयत्न केले होते. महार बटालियनची स्थापना केली होती. इ.स. १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई, औरंगाबाद येथे महाविद्यालये सुरू केली होती.

**पत्रकरिता :**

कोणतेही आंदोलन चालविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वर्तमानपत्र होय. डॉ. आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता ही पाक्षिके मुंबईतून चालवली. या सर्वांचे कार्यालय व मुद्रणस्थळ मुंबईत होते. पाक्षिकांद्वारे बाबासाहेबांनी राजकीय, सामाजिक आंदोलनाची पार्श्वभूमी तयार केली.

**शैक्षणिक कार्य :**

सन १९२७ साली मुंबई प्रांताच्या विधीमंडळामध्ये मुंबई विद्यापीठ कायद्यामध्ये सुधारणा

सुचविणारे विधेयक मांडण्यात आले होते, तेव्हा डॉ. आंबेडकरांनी मुंबई विद्यापीठाच्या कामकाजात भविष्यकाळाच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त दुरुस्त्या सुचविल्या होत्या. सन १९३८ च्या मुंबई प्रांतातील प्राथमिक शिक्षण कायद्यामध्ये सुधारणा सुचविणाऱ्या विधेयकाच्या चर्चेत सूचना सुचविल्या होत्या.

सन १९४५ साली डॉ. आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना मुंबईत केली. या सोसायटीचे सिद्धार्थ कॉलेज, मुंबई फोर्ट विभागात सुरू करण्यात आले. मुंबईमध्ये पहिले मॉर्निंग कॉलेज सुरू करण्याचा मान सिद्धार्थ कॉलेजकडे जातो. या सोयायटीमध्ये विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका' हा मंत्र देऊन हजारो होतकरू मुलांच्या जीवनाला दिशा देण्याचे काम केले. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना लोकशाहीची ओळख व्हावी म्हणून कॉलेज पार्लमेंटसारखे अभिनव कार्यक्रम राबविले जात. या संस्थेच्या महाराष्ट्रात व देशात अनेक शाखा स्थापन करण्यात आल्या आहेत. आजही ही संस्था सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कार्यरत आहे.

**२.७ सारांश :**

अशा रितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्योधाराची चळवळ इ.स. १९२० ते इ.स. १९३५ पर्यंत केली. हिंदू धर्माचा अंतर्गत राहून अस्पृश्याचे प्रश्न सुटणार नाहीत हे सत्य समजल्यानंतर त्यांनी इ.स. १९५६ मध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्त्वप्रणालीवर आधारित बौद्ध धम्माचा स्वीकार केला याच तत्त्वांवर आधारित देशाचे संविधान त्यांनी बनविले होते.

**२.८ संदर्भ :**


१. खैरमोडे चां. भ., डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड-१, आवृत्ती पाचवी, सुगावा, पुणे, २००२, पृष्ठ क्र. ५५.

२. फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या, पुणे १९८५, पृष्ठ क्र. ३२-३३.

३. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉल्युलर, आवृत्ती चौथी, २००६, पृष्ठ क्र. २९.

४. जनता पाक्षिक, दि. २३/५/१९५६, पृष्ठ क्र.

५. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर, आवृत्ती चौथी, २००६, पृष्ठ क्र. ६१.

६. खरात शंकरराव (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, इंद्रायणी, पुणे २००८, पृष्ठ क्र. १४.

७. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर,आवृत्ती चौथी, मुंबई, २००६,पृष्ठ क्र.६१.

८. मून वसंत (संपा.), बहिष्कृत भारतातील अग्रलेख, महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग, मुंबई १९९०, पृष्ठ क्र. २५.

९. गणवीर रत्नाकर (संपा.), बहिष्कृत भारतातील अग्रलेख, रत्नमित्रा, नागपूर, १९७६, पृष्ठ क्र. ८८

१०. गणवीर रत्नाकर (संपा.) तत्रैव.

११. खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंड तिसरा, आवृत्ती तिसरी, सुगावा, पुणे २००३, पृष्ठ क्र. २६३.

१२. खैरमोडे चां. भ., तत्रैव, पृष्ठ क्र. ३०३.

१३. खरात शंकरराव (संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, ठोकळ, पुणे, १९६६, पृष्ठ क्र.२९

१४. खरात शंकरराव, तत्रैव, पृष्ठ क्र. ३१.

१५. रुपवते (संपा.), प्रबुद्ध भारतातील लेख, दि. १४ एप्रिल १९५२, अंक ६ वा.

१६. पंडित नलिनी, स्वातंत्रोत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना, पुणे १९७७, पृष्ठ क्र. १२९.

१७. पाटणकर मनीषा (संपा.), लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, मुंबई, २००६, पृष्ठ क्र. १२९.

१८. खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड तिसरा, आवृत्ती तिसरी, सुगावा, पुणे, २००३, पृष्ठ क्र. १८५.

१९. तत्रैव, पृष्ठ क्र. १८६.

२०. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, आवृत्ती दुसरी, सुगावा, पुणे २००६, पृष्ठ क्र. ४१.

२१. सुरवाडे विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय, मुंबई, २००८, पृष्ठ क्र. ८.

२२. Singh Sanghsen, Ambedkar on Buddhism and its impact, Eastern Book linless, Delhi, 1990 P.No. 15

२३. खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड-१४, आवृत्ती तिसरी, सुगावा, पुणे, २००३, पृष्ठ क्र. ९४-९५.

२४. खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, आवृत्ती दुसरी, इंद्रायणी, पुणे, पृष्ठ क्र. ४७.

२५. कित्ता, पृष्ठ क्र. ४७.

२६. खैरमोडे चां. भ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड पाचवा, आवृत्ती ३, सुगावा, पुणे पृष्ठ क्र. ६१-६२.

२७. खैरमोडे चां. भ., तत्रैव, पृष्ठ क्र. ६१-६२.

२८. खरात शंकरराव, डॉ.आंबेडकरांची पत्रे, ठोकळ, पुणे, १९६१, पृष्ठ क्र. १५८.

२९. गणवीर रत्नाकर, संपा., डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील लेख, रत्नमित्र, नागपूर, १९६१, पृष्ठ क्र. १७८.

३०. खरात शंकरराव, डॉ. आंबेडकरांची पत्रे, ठोकळ, पुणे, १९६१, पृष्ठ क्र. १५९.

३१. मून वसंत, डॉ. आंबेडकर आणि धम्मक्रांती, फुलराणी साहित्य सहवास, मुंबई, पृष्ठ क्र. १८.

३२. मून वसंत, तत्रैव.

३३. कसबे रावसाहेब, डॉ.आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा, आवृत्ती दुसरी, पुणे, २००६, पृष्ठ क्र. १८४.

३४. कसबे रावसाहेब, तत्रैव.

३५. Das Bhagwan, Thus spoke Ambedkar, Vol.4, Abmedkar Sahithya, Punjab, 1980, Page No. 139-40.

३६. गणवीर रत्नाकर (संपा.), बहिष्कृत भारतातील अग्रलेख, रत्नमित्र, नागपूर, १९६१, पृष्ठ क्र.९०.

३७. Ambedkar B.R., Buddha and the Future of his religion, Bheem Patrika, Panjab, 1970, Page No. 12/13.

३८. आपटे वा. गो., बौद्ध पर्व अथवा बौद्ध धर्मांचा साव्यंत इतिहास, समता, नागपूर, १९९५, पृष्ठ क्र. १.

३९. प्रबुद्ध भारत, डॉ.आंबेडकर बौद्ध दीक्षा विशेषांक, दि.२७ ऑक्टोबर १९५६ च्या भाषणातून.

४०. Ambedkar B. R., Buddha and the Future of his religion, Bheem Patrika, Panjab, 1970, Page No. 13.

४१. मून वसंत, नरके हरि (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग-३, महाराष्ट्र शासन, २००२, पृष्ठ क्र. २०३.

४२. तत्रैव, पृष्ठ क्र. २१७.

४३. तत्रैव, पृष्ठ क्र. २१७.

४४. तत्रैव, पृष्ठ क्र. २२९.

४५. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आवृत्ती चौथी, पॉप्युलर, मुंबई, २००६, पृष्ठ क्र. २८७.

४६. मून वसंत, नरके हरि (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग-३, महाराष्ट्र शासन, २००२, पृष्ठ क्र. ५६६.

४७. तत्रैव, पृष्ठ क्र. ३५४.

४८. गायकवाड प्रदीप (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बौद्ध धम्मावील भाषणे व लेख, दीक्षाभूमी संदेश, नागपूर, द्वितीय आवृत्ती, २००८, पृष्ठ क्र. १४७.

४९. मून वसंत, नरके हरि (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग-३, महाराष्ट्र शासन, २००२, पृष्ठ क्र. ३५४.

५०. तत्रैव, पृष्ठ क्र. ५४१.

५१. तत्रैव, पृष्ठ क्र. ४१४.

५२. तत्रैव, पृष्ठ क्र. ४८०.

५३. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर, आवृत्ती चौथी, मुंबई, २००६, पृष्ठ क्र. ५३७.

५४. तत्रैव, पृष्ठ क्र. ५०८.

५५. Ambedkar B. R., Buddha and the future of his religion, Bheem Patrika Panjab, 1973, Page No. 16/17.

५६. बहिष्कृत भारताचे अंक सविस्तरसाठी पहा : १९२७, २ सप्टेंबर, १६ सप्टेंबर, ३० सप्टेंबर आणि १४ नोव्हेंबर.

५७. Letter to Police Commissioner Bombay, 6 Nov. 1929, Spl. Home Dept. File Page No. 23.

५८. मून वसंत (संपा.), बहिष्कत भारत आणि मूकनायक, महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग, मुंबई, १९९०, पृष्ठ क्र. ३४४.

❑❑

# प्रकरण ३

# मुंबईत बौद्ध धर्माचा प्रसार

## ३.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात बौद्ध धर्माचा मुंबई शहर आणि तिच्या उपनगरात केव्हा उदय झाला व त्याचा किती प्रभाव होता यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या प्रकरणात बौद्ध धर्माचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे मुख्य विषयाची कालखंडाची मर्यादा ओलांडणे क्रमप्राप्त झाले आहे. या प्रदेशात इ.स.पूर्व ३ रे शतक ते ११ वे शतक या कालखंडात बौद्ध धर्माचा उदय, विकास आणि प्रसार तसेच ऱ्हास झालेला दिसून येतो. त्यानंतर जवळजवळ नऊ शतके हा धर्म या ठिकाणी अदृश्य झालेला दिसतो. पुढे त्याचे पुनरुज्जीवन २० व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. मुंबईमध्ये आज एकूण लोकसंख्येत सात टक्के लोकसंख्या बौद्धांची आहे. ज्यांनी प्रामुख्याने सन १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे.

हे प्रकरण स्थापत्याच्या अथवा कलेच्या दृष्टीने लिहिलेले नसून ऐतिहासिकदृष्ट्या बौद्ध धर्माचा प्रसार मुंबई शहर व उपनगर यावर किती झाला होता यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने लिहिले आहे. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून ते ११ व्या शतकापर्यंत म्हणजे सम्राट अशोकाच्या काळापासून ते ब्रिटिश काळापर्यंत अनेक राजघराण्यांनी मुंबईवर राज्य केलेले आहे. या काळात बौद्ध धर्माचा प्रभाव या प्रदेशावर किती होता, हे अभ्यासणे हा या प्रकारणाचा मुख्य उद्देश आहे. कारण मुंबईच्या सांस्कृतिक जडणघडणीत बौद्ध धर्माचा फार मोठा वाटा आहे. इ.स. पहिल्या शतकापूर्वीपासून येथे बौद्ध धर्माचा प्रसार झालेला होता. बौद्ध धर्माची शिकवण येथे मिळाली होती. या शिकवणुकीमुळेच येथे एक नवा सांस्कृतिक ठेवा निर्माण झालेला आहे. मुंबईत अनेक लेणी, विहारे, चैत्ये खोदली गेलेले दिसतात. यातील काही लेणी काळाच्या आड गेली आहेत. परंतु काही लेणी मात्र आजही बौद्ध धर्माच्या प्रभावाची साक्ष देतात. उदा. कोंडिवटे, कान्हेरी, मागठाणे, जीवदानी, इ. लेण्या.

मुंबई हा भारतातील असा एकमेव प्रदेश आहे, ज्यावर अनेक वर्षे देशी आणि विदेशी राज्यकर्त्यांनी तसेच विविध धर्मीयांनी राज्य केले. त्यातूनच मुंबई हे कॉस्मोपॉलिटन शहर म्हणून उदयास आले. प्राचीन काळात बौद्ध धर्माला प्रचंड लोकप्रियता लाभली होती, हे येथील पुरातत्त्विक पुरांव्यावरून सिद्ध होते. भारतात एकूण १२०० लेणी असून यांपैकी सर्वाधिक लेणी महाराष्ट्रात आहेत. यामध्ये सर्वात जास्त लेणी मुंबई व तिच्या उपनगरात आहेत. यावरून मुंबईमध्ये बौद्ध धर्माचा किती प्रभाव होता हे स्पष्ट होते. या धर्माला त्या काळात राजाश्रय मिळाला होता. तसेच सर्वच थरांतून लोकांनी या धर्माला देणग्या दिल्या होत्या. त्याचे पुरावे आजही उपलब्ध आहेत. त्यामध्ये व्यापारी, उद्योगपती व सामान्य माणसांपर्यंत सर्वांनी दान दिल्याचे दानपत्रांवरून समजते. दोन हजार वर्षांपूर्वी मुंबईचा संपूर्ण भूभाग बौद्ध संस्कृतीच्या प्रभावाखाली होता हे सिद्ध होते.

महाराष्ट्राच्या पर्यायाने मुंबईच्या इतिहासची सुरुवात बुद्धकाळापासूनच केली पाहिजे. परंतु बऱ्याचदा हा कालखंड सातवाहन घराण्यापासून समजला जातो. ख्रिस्तपूर्व ५०० ते ख्रिस्तोत्तर ५०० वर्षे असा जवळजवळ १००० वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील धार्मिक इतिहासाकडे पाहिल्यास त्यात बौद्ध संप्रदायाच्या प्रभावाचा विचार करणे आवश्यक ठरते.

### ३.२ मुंबईचे प्राकृतिक स्थान :

मुंबईच्या प्राकृतिक रचनेमुळे बौद्ध धर्माच्या प्रसारास अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली दिसते. ''मुंबईच्या प्राकृतिक रचनेमुळेच येथून भारताबाहेर व्यापार चालत असे. याच व्यापारी मार्गावर सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बसाल्ट खडकात लेणी खोदलेली आहेत.''[१] प्राकृतिकदृष्ट्या महाराष्ट्राचे प्रामुख्याने तीन विभाग पडतात. सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेकडील किनारपट्टी म्हणजे कोकण, सह्याद्रीचा घाटमाथा म्हणजे देश आणि सह्याद्रीचा पूर्वेकडे पसरलेला पठारी प्रदेश म्हणजे विदर्भ होय. महाराष्ट्राचा बराचसा भाग अग्निजन्य खडकांमुळे बनलेला आहे. हा भाग डेक्कन ट्रॅप्स नावाने ओळखला जातो (दख्खनचे पठार). ''महाराष्ट्राभोवती एकसंघ काळ्या कातळामुळे येथे लेणी खोदणे सोपे गेले आहे.'' भारतात जवळ जवळ १२०० लेणी आहेत.''[२] त्यांपैकी ६०% लेणी पश्चिम महाराष्ट्रात असून उत्तर कोकणात म्हणजेच मुंबई व तिच्या उपनगरात सर्वात जास्त लेणी आढळतात.

### ३.३ उत्तर कोकण :

मुंबई ही संज्ञा प्राचीन काळात अस्तित्वात नव्हती. आधुनिक काळातील मुंबई जिल्हा व उपनगर जिल्हा हे प्रदेश प्राचीन काळात साष्ठी या विभागात मोडत असे व त्याचा इतिहास ठाणे जिल्ह्यात येत असे. ''साष्टीमध्ये बांद्रे, खार, दांडा, सांताक्रूज, अंधेरी, जोगेश्वरी, मालाड, कांदिवली, बोरिवली इत्यादींचा समावेश होता.''[३] महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रदेशांना जी नावे दिली आहेत त्यामध्ये कोकण या प्रादेशिक विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व मुंबई शहर आणि उपनगरांचा समावेश होतो. या कोकणपट्टीचे उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे भाग पडतात. ''उत्तर कोकणात ठाणे व मुंबई शहर व तिच्या उपनगरांचा समावेश होतो. या उत्तर कोकणाचा उल्लेख प्राचीन काळात अपरांत असा केला आहे.''[४] अपरांत म्हणजे पश्चिमेकडचा शेवटा प्रदेश. डॉ. भांडारकरांच्या मते, अपरांत म्हणजे उत्तर कोकण, त्याची राजधानी सुप्पारक असे मानले आहे.''[५] मुंबई बेट साष्टी तालुक्याखाली कुलाबा तालुक्याच्या पश्चिमेस समुद्रात पसलेले होते. कुलाब्यापासून माहीमपर्यंतचा भाग सात बेटांचा होता. माहीम, कुलाबा, छोटा कुलाबा, माझगाव, वरळी, परेल आणि माटुंगा. या बेटांमधील जमीन पाण्याखाली होती. त्यात भर टाकून हल्लीची मुंबई बनली आहे. मुंबईचा विस्तार पश्चिम रेल्वेच्या दहिसरपासून मध्य रेल्वेच्या मुलुंडपर्यंत झाला आहे. हा संपूर्ण प्रदेश आज बृहन्मुंबई या नावाने ओळखला जातो. या दोघांचा उल्लेख मुंबई असा केला जातो. प्रस्तुत प्रबंधात हा प्रदेश संशोधनाचे क्षेत्र आहे.

मुंबईच्या पश्चिमेला अरबी समुद्र, तर उत्तरेला ठाणे जिल्हा आहे. दक्षिणेकडे रायगड जिल्हा, पूर्वेला ठाणे, वाशीजवळ नवे शहर आणि आजूबाजूचा प्रदेश मिळून नवी मुंबई बनली आहे व हा प्रदेश उत्तर कोकण प्रदेशात मोडतो.

मुंबई शहर भागामध्ये कुलाबा ते माहीम, शीव, गिरगाव, लालबाग व दादर हा भाग येतो. माहीमपासून दहिसरपर्यंत शीवपासून मुलुंडपर्यंतचा भाग उपनगरांमध्ये येतो. वांद्रे, कुर्ला, अंधेरी व चेंबूर ही त्यातील महत्त्वाची उपनगरे असून या प्रदेशावरील बौद्ध धर्म प्रभावाचा अभ्यास या ठिकाणी केला आहे.

### ३.४ मुंबईचा प्राचीन इतिहास :

मुंबईचा म्हणजेच उत्तर कोकणाचा उल्लेख रामायण व महाभारत या ग्रंथांमध्ये आढळतो.

महाकवी कालिदास यांनी या प्रदेशाचा अपरांत या नावाने आपल्या काव्यात उल्लेख केलेला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातदेखील अपरांताचा उल्लेख सापडतो. ''प्रसिद्ध इजिप्शियन भूगोलतज्ज्ञ टॉलेमी याने आपल्या भूगोल या ग्रंथात या प्रदेशाला ॲरियाका असे म्हटले आहे. ॲरियाका अपरांताचे भ्रष्ट रूप असावे.''[६] बौद्ध साहित्यातून अपरांताचा संदर्भ येत असून सम्राट अशोकाने अपरांतात धर्मप्रसारक पाठविल्याचा उल्लेख पुढे येईलच.

राजकीयदृष्ट्या महाराष्ट्र हा एकसंघ नव्हता. ''पाली वाङ्मयात अपरांत, अवंती, दक्षिणापथ, महाराष्ट्र, कोकणपथ, इ. देशांचा निर्देश होता.''[७] या ठिकाणी असणारी सुपीक जमीन, बारमाही वाहणाऱ्या नद्या, नैसर्गिक बंदरे, उत्तम हवामान आणि मिठागरे या सर्वामुळे उत्तर कोकणाचा प्रदेश परकीय लोकांना नेहमीच आकर्षणाचे क्षेत्र ठरले आहे. त्यातूनच अनेक राजसत्तांनी येथे शासन केलेले दिसते. त्यापैकी काही राजकीय कारकिर्दी बौद्ध धर्माच्या प्रसाराला अनुकूल ठरल्या होत्या. त्यामुळे अगदी प्राचीन काळापासून या प्रदेशावर बौद्ध धर्माचा प्रभाव दिसतो. प्रथम येथे ''अतिप्राचीन काळात द्रविड लोकांची वस्ती असावी.''[८] ''भोजक, बौद्ध नागराजे, चंदिराजे, आंध्र घराणे, सातवाहन, शक, अभिर, तैकूटक, कलचुरी, मौर्य, बदामीचे चालुक्य, सेंद्रक, रापदूकूट, शिलाहार, गुजरातचे चालुक्य, कदंब, देवगिरीचे यादव, अल्लाउद्यीन खिलजी, बहामनी, गुजरातचा सुलतान, पोर्तुगीज, मराठे आणि शेवटी इंग्रजी सत्ता''[९] अशा प्रकारे अडीच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजवटींनी येथे राज्य केले. जगातील प्रमुख सात धर्मांचे लोक येथे शेकडो वर्षे रहात आहेत. त्यामध्ये बौद्ध, हिंदू, जैन, ख्रिश्चन, पारशी, मुस्लीम, ज्यू महत्त्वाचे होते. या सर्वामध्ये जास्त काळ बौद्ध धर्माचा प्रभाव या प्रदेशावर होता. ही मोठी महत्त्वाची बाब आहे.

**मुंबईची सत्तांतरे व बौद्ध धर्म :**

उत्तर भारतात जेव्हा मौर्यांची सत्ता इ.स.पूर्व १८४ मध्ये नष्ट झाली होती, तेव्हा उत्तर कोकणात मात्र त्याची छोटी छोटी राज्य अस्तित्वात होती. मौर्यांची राजधानी पुरी ही होती. इ.स. ६२५ मध्ये चालुक्य घराण्यातील पुलकेशीने मौर्यांचा पराभव केला होता. मौर्यानंतर महाराष्ट्रात सातवाहन घराणे सत्तेवर आले. या सातवाहनांच्या काळात व्यापार भरभराटीला आला होता. त्यांच्यानंतर क्षत्रयांचे राज्य आले. इ.स. पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात मौर्यकुळातील राजे सत्तेवर

होते. परंतु सहाव्या शतकाच्या शेवटी चालुक्य राजांनी मौर्याची वाताहत लावली. चालुक्यानंतर राष्ट्रकुट व त्यानंतर शिलाहार घराणे सत्तेवर आले. त्यांनी इ.स. ८१० ते इ.स. १२६० पर्यंत प्रदीर्घ राज्य केले. त्यानंतर यादवांनी येथे सत्ता प्रस्थापित केली होती. यादवांचा राजा रामदेव याने आपला मुलगा बिंब (भिमदेव) याला कोकणात पाठविले होते. यादवानंतर चौल घराण्याने येथे थोडा काळ राज्य केले. परंतु अहमदाबादच्या सुलतानाने हा भाग आपल्या प्रदेशास जोडला. गुजरातचा सुलतान बहादूरशहाने इ.स. १५३४ मध्ये मुंबई व वसई बंदर पोर्तुगीजांना दिले. तेव्हापासून इ.स. १६६१ पर्यंत मुंबईची बेटे, साष्टी हा प्रदेश त्यांच्या ताब्यात होता. ''सन १६६१ मध्ये या प्रदेशाची मालकी इंग्रजाकडे गेली. सन १९४७ पर्यंत हा प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात होता.''[१०] या सर्वांमधे काही राजवटी बौद्ध धर्माला अनुकूल होत्या तर काही प्रतिकूल होत्या. त्यांपैकी सातवाहन घराणे हे प्रमुख होते. इ.स.पूर्व ७८ ते इ.स. २१८ इतक्या प्रदीर्घ काळात या भागावर त्यांचे शासन होते. त्याच्या साम्राज्यात उत्तर कोकणाचा भाग येत होता. सातवाहन राजे धर्मसहिष्णू होते. त्यांच्या काळात बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाला. याचे पुरावे उपलब्ध आहेत. उदा. नाशिक, कार्ले, कान्हेरी येथे लेणी खोदण्यात आली होती. सातवाहनांचा राजा ''यशश्री सातकर्णी याने कान्हेरी येथील १०९ लेणी खोदली होती.''[११] ''इ.स. १२४-५० या कालखंडामध्ये सातवाहनांच्या नाण्यांवर बहुतेक चैत्य (स्तूप) आहेत.''[१२] विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील बहुतेक लेणी सातवाहनांच्या काळात कोरली गेली आहेत. उदा. नाणेघाटातील लेखामध्ये सातवाहनांनी बौद्ध धर्माला उदारपणे देणग्या दिल्या होत्या, याचे उल्लेख सापडतात. कान्हेरी येथील एक्यांऐशी नंबर शिलालेख सातकर्णी नृपनी गौतमीपुत्र यशश्री सातकर्णी याचा असून कान्हेरी पर्वतावर लेणे व मंडप दान दिल्याची नोंद आहे. कल्याणचा रहिवासी अपरेणु याने हे दान दिले होते. त्याने चारही दिशांच्या भिक्षुंना द्रव्य आणि शेती दान केली होती. तसेच ''मंगळस्थान खेड्यातील शेती दान केली होती. हे मंगलस्थान म्हणजे आजचे कान्हेरी जवळचे मागठाण होय.''[१३] तसेच तीन नंबरचे चैत्य लेणे गौतमी पुत्र यशश्री सातकर्णी यांच्याच काळातील असून या लेखात बंधू गजसेन व गजाभिन यांनी चैत्य बांधल्याचा उल्लेख आहे. ''याच लेण्यांचा प्रवेशद्वारावर इ.स. ४ ते ५ व्या शतकातील बुद्ध रक्षितांना दान दिल्याचा उल्लेख आहे.''[१४] सातवाहनानंतर क्षत्रय व अभीरांच्या राज्यात बौद्ध धर्माला आश्रय मिळाला. यापैकी क्षत्रय हे शक असूनही त्यांनी बौद्ध धर्माला आश्रय दिला होता. उदा. ''नहपान क्षत्रपाचा जावई ऋषभदेव याने

सोपारा येथे धर्मशाळा बांधल्या, अन्न छत्रे चालविली, आश्रम बांधले व विहिरी खोदल्या.''[१५] या नहपनाचा पराभव गौतमीपुत्र सातकर्णी याने केला होता. ''भारतात राज्य करणारे परकीय शासक म्हणजे क्षत्रय उदा. ग्रीक, शक, पल्लव, नहपान. नहपान हा शेवटचा क्षत्रय राजा होता. त्याचे राज्य उत्तर कोकणावर होते व सोपारा प्रदेश त्याच्या ताब्यात होता.''[१६] त्याच्या काळात कोकणाचा व्यापार वाढला होता. क्षत्रय राजांपैकी रूद्रसिंह हा बौद्ध उपासक होता. राष्ट्रकुट राजा अमोघवर्षे, शिलाहार राजा पुल्लशक्ती व कपर्दी इत्यादी राजांच्या काळात बौद्ध लेणी खोदण्यात आली होती. त्यांपैकी राष्ट्रकुट घराण्याचा पराक्रमी राजा अमोघ वर्ष याच्या काळात वेरूळपासून कान्हेरीपर्यंत अनेक लेणी व चैत्य विहार खोदण्यात आले होते. त्यांचा कोकणातील मांडलिक शिलाहार राजा पुल्लशक्ती याचा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा लेख कोरलेला मिळतो. ''कोकण वल्लभ-श्री. कर्पीचा अमात्य, श्री. पूर्णहरीचा पुत्र, श्री. विष्णुगुप्त याने श्री. कृष्णगिरीचा आचार्य संघाला वंदन करून विहाराच्या दुरुस्तीसाठी भिक्षुंना वस्त्र देण्यासाठी व पुस्तके देण्यासाठी तसेच बुद्धांच्या पूजेसाठी धन दान केले असा उल्लेख आलेला आहे.''[१७] शिलाहारांच्या एकूण बासष्ठ शिलालेखांपैकी तीन लेख बौद्ध धर्मासंबंधीचे आहेत. हे लेख कान्हेरी लेण्यामध्ये असून त्याचा काळ इ.स. ८५१, ८७७ व ८७८ असा आहे. दान दिलेल्या शैलगृहाची काळजी आपल्या स्त्री-पुत्राप्रमाणे करावी असा उल्लेख ७८ क्रमांकाच्या शिलालेखावर आहे. ''या शिलालेखानुसार कृष्णगिरी येथे राहणाऱ्या भिक्षुंच्या चिवरा करता व ध्यानसाधनेसाठी आवश्यक असलेल्या जागेसाठी धम्मदान केल्याचा उल्लेख आला आहे.''[१८] शिलाहारांच्या एकूण तीन शाखा महाराष्ट्रात होत्या. त्यातील एक शाखा उत्तर कोकणात ठाणे व कुलाबा या भागात होती.

**३.५ उत्तर कोकणातील बौद्ध धर्माचा ऱ्हास :**

गौतमी पुत्र सातकर्णी याने नहपान क्षत्रपाचा पराभव केला होता. त्याच्याच काळात ''समाजात जी चातुर्वर्ण्य व्यवस्थेला शिथिलता आली होती ती घालविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते.''[१९] पुढे मध्ययुगात पोर्तूगीजांच्या काळात तर बौद्ध भिक्खूंना ख्रिश्चन केल्याच्या नोंदी आढळतात. पोर्तुगीजांच्या आक्रमणामुळे कान्हेरी येथे बराच काळ जिवंत राहिलेला बौद्ध धर्म ऱ्हासाकडे गेला. ''इ.स. १५३५ मध्ये पोर्तुगीज पाद्री फादर ॲन्टोनिओ-डी-पोर्टो याने येथील भिक्षुंना ख्रिश्चन केल्याची नोंद आहे.''[२०] य. न. केळकर यांच्या 'वसईची मोहीम' या ग्रंथात

वास्को-द-गामा याचे तोंडचे एक वाक्य दिले आहे, ''आम्ही धर्मप्रसारासाठी आणि व्यापारासाठी हिंदुस्थानात आलो आहोत.''[२१] पोर्तुगीज मिशनऱ्यांनी पोर्तुगीज सरकारी अधिकाऱ्यांची मदत घेऊन धर्मांतरे करण्यास सुरुवात केली होती. ''इ.स. १५७८ मध्ये एकट्या वसईत ९४०० लोकांना बाप्तिस्मा देण्यात आला होता.''[२२] या काळात हिंदूंच्या धर्मस्थळांची बरीच मोडतोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे कान्हेरीसारख्या बौद्ध स्थळाचीही मोडतोड करण्यात आली. इ.स. १५४२ किंवा इ.स. ४४ सुमारास गोव्याचा सुप्रसिद्ध सेंट झेविअर्स हा पाद्री वसईत आला होता. त्याने आपला जेजुईट पंथ वसई आणि वांद्रे भागात पसरविला होता. शेकडो हिंदूंना त्याने बाटविले. इ.स. १७५८ मध्ये एकट्या वसईत चर्चमध्ये ९४०० शे. हिंदूंना बळजबरीने बाप्तिस्मा देण्यात आला होता. इ.स. १५५२ मध्ये वसई, चौल व ठाणे येथून धर्मोपदेशक पाठविण्यात आले होते. वांद्र्याचे सेंट ॲन्ड्र्युज चर्च याच काळात बांधण्यात आले. ''१५८५ मध्ये मंडपेश्वर, माहीम, मुंबई, कारंजा, कलव्हरी व आगाशी ही ठिकाणी मिशनऱ्यांनी उध्वस्त केली होती. तेथील जोग्यांना हाकलून लावले होते व तेथील लेण्यांवर चर्च बांधून खिस्ती धर्माची पाठशाला स्थापन केली होती.''[२३]

याच काळात बौद्ध धर्म येथून पूर्णपणे नष्ट झालेला दिसतो. तो फक्त स्थापत्यातून तसेच वाङ्मयातून जिवंत राहिला होता. अशा प्रकारे उत्तर कोकणात वेगवेगळ्या राजघराण्यांच्या काळात बौद्ध धर्माचा प्रभाव किती आणि कसा होता, हे समजते.

**३.६ मुंबई परिसरातील बौद्ध धर्माचे प्रभावक्षेत्र :**

मुंबईत बौद्ध धर्माच्या प्रसाराची सुरुवात अडीच हजार वर्षांपासून झालेली आहे. सम्राट अशोकापासूनच येथे बौद्ध धर्म मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला होता. संपूर्ण उत्तर कोकणाचे क्षेत्र बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली होते, हे खालील मुद्यांवरून स्पष्ट होते. या ठिकाणच्या प्रदीर्घ बौद्ध कालखंडाचे उगमस्थान हे सध्याचे ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा हे शहर आहे.

**सोपारा :**

हा प्रदेश इतिहासात वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. ''शिलालेखातून व ताम्रपटातून सोपाऱ्याला शूर्पारक असे नमूद केलेले आहे. परंतु मूळ नाव सौपर्यम-सॉपरे-सुपारे-सोपारे असे असून शूर्पारक हे संस्कृतमध्ये नाव असून''[२४] या सोपारा शहरात सम्राट अशोकाच्याही अगोदर तथागत

बुद्ध स्वतः आलेले होते. म्हणजेच इ.स.पूर्व ५ व्या शतकात बुद्धांच्या पदस्पर्शाने ही भूमी पवित्र झालेली दिसते. महाराष्ट्रातील नालासोपारा हे एकमेव असे तीर्थक्षेत्र आहे, जेथे स्वतः तथागत गौतम बुद्ध येऊन गेलेले आहेत. बऱ्याचदा असे समजले जाते की, उत्तर कोकणात बौद्ध धर्माचा प्रसार अशोकाच्या काळात सुरू झाला व त्याला अशोकाचे शिलालेख पुरावा म्हणून सादर केले जातात. परंतु जेव्हा आपण बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करतो, तेव्हा बौद्ध धर्म बुद्धांच्या काळात महाराष्ट्रात आला होता असे दिसते. एवढेच नव्हे तर स्वतः तथागतांनी येथे येऊन अनेक लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली होती, हे सिद्ध होते. याचा वाङ्मयीन पुरावा म्हणजे बावरीची कथा होय. या कथेचा उल्लेख पारायण वग्गात दिलेला आहे. पाली भाषेतील सुत्त नीपात यामधील पाराण वग्गावरून महाराष्ट्रात बुद्धांच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता, हे सिद्ध होते. 'सुत्तनिपातः' हा ग्रंथ प्राचीन असून अशोकाच्या अगोदरच्या कालखंडाची माहिती ग्रंथावरून उपलब्ध होते. त्यानुसार बावरी नावाचा एक मंत्रपारायण ब्राह्मण कोशल देशावरून श्रावस्तीमधून दक्षिण पथामध्ये गेल्याचा उल्लेख आहे. गोदावरी नदीच्या तीरावर तो राहत होता. एकदा त्याने यज्ञ केला होता. त्यावेळी त्याने एका ब्राह्मणाला दान देण्याचे नाकारताच ब्राह्मणाने बावरीला शाप दिला की, ''सात दिवसांच्या आत तुझ्या डोक्याचे तुकडे होतील.''[२५] बावरीला याचा अर्थ न कळाल्यामुळे त्याने आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी आपले सोळा शिष्य तथागतांकडे पाठविले होते. आपल्या शंकेचे निरसन झाल्यानंतर बावरी आपल्या शिष्यांना घेऊन पैठण येथे आले. या ठिकाणी त्यांनी विहार बांधून बौद्ध धर्माच्या प्रसाराचे कार्य सुरू केले. यावरून तथागतांच्या काळापासून महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता, हे सिद्ध होते. प्रत्यक्ष धर्मदीक्षेसाठी बुद्ध येथे आले होते, हे खालील कथांवरून स्पष्ट होते.

**अर्हतपुण्ण :**

''थेरगाथांमध्ये अर्हतपुण्ण आणि अर्हंत ईसिददिना''[२६] यांची नोंद आहे. तसेच पपंचसुयनी व सारथयप्पकटिनी या ग्रंथामध्ये ''पूर्णाच्या आमंत्रावरून बुद्धांनी सोपाऱ्याला आगमन केल्याचा उल्लेख आहे.''[२७] अर्हतपुण्ण हा ठाणे जिल्ह्यातील सोपारा येथील व्यापारी होता. या पुण्णने तथागत बुद्धाकडून श्रावस्ती येथे दीक्षा घेतली होती त्याला धर्माचे ज्ञापन प्राप्त झाल्यानंतर तो पुन्हा सोपारा येथे आला. या ठिकाणी त्याने बौद्ध विहार बांधून धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले होते.

बनार्फ या फ्रेंच विद्वानाने नेपाळ, तिबेट व सिलोन येथील धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता. या विद्वानाने पुर्णाविषयी माहिती सांगितली आहे. ती म्हणजे पुण्ण (पूर्ण) हा सोपाऱ्यातील एका श्रीमंत व्यापाऱ्याचा दासीपुत्र होता. एकदा तो व्यापारानिमित्त सोपाऱ्यावरून बनारसच्या काही व्यापाऱ्यांना येऊन मलबारकडे जात होता. त्यावेळी मलबार हा देश चंदनाच्या झाडांसाठी प्रसिद्ध होता. प्रवासात जाताना बनारसच्या या व्यापाऱ्यांनी काही गाथा म्हटल्या. त्या गाथा ऐकून पुण्ण आनंदित झाला व त्याने ही गाणी कसली, असे विचारले. तेव्हा ही गाणी नसून बुद्धधम्माच्या वंदना व धम्माची पवित्र गीते आहेत, असे सांगितले. या गाण्यांमुळे पूर्ण प्रभावित झाला. ''मलबारवरून परत आल्यानंतर त्याने व्यापार सोडला व तो बुद्धांच्या भेटीसाठी श्रावस्ती येथे गेला. तेथे त्याने बुद्धाकडून धम्म समजावून घेतला आणि धम्माचा स्वीकार केला. तसेच त्याने बुद्धाला आपल्या देशात धम्माचा प्रसार करण्याची परवानगी मागितली. तेव्हा तथागतांनी धम्मप्रसारात कशा अडचणी येतील याची पूर्वकल्पना त्याला दिली होती. परंतु त्याने न घाबरता आपण धम्माचा प्रसार करू असे बुद्धाला सांगितले होते आणि तथागतांनी त्याला तशी मान्यताही दिली होती.''[२८] पूर्ण सोपाऱ्याला परत आल्यानंतर त्यांने सोपाऱ्यात एक विहार बांधले. या विहाराचे वर्णन खालीलप्रमाणे केलेले आढळते. त्यानुसार ''सोपारा शहराच्या मध्यभागी एक मोठे बुद्धविहार होते. त्याचे क्षेत्रफळ १००० चौ.यार्ड होते. मंदिराचे दरवाजे चंदनाचे होते. भिंती, चंदनाच्या लाकडावर कोरीव काम केलेल्या होत्या. त्या बुद्धांच्या जीवनातील प्रसंगांविषयीच्या चित्रांनी सुशोभित केल्या होत्या.''[२९] असा उल्लेख आहे. शहराला मोठा वेस असून त्याला एकूण अठरा दरवाजे होते. ''या बौद्ध मंदिराचे उद्घाटन करण्यासाठी पुर्णाने तथागत बुद्धांना सोपाऱ्यात बोलाविले होते. याची माहिती पपंच सुमती आणि सारथ्यप्पकटिणी या ग्रंथात सापडते.''[३०] महाकवि अश्वघोष याने बुद्ध चारित्र्यामध्ये महत्त्वाची नोंद केली आहे की, ''तथागत बुद्धांनी सोपाऱ्याला श्रेष्ठ स्तवकर्ण याला धर्मदीक्षा दिली होती.''[३१] पूर्णाचा कालखंड इ.स.पूर्व चौथे शतक असा आहे. अशा प्रकारे तथागतांच्या काळातच बौद्ध धर्माचा प्रसार महाराष्ट्रात पयार्याने मुंबईत झाल्याचे वाङ्मयीन पुरावे आजही उपलब्ध आहेत. ब्रिटिश इतिहास संशोधक एस. एम. एडवर्ड यांनी आपल्या 'राईज ऑफ बॉम्बे' या ग्रंथामध्ये भगवान बुद्ध अपरांतात आल्याचे स्पष्ट केले आहे. ''बुद्ध जेव्हा सोपाऱ्यात आले होते, तेव्हा त्यांनी दक्षिणेकडील पंधरा मैल अंतरावरील साष्टी परिसरात मुसलगिरी या अरण्यात राहणाऱ्या नागराजांना,

कृष्ण आणि गौतम यांना धम्माची दीक्षा दिली होती.''[३२] असा उल्लेख आहे. या नागराजांना भेटण्यासाठी बुद्ध मुसलगिरी येथे आले होते. ''या ठिकाणी राहणाऱ्या सिद्धमुसल नावाच्या महर्षीला बुद्धांनी धर्माची दीक्षा दिली होती.''[३३] तसेच येथील पाचशे जोगतीणींच्या मठालासुद्धा बुद्धांनी भेट दिली होती. येथे एक छोटा स्तूप बांधला होता. ''तो विधवांचा स्तूप अथवा वाकूला स्तूप म्हणून प्रसिद्ध आहे.''[३४] याचा उल्लेख ''महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्हा गॅझेटमध्येसुद्धा सापडतो.''[३५]

**मुसलगिरी :**

हे ठिकाण मुंबई उपनगरातील कांदिवलीच्या पश्चिम द्रूतगती मार्गावर आकुर्ली गावाच्या वेशीजवळ पडण नावाचे गाव आहे. हे पडणगाव म्हणजेच प्राचीन मुसलगिरी होय. या मुसलगिरीच्या टेकडीवर बौद्ध संस्कृतीचे अवशेष सापडले होते. बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक भगवान लाल इंद्रजी यांनी इ.स. १८८२ मध्ये या ठिकाणी उत्खनन केले असता त्यांना येथे बौद्ध संस्कृतीचा मोठा ठेवा प्राप्त झाला. या ठिकाणी उत्खननात काही शिलालेख, बुद्धांची पदचिन्हे आणि सिद्धमुसल असे नाव कोरलेला एक शिलालेख सापडला आहे. हा लेख ब्राम्ही लिपीतील आहे. ''इ.स.पूर्व पहिल्या शतकातील या शिलालेखावरून अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्धांनी सिद्धमुसल नामक ब्रह्मर्षीला बौद्ध धर्माची दीक्षा दिली होती, हे सिद्ध होते. त्याच्या नावावरूनच या टेकडीला मुसलगिरी हे नाव पडलेले आहे''[३६] असे बौद्ध संस्कृतीचे प्रसिद्ध इतिहास संशोधक भगवान लाल इंद्रजी यांनी म्हटले आहे. परंतु आज मात्र या ऐतिहासिक भेटीचे कोणतेच अवशेष शिल्लक नाहीत. मुंबईच्या नकाशावरून हा भाग अदृश्य झाला आहे.

इ.स. १८८८ मध्ये भगवानजींचा मृत्यू झाला. त्यानंतर ''सोपाऱ्याचा हा ऐतिहासिक ठेवा आश्चर्यकारकपणे दुर्लक्षित राहिला.''[३७] परंतु इ.स. १९३१ मध्ये त्यांच्या जन्मशताब्दीप्रित्यर्थ गुजरात संशोधन सोसायटीने त्यांच्या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. त्यामुळे पुन्हा सोपाऱ्याविषयीची माहिती पुढे येण्यास मदत झाली. भगवानलालजींनी बौद्ध धर्माविषयीचे जे जे संशोधन केले होते, ते या ग्रंथात प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सम्राट अशोकाच्या काळात उत्तर कोकणात म्हणजेच अपरांतात आणि महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार झाल्याचे अनेक वाङ्मयीन आणि पुरातत्त्वीय पुरावे उपलब्ध आहेत. सम्राट अशोक सत्तेत आल्यानंतर १७ व्या वर्षी त्याने तिसरी बौद्ध संगीती पाटलीपुत्र येथे भरविली होती. 'दीपवंत'

आणि 'महावंस' या सिलोनच्या ग्रंथांवरून या परिषदेची माहिती उपलब्ध होते. या परिषदेचा अध्यक्ष मोगलीपुत्र तिस्सा हा महाथेरो होता. या परिषदेमध्ये एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धर्मप्रसारासाठी वेगवेगळ्या प्रांतांत धर्मप्रसारक नेमण्यात आले होते. त्यानुसार ''महाधर्मरक्षित स्थविर यास महाराष्ट्रात पाठविण्यात आले होते आणि यवन धर्मरक्षित याला अपरांतात''[३८] म्हणजे उत्तर कोकणात पाठविण्यात आले होते. धर्मरक्षिताने महाराष्ट्रात बौध धर्माचा प्रसार कसा केला याची माहिती महावंस ग्रंथात दिली आहे. त्यानुसार ''त्याने ८४ हजार लोकांना धम्माचे ज्ञान दिले होते. १३ हजार लोकांना भिक्षू केल्याचा उल्लेख आहे.''[३९] तसेच ''यवन धर्मरक्षित स्थवराने अपरांत देशात जाऊन अग्निस्कन्धोपम सुत्ताचा उपदेश लोकांना सांगितला होता.''[४०] तेव्हा सदोतीस हजार लोकांनी त्याचा उपदेश ऐकला होता. त्यापैकी ''एक हजार क्षत्रिय स्त्री-पुरुषांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता''[४१] असा उल्लेख सापडतो.

इ.स. १८८२ मध्ये इंग्रजांनी जे उत्खनन केले, त्यामध्ये तीन ठिकाणी प्रामुख्याने अवशेष सापडलेले आहे. या अवशेषांवरून उत्तर कोकणात बौद्ध धर्माचा प्रभाव होता, हे सिद्ध होते. हे अवशेष प्रामुख्याने चार विभागात सापडले आहेत. १) शिलाशासनाचा तुकडा २) शिलालेख ३) विटांचा बौद्ध स्तूप आणि ४) चक्रेश्वमंदिरातील मूर्ती. हे सर्व अवशेष सोपारा व सोपाऱ्याच्या जवळच्या भागात सापडले आहेत.

**१. सोपाऱ्यातील अशोकाचा शिलालेख :**

सोपाऱ्यात अशोकाच्या आज्ञापत्राच्या शिलालेखाचा तुकडा सापडलेला असून तो काळ्या बसाल्ट दगडाचा आहे. हा दगड शहराच्या पूर्वेला असणाऱ्या भाटिला तलावाजवळ सापडला होता. या शिलालेखाच्या तुकड्याचे निरीक्षण केल्यानंतर तो तुकडा सम्राट अशोकाचे जे चौदा शिलाशासने आहेत, त्यातील आठव्या शिलाशासनाचा तुकडा आहे हे लक्षात येते. या शिलाशासनातील शेवटच्या सहा ओळी इतर शिलाशासनाचे निरीक्षण करून त्या आठव्या शिलाशासनाच्या १/३ भाग असल्याचे भगवानलाल इंद्राजी यांनी इ.स. १८८२ मध्ये शोधून काढले होते. इंद्राजी यांच्या मते ''अशोकाची एकूण १४ ते १५ शिलाशासने गिरनार, कापुरडी-गढी, कालजी, डौलिया, जौगडा येथे सर्वत्र एकाच ठिकाणी आढळतात.''[४२] त्याअर्थी सोपार येथे सुद्धा अशी सर्व शासने असावीत. त्याचे संशोधन होणे गरजेचे आहे. अशोकाने आपल्या धर्माज्ञाचे शिलाशासन त्या त्या सर्व राज्यात निर्माण केले होते.

यावरून उत्तर कोकणाचा प्रदेश मौर्याच्या ताब्यात होता आणि या काळात बौद्ध धर्माचा प्रसार व प्रभाव होता, हे सिद्ध होते.

अशाच प्रकारचा आणखी एक शिलालेख येथे सापडलेला असून, ''हा शिलालेख सुरक्षित राहावा म्हणून कलेक्टरने सोपाऱ्याच्या पाटलाला या शिलालेखाच्या तुकड्याची काळजी घेण्यास सांगितले होते. परंतु नंतर पाच ते सहा वर्षांनी या शिलालेखाचा तुकडा गायब झाला.''[४३] अशाच प्रकारचा दुसरा शिलालेख १९५६ मध्ये एशियाटिक सोसायटीचे ग्रंथपाल एन. ए. गोरे यांना सापडला होता. हा शिलालेख अशोकाचे नववे शिलाशासन आहे. अशोकाचे आठवे व नववे शिलाशासन सध्या छत्रपती शिवाजी महाराज म्युझियम, मुंबई येथे ठेवण्यात आले आहेत.

**२. वाकाला किंवा ब्रह्मटेकडी :**

दुसरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे सोपाऱ्यातील गस नावाच्या गावात ब्रह्मटेकडी किंवा वाकाला येथे काही शिलालेख, मुद्रा व नाणी सापडली आहेत. ब्रह्मटेकडीजवळ वाकाला नावाचे तळे आहे. त्यामुळे या टेकडीला 'वाकाला' असेही म्हणतात. या ठिकाणी पाच शिलालेख बसाल्ट दगडात कोरलेले आहेत. हे एकूण पाच शिलालेख (Inscription) असून त्यापैकी तीन महिलांच्या नावाचे आहेत व दोन पुरुषांच्या नावाचे आहेत. ''हे शिलालेख इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील असावेत.''[४४] याच ''वाकाला टेकडीवर बुद्धांनी सोपाऱ्याला जाताना पाचशे विधवांच्या मठाला भेट देऊन त्यांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली होती, हे एम. बर्नाफ यांनी (The Buddhist Legend of Punna) या ग्रंथात सांगितले आहे.''[४५]

**३. बुरुड राजाचा किल्ला :**

सोपाऱ्याचा पश्चिम दिशेला हा किल्ला आहे. हा बुरुड राजाच्या नावावरून ओळखला जातो. या ठिकाणी दिनांक २ एप्रिल १८८२ मध्ये इंद्रजी यांना एक विटांचा स्तूप सापडला. या स्तूपाच्या मध्ये एक करंडक सापडला असून त्या करंडकात बुद्धाच्या गोलाकर आठ छोट्या मूर्ती वेगवेगळ्या मुद्रांमध्ये सापडल्या आहेत. याच करंडकामध्ये आणखी एक छोटा करंडक असून त्यात मातीच्या भांड्याचे काही तुकडे व त्याच्या शेजारी बुद्धाचे चित्र असलेले नाणे सापडले आहे. संशोधकाचे मते, ''मातीच्या भांड्याचे तुकडे हे बुद्धाच्या भिक्षापात्राचे तुकडे असावेत.'' कारण ''स्तुपाची रचना हीच मुळी बुद्धाच्या शरीर धातुवर अथवा वस्तूंवर झालेली दिसते. पुरातत्त्वीय पुरावे

आणि वाङ्मयीन पुराव्यावरून हा स्तूप अशोकाच्या काळातील असावा.''[४६] ''सोन्याच्या करंडकामध्ये बुद्धांच्या मूर्तीबरोबरच सोन्याची फुले सापडली आहेत. तसेच एक चांदीचे नाणे सपाडले असून त्यावर गौतमीपुत्र यजनाश्री सातकर्णी असे लिहिले आहे.''[४७]

**पडण :**

मुंबईच्या उत्तरेपासून अकरा मैलांवर सोपाऱ्याच्या दक्षिणेला अठरा मैल आणि गोरेगाव स्टेशनपासून तीन मैल अंतरावर आकुर्ली नावाचे गाव असून त्याला पडण असेही म्हणतात. या पडण गावाच्या टेकडीवर अनेक अवशेष सापडले आहेत. ''यामध्ये एक नैसर्गिक गुहा, दगडाची बनविलेली प्रतिके, तसेच एक शिलालेख येथे सापडले आहेत. टेकडीच्या माथ्यावर नैसर्गिक गुहा असून टेकडीवर एकूण अकरा प्रतीके कोरलेली सापडलेली आहेत. उदा. गाईची पावले, चक्र, कोन, शंख, जग, पावले, पात्र इत्यादी याच ठिकाणी शिलालेख ही सापडले आहेत.''[४८] या सिद्धमहर्षी नावाच्या महर्षीचा एक शिलालेख आहे.

**बौद्ध लेणी :**

भारताच्या तसेच महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती मिळविताना रामायण, महाभारत, अर्थशास्त्र, पुराणे इत्यादींचा आधार घ्यावा लागतो. तसेच जातक कथा, काव्य व नाटके या साधनांचाही उपयोग होतो. परंतु यातून उपलब्ध होणारा इतिहास विश्वसनीय असलेच असे नाही. कारण घटनांची कालगणना करणे कठीण असते. मात्र उत्खननात मिळालेले अवशेष, अहवाल, नाणी, ताम्रपट, इ. साधने मात्र विश्वसनीय असतात. सुदैवाने महाराष्ट्रात इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून ते इ.स.नाच्या १२ शतकापर्यंतची माहिती लेण्यांच्या माध्यमातून समजते. महाराष्ट्रात जवळजवळ ९०० लेणी आहेत. त्यांपैकी साधारण १५० लेणी मुंबईच्या परिसरात कोरलेली आहेत. या लेण्यांचे सात समूह असून, त्यांपैकी कान्हेरी, महाकाली, मागढाणे आणि जीवदानी ही बौद्ध लेणी आहेत. पुरातत्त्व खात्याने एकूण १२०० लेण्यांची नोंद केलेली आहे. त्यांपैकी दोन तृतीयांश लेणी बौद्धधर्मीयांची आहेत. ''शिलालेखामुळेच अपरांतात सम्राट अशोकाचे राज्य होते''[४९] हे सिद्ध होते. तसेच महाराष्ट्रात सर्वात जास्त लेण्या सातवाहन काळात कोरलेल्या दिसतात.

महाराष्ट्रात असणारा काळा कातळ, अग्निजन्य खडक, निसर्गसौंदर्य, डोंगरात निवांत जागा व पाण्याची सोय यामुळे येथे मोठ्या प्रमाणात लेण्या खोदलेल्या आहेत. व्यापारी मार्गावर या लेण्या

खोदल्या आहेत. उदा. ''सोपारा, कल्याण, ठाणेबंदर यावरून नाणेघाटातून जुन्नरला जाणाऱ्या व्यापारी मार्गावर कान्हेरी, कांडिवटे, अंबिवली, कोंडाणे, भाजे, कार्ले, बेडसे, इंदुरी, पाली व शेलारवाडी या लेण्या आहेत.''[५०]

या लेण्या भिक्षुंच्या वास्तव्यासाठी खोदण्यात आल्या होत्या. तसेच ''भिक्षुंच्या धर्मिक सोयीसाठी चैत्यगृहे बांधण्यात आली होती.''[५१] जसजशी भिक्षूंची संख्या वाढू लागली तसतशी विहारांची, लेण्यांची संख्या वाढत गेली. यावरून बौद्ध धर्माचा प्रसार किती झाला होता, हे समजते. दोन हजार वर्षांपूर्वी मुंबईच्या संपूर्ण भूभागावर घारापूरी, माहीम, कोंडिवटे (अंधेरी), पंचकोड (गिरगाव), मुसलगिरी (कांदिवली), कान्हेरी (बोरिवली) आणि सोपारा येथे वैभवसंपन्न बौद्ध संस्कृतीच्या खुणा आढळून येतात. घारापूरी लेणी (एलिफंटा केव्हज) या लेणी इ.स. नऊ ते तेरावे शतकातील असून इ.स.(८१० ते इ.स. १२६० राष्ट्रकुटांच्या काळातील आहेत. मुंबईजवळ घारापूरी बेटावर खोदलेल्या या लेण्यातील प्रसिद्ध मूर्ती म्हणजे त्रिमूर्ती होय. याच ठिकाणी स्तूप देखील सापडले आहेत. घारापूरी बेटाला पोर्तुगीजांनी एलिफंटा केव्हज् असे नाव या ठिकाणच्या दगडी मोठ्या हत्तीवरून दिले होते. या लेण्या हिंदूधर्मीय शैल लेण्या आहेत. तसेच येथे बौद्ध स्तूपही आहेत.

''घारापूरी हे बेट मौर्यांच्या ताब्यात होते, असे काही इतिहासकांचे मत आहे.''[५२] श्री. सदाशिव गोरक्षक यांच्या मते घारापूरी येथील बौद्ध धर्माचे महत्त्व शैवपंथामुळे कमी झाले. ''या ठिकाणच्या स्तुपांचा नायनाट पोर्तुगीजांनी केला असावा. तसेच या बेटावर बौद्ध विहार असावेत.''[५३] घारापूरी लेण्यांचे, स्तुपांचे संशोधन होणे गरजेचे आहे.

**कोंडिविटे :**

''हा लेण्यांचा समूह मुंबईतील अंधेरी स्टेशनपासून सहा कि.मी. अंतरावर असून या लेण्या महाकाली गुंफा म्हणून प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी एकूण २० लेणी आहेत.''[५४] ''या लेण्या इ.स. पाच ते सहाव्या शतकात खोदल्या गेल्या असाव्यात.''[५५] या लेण्या वेरावली नावाच्या टेकडीवर आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी येथे घनदाट जंगल होते. सुरुवातीच्या काळात या लेण्या कोंडिविटे नावाने ओळखत असत. कारण या लेण्यांपासून जवळच कोंडिविटे नावाचे गाव असून या गावावरून या लेण्यांना कोंडिविटे नाव होते. परंतु नंतरच्या काळात या ठिकाणच्या महाकाली मंदिरामुळे या

लेण्या महाकाली लेणी म्हणून प्रसिद्ध झाल्या. ''या लेण्या बौद्ध लेण्या असून महाकाल नावाचा बौद्ध उपासक होता, त्याच्या नावावरून तसे नाव पडले असावे, हे प्रा. अनिता राणे यांनी सिद्ध केलेले आहे.''[५६] कोंडिविटे लेण्यांमध्ये बुद्धांची कमळावर आसनस्थ अशी मोठी प्रतिमा आहे. दोन नागराजांनी ध्यानस्थ बुद्धांच्या या प्रतिमेला कमळाच्या देठात धरलेले आहे. नागराजांच्या मस्तकावर सात डोक्याच्या नागाचा फणा आहे. त्याच्या दोन राण्या बाजूला उभ्या असून चवऱ्या ढाळणारे दोन सेवक आहेत. तसेच बुद्धांच्या बाजूला दोनराजवंशीय उपासक असून वर पंखाकृती विद्याधर आहेत. हे दोन राजे नंद आणि उपानंद नावाचे नागराजे असून ते मुंबईच्या प्रारंभीच्या बौद्ध संप्रदायाचे अधिपती होते. महाकाली गुंफा मुंबईची ऐतिहासिक ठेव आहे. या ठिकाणी विहार, स्तूप तसेच धम्मचक्र सापडले असून ते बौद्ध धर्माच्या प्रसाराची साक्ष देतात.

**कान्हेरी लेणी :**

मुंबईच्या उत्तरेला कान्हेरी लेण्या असून कान्हेरी हे बौद्धांचे प्राचीन काळातील मोठे केंद्र होते. या ठिकाणी जवळजवळ १२० गुहा असून हिनयान, महायान आणि वज्रयान या तीनही विचारप्रणालीची ते साक्ष देतात. या लेण्यांमुळे बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानात काळानुरुप कसे बदल झाले याची माहिती मिळण्यास मदत होते.

'कान्हेरी' हे प्राचीन नगरांशी जोडलेले होते. उदा. कल्याण, चौल, नाशिक, पुरी, पैठण, औरंगाबाद आणि सोपारा ही व्यापारी शहरे होती. या लेण्यांमधील विविध शिलालेखांचा अभ्यास केल्यास समजते की, अनेक राजवंशांनी, व्यापारी, सर्वसामान्य लोक, सोनार, अमात्य, भिक्षू, भिक्षुणी, कलाकार आणि लेणी खोदणारे तंत्रज्ञ यांनी लेणी खोदण्यास दान दिल्याची माहिती मिळते. यावरून बौद्ध धर्माचा प्रभाव राजापासून सर्वसामान्य जनतेवर पडला होता हे समजण्यास मदत होते.

**जीवदान लेणी :**

विरार रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला तीन कि.मी. अंतरावर या लेणी आहेत. मुंबई शहरापासून ५६ कि.मी. अंतरावर त्या आहेत. या लेण्यापासून अवघ्या ५ कि.मी. अंतरावर सोपारा येथे बौद्ध लेण्यांचे अवशेष सापडले आहेत. जीवदान येथे दोन विभागात लेण्या खोदलेल्या असून पहिल्या विभागात सात लेणी व दुसऱ्या विभागात पाच लेणी खोदल्या आहेत. या लेण्या बौद्ध लेण्या आहेत,

परंतु याच ठिकाणी टेकडीवर जीवदानी देवीचे मंदिर असून त्याला जीवदानी मंदिर म्हणतात. या लेण्या मौर्य काळातील असाव्यात. बौद्ध भिक्षूंच्या वर्षावासाठी त्या बांधल्या होत्या.

**मागठाण लेणी :**

''महाकाली व कान्हेरी गुहांप्रमाणे आणखी एक बौद्ध स्थळ म्हणजे मागठाण होय.''[५७] बोरिवलीतील हे स्थळ आज मात्र मुंबईच्या अतिक्रमणाच्या कोंडीत सापडलेले आणखी एक स्थळ आहे. या ठिकाणी सहाव्या आणि आठव्या शतकातील बौद्ध लेणी आहे. या लेण्यावर पूर्णपणे अतिक्रमण झालेले असून सध्या सेंट झेव्हिअर्स कॉलेजच्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या विभागप्रमुख प्रा. अनिता राणे यांनी या अतिक्रमणाचा मुद्या उचलून धरलेला आहे. ही लेणी वाचविण्यासाठी सध्या त्या कार्यरत आहेत. ब्रिटिश गॅझेट व पुरातत्त्व खात्यामध्ये या लेण्यांची नोंद आढळून येते.

या बौद्धकालीन लेण्यांमधील अतिक्रमणावर दंडकात्मक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आहेत. या लेण्या जोगेश्वरीतील महाकाली गुंफा व बोरिवलीतील कान्हेरी गुंफा यांच्याप्रमाणेच महत्त्वाच्या आहेत. या लेण्यादेखील मुंबईतील बौद्ध धर्माच्या प्रभावाची व प्रसाराची आपणास साक्ष देतात.

**माहीमचा स्तंभ-स्तूप :**

मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाजवळील नायर दवाखान्याच्या परिसरात काही गुहा सापडल्या होत्या. त्यावरून ''कोणी एका काळी मुंबई बेटावर बुद्ध धर्माचा फार मोठा प्रभाव होता आणि तेथे बरेच विहार व चैत्य होते.''[५८] ''मुंबईच्या माहीम भागात शिवाजी पार्ककडे जाणाऱ्या ले. दिलीप गुप्ते मार्गावर सापडलेल्या या काम्य स्तुपाची दखल राज्य गॅझेटमध्ये घेतली आहे.''[५९] परंतु काळाच्या ओघात हे सर्व नष्ट झाल्याची खंत फिरोज रानडे यांनी केली आहे.

अशोकाचे साम्राज्य वसई आणि ठाणे येथे होते, हे सिद्ध करणारा आणखी एक पुरावा अगदी नजीकच्या काळात इ.स. २००७ मध्ये सापडला आहे. ठाण्याच्या पाचपाखाडी येथे भरीव आकाराचा दगडी अशोकस्तंभ व अशोकचक्र सापडले आहे. सध्या हा स्तंभ पाचपाखाडी येथील संघर्ष या संस्थेच्या कार्यालयात सुरक्षित असून या ''स्तुपाचा अभ्यास करण्यासाठी प्रा. दाऊद दळवी यांना बोलाविण्यात आलेले आहे.''[६०] अशाच प्रकारे कमला नेहरू पार्क, मलबार हिल येथेही प्राचीन अशोकस्तंभ आहे, जो बौद्ध धर्मप्रसाराचा साक्षीदार आहे.

**दादर काम्य स्तूप :**

इ.स. १९८२ मध्ये शिवाजी पार्क येथील दिपील गुप्ते मार्गावर इमारतीचे बांधकाम चालू असताना एक काम्प स्तूप सापडला होता. परंतु नंतर या स्तुपाची शिवलिंग म्हणून पूजाअर्चा होऊ लागली.

**पंचकोड लेणी :**

कोंडिवटे लेण्यांचा विस्तार चार ते सहा एकरांपर्यंत झालेला होता. येथे अनेक लहान-मोठे स्तूप होते. त्यांपैकी आरे कॉलनीतील गोरेगाव पूर्व जंगलातील पंचकोड येथे मिठी नदीच्या दक्षिण तीरावर कोंडिविटे लेण्यांपासून अवघ्या अर्धा कि.मी. अंतरावर या लेण्या आहेत. पंचकोड याचा अर्थ पंच म्हणजे पाच व कोड म्हणजे कोंड. कोंड म्हणजे कोंडिवटे या नावाशी संबंधित असावे. या ठिकाणी शिलालेख सापडले नाहीत. त्यामुळे या लेणी बौद्ध लेणी आहेत की हिंदू लेण्या आहेत, हे पुराव्याअभावी सांगता येत नाही. याचे संशोधन होणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे दोन-अडीच हजार वर्षांपासून मुंबईच्या भूभागात घारापूरी, कान्हेरी, माहीम, कोंडिवटे, पंचकोड, सोपारा व मुसलगिरी येथे बौद्ध धर्माचे अवशेष सापडले आहेत. या भागात आणखी संशोधन करण्याची गरज आहे. बौद्ध संस्कृतीच्या खुणा आजही अस्तित्वात आहेत. त्यावरून मुंबई व तिच्या उपनगरावर बौद्ध धर्माचा प्रभाव होता, हे सत्य नाकारता येत नाही.

**३.७ सारांश :**

थोडक्यात मुंबई शहर व तिच्या उपनगरामध्ये बौद्ध धर्माचा प्रसार अडीच हजार वर्षांपूर्वी म्हणजेच बुद्धांच्या तसेच सम्राट अशोकाच्या काळापासूनच झाला होता. संपूर्ण उत्तर कोकण बौद्ध धम्माच्या प्रभावाखाली होते. विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन घडवून आणले आणि बौद्ध धम्म प्रसाराचे कार्य पुन्हा जोमाने सुरू झाले.

या कार्याचे मुख्य केंद्र मुंबई होते. मुंबईमधील बौद्ध स्थापत्याचे वैशिष्ट्य म्हणजे मुंबईमध्ये असणाऱ्या सर्व धर्मांच्या स्थापत्यांपैकी बौद्ध स्थापत्य सर्वात पहिले आहे.

## ३.८ संदर्भ :


१. Vidya Deheja, Early Buddhist Rock Temple, A Chronology Study, Thames and Husen, London, 1972, Page No. 1.

२. Gokhale B. G., Buddhism in Maharashtra A History, Popular, Mumbai, 1976 , pp. 13.

३. धोत्रे सु. बा., बौद्धकालीन मुंबई साष्टी व मुंबई बेटातील बौद्ध संस्कृती, पद्मपाणी, मुंबई, पृष्ठ क्र. १४.

४. मोरे मा. श., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य, औरंगाबाद, २०००, आवृत्ती तिसरी, पृष्ठ क्र. १३.

५. केतकर श्री. व्य., प्राचीन महाराष्ट्र भाग १, वरदा, पुणे १९८९, आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र. १४८.

६. टिकेकर अरुणा, स्थल-काल, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०४, पृष्ठ क्र. १०.

७. आचार्य बा.बा./शिंगणे मो.वि. संपा. मुंबईचा वृत्तांत, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुनर्मुद्रण, मुंबई, १९८०, पृष्ठ क्र. ५.

८. David M. D., History of Bombay (1661-1708), University of Bombay 1973, pp. 10.

९. जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा विवेचनात्मक इतिहास, खंड चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९६५, पृष्ठ क्र. ४.

१०. टिकेकर अरुण, स्थलकाल, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००४, पृष्ठ क्र. १२.

११. भावे वा. कृ., मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड एक, भावे वा. कृ., १९४६, पृष्ठ क्र. १५.

१२. कित्ता, पृष्ठ क्र. १८.

१३. देव शां. भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, पृष्ठ क्र. ६२-६३.

१४. कित्ता, पृष्ठ क्र. ६७.

१५. दळवी दाऊद, लेणी महाराष्ट्राची, ग्रंथाली, मुंबई, २००४, पृष्ठ क्र. १२१.

१६. चौधरी के. के. संपा., महाराष्ट्र राज्य गॅझेट, भाग एक, गॅझेटियर डिपार्टमेंट ऑफ महाराष्ट्र मुंबई, १९८६, पृष्ठ क्र. २१८-१९.

१७. देव एस. बी., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक सूची, मुंबई, १९८४, पृष्ठ क्र. ६७.

१८. मिराशी वा. वी., शिलाहार रावंशाचा इतिहास व कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, १९७४, पृष्ठ क्र. २१.

१९. भावे वा. कृ., मुसलमानपूर्व महाराष्ट्र - खंड एक, श्री सयाजीराव साहित्य, भाषापुष्प २९८ वे, १९४६, पृष्ठ क्र. १४.

२०. मोरे मा. शं., महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा इतिहास, कौशल्य, आवृत्ती तिसरी, २०००, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ७९.

२१. केळकर य. न., वसईची मोहीम, आनंद मुद्रणालय, पुणे १९३०, पृष्ठ क्र.

२२. टिकेकर अरुण, स्थल-काल, मौज, मुंबई, २००४, पृष्ठ क्र. २६५.

२३. केळकर य. न., वसईची मोहीम, आनंद मुद्रणालय, पुणे, १९३०, पृष्ठ क्र. ७२/७३.

२४. राजवाडे वि. का., महाकावतीची बखर, उर्फ माहीमची बखर, चित्रशाळा प्रेस, १९४६, पृष्ठ क्र. ८८.

२५. भिक्षू धर्मरत्न, सुत्त निपातपाराण वग्ग गाधा, महाबोधी, सारनाथ, १९५१, पृष्ठ क्र. १०८.

२६. भागवत एन. के., थेरगाथा, मुंबई युनिव्हर्सिटी, १९३९, पृष्ठ क्र. १२.

२७. देवडेकर आनंद (संपा.), सद्धधम्म पत्रिका, मुंबई, पृष्ठ क्र. ५.

२८. Maharashtra State Gazzeetter, Thane District Revised edition II, Gazzeetters Government Press, Mumbai, 1982, pp. 53/54.

२९. तत्रैव.

३०. मोरे मा. श., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी, २०००, पृष्ठ क्र. ३८.

३१. देवडेकर आनंद (संपा.), सद्धधम्म प्रतिका मासिक, २००६, पृष्ठ क्र. ५.

३२. Adward S. M., Rise of Bombay, Times of India Pres, 1902, pp. 20.

३३. Maharashtra State Gazetteer, Thane District, Revised II Edition, 1982, Gazetteers Dept. Govt. Press, 1982.

३४. The Journal of the Bombay branch of the Royal Society Vol.VI, 1982, pp. 291-92.

३५. Maharashtra State Gazzeeteers, Thane District, Revised II edition, 1982, Gazzeetters Dept. Mumbai Govt. Press, pp. 55.

३६. Journal of the Asiatic Society of `Bombay, The Asiatic society of Bombay , 1982, pp. 327.

३७. Devangana Desai (editor), Journal of the Asiatic society of Bombay, the Asiatic Society of Bombay, 1986, pp. 9.

३८. भदंत महानाम, भदंत आनंद, कौसल्यायन, (अनु.), महावंस, बुद्धभूमी, नागपूर, २००० पृष्ठ क्र. ५६.

३९. मिराशी वा. वि., पुस्तकावली, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४, पृष्ठ क्र. ५१-५२.

४०. शास्त्री द्वारिकादास, त्रिपाठी रामकुमार (अनु.), दिपवेस गाथा, बुद्ध आकार ग्रंथमाला, म. गांधी काशी विद्यापीठ, काशी, १९५६, पृष्ठ क्र. १२४.

४१. भदंत महानाम, मदंत आनंद, कौसल्यायन (अनु.), महावंस, बुद्धभूमी, नागपूर, २०००, पृष्ठ क्र. ५७.

४२. Journal of the Asiatic society of Bombay, Vol. IV, The Asiatic society of Bombay, 1882-83, pp. 282.

४३. Ibid.

४४. Ibid, pp. 291.

४५. Ibid.

४६. Journal of the Asiatic Society of Bombay, Town Hall (A 50 B) 1986, Vol.-56 1981-84, pp. 17.

४७. Ibid, pp. 8.

४८. Journal of the Royal Asiatic Society Vol. IV, 1982-83, Mumbai, pp. 317 to 327.

४९. केतकर श्री. व्यं., प्राचीन महाराष्ट्र, वरदा, पुणे १९८९, आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र. ३३७.

५०. Nagarju S., Buddhist Architecture of Western India, Agam Kala, Delhi, 1981, pp. 12.

५१. पाठक अरुणचंद्र (संपा.), स्थापत्यकला महाराष्ट्र राज्य गॅझेट, खंड १, भाग २, महाराष्ट्र दर्शविका विभाग, मुंबई, पृष्ठ क्र. २२.

५२. केतकर श्री. व्यं., प्राचीन महाराष्ट्र, वरदा, पुणे, १९८९, पृष्ठ क्र. ३४४.

५३. Desai Devangana (editor), Journal of the Asiatic Society of Bombay, Asiatic Society of Bombay, Mumbai, 1984, pp. 21.

५४. Nagarju N., Buddhist Architecture of wester India, Agam Kala, Delhi, 1981, Page No. 237-239.

५५. पाठक अ. श. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, स्थापत्य व कला खंड १, भाग २, दर्शनिका विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००२, पृष्ठ क्र. ४७.

५६. कांबळे बबन (संपा.), सम्राट, दि. १३/२/२००६, पृष्ठ क्र. ४.

५७. देव शां. भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक सूची, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, ठाणे, १९८२, पृष्ठ क्र. ६२.

५८. रानडे फिरोज/रानडे रश्मी, महिमा मुंबईचा, ग्रंथाली, २००४, पृष्ठ क्र. ६.

५९. जामखेडकर अ. प्र. व कुलकर्णी भा. वि., स्थापत्य व कला, खंड १, भाग २, राज्य दर्शनिका विभाग, मुंबई, २००२, पृष्ठ क्र. ६२.

६०. महाराष्ट्र टाइम्स, दि. २८ सप्टेंबर २००७, पृष्ठ क्र. २.

❑❑

## प्रकरण चौथे

# धर्मांतराचा मुंबई शहर आणि तिच्या उपनगरावर पडलेला प्रभाव

दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर धर्मांतराची लाट महाराष्ट्रात आली. मुंबई शहर याला अपवाद नव्हते. दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचा पार्थिव देहाला साक्षी ठेवून हजारो लोकांनी धम्मदीक्षा घेतली होती. मुंबईतील हा पहिला दीक्षा समारंभ ठरला. त्यानंतर मुंबईमध्ये धर्मांतराची चळवळ सुरू झाली. धर्मांतरामुळे नवबौद्धांचे संपूर्ण राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन बदलून गेले. प्रस्तुत प्रकरणात धर्मांतराच्या प्रभावामुळे बौद्धांचे जीवनात विविध क्षेत्रात जे बदल झाले. जी स्थिंत्यतरे घडून आली त्याचा शोध या प्रकरणात घेण्यात आला आहे.

सर्वांत प्रथम डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या विविध क्षेत्रातील संस्था, संघटनांवर धर्मांतराचा प्रभाव कसा पडला आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. धर्मांतराचा स्पष्ट प्रभाव पडलेले क्षेत्र म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्र होय. या सांस्कृतिक घडामोडीचा साहित्य निर्मितीवर मोठा प्रभाव पडला आहे. धर्मांतरानंतर या साहित्यामध्ये ती स्थित्यंतरे घडून आली, त्याचा परामर्श घेण्यात आला आहे. धर्मांतराच्या प्रभावाचे आणखीन एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे धार्मिक क्षेत्र होय. धर्मांतरानंतर मुंबईमध्ये बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन होऊन बौद्ध संस्कृती निर्माण झाली व मोठ्या प्रमाणात विहारसंस्कृती निर्माण झाली. तसेच धार्मिक संस्कार, रूढी, परंपरा व प्रथा बदलेल्या आहेत. यांचे संशोधन करण्यात आलेले आहे. धर्मांतराच्या प्रभावाने झालेल्या शैक्षणिक, आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे. आणि शेवटी धर्मांतरामुळे बौद्ध धर्मियांच्या लोकसंख्येत किती वाढ झाली आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. धर्मांतराचा महिलांवर पडलेल्या प्रभावाची चर्चा शेवटी करण्यात आली आहे.

## ४.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या राजकीय संघटना आणि त्यावरील धर्मांराचा प्रभाव :

● **अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष :**

**प्रस्तावना :**

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा प्रभाव पडलेले महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे राजकीय क्षेत्र होय. डॉ. आंबेडकरांनी राजकीय क्षेत्रात नेतृत्व, संघटना, निवडणुका, मतदान आणि लोकशाही शासनप्रणाली या घटकांना जास्त महत्त्व दिले होते. म्हणूनच त्यांनी या तत्त्वांवर आधारित राजकीय पक्ष दिला होता. त्यांचे धर्मांतर हेसुद्धा भारतीय समाजात राजकीय जागृतीची जाणीवपूर्वक सुरू केलेली एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया होती. त्याचा विसर पडला तर त्यांचा धर्मांतरामागील मूलभूत प्रेरणेचाच आपल्याला विसर पडेल व अनेक प्रश्न त्या दृष्टीने अनुत्तीर्ण राहतील, म्हणून त्यांनी स्थापन केलेल्या राजकीय संघटनांचा धर्मांतराच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. आजच्या देशाच्या राजकाणात त्या कितपत यशस्वी आहेत, हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे.

दि. १५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. आंबेडकरांनी मुंबईमध्ये सर्वांत प्रथम आपल्या 'स्वतंत्र मजूर पक्ष' या राजकीय पक्षाची स्थापना केली. या संघटनेचे कार्यक्षेत्र मुंबई व मध्यप्रांतापुरतेच मर्यादित होते. संघटनेचे मुख्य कार्यालय परेल येथे होते. ''या संघटनेचा प्रमुख उद्‌देश म्हणजे दलित, मजूर आणि शेतकरी यांचा संसदीय राजकारणात सहभाग करून घेणे हा होता. तसेच हा पक्ष सर्वासाठी खुला होता.''[१] या पक्षाविषयी त्याकाळात टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने सांगितले होते की, ''जाती आणि धर्माच्या मर्यादा ओलांडणारा कष्टकऱ्यांच्या हिताची जपवणूक करणारा हा पक्ष आहे.'' या काळात राष्ट्रीय काँग्रेस हा एकमेव प्रभावी राजकीय पक्ष होता. त्यामुळे ''देशात एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होऊन देशाच्या लोकशाहीस धोका निर्माण होईल, म्हणून लोकशाही पद्धतीप्रमाणे विरोधी पक्ष असावा.''[२] यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. ''इ.स. १९३६ च्या मुंबई विधिमंडळात अस्पृश्यांच्या पंधरा राखीव जागांपैकी तेरा जागा जिंकून डॉ. आंबेडकरांनी इतिहास घडविला होता.''[३] इ.स. १९३६ ते इ.स. १९३९ या अल्पखंडात पक्षाने केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे कुळ कायदा, खोतीपद्धती, उद्योगांची पुनर्रचना,

तांत्रिक शिक्षण, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, प्रौढशिक्षण तसेच, अस्पृश्यांचे प्रश्न इत्यादी विषयांतर्गत कार्य केले.

डॉ. आंबेडकरांनी या पक्षाची स्थापना एका उच्च ध्येयाने केली होती. त्यांना वर्गविरहित, जातीविरहित आणि वर्णविरहित समाज निर्माण करावयाचा होता. परंतु या पक्षाकडे ''अस्पृश्यांचा पक्ष म्हणून पाहिले गेले. एवढेच नव्हे तर मजूर, शेतकरी, यांनीसुद्धा बाबासाहेबांना साथ दिली नाही.''[४] शिवाय या काळात देशाचे राजकारण वेगळ्या पद्धतीने बदलत होते. इ.स. १९४२ मध्ये इंग्लडचे पंतप्रधान चर्चिल यांनी क्रिप्स याला भारताची भावी राज्यघटना करण्याची योजना देऊन भारतात पाठविले होते. ही योजना काँग्रेस, मुस्लीम लीग, हिंदू महासभा, शीख, आणि संस्थानिक यांच्यासमोर ब्रिटिशांनी मांडली होती. यामध्ये अस्पृश्य वर्गाला दुर्लक्षित केले जाईल म्हणून जेव्हा क्रिप्स यांनी डॉ. आंबेडकरांना तुम्ही अस्पृश्यांचे पुढारी आहात की मजुराचे? असा प्रश्न उपस्थित केला. तेव्हा डॉ. आंबेडकरांना ही संधी जाऊ द्यायची नव्हती. त्यांनी दि. १८ व १९ जुलै १९४२ मध्ये नागपूर येथे अस्पृश्य वर्गाची अखिल भारतीय परिषद घेऊन त्यामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या संघटनेचा प्रस्ताव मांडला व तो मान्य झाला.'' ही संस्था स्थापन करण्याचा मुख्य उद्‌देश म्हणजे, शासनकर्ती जमात बनणे हा होता.''[५] ही शासनकर्ती जमात म्हणजे संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करणारी जमात, बाबासाहेबांना अपेक्षित होती. त्यांना धर्म आणि जातीचे राजकारण अपेक्षित नव्हते. परंतु शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा इ.स. १९५१-५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पराभव झाला. या पराभवाचे गमक डॉ. आंबेडकरांना माहीत होते. त्यांच्या मते, 'दलित वर्गियांनी आपल्यामध्ये आणि इतर समाजामध्ये एक मोठी भिंत उभी केली आहे. परिस्थिती अशा थराला आली आहे की, ''अस्पृश्य वर्गातील उमेदवारांना इतर लोक मते देत नाहीत आणि ते स्वतः दुसऱ्या पक्षातील उमेदवाराला मते देत नाहीत.''[६] ''दलितांनी, ज्या लोकांना दलितांच्या गाऱ्हाण्याविषयी सहानुभूती आहे त्यांच्या साहाय्याने एक राजकीय पक्ष स्थापावा आणि दुसऱ्या पक्षातील नेत्यांबरोबर काम करण्याचा प्रयत्न करावा, आता परिस्थितीचा आढावा घेण्याची वेळ आहे.''[७] यावरून डॉ. आंबेडकरांना दलित आणि इतर समविचारी यांचा एक राजकीय पक्ष असावा असे वाटत होते. संसदीय शिक्षण देणारी 'ट्रेनिंग स्कूल फॉर एन्ट्रान्स टू पॉलिटिक्स' ही संख्या त्यांनी दि. १ जुलै १९५६ रोजी स्थापन केली होती. इ.स. १९४२ ते इ.स. १९५६ या शे.का.फेडरेशनच्या

कालखंडातील सर्वात मोठा विजय म्हणजे धर्मांतरानंतरच्या १९५६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दिल्ली लोकसभेवर नऊ उमेदवार प्रचंड मताने निवडून आले होते. तसेच लोकसभेत शे.का.फेडरेशनचे सतरा उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले होते. इ.स. १९५६ नंतर हेच प्रतिनिधी रिपब्लिकन पक्षाच्या नावाने कार्य करू लागले होते. शे.का. फेडरेशनचे पी. टी. बोराळे हे मुंबईच्या महापौरपदी निवडून आलेले पहिले बौद्ध होते.

दि. २ ऑक्टोबर १९५७ रोजी नागपूर येथे शे.का. फेडरेशनची बैठक घेण्यात आली होती. हा दिवस दसऱ्याचा म्हणजे धम्मचक्र प्रवर्तनाचे पहिले वर्ष होते. ''या बैठकीत शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करण्यात येऊन भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यांत आली.''[८] वास्तविक पहाता आर.पी.आय. या राजकीय पक्षाची घोषणा अगोदरच डॉ. आंबेडकरांनी केलेली होती. ''नागपूरच्या धम्मदीक्षा समारंभाच्या वेळी डॉ. आंबेडकरांनी या राजकीय पक्षाची घोषणा करून त्याचे नाव अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष असेल आणि तो स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर आधारित असेल'' असे जाहीर केले होते. त्या प्रसंगी वार्ताहरांशी बोलताना त्यांनी सांगितले होते की, ''आपण पक्षाची घटना तयार केली असून तिच्या प्रिअंबलमध्ये पार्लमेंटमध्ये येणाऱ्या प्रत्येक विधेयकाची कसोटी स्वातंत्र, समता बंधुत्व या तीन तत्त्वांच्या निकषांवर लावली जाईल.''[९] तसेच यावेळी ''आंबेडकरांनी जनतेला एक खुले पत्र दिलेले होते. त्यानुसार 'संसदीय लोकशाहीच्या यशस्वी क्रियान्वयनाकरिता रिपब्लिकन पक्ष कटिबद्ध राहील.''[१०] असेही जाहीर केले होते. धर्मांतराच्या आदल्या दिवशी वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तरे देताना बाबासाहेबांनी सांगितले होते की, ''बौद्ध धम्मात प्रवेश केल्यानंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा मी सभासद रहाणार नाही.''[११] डॉ. आंबेडकरांनी भारतीय संवधिनाच्या उद्देशिकेवर आधारित राजकीय पक्ष देऊन या पक्षामध्ये सर्वांना येण्याचे आवाहन केले होते. परंतु पक्षाच्या अधिकृत स्थापनेपूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण झाले. भारतीय राज्यघटनेची उद्देशिका म्हणजे बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान आहे आणि राज्यघटनेतील उद्दिष्टांची पूर्ती करणे हेच भारतीय रिपब्लिकन पक्षाचे मुख्य ध्येय आहे. या अनुषंगाने आर.पी.आय.च्या केंद्रीय मंडळाने दि. १० मार्च १९५९ रोजी भारतीय रिपब्लिकन पक्षानी घटना मान्य करून ती अंमलात आणली आहे. त्यानुसार ''भारतीय राज्यघटनेतील उद्देशिका पत्रिकेतील नमूद केलेली ध्येये व उद्दिष्टे हीच भारतीय रिपब्लिकन पद्धतीची ध्येये व उद्दिष्टे आहेत.''[१२]

दि. २९ मे १९६० रोजी मुंबईतील पुरंदरे स्टेडियम नायगाव, दादर येथे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन भरविण्यात आलेले होते. या अधिवेशनात एक ठराव मांडण्यात आला होता त्यानुसार ''जे पक्ष रिपब्लिकन पक्षाची तत्त्वे मान्य करतील आणि जे पक्ष हुकूमशाहीविरुद्ध आहेत तसेच पार्लमेंटरी लोकशाहीचा पुरस्कार करतात अशा पक्षाला रिपब्लिकन पक्ष सहकार्य करेल'[१३] आर.पी.आय.च्या खुल्या अधिवेशनाची दखल त्यावेळेला वृत्तपत्रांनी घेऊन आर.पी.आय.चे महत्त्व त्यांनी ओळखले होते. या अधिवेशनात सुरुवातीला काढलेल्या मिरवणुकीबद्दल साप्ताहिक जनवाणी यांनी दखल घेताना लिहिले होते की, ''एवढी प्रचंड आणि शिस्तबद्ध मिरवणूक गेल्या साडेचार वर्षात संयुक्त महाराष्ट्र समितीचीही निघाली नव्हती, असे दिलखुलास मान्य करण्यास हरकर नाही.''[१४] तर दैनिक नवाकाळ आणि दैनिक तरुण भारत यांनी ''लोकशाहीच्या वाढीस रिपब्लिकन संघटनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिद्धांताप्रमाणे वागण्यातच रिपब्लिकन संघटनेचे व देशाचे हित असल्याची ग्वाही दिली होती.''[१५] वृत्तपत्र नवशक्तीने रिपब्लिकन पक्षाच्या शक्तीविषयी लिहिले होते की, ''बौद्धनिष्ठ विचार आणि लोकशाही निष्ठ आचार यांच्यावर आधारलेला रिपब्लिकन पक्ष ही आज महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रभावी शक्ती आहे. या कार्याचा पसारा इतरत्र झाला तर ती भारतातील एक प्रभावी शक्ती होईल.''[१६] परंतु ''डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर अवघ्या दहा महिन्यांनी अस्तित्वात आलेला रिपब्लिकन पक्ष बाबासाहेबांच्या कल्पनेतला नव्हता.''[१७] इ.स. १९५६ पासूनच आर.पी.आय.मध्ये फुटीचे राजकारण सुरू झाले होते. ते आजतागयात चालूच आहे. इ.स. १९५६ ते २००६ पर्यंत पक्षाचे ऐक्य घडविण्याचे प्रयत्न झाले परंतु ते जास्त काळ टिकले नाही. या काळात बुद्ध शासन सभा, दलित पँथर, मास मूव्हमेंट, सम्यक क्रांती इ. नवीन संघटना स्थापना झाल्या. सध्या आर.पी.आय. चार प्रमुख गटांमध्ये विखुलेली आहे. रा. सू. गवई, ॲड. बाळासाहेब आंबेडकर, रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे हे या गटांचे प्रमुख आहेत. आंबेडकरी समाज मात्र आजही डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाशी एकनिष्ठ आहे. धर्मांतरानंतर प्रत्येक बौद्ध वस्ती पक्षाशी जोडलेली दिसते. आर.पी.आय.मध्ये भले कितीही गट असोत पण वेळ आली तर सारे लोक रिपब्लिकन पक्षाच्या पाठीमागे उभे राहतात. अर्थात याला मुंबई शहर व उपनगरे अपवाद नाहीत. मुंबईतील वस्त्या आर.पी. आय.च्या झेंड्याने आणि पंचशील झेंड्यांनी जोडलेल्या दिसतात.

**आजची रिपब्लिकन पक्षाची स्थिती :**

वास्तविक पाहता ''जातिभेद आणि विषमतेवर आधारलेल्या सत्तास्थानांना हादरे देऊन, जातिव्यवस्थेची उतरंडी खाली ढकललेल्या समाजघटकांच्या हाती सत्तेची सूत्रे यावीत यासाठी बाबासाहेबांनी आर.पी.आय.ची स्थापना केली होती.''[१८] परंतु आजच्या रिपब्लिकन नेत्यांची अवस्था इतकी चिंताजनक आहे की, समाजचे तुकडे-तुकडे करून आंबेडकरी जनतेत भांडण लावून ही राजकीय मंडळी चार दिशेला तोंड करून बसलेली आहेत. याचा परिणाम म्हणजे ''स्वतंत्र भारताच्या अकराव्या लोकसभेत, २००९ मध्ये पहिल्यादाच आर.पी.आय.चा एकही खासदार निवडून आला नाही.''[१९] भविष्यकाळात आर.पी.आय.चे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शिवाय रिपब्लिकन जनतेचाही आर.पी.आय. या नेत्यांवरचा विश्वास कमी झालेला दिसतो आहे. राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत जागृत असलेला, शिक्षणाचे बाबतीत थेट ब्राह्मणांशी स्पर्धा करणाऱ्या या समाजाला कोंडीत पकडले जात आहे, हे निश्चित आहे.

''मुंबईसारख्या महानगरात इ.स. १९९९ च्या विधानसभेत मुंबई आणि तिच्या उपनगरात आर.पी.आय.चा एकही उमेदवार निवडून आला नाही.''[२०] आर.पी.आय.मधील गटबाजीचा फायदा घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेसने आर.पी.आय. नेत्यांचा पराभव अकराव्या लोकसभेत केला. जातीय वादाचे डावपेच वापरून महाराष्ट्रातील रिपब्लिकन राजकारणाला शह देण्यात आला. आर.पी.आय.मध्ये गटाचे राजकारण जरी असले तरी रिपब्लिकन पक्ष सोडण्याची कोणी ताकद करत नाहीत. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्नांवर त्यांच्यात मतभेद नाहीत. ''स्वार्थापोटी धम्माचे कार्य मात्र दुर्लक्षिले जात आहे.''[२१] तसेच ''शिक्षण आणि लोकजागृती कामाऐवजी राज्यसभेकडे त्यांनी आपली दृष्टी वळविली आहे.''[२२]

**रिपब्लिकन पक्षाचे कार्य :**

''इ.स. १९५६ ते इ.स. १९५९ या काळातील आंबेडकरी चळवळ म्हणजे जय नावाचा इतिहास होता. या काळात भारताच्या राजकीय नकाशावर रिपब्लिकन पक्ष चौथ्या क्रमांकावरचा पक्ष होता.''[२३] इ.स. १९६४ मध्ये कर्मवीर दादासाहेब गायकवाड आर.पी.आय.चे अध्यक्ष असताना संसदेवर मोर्चा नेण्यात आला होता. तेव्हा दहा मागण्याचा एक प्रस्ताव मांडण्यात आलेला होता. उदा. कसेल त्यांची जमीन, भूमिहिनांना जमिनीचे वाटप, झोपडपट्टी वाल्यांना घरे,

अस्पृश्यतानिवारण, कायद्याची कठोर अंमलबजावणी, अनुसूचित जाती-जमातींना नोकरीतील आरक्षण, डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र संसदेत लावणे, जीवनावश्यक वस्तुचे भाव कमी करणे, नवबौद्धांना सवलती पुन्हा मिळविणे इत्यादी. विशेष म्हणजे या सर्व मागण्या मान्य झाल्या होत्या. याशिवाय नंतरच्या काळात काही आंदोलने आर.पी.आय.ने केली होती. उदा. मराठवाडा विद्यापीठ नामांतर, राखीव जागा अनुशेष, रिडल्स प्रकरण, झोपडपट्टी पुनर्वसन, घाटकोपर रमाबाई आंबेडकर नगर हत्याकांड इत्यादी. आर.पी.आय.च्या वेगवेगळ्या गटाने ही आंदोलने केली असली तरी त्यांचे उद्दिष्ट मात्र सारखेच आहे.''[२४]

**आर.पी.आय.चे धम्मप्रसारातील कार्य :**

भैय्यासाहेब आंबेडकरांनी राजकारणापेक्षा धम्मप्रसार कार्याला जास्त महत्त्व दिले होते. ''इ.स. १९५६ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मुंबई या राखीव मतदार संघाची उमेदवारी भैयासाहेब आंबेडकरांनी महार म्हणून राखीव जागा घेण्यास नकार दिला होता आणि आपण डॉ. आंबेडकरांचे बौद्ध धर्मिय पुत्र आहोत हे दाखवून दिले आणि मतदार संघाची उमेदावारी नाकारली होती.''[२५] आर.पी.आय. धम्मप्रसाराचे कार्य राजकारणाबरोबर करत आहे, परंतु या सर्वांमध्ये सातत्याने पक्षांतर होत असल्यामुळे धम्मकार्यावर त्याचा विपरित परिणाम होत आहे. डॉ. आंबेडकरांनी जाती-धर्माचे राजकारण बाजूला ठेवण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि लोकशाही या मुद्यांवर आधारित भारताचे संविधान निर्माण करून त्याचे पालन करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली होती. परंतु रिपब्लिकन पक्षातील गटांचे राजकारण बाबासाहेबांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष साकार करू शकला नाही, हे सत्य नाकारता येणार नाही. धम्मकार्याच्या बाबतीतही बुद्धजयंती, आंबेडकर जयंती, धम्मचक्र परिवर्तनदिन अशा प्रासंगिक दिनांपुरते कार्य करताना दिसतात.

## ४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सामाजिक संस्था आणि त्यांवरील धर्मांतराचा प्रभावः

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाची सुरुवात सामाजिक सुधारणा चळवळीपासून केली. कारण, ''राजकीय क्रांती नेहमीच सामाजिक आणि धार्मिक क्रांतीनंतर घडून आलेल्या आहेत.''[२६] म्हणून बाबासाहेबांनी सामाजिक क्रांतीचे आंदोलन प्रथम सुरू केले होते. ''इ.स. १९२४ मध्ये त्यांनी संस्थात्मक कार्याची सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी मुंबईमधे परेल येथे

दामोदर हॉलमध्ये समाजसेवकांची बैठक बोलाविली होती.''[२७] त्यानुसार २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी संस्थेची स्थापना करण्यांत आली. या संस्थेचे ब्रीदवाक्य होते, ''शिकवा, चेतवा आणि संघटित करा.''[२८] (educate, Agilate and organis) या संस्थेचे कार्य मुंबई इलाख्यापुरते मर्यादित होते. ''संस्थेची मुख्य उद्दिष्टे बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, सांस्कृतिक विकास घडविणे, आर्थिक, परिस्थिती सुधारणे आणि बहिष्कृत वर्गाची गाऱ्हाणी सरकार समोर मांडणे ही होती.''[२९] इ.स. १९२८ मध्ये या सभेचे विसर्जन करण्यात येऊन त्याऐवजी भारतीय बहिष्कृत समाज सेवा समितीची स्थापना करण्यात आली. या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती, ''सामाजिक आणि राजकीय समता प्राप्त करून घेणे आणि आर्थिक स्थिती सुधारणे''[३०] इत्यादी होती.

- **समता सैनिक दल :**

दि. ४ सप्टेंबर १९२७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी 'समाज समता संघा'ची स्थापना मुंबईमध्ये केली होती. त्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात आलेले होते. उदा. वैदिक पद्धतीने अस्पृश्यांची लग्ने लावणे, स्पृश्य-अस्पृश्यांमध्ये सहभोजन घडविणे इत्यादी. या संघामध्ये स्पृश्य समाजातील व्यक्तींचा समावेश होता. ''उदा. लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधरपंत''[३१] इत्यादी. ''दि. २९ जून १९२९ रोजी डॉ. आंबेडकरांनी वैदिक पद्धतीने एक अस्पृश्य दाम्पत्यांचा विवाह मुंबईत दामोदर हॉल येथे पार पाडला होता.''[३२]

सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने डॉ. आंबेडकरांनी 'समता सैनिक दल' या संस्थेची स्थापना १३ मार्च १९२६ साली मुंबईत केली होती. ''या दलाचे सुरुवातीचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा दल असे होते.''[३३] ''दि. २ एप्रिल १९३१ रोजी दामोदर हॉल, मुंबई येथे झालेल्या बैठकीत दलाचे नाव 'समाज समता दल' असे देण्यात आले. हे दल अखिल भारतीय समता सैनिक दल या नावाने ओळखले जाऊ लागले, दि. ३० जानेवारी १९४४ रोजी कानपूर येथे अखिल भारतीय समता सैनिक दलाचे अधिवेशन भरविण्यात आलेले होते. तेव्हा दलाची घटना करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने केलेल्या घटनेचे परिक्षण करून दि. २ ऑक्टोबर १९४५ रोजी दलाचे नाव 'समता सैनिक दल' असे ठेवण्यात आले.''[३४] या घटनेमध्ये दलाचे उद्‌देश स्पष्ट करण्यात येऊन ''वंश, धर्म, जात, लिंग, आणि वर्ग यावर आधारित असमानता

नष्ट करून स्वातंत्र्य आणि समतेच्या तत्त्वालवर आधारित समाजाची रचना करणे हा उद्देश होता.''[३५] समता सैनिक दलाचे वार्षिक अधिवेशन मुंबईमध्ये परेल येथे दि. ८ मार्च १९३९ रोजी भरविण्यात आले होते. त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, ''समता सैनिक दलाचा सैनिक म्हणजे समाज सेवेसाठी तळहातावर शीर घेऊन लढण्यासाठी सज्ज झालेला निर्भय योद्धाच म्हटले पाहिजे.''[३६] डॉ. आंबेडकारांच्या सर्व चळवळींमध्ये स. सै. दलाने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. उदा. महाडचा सत्याग्रह, मंदिरप्रवेश सत्याग्रह, धर्मांतर घोषणा, प्रत्यक्ष धर्मांतर आणि धर्मांतरानंतर आजही ती आपली भूमिका बजावताना दिसते. चैत्यभूमीवरील महापरिनिर्वाणदिनी १९५६ पासून आजपर्यंत सुरक्षिततेची जबाबदारी समता सैनिक दल पार पाडते.

याशिवाय इतर विविध प्रकारचे कार्यक्रम दलामार्फत राबविले जातात. उदा. तरुणांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या बलवान बनविणे, शैक्षणिक विकासाकडे लक्ष पुरविणे, त्यांना उद्योग धंद्याचे प्रशिक्षण देणे इत्यादी. समता सैनिक महिला दल - महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांना त्यांच्या हक्काविषयी जागृत करणे, कायदा, आरोग्य, कुटुंब नियोजन यांचे ज्ञान देण्याचे कार्य महिला दल करते. तसेच आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्यही महिला दल करतात. या महिलांनाही सैनिकी प्रशिक्षण देण्यात येते. आजही महिलांच्या शाखा मुंबईमध्ये कार्य करत आहेत. दीक्षाभूमी, चैत्यभूमी, भीमा कोरेगाव स्मृतिस्थळ इत्यादी ठिकाणी प्रसंगानुसार सुव्यवस्था आणि सुरक्षिततेचे कार्य करतात.

**समारोप :**

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आर.पी.आय.मध्ये जशजशी फूट पडत गेली तसतशी समता सैनिक दलामध्ये सुद्धा गटबाजी सुरू झाली. कारण समता सैनिक दल रिपब्लिकन पक्षाचा एक हिस्सा होता. त्यावेळी आर.पी.आय. आणि समता सैनिक दलाचे अध्यक्ष एकच होते. आर.पी.आय.च्या राजकारणाचा परिणाम समता सैनिक दलावर होणे अपरिहार्य होते. परंतु असे असले तरी आजही मुंबईमध्ये समता सैनिक दल कार्यरत आहे. मुंबईमध्ये समता सैनिक दलाच्या जवळजवळ पाचशे शाखा आहेत. डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाणदिन, चैत्यभूमी, दीक्षाभूमी, महाड, नाशिक भीमा कोरेगाव स्मृतीदिन आणि धम्मचक्र परिवर्तन दिन अशा प्रसंगी महत्त्वाची भूमिका बजावतात.

- **बौद्ध पंचायत समिती :**

डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेली आणि आजही कार्यरत असणारी आणखी एक महत्त्वाची संस्था म्हणजे बौद्ध पंचायत समिती होय. ''मुंबईमध्ये कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातून प्रामुख्याने अनेक लोक नोकरी मिळविण्यासाठी येत असत. मराठवाड्यातील लोक मात्र इ.स. १९७२ च्या दुष्काळानंतर मुंबईकडे वळलेले दिसतात.''[३७] नंतर हे लोक मुंबईमध्येच स्थायिक झाले. यामध्ये महार जमातीने आपल्या सामाजिक जागृतीसाठी संघटना तयार केल्या होत्या. या संघटना इ.स. १९२७ पासूनच मुंबईमध्ये समाजजागृतीचे कार्य करत होत्या.

''यामध्ये 'महार समाज सेवा संघ' नावाची संघटना होती. श्री. भिकाजी संभाजी गायकवाड यांच्या पुढाकाराने ही संस्था स्थापन झालेली होती.''[३८] ''दलित वर्गाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करण्यासाठी सरकारने नेमलेल्या स्टार्ट कमिटीपुढे अखिल कोकणस्थ महार समाजाची बाजू मांडण्याचे काम या संघाने केले होते.''[३९] डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली हा संघ कार्य करत होता. पुढे जेव्हा बौद्ध पंचायतीची स्थापना झाली तेव्हा तिच्या स्थापनेच्या कार्यात या संघाने पुढाकार घेतला होता. महार समाज सेवा संघ ही संघटना बौद्ध पंचायत समितीच्या अगोदरची संस्था होती.

**बौद्ध पंचायत समितीची स्थापना :**

मुंबईमध्ये आलेल्या महार जमातीच्या लोकांनी आपापल्या जातिसंस्था बनविल्या होत्या. या जातिसंस्था मिळून 'महार ज्ञाती समिती' नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या मुंबई व तिच्या उपनगरात प्रचार समित्या होत्या. त्यांनी कुलाबा, अंधेरी आणि कुर्ला ते चेंबूरपर्यंत प्रसाराचे कार्य केले होते. या समितीची बैठक दि. २४ मे १९४१ रोजी खार येथील कोकणस्थ कॉलनीत झाली होती. डॉ. आंबेडकर हे सभेचे अध्यक्ष होते. या सभेत महार जाती पंचायत समितीची स्थापना करण्यात आली होती. या घटनेची दखल बॉम्बे क्रॉनिकलने घेतली होती. 'महार संघटित झाले' या मथळ्याखाली त्यांनी बातमी छापली होती. धर्मांतरानंतर या समितीचे नांव 'बौद्ध पंचायत समिती'[४०] असे ठेवण्यात आले.

**बौद्ध पंचायत समितीचे धम्मप्रसाराचे कार्य :**

इ.स. १९४१ ते इ.स. १९९१ सुवर्ण महोत्सवी वर्षात समितीने धम्मप्रसारासे कार्य अत्यंत

योजनापूर्वक केलेले आहे. या समितीच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक प्रबोधनासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झालेले आहे. मुंबई शहर आणि उपनगरात समितीच्या शेकडो शाखा कार्यरत आहेत. समितीचे मुख्य कार्यालय दादर नायगाव येथे आहे. बौद्ध पंचायत समितीचे कार्य खालील प्रमाणे आहे.

**बौद्धाचार्यांची निर्मिती करणे :**

इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर धार्मिक संस्कार करण्यासाठी बौद्धाचार्यांची गरज होती. म्हणून बौद्धपंचायत समितीने बौद्धाचार्य संस्थेची स्थापना केली या संस्थेमध्ये धम्मप्रसाराचे प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात येते, समितीमार्फत धम्म प्रवचने, सभा-संमेलने, मेळावे यांचे आयोजन केले जाते. बुद्धजयंती, आंबेडकर जयंती, धम्म चक्रपरिवर्तनदिन साजरे केले जातात. वर्षावास शिबिरे, याचे आयोजन केले जाते.

**बौद्ध विहारांची निर्मिती करणे :**

धर्मांतरानंतर मुंबईचे बौद्धपंचायत समितीचने अनेक बौद्ध विहार निर्माण केली आहेत. या विहारांमधून धम्मप्रसार-प्रचाराचे कार्य चालते. बौद्धपंचायत समितीने चालविलेल्या बहुतेक सर्व विहारांमध्ये वाचनालय, बालवाड्या, विद्यादानाचे अभ्यासवर्ग चालविले जातात.

**बौद्ध विवाह मंडळाची स्थापना :**

धर्मांतरानंतर बौद्ध झालेल्या मुलामुलींचे विवाह जुळविण्यासाठी सोय व्हावी म्हणून विवाह मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

**शैक्षणिक कार्य :**

शिक्षणाचे महत्त्व ओळखून समितीने शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठविलेच पाहिजे असा दंडक आहे. तसेच मुलींच्या शिक्षणाचा सातत्याने आग्रह धरला होता. बोर्डिंग, वसतिगृहे, आश्रमांना आर्थिक मदती केल्या. मुंबईमध्ये इ.स. १९७० मध्ये मुकुंदराव आंबेडकर रात्रशाळा काढली होती. गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर केली जाते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व्याख्याने, संमेलने, मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात येते. गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात येतात. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीसाठी पतपेढीची स्थापना केली आहे. त्याचप्रमाणे शिक्षणासाठी फंड उभा केला जातो. शिक्षणाप्रमाणेच उघुउद्योगांना अर्थसाहाय्य करण्यासाठी कमी दराने कर्जपुरवठा केला जातो.

**मुंबईमध्ये स्मारकनिर्मिती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पहिले स्मारक म्हणजे आंबेडकर सभागृह होय. ''हे स्मारक मुंबईमध्ये बौद्धजन पंचायत समितीने दि. २२ जून १९५८ मध्ये बांधलेले असून त्यावेळी भैय्यासाहेब आंबेडकर हे बौद्ध पंचायत समितीचे अध्यक्ष होते.''[४१] विशेष म्हणजे, ''मुंबईतील डॉ. आंबेडकरांचा पहिला पुतळा सचिवालयासमोर बसविण्यात आला, त्याचेही श्रेय भैय्यासाहेब आंबेडकरांकडे जाते.''[४२]

**बौद्ध साहित्यनिर्मिती :**

बौद्धपंचायत समितीने इ.स. १९५७ मध्ये सर्वप्रथम 'बौद्ध संस्कार विधी' या पुस्तिकेचे प्रकाशन केले. ही संस्कारविधी पुस्तिका डॉ. आंबेडकर यांनी सारनाथ महाबोधी सभेकडून घेतलेल्या अधिकृत मार्गदर्शनानुसार करण्यात आली होती. ''बौद्ध संस्कार विधिप्रमाणेच समितीने चां. भ. खैरमोडे लिखीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड-२ याचे प्रकाशन केले.''[४३] तसेच पंचायत पत्रिका पाक्षिक, पंचशील त्रैमासिक, पंचशील विशेषांक काढले. बौद्धपंचायत समितीची सुवर्ण महोत्सवी स्मरणिका काढण्यात आली होती. बौद्ध साहित्याची चर्चा करण्यासाठी कविसंमेलने, व्याख्यानांचे आयोजन समिती करणे. ''बौद्ध धम्माचे तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी पाली भाषेचे वर्ग समिती चालविते.''[४४] बौद्धपंचायत समिती बौद्ध महिला मंडळाचा मेळाव्याचे आयोजन करते. उदा. दि. ९ मार्च १९७५ रोजी मुंबईच्या सेंट झेव्हिअर स्टेडियममध्ये महिलांचा मेळावा भरविण्यात आला होता. ''मीराताई आंबेडकर या अध्यक्षा होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध साहित्यिक सौ. मालतीबाई बेडेकर होत्या.''[४५] संस्थेच्या रौप्य महोत्सव दिनानिमित्त दि. १९ जाने. १९७० मध्ये सेंट्रल रेल्वे मैदान परेल येथे मेळावा आयोजित करण्यात आला आला होता. तेव्हा ''१९ जानेवारी या दिवशी मीराताई आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली महिलांचा मेळावा झाला होता. तसेच महाराष्ट्राच्या उपमंत्री सौ. प्रतिभा पाटील प्रमुख पाहुण्या होत्या.''[४६] तसेच संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातही इ.स. १९९१ मध्ये महिला मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याच्या अध्यक्ष सौ. राजश्री जाधव होत्या, तर प्रमुख पाहुण्या साहित्यिक पुष्पा भावे होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी वर्षामध्ये समितीने गोवा ते मुंबई अशी भीमज्योत काढली होती. ही भीमज्योत सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे इत्यादी जिल्ह्यात फिरत शेवटी मुंबईमध्ये झाली होती.

**समारोप :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशिष्ट हेतू ठेवून बौद्ध पंचायत समितीची स्थापना केली होती. कोकणातील लोकांचा मागासलेपणा त्यांच्या लक्षात आला होता. हा समाज मुंबईत येऊन मोठ्या प्रमाणात चाकरमन्याचे काम करीत होता. धर्मांतरापूर्वी हा समाज अनेक अंधश्रद्धा, देवदेवस्की याला पूर्णपणे बळी गेला होता. त्याला या अवस्थेतून बाहेर काढून त्यांचे संघटन करण्यासाठी बाबासाहेबांनी ही संघटना स्थापन केली होती. सध्या मुंबईमध्ये सर्वत्र बौद्ध पंचायत समितीचे जाळे पसरले आहे. परंतु संध्या विवाह, नामकरण, अत्यसंस्कार वैगेरे विधीपुरतेच संस्थेचे कार्य मर्यादित झालेले दिसते.

- **दी पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट :**

डॉ. आंबेडकरांनी स्थापना केलेली आणि आजही कार्यरत असणारी सामाजिक संस्था म्हणजे 'दी पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट' होय.

दि. २९ जुलै १९४४ रोजी मुंबईमध्ये दी बॉम्बे शेड्यूल्ड कास्ट इम्प्रूव्हमेंट ट्रस्टची स्थापना डॉ. आंबेडकरांनी केली होती. धर्मांतरानंतर ट्रस्टचा कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर ट्रस्टचे नाव ''दी पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट असे ठेवण्यास आले.''[४७] या संस्थेचा प्रमुख उद्देश मागासवर्गीयांची उन्नती करणे हा होता. ही संस्था आजही कार्यरत असून डॉ. आंबेडकर भुवन नायगाव, दादर येथे संस्थेचे कार्यालय आहे. या संस्थेची इमारत बांधण्यासाठी इमारत-फंड काढण्यात आला होता. त्यावेळी त्यासाठी बाबासाहेबांनी एक निवेदन काढले होते. त्यानुसार, ''अस्पृश्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व अधिक अभ्युदयासाठी विविध प्रकल्पांचा, उपक्रमांचा निर्देश करून भारताच्या प्रत्येक राज्यात महत्त्वाच्या ठिकाणी अस्पृश्यांसाठी समाजकल्याण केंद्रे व्हावीत व त्यांचे मुख्य केंद्र मुंबईमध्ये असावे,''[४८] असे निवेदनात म्हटलेले होते. ही संस्था आजही कार्यरत असून संस्थेच्या आवारात विविध कार्यक्रम, उपक्रम राबविले जातात. उदा. मोफत कायदा सल्ला केंद्र, यशोधरा संगणक केंद्र, सम्यक व्यवसाय केंद्र या ठिकाणी असून वैद्यकीय ग्रंथपेठी, ग्रंथालय, वधू-वर सूचक केंद्र येथे आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. चर्चासत्र, ग्रंथप्रदर्शन, काव्यसंमेलने, भरविली जातात. बुद्धजयंती, आंबेडकर जयंती, धम्म चक्रपरिवर्तन दिन इ. उत्सव साजरे केले जातात.

दी पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्टने मुंबईत स्मारके निर्माण केली. उदा. महानगरपालिकेच्या गोरेगाव मुंबई येथील सिद्धार्थ रुग्णालय व मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालयात भगवान बुद्धांची मूर्तीची प्रतिस्थापना केलेली आहे.

यामध्ये 'महार समाज सेवा संघ; नावाची संघटना होती. श्री. भिकाजी संभाजी करण्यांचे प्रयत्न चालू आहेत. याशिवाय भविष्यकालीन योजनाअंतर्गत, विपश्यना केंद्र, शैक्षणिक संस्था, डॉ. आंबेडकर म्युझियम इ. उपक्रमांचा समावेश आहे

## ४.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था आणि त्यावरील धर्मांतराचा प्रभावः

भारतीय समाजव्यवस्थेत शूद्रादी शुद्रांना शिक्षण घेण्याचे अधिकार प्राचीन काळापासून नाकारलेले होते. शिक्षण हे पूर्णपणे धर्मसंस्थेच्या अधिपत्याखाली होते. मुनस्मृतीसारखे धर्मग्रंथ त्याचे काटेकोरपणे पालन करत होते. परंतु १९ व्या शतकात मात्र प्रचलित समाजव्यवस्थेला तडे जाऊ लागले. त्याला ब्रिटिश शासनव्यवस्था प्रामुख्याने जबाबादार होती. त्यांनी शिक्षण हे धर्मापासून वेगळे केले. आणि सर्वासाठी खुले केले. त्यांनी केलेल्या घटनात्मक आणि सामाजिक कायद्यांमुळे भारतात प्रबोधनाची सुरुवात झाली. अर्थात याला शैक्षणिक क्षेत्र अपवाद नव्हते. ''मुंबईमध्ये शिक्षणाचा प्रसार खऱ्या अर्थाने सुरू झाला, जेव्हा इ.स. १६६८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला मुंबई प्रातांची कारभाराची सनद प्राप्त झाली.''[४९] सुरुवातीला शैक्षणिक संस्था ख्रिश्चन चर्च संस्थेशी संलग्न होत्या. ''इ.स. १८१५ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. या संस्थेने मुंबई प्रातांत शिक्षणाच्या प्रसारास सुरुवात केली.''[५०] इ.स. १८९३ साली मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाली. पुढे इ.स. १८९० मध्ये प्राथमिक शिक्षण म्युनिसिपालिटीकडे सोपविण्यात आले. इ.स. १९०६ पासून शिक्षण सक्तीचे सुरू झाले. इ.स. १९२० मध्ये मुंबई शहर शिक्षण कायदा मंजूर झाला. त्यानुसार ''प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले होते.''[५१] या सर्व प्रयत्नांमुळे शाळांची आणि मुलांची संख्या वाढली. इ.स. १९५० च्या वर्षात मुंबई शहराची शैक्षणिक पाहणी करण्यात आली होती. त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. ''अर्थातच बहुजन समाजाच्या मुलांचा यात अंतर्भाव नव्हता.''[५२] अस्पृश्य मुलांना शिक्षणाची ओळख खिश्चन मिशनरीमुळे होऊ लागली. परंतु त्यांच्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत. वास्तविक पाहता ''खिश्चन मिशनरींना दलित समाजातील मुले शिक्षणासाठी अत्यंत उत्सुक असलेले

सर्वोत्कृष्ट विद्यार्थी वाटतात,''[५३] असे मत त्यावेळचे प्रसिद्ध प्रशासक माऊंट स्टुअर्ड एलफिस्टन यांचे होते. परंतु ''आपले राज्य व्यापक पायावर उभे राहावे असे वाटत असेल तर दलितांच्या शिक्षणाचा प्रसार-प्रचाराचे हे धोरण आपल्या राजवटीला व्यापक आधार देण्याला विरोधी आहे''[५४] असेही त्यांनी प्रतिपादन केले होते. अर्थात याचा परिणाम दलितांच्या शिक्षणावर होणे क्रमप्राप्त होते.

- **पीपल्स एज्युकेशन ट्रस्ट :**

विसाव्या शतकात खऱ्या अर्थाने दलितांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. अर्थात याला डॉ. आंबेडकर यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत. अस्पृश्य समाजाला अत्यंत निकडीचे असे कोणते कार्य असेल तर ते शिक्षण होय, हे त्यांनी ओळखले होते. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.

''अस्पृश्यांमध्ये परिवर्तन घडवून आणणारे, त्यांचा सर्वांगीण विकास करणारे प्रभावी माध्यक म्हणून शिक्षणाचे जोरदार समर्थन त्यांनी केले होते.''[५५] ते स्वतः अस्पृश्य समाजातील पहिले उच्चविद्याविभूषित होते. शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजले होते. अस्पृश्य वर्गात शिक्षणाची जागृती निर्माण करण्यासाठी इ.स. १९२२ मध्ये मुंबईत 'भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेची स्थापना केली होती. ''दि. २९ मे १९२८ रोजी संविधान आयोगासमोर दलितांच्या शैक्षणिक स्थितीची कैफियत मांडली होती.''[५६] त्यामध्ये त्यांनी इ.स. १८१३ ते इ.स. १९२२ या कालखंडातील शैक्षणिक आढावा घेतला होता.

इ.स. १९४५ मध्ये डॉ. आंबेउकरांनी मुंबईमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जवळजवळ तीन शतकांचा इतिहास असणारे मुंबई हे शहर असून या ठिकाणी अनेक प्रसिद्ध शाळा व महाविद्यालये आहेत. त्यामध्ये ऐतिहासिक वारसा असणारे महत्त्वाचे विद्यालय म्हणून पीपल्स एज्युकेशन संस्थेचे सिद्धार्थ कॉलेज प्रसिद्ध आहे. अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणाची सोय करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी या संस्थेची स्थापना केली होती. मुंबईतील पहिले मॉर्निंग कॉलेज म्हणून त्याची ख्याती होती. 'कमवा आणि शिका' ही सवलत विद्यार्थ्यांना येथे उपलब्ध करून दिली होती. संस्थेचे बोधवाक्य आहे 'प्रज्ञा-करूणा'.

बौद्ध समाजाने चालविलेली मुंबईतील पहिली शैक्षणिक संस्था असून या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट

म्हणजे, ''शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यासाठी शाळा, महाविद्यालय स्थापन करणे, ग्रंथालये, वस्तीगृहे निर्माण करणे, गरीब मुलांना शैक्षणिक सोयीसुविधा उलब्ध करून देणे. त्यांना शिष्यवृत्या, मोफत शिक्षण देणे, तसेच बौद्ध धर्मियांच्या संस्था स्थापन करून बौद्ध कला-साहित्य यांचे शिक्षण देणे''[५७] इत्यादी होते. पीपल्स एज्युकेशन संस्थेच्या शाखा मुंबई तसेच महाराष्ट्रात आहेत. उदा. सिद्धार्थ कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, सिद्धार्थ लॉ कॉलेज, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, सिद्धार्थ इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रीज ॲण्ड ॲडमिशन आणि सिद्धार्थ नाइट स्कूल इत्यादी मुंबई विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी संस्थेमध्ये मागास जातींचे प्रमाण सर्वाधिक आहे.

१९५६ नंतर शैक्षणिक क्षेत्रात या समाजाचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढलेले असून, ''धर्मांतरानंतर नवदीक्षितांमध्ये शिक्षणाचा प्रसार जेवढा झाला तेवढा हिंदू धर्मांच्या अंतर्गत असलेल्या कोणत्याही मागासवर्गीयांचा झालेला नाही.''[५८] ''२००१ च्या जनगणनेनुसार बौद्ध समाजाच्या शिक्षणाचे प्रमाण ८५ टक्के असून सध्या शैक्षणिक स्पर्धा सरळसरळ ब्राह्मणांशी आहे.''[५९] पीपल्स एज्युकेशन संस्थेचा बौद्धांना उच्चशिक्षणासाठी फायदा झाला. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे माध्यम असल्याने त्याचा फायदा बौद्धांनी सर्व क्षेत्रांत घेऊन आपला विकास अल्पकाळात करून घेतला. उदा. समाजकारण, राजकारण, कला, साहित्य, शैक्षणिक, औद्योगिक, तांत्रिक व वैद्यकीय क्षेत्र. बौद्ध धर्मातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही, विज्ञानवाद या तत्त्वांचा समावेश शिक्षणक्षेत्रामध्ये आला आहे. उदा. मुंबई विद्यापीठाच्या २००३-०४ या वर्षाच्या वर्षवृत्त या पुस्तकाच्या मुख्य पृष्ठांवर बुद्धांचा संदेश देण्यात आलेला आहे.

**४.४ धर्मांतरानंतर धम्मक्षेत्रात काम करणारी संस्था :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ. स. १९५६ मध्ये बौद्ध धम्माचा स्वीकार करून बौद्धधर्माचे पुनरुज्जीवन केले. ''ही घटना भारताच्या धार्मिक इतिहासाला एक नवे वळण लावणारी आहे.''[६०] ''बुद्धाच्या धम्मात लोकल्याणादी व समतेवर समाजाची पुनर्रचना करण्याची तत्त्वे आहेत.'' हे एकदा का पूर्णपणे जाणून घेतले की, ''जगातील अखिल मानव बुद्ध धम्माकडे आकर्षित झाल्याशिवाय राहाणार नाही.''[६१] म्हणून बाबासाहेबांनी या तत्त्वांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेची स्थापना केली.

● **अखिल भारतीय बौद्ध महासभा - The Buddhist Society of India :**

दि. ४ मे १९५५ रोजी भारतीय बौद्ध महासभेची स्थापना मुंबईमध्ये करण्यात आली. मुंबई हे सभेचे मुख्यालय असून सभेचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

''बौद्ध विहारे बांधणे, शाळा-महाविद्यालये सुरू करणे, अनाथाश्रम, दवाखाने, सहाय्यक केंद्र निर्माण करणे, बौद्ध धम्म प्रचारक व प्रसारक निर्माण करणे, बौद्ध धम्म प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे बौद्ध वाङ्मयाचे प्रकाशन करणे, भिक्कू वर्गाची निर्मिती करणे, धम्म प्रचार-प्रसारासाठी छापखाने चालविणे, मुद्राणालयांची स्थापना करणे, आणि बौद्धांमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी त्यांच्यात एकसूत्रता आणण्यासाठी धम्म परिषदांचे आयोजन करणे,''[६२] ही आहेत. ''भारतीय बौद्ध महासभेचे सभासद होण्यासाठी बौद्ध धम्माची दिशा घेणे आवश्यक आहे, किंवा सभेच्या तत्त्वांशी सहमत असलेल्या कोणालाही सभासद होता येते.''[६३]

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे पुत्र यशवंत उर्फ भैय्या साहेब आंबेडकर भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष झाले. त्यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ व २४ नोव्हेंबर १९६४ साली मुंबईमध्ये पुरंदर स्टेडियमजवळ बौद्ध परिषद घेण्यात आली होती. ''या परिषदेत, 'बौद्ध जीवन संस्कार पाठ' या पुस्तिकेचे प्रकाशन भदंत आनंद कौशल्यायन यांच्या हस्ते करण्यांत आलेले होते.''[६४] भैय्यासाहेब आंबेडकरांनी भारतातील खेड्यांमध्ये धम्मदीक्षेचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घडवून आणले होते. त्यांनी स्वतः श्रामणेरची दीक्षा घेतली होती. ''त्यावेळी त्यांचे नाव महापंडित काश्यप असे ठेवण्यात आले होते.''[६५] भैय्यासाहेबांनी धम्मप्रसारासाठी बौद्धाचार्य हे पद निर्माण केले होते. बाबासाहेबांची स्मारके उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. देशातील पहिले बाबासाहेबांचे स्मारक बौद्धजन समिती भुईवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह या नावाने बांधले. तसेच मुंबईमधील आंबेडकरांचा पहिला पुतळा बांधण्यात त्यांचा पुढाकार होता. शिवाय चैत्यभूमी निर्माण कार्यातही ते अग्रक्रमी होते. धर्मांतरानंतर नवबौद्धांवर होणारे अन्यायाविरुद्ध प्रबुद्ध भारतातून त्यांनी आवाज उठविला होता. महाराष्ट्र विधानसभेत बौद्धांचे प्रश्न मांडले होते. बँकॉक, दिल्ली, श्रीलंका, सारनाथ येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये त्यांनी प्रतिनिधित्व केले होते. भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष असताना त्यांनी विविध भूमिका बजावल्या होत्या. उदा. आर.पी.आय.चे उपाध्यक्ष व मुंबई प्रदेश अध्यक्ष, दीक्षा भूमी स्मारक समितीचे अध्यक्ष, बौद्ध पंचायत समितीचे

कार्याध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे गव्हर्निंग बॉडीचे सदस्य, आणि कामगार संघाचे अध्यक्ष अशा विविध भूमिका यशस्वीरित्या पार पाडल्या होत्या. विशेष म्हणजे धर्मांतरानंतर समाजातील राजकीय, सामाजिक, धार्मिक संघटनांना एकत्र बांधण्याचे त्यांनी प्रयत्न केले.

दि. १७ सप्टेंबर १९७७ रोजी भैय्यासाहेबांचे निर्वाण झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी महाउपासिका मीराताई आंबेडकर भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्ष झाल्या. तेव्हापासून त्या आजपर्यंत कार्यरत आहेत. धम्मप्रसाराचे व प्रचाराचे कार्य त्या करीत आहेत. मीराताईंनी धम्म चळवळ जिल्हापातळीवरून गाववाड्यांपर्यंत पोहोचविली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली धम्म शिबिरे, आचरण संस्कार शिबिरे, विपश्यना शिबिरे, कार्यकत्यांची शिबिरे, व्यक्तीमत्व प्रशिक्षण, शिबिरे, धम्मप्रशिक्षण शिबिरे, बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरे, व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे इ. शिबिरांचे आयोजन केले जाते. ''बौद्ध बांधवांनी आपली नोंदणी बौद्ध म्हणून करावी''[६६] असे आवाहन त्यांनी केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बौद्ध महासभेचे अनेक अधिवेशने मुंबईप्रमाणेच दिल्ली, नागपूर, उत्तरप्रदेश इत्यादी ठिकाणी भरविण्यात आली. ''धम्मप्रसारासाठी धम्मांच्या विधींची मार्गदर्शिका, मार्गदीपिका तयार केली आहे. धम्मसंस्कार करण्यासाठी प्रशिक्षित बौद्धाचार्य निर्माण केले आहेत. महिलांना संघटित करून त्यांची धम्म शिबिरे, बाल शिबिरे यांचे आयोजन केले जाते. भिक्खू संघ निर्माण करण्याचे कार्य सभेच्या माध्यमातून केले जाते. दादर चैत्यभूमी स्मारकाचे व्यवस्थापन बघण्याचे काम त्या करतात.''[६७] भारतीय बौद्ध महासभा धम्मप्रचारार्थ प्रकाशनाचे कार्य करीत आहेत. उदा. संस्थेने धम्मयान मासिक, बौद्ध जीवन संस्कारपाठ, धम्मदिनदर्शिका, वंदना सूत्र पठण तसेच सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर इत्यादी ग्रंथांचे पुस्तकांचे प्रकाशन केले आहे.

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर, आंबेडकरांचे धम्मप्रसाराचे उद्दिष्ट समोर ठेवून भारतीय बौद्ध महासभेचे कार्य त्याकरिता आहे.

### ४.५ धम्मस्वीकाराचा सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव :

हिंदुस्थानच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरावर परकीय आक्रमणांचा जो ठसा उमटलेला आहे, तसा जगाच्या इतिहासात कोणत्याही देशाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रावर प्रभाव पडलेला नसेल. याचे कारण परकीय आक्रमणांनी या देशात सत्तेचा उपभोग घेऊन आपल्या

धर्माचा प्रसार निरनिराळ्या मार्गाने केला. मुस्लीम तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इथे हजारो, लाखो लोकांची धर्मांतरे घडवून आणली होती. या लोकांमध्ये प्रामुख्याने दलित अस्पृश्य समाजाचा मोठा भरणा होता, हे ऐतिहासिक सत्य आहे. काळानुसार त्यांनी मुस्लीम, ख्रिस्ती, आणि शेवटी बौद्ध धर्मामध्ये धर्मांतर केलेले आहे.

- **धर्मांतराचा अर्थ :**

''धर्मांतराचा शब्दशः अर्थ म्हणजे, एका धर्मातून बाहेर पडून विधीपूर्वक दुसरा धर्म स्वीकारणे. धर्म याचा येथे प्रस्थापित धर्म असा अर्थ समाजावायाचा आहे. जगातील प्रमुख धर्म म्हणजे ख्रिस्ती, इस्लाम, ज्यू, पारशी, बौद्ध, जैन आणि हिंदू इत्यादी.''[६८] इंग्रजीमध्ये धर्मांतर या शब्दात Conversion हा शब्द प्रयोग केला जातो. Conversion या शब्दाचे विविध अर्थ आहेत. उदा. रुपांतर, धर्मांतर आणि मतांतर. प्रस्तुत प्रबंधामध्ये धर्मांतराचा अर्थ-हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार या अर्थाने वापरण्यात आलेला आहे. बौद्ध धम्म धर्म आहे कि नाही हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे. जगामध्ये धर्म अनेक आहेत, धम्म मात्र एकच आहे हे मात्र निर्विवाद सत्य नाकारता येणार नाही. एक मात्र निश्चित आहे की, कोणत्याही धर्माचा त्याग करून दुसऱ्या धर्मात जाण्यासाठी दीक्षा विधीची आवश्यकता प्रत्येक धर्मात आहे. थोडक्यात, ''एका धर्माचा त्याग करून दुसरा धर्म दीक्षापूर्वक स्वीकारणे याला धर्मांतर असे म्हणतात.''[६९] ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले असता ''बहुतेक सर्व धर्मांतरे हिंदू धर्मातून बौद्ध, जैन, ख्रिश्चन, मुस्लीम धर्मांमधे होतात.''[७०] प्रत्येक धर्मात जन्माला आलेल्या बालकांवर धर्माचा संस्कार करावा लागतो. ती एक प्रकारची दीक्षाच असते. धर्मांतराचे नैतिक, आध्यात्मिक, बौद्धिक यांसारखे प्रकार पाडले जातात. धर्मांतरामध्ये बाह्य धर्मांतराइतके आंतरिक धर्मांतरही महत्त्वाचे आहे. ''बौद्धांची आंतरिक धर्मांतराची चळवळ अर्ध्या जगावर पसरली होती. त्यात जबरदस्तीचा उपयोग केव्हाही केल्याचे उदाहरण नाही.''[७१] ''धर्मांतरे धनाच्या लोभाने, बळजबरीने, सत्तेच दडपण, युद्ध इत्यादी साधनांनी केली जातात.''[७२] बुद्धीपूर्वक धर्मांतराचे अलीकडील उदाहरण म्हणजे ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला बौद्ध धर्मातील प्रवेश होय. त्यांच्यासमवेत तसेच नंतरही त्यांच्या हजारो अनुयायांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला.''[७३] बौद्ध धम्माची दीक्षा घेण्याची ही प्रक्रिया अजूनही चालू आहे.

- **बौद्ध धम्माची दीक्षा :**

''दीक्षा म्हणजे एखाद्या धार्मिक कार्यास प्रारंभ करताना स्वीकारावयाचे व्रत, मंत्रोपदेश घेण्यापूर्वी केला जाणारा संस्कार किंवा एखाद्या जनसमुदायाचा घटक म्हणून व्यक्तीला घ्यावयाची मान्यता, असे दीक्षाविधीचे निरनिराळे अर्थ होतात.''[७४] ''शब्दशः या शब्दाची उत्पत्ती 'दी' म्हणजे देणे आणि 'क्षा' म्हणजे नाश करणे या दोन धातूंपासून बनली आहे. बौद्ध तंत्रामध्येही दीक्षा आहे. त्याला प्रव्रजा किंवा पाली भाषेमध्ये पव्वज्जा आणि उपसंपदा हे दोन संस्कार म्हणतात.''[७५] हा दीक्षा संस्कार सर्व धर्मांमध्ये असतो. उदा. ''पारशी धर्मामध्ये दीक्षा विधीला नवजोत असे म्हणतात. इस्लाममध्ये सुंता, ख्रिश्चनमध्ये बाप्तिस्मा हा दीक्षाविधीच असतो. उपनयन ही एक दीक्षाच आहे. एखाद्या जनसमूहात घटक म्हणून एखाद्या व्यक्तीस मान्यता देणे त्याबद्दलचे विधि, अनेक जमातीत आहेत.''[७६] ''बौद्ध धम्मामध्ये दीक्षाविधी हा प्रायःसंस्कार आहे ते कर्मकांड नाही.''[७७] धम्मदीक्षा न घेतलेले महार हे अप्रत्यक्षरीत्या हिंदूंचाच भाग असतो. ''त्रिशरण, पंचशील आणि बावीस प्रतिज्ञा यांचा स्वीकार केल्यानंतरच बौद्ध धम्मात धर्मांतर करण्याचा विधी पूर्ण होतो. यालाच बाबासाहेब आंबेडकर धम्मदीक्षा म्हणत.''[७८]

- **धम्मदीक्षेचे महत्त्व :**

''बौद्ध काळात संघ ही सुसंघटित संस्था होती. या संघामध्ये प्रवेश करण्यासाठी संघदीक्षा हा समारंभ केला जात असे. संघामध्ये प्रवेश फक्त परिवज्जा स्वीकारलेल्यांनाच मिळत असे. परिवज्जा म्हणजे घर सोडून अनिकेत बनलेला. म्हणजेच संघप्रवेश करायचा नसेल त्यांच्यासाठी वेगळी धम्मदीक्षा नसे. धम्मप्रवेशासाठी धम्मदीक्षा नसणे ही एक गंभीर उणीव होती. ज्या अनेक कारणांनी भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला त्यापैकी हे एक महत्त्वाचे कारण आहे.''[७९] या दीक्षाविधीच्या अभावी उपासक एका धर्मातून दुसऱ्या धर्मात भ्रमण करू शकत असे आणि अधिक वाईट गोष्ट म्हणजे त्याला एकाच वेळी दोन धर्म आचरणाची मुभा मिळू लागली. ही उणीव दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी उपासकाच्या धम्मदीक्षेवर जोर दिला. धम्मदीक्षेचे बंधन वापरून उपासकांना संघटित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांचा परिनिर्वाणानंतर हे कार्य काही संस्था करत असून मुंबईमध्ये त्रैलोक्य महासंघ, सर्वोदय बौद्धविहार आणि भारतीय बौद्ध महासभा धम्मदीक्षेत कार्य करत आहेत. डॉ. आंबेडकरानी दीक्षेच्या संदर्भात उचलेले आणीन एक महत्त्वाचे

परिवर्तन म्हणजे ''पारंपरिक बौद्ध रूढीनुसार बौद्ध धम्माची दीक्षा देण्याचे अधिकार फक्त भिक्षुंना होते. बाबासाहेबांनी दरेकाने दरेकाला धम्मदीक्षा देण्याचा अधिकार मान्य केला. व धम्मदीक्षेची मोहीम कधीच थंडावणार नाही. याचीही काळजी घेतलेली दिसते.''[८०] ''बाबासाहेबांनी सांगितलेला बुद्ध धम्म पारंपरिक बौद्ध धम्मापेक्षा वेगळा आहे. त्यांनी व्यावहारिक आणि आजमितीला आवश्यक असलेले परंतु तर्कसंगत बुद्धिप्रामाण्यावर आधारित विज्ञानधारी आणि जडवादी भूमिका घेऊन बदल-दुरुस्त्या केल्या.''[८१] थोडक्यात बाबासाहेबांनी हिनयान आणि महायान यापैकी कोणताही ऐतिहासिक संप्रदाय स्वीकारला नाही. कारण या सर्वात मूळ धम्मविरोधी अशी पुष्कळ भेसळ झालेली आहे. ''अंधश्रद्धा, कर्मकांड, अनैतिकता बोकाळली होती. या सर्वांना फाटा देऊन बाबासाहेबांनी शील, सदाचार प्रधान धम्माचा स्वीकार केला.''[८२] दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षा घेण्याअगोदर सकाळी वार्ताहर परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले होते की, ''थेरवाद, महायान, वज्रयान यांच्या स्वीकार करत नसून नवा मार्ग मी स्वीकारला आहे तो म्हणजे नवयान.''[८३]

या बौद्ध धम्मचक्र प्रवर्तनाच्या ऐतिहासिक घटनेस दिनांक १४ आक्टोबर २००६ रोजी पन्नास वर्षे पूर्ण झालेली आहेत. कोणत्याही धर्माच्या जीवनातील हा कालखंड खूप छोटा आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा स्वीकाराचा प्रभाव व त्याचे परिणाम याचे परीक्षण करताना हा कालखंड अपुरा पडतो. कारण धार्मिक लढ्याचा कालखंड शेकडो वर्षांचाही असू शकतो. शिवाय बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर अवघ्या बावन्न दिवसांत डॉ. आंबेडकराचे महापरिनिर्वाण झाले. आणि नवदीक्षित समाजाचा मार्गदर्शक गेला. ही फार मोठी हानी बौद्ध संस्कृतीचा पुनरुज्जीवन करण्याचा प्रक्रियेत निर्माण झाली.

- **धम्मस्वीकार एक सांस्कृतिक चळवळ :**

''राजकीय आणि आर्थिक लढ्यापेक्षा सांस्कृतिक लढे हे अधिक गुंतागुंतीचे व दीर्घकाळ चालणारे असतात. सांस्कृतिक लढ्याचा फलनिष्पत्तीची प्रकाश किरणे एखाद्या युगावर पडण्यासाठी अनेक शतके लोटावी लागतात.''[८४] म्हणूनच कदाचित ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित-पददलितांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांना आर्थिक प्रश्नांपेक्षाही अधिक महत्त्व दिले होते.''[८५] डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर म्हणजे रूढ अर्थाने 'एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाणे' असा

नसून एका सीमित अर्थाने धर्मांतर होते. दिनांक १३ ऑक्टोबर १९३५ मध्ये त्यांनी धर्मांतराची घोषणा केली होती. आणि जवळजवळ वीस वर्षानी दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. १९३५ ते १९५६ या सीमित कालखंडाला त्यांच्या धर्मांतराच्या चळवळीचा कालखंड समजला जातो. धर्मांतर म्हणजे एका धर्मातून धम्मामध्ये प्रवेश या अर्थाने प्रस्तुत प्रबंधात शब्दप्रयोग केला आहे. ''डॉ. आंबेडकरांनी धर्म ही संकल्पनाच कुचकामी ठरविल्यामुळे ईश्वर/देव या सकल्पनेचा त्याग त्यांनी केला आहे. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या दलितांच्या चळवळीचे प्रामुख्याने तीन विभागांत वर्गीकरण केले जाते. पहिल्या विभागात सामाजिक चळवळ असून त्यामध्ये अन्यायाविरुद्ध संघर्ष आहे. दुसरी चळवळ राजकीय चळवळ आहे. यामध्ये राजकीय जाणिवांची निर्मिती होऊन राजकीय सहभाग वाढला आणि तिसरी चळवळ सांस्कृतिक चळवळ आहे. ज्यामध्ये धर्मांतर घडून आले त्यामुळे नवे मूल्ये मिळाली, स्वाभिमान व माणुसकी मिळाली. जीवनाची नवी सुरुवात झाली. न्यूनगंड गळून पडला. स्वतःचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला.''[८६]

**नवदीक्षित बौद्धांचे सांस्कृतिकरण प्रक्रिया :**

सांस्कृतिकरण प्रक्रियांचा पहिल्यांदा उपयोग एम. एन. श्रीनिवास यांनी केला. त्यासाठी त्यांनी ब्राह्मणीकरण हा शब्द प्रयोग केला होता. ब्राह्मणीकरण म्हणजे ब्राह्मण समाजाचे अनुकरण करणे, त्यांच्या प्रमाणे राहणे, खाणे-पिणे, कर्मकांड करणे व धार्मिक विधी करणे (Rituals) इत्यादी. थोडक्यात वर्णव्यवस्थेतील तीन उच्चवर्णियांनी केलेले ब्राह्मणांचे अनुकरण म्हणजे संस्कृतिकरण परंतु नंतर त्या काळात ही व्याख्या पुनः करण्यात येऊन सांस्कृतिकरण म्हणजे ''Process by which a low Hind Caste or tribal or other group, change it's custums ritual, ideology and way of life in the direction of high ftequently twine born caste"[८७] अशी करण्यात आली. परंतु सांस्कृतिकरणाच्या बाबतीत १९५६ मध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्या नवदीक्षित समाज सांस्कृतिकरणाच्या वरील व्याखेत बसत नाही. ''The mass conversion of lower and untouchables caste to Buddhism in the twentieth century India reveals Buddhism continues to be a dynamic mechanism of cultural movement in India.''[८८] याठिकाणी नवदीक्षित बौद्ध समाजाने नवीन संस्कृतीचा स्वीकार तर केलाच परंतु ब्राह्मणी संस्कृतीला पूर्णपणे नाकारले. त्यांचे धार्मिक संस्कार, कर्मकांड, रूढी-परंपरा इत्यादींना त्यांनी पूर्णपणे त्याग

केला. अत्यंत चिकित्सकरीत्या डोळसपणे त्यांनी ब्राह्मणी संस्कृती नाकारली आहे. या नव्या सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर आधारित असलेली संस्कृती, संविधानाद्वारे प्रस्थापित करणे हे आहे. या एका सूत्रामध्ये सर्वांना बांधून सांस्कृतिक ऐक्य निर्माण करणे, हा या संस्कृतिकरणाचा उद्देश आहे. कोणत्याही संस्कृतीला एक तात्त्विक बैठक असते. नुसते खाणे, पिणे, राहणीमान पेहराव, कर्मकांड, पूजाअर्चा एवढाच मर्यादित अर्थ नसतो, त्यामध्ये जीवनमूल्ये असतात. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर जी तात्त्विक बैठक निर्माण झाली. ती स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यावर आधारित होती. नवदीक्षित बौद्धांनी या समतेच्या पायावर उभ्या असलेल्या संस्कृतीचा स्वीकार करून देशामध्ये राज्यघटनेला अभिप्रेत असलेली संस्कृती प्रस्थापित केली आहे.

**नवदीक्षित बौद्धांच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये :**

- विषमतेवर आधारित असलेल्या जुन्या संस्कृतीचा त्याग करून समतेच्या तत्त्वावर आधारित बौद्ध संस्कृतीचा स्वीकार केला.
- शतकानुशतके प्रचलित असलेले संस्कार झटक्यात टाकून दिले.
- सामाजिक जीवनात बौद्ध पद्धतीचे संस्कार हेतूपुरस्सर करण्यात येऊ लागले.
- धार्मिक विधी संस्कार पूर्णपणे बदलते.
- बौद्ध संस्कार केंद्राची निर्मिती मोठ्या प्रमाणात निर्माण झाली.
- बौद्ध संस्कार वाङ्मय मोठ्या प्रमाणात निर्माण झाले.

**धम्मस्वीकाराचा सामाजिक/सांस्कृतिक प्रभाव**

इ.स. १९६२ मध्ये धम्म स्वीकाराच्या अवघ्या पाच वर्षानंतर पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च या संस्थेने मुंबईतील बौद्धांचा सर्व्हे केला होता. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर झालेल्या परिणामांचे तसेच बदलाचा अभ्यास करण्यात आला होता. या पाहणीमध्ये धम्म स्वीकाराचा प्रभाव कसा पडला हे नमूद करण्यात आले होते. त्यानुसार, ''धर्मांतराचा जबरदस्त प्रभाव पडल्याचे नमूद करण्यात आले होते. धर्मांतरानंतर या समाजात ऐक्य निर्माण झालेले असून त्यांना जातीविरहित समाज निर्माण करावयाचा आहे. त्यांच्यामध्ये अत्यंत मोठा अभिमान निर्माण

झालेला आहे. ते आपल्या हक्कासाठी जागृत आहेत आणि अन्यायाविरुद्ध संघटित आवाज उठवतात. त्यांच्यामध्ये एक प्रकारच्या आत्मविश्वास, प्रतिष्ठा निर्माण झालेली असून कन्याकुमारीपासून ते काश्मिरपर्यंत त्यांच्यात ऐक्य निर्माण झालेले असून त्यांच्यात आंतरजातीय विवाह होतात. ते बौद्ध विहारामध्ये एकत्र जमतात आणि एकत्र निर्णण घेतात प्रतिष्ठा आणि सन्मानाचे जीवन ते जगत आहेत.''[८९]

प्रसिद्ध बौद्ध साहित्यिक डी. सी. अहिर यांचे मते धर्मांतराच्या प्रभावामुळे बुद्धांचे पुन्हा त्याचे घरी पुनर्गमन झालेले असून डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे भारतीय बौद्धामध्ये आंबेडकर युग निर्माण झाले. डॉ. आंबेडकरांचे जवळचे स्नेही एक शिवतारक म्हणतात, ''जिवंत आंबेडकरांपेक्षा मृत आंबेडकर अधिक आक्रमण, अधिक प्रभावी सिद्ध होतील.''[९०]

इ.स. १९२० पर्यंत मुंबईमधील महार वैदिक पद्धतीने संस्कार करत. यासंबधी एलिनार झेलियट लिहितात, ''In the late 1920s Mahar in the Bombay area attapted the participated in the public worship of Ganpati at Dadar started performing wedding in accordance with vedic rites and at least on one occasion donned the symbol of the High Caste Hindu, the scared thread.''[९१]

**धर्मांतरापूर्वीचे संस्कार :**

महारांचे मूळ दैवत किंवा कुलदैवत देवी मरिआई होते. मरिआईच्या यात्रा भरत. देवीला नवस केला जाई. तिला बळी दिला जाई. या मरिआईचा भक्त पोतराज बहुतेक महार असे. दरवर्षी महारवाड्यात देवीची यात्रा भरत असे. तसेच खंडोबा, जोतिबा, वेताळ, पांढरी, भादवी इत्यादी देवतांची पूजा भक्तिभावाने केली जाई. होळीचा सण महत्त्वाचा होता. प्रत्येक गावात महारांची होळी असे. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर हे सर्व बंद झालेले दिसते. चावडीचे रुपांतर बुद्धविहारांमध्ये झालेले दिसते. धर्मांतरामुळे महार जातीचे नामांतर झाले. महार जात पूर्वी वेगवेगळ्या नावाने ओळखली जात असे. अत्यंत, अतिशुद्र, भूमीपुत्र, कूयल, चोखामेळा, धेंड, डोंब, होळसाव, काढीवाले, म्हेत्रे, मिराशी, परवरी, तराळ, धोरब्या, धरचे, वेसकर इत्यादी. प्रत्येक नावामागे विशिष्ट अर्थ असे. धर्मांतरानंतर ही सर्व नावे नष्ट होऊन बौद्ध हे नाव प्रचलित झाले.

प्रत्येक महाराचे कुळ असे तसे देवक असे. देवकाचे पूजा केली जाई. लग्नविधीमध्ये देवक

पूजाविधी होता. एकच देवक असलेल्या कुटुंबात लग्नविधी होत नसत. महारांमध्ये पोटजाती होत्या. पण त्या सर्वांमध्ये विवाह होत असत. त्या सर्वांचे विधी सारखेच असत. त्या त्या भागात त्यांचे गुरू, पुरोहित, उपासक, भगत लग्नापासूनचे सर्व विधी महार गुरू करत असत. ब्राह्मण गुरू कधीच नव्हता. कोणतेही संस्कार तो करत नसे. फक्त मुहूर्त सांगत असे.

**इ.स. १९५६ नंतरचे बौद्ध संस्कार विधींचे स्वरूप :**

बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर संस्कार करण्यासाठी धम्म संस्कार विधींची गरज ओळखून डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराअगोदरच बौद्ध उपासना पाठ नावाची संस्कार विधी पुस्तिका लिहिली होती. या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''बौद्ध धर्माच्या प्रसाराबद्दल लोकांमध्ये ज्या दिवसापासून आतुरता उत्पन्न झाली आहे त्या दिवसापासून बौद्ध धर्म म्हणजे काय ? व त्याचे वाङ्मय काय आहे व कोठे मिळते या सबंधाने भारतीय जनतेमध्ये मोठे कुतुहूल दिसून येते.''[९२] भारतातील बौद्ध पूजापाठ लोप पावलेला होता. ज्या देशात बौद्ध धम्म प्रचलित होता फक्त तेथेच या गाथा अस्तित्वात होत्या. इ.स. १९५० मध्ये डॉ. आंबेडकर जेव्हा सिलोनला गेले होते तेव्हा त्यांनी या गाथा संग्रहित करून ठेवल्या होत्या. ''या पुस्तिकेमध्ये एकूण दहा पाठ आहेत. (१) सरणत्तय (२) पंचसिलानि (३) बुद्ध वंदना (४) धम्म वंदना (५) संघ वंदना (६) पूजा (७) सब्बसुख गाथा (८) धम्म पालन गाथा (९) रतनसुत्त (१०) जप.''[९३]

धर्मांतरानंतर भारतीय बौद्ध महासभेने बौद्ध जीवन संस्कार पाठ ही पुस्तिका प्रकाशित केली असून त्यामध्ये प्रत्येक बौद्ध व्यक्तीच्या जीवनातील संस्काराच्या विधी दिल्या आहेत. सर्वात प्रथम बौद्ध होण्यासाठी धम्माची दीक्षा घेणे महत्त्वाचे आहे, म्हणून धम्मदीक्षा संस्कार प्रथम दिला आहे. त्यानंतर नामकरण विधी, विद्यारंभ विधी, साक्षगंध विधी, विवाह विधी, भूमीपूजन विधी, गृहप्रवेश, उद्घाटन विधी, मूर्ती प्रतिष्ठापना विधी, अंतिम संस्कार विधी, पुण्यानुमोदन विधी, जन्मदिवस स्मृतीदिवस विधी, अशा जीवनातील सर्व महत्त्वाच्या प्रसंगी करण्यात येणाऱ्या संस्काराविधींचा या पुस्तिकेत समावेश करण्यात आलेला आहे.''[९४] याच पुस्तिकेत गाथांचा समावेश करण्यात येऊन त्यातील तेहतीस नंबरची गाथा ही बावीस प्रतिज्ञांची आहे. तसेच भीमस्तुती गाथेचाही या ठिकाणी समावेश आहे.

**भीमस्तुती :**

''दिव्य प्रभरत्न तू, साधू वरदान तू ।
आद्य कुलभूषण तू, भीम राजा ।
सकल विद्यापती, जात सत्यंगति ।
शास्त्र शासन मती, बुद्धीतेजा ।
पंकजा नरवरा, रत्न ------ स्वजन उद्धरा ।
भगवंत आमुचा, खरा भक्त काजा ।
चवदार संगरी, शस्त्र धरिता करि ।
कावला अरी उरी, रौद्ररुपा ।
मुक्तीपथ कोणता, जीर्ण स्मृती जाळता ।
उजाळिला अगणिका, मार्ग साजा ।
राष्ट्रघटना कृती, शोभते भारती ।
महामानव बोलती, सार्थ संज्ञा ।
शरण बुद्धास ये, शरण धम्मास ये, शरण संघास ये ।
मानवा ।''[९५]

धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. आंबेडकरांनी स्वतः तयार केलेल्या 'बावीस प्रतिज्ञांचे' ग्रहण केले होते. तसेच उपस्थित दीक्षा घेणाऱ्या जनतेमधून त्यांनी स्वतः या प्रतिज्ञा वदवून घेऊन धम्मदीक्षा विधी पूर्ण केला होता. जुने संस्कार नष्ट करून नवे बौद्ध संस्कार रुजविण्यासाठी या प्रतिज्ञा केल्या होत्या. हिंदू सण, देवदेवता, ग्रंथ, तीर्थस्थाने यातून बाहेर पडण्यासाठी या प्रतिज्ञा देण्यात आल्या होत्या. या प्रतिज्ञा नवदीक्षित बौद्धांची मार्गदर्शिका असून ती त्यांची धम्मसंहिता आहे. ''बौद्धांचे सर्व संस्कार विधी अत्यंत साध्या पद्धतीने होतात. मंगल परिणय हा संस्कार एक दिवसात साध्या पद्धतीने केला जातो. पूर्वी लग्नसोहळा आठ-आठ दिवस चालत असे. परंतु आता तो एक दिवसात अवघ्या काही तासात संपन्न होतो. नववधू आणि वर शुभ्र वस्त्र परिधान करतात. उपासक अथवा बौद्धाचार्य विधी पार पाडतो. विवाह जमविताना मुहूर्त पाहणे, मुलामुलीची जन्मपत्रिका पाहणे, ब्राह्मणचा सल्ला घेणे, लग्नात गोंधळ घालणे, बळी देणे या प्रथा बंद झाल्या आहेत. पूर्वीच्या

पोटजातीचा विचार केला जात नाही. मंडपातील सजावट बौध संस्कृतीला शोभेशी असते. मंगल परिणय संस्कार विधीमध्ये त्रिशरण, रतनसूत्र, मंगलगाथा, परित्राण या पवित्र सूत्रांचे पठण होते. विवाहाच्या शेवटचा महत्त्वाचा विधी म्हणजे वर आणि वधू यांच्याकडून प्रतिज्ञा घेतल्या जातात.''[९६] या प्रसंगी भगवान गौतम बुद्धांची मूर्ती आणि बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला फुले अर्पण करून मेणबत्ती आणि अगरबत्ती लावण्यात येते. बाकी कोणत्याही प्रकारचे कर्मकांड होम सप्तपदी केले जात नाही.

नवदीक्षित बौद्धांचा अत्यंत महत्त्वाचा संस्कार म्हणजे धम्मदीक्षा संस्कार होय. मुंबईमध्ये विविध धार्मिक संस्थामार्फत हा विद्या समारंभ अत्यंत साध्या पद्धतीत केला जातो. त्रैलोक्य बौद्ध संघ, सर्वोदय महाबुद्धविहार तसेच अखिल भारतीय बौद्ध महासभेमार्फत हा संस्कार करण्यात येतो. या संस्काराचा अविभाज्य भाग म्हणून बावीस प्रतिज्ञा घेतल्या जातात. पारंपरिक बौद्ध धम्मात संघाला दीक्षा दिली जात असे. म्हणजेच संघदीक्षा होती पण धम्म दीक्षा नव्हती. सर्वांना धम्मदीक्षा देण्याची प्रथा इ.स. १९५६ नंतर सुरू झाली.

**बौद्धांचे ध्वज :**

**१) धम्मध्वज :**

इ.स. १८८० मध्ये कोलंबोमध्ये बुद्धजंयती साजरी करण्यात आली होती. त्यावेळी धम्मध्वजाची निर्मिती करण्यात आली होती. पुढे १९५० मध्ये जागतिक बौद्ध परिषद कोलंबोत भरविण्यात आली तेव्हा या धम्मध्वजाला जागतिक बौद्धांचा धम्मध्वज म्हणून मान्यता देण्यात आली. याच काळात डॉ. आंबेडकर या अधिवेशनात कोलंबोमध्ये होत. त्यांनी १९५० मध्ये महाराष्ट्रात हा धम्मध्वज आणला. ''आज हा ध्वजी धार्मिक ध्वज म्हणून संपूर्ण भारतात मान्यता पावलेला आहे.''[९७]

**२) निळा झेंडा :**

इ.स. १९४२ मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या वेळी निळा झेंडा मान्य करण्यात आला होता. या निळ्या झेंड्यावर मधे पांढऱ्या रंगात सूर्य आणि बाजूला अकरा चांदण्या होत्या. मधला सूर्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अकरा चांदण्या म्हणजे अकरा प्रॉव्हिन्सिस होय. ''हाच SCF चा झेंडा शेवटी डॉ. आंबेडकरांचे पार्थिवावर होता.''[९८] शेड्युल्ड कास्ट फेडरेशन

बरखास्त झाल्यानंतर १९५६ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाची स्थापना झाली. तेव्हा या निळ्या झेंड्यामध्ये पांढऱ्या रंगाचे धम्मचक्र टाकण्यात आले. हा झेंडा रिपब्लिकन पक्षाचा झेंडा नसून तो आंबेडकरी बुद्धिस्ट जनतेचा झेंडा आहे. त्यामुळे हा झेंडा सर्व आंबेडकरी वस्त्यांमध्ये लावला जातो. मुंबईमधील प्रत्येक बौद्ध वस्तीमध्ये हे दोन्ही ध्वज फडकताना आपल्याला दिसतात. नवदीक्षित बौद्धांच्या ऐक्याचे ते प्रतीक आहेत. बौद्ध समाजाचे प्रतिनिधीत्व करतात.

दिनांत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्म स्वीकार केल्यानंतर अवघ्या बावन्न दिवसात बाबासाहेबाचे महानिर्वाण झाले. परंतु आंबेडकरी जनतेने, कार्यकर्त्यानी धैर्याने या प्रसंगाला तोंड दिले. आंबेडकरांना अपेक्षित असलेल्या धम्म चळवळीला पुढे नेण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांच्या अकाली निधनाने अनेक प्रश्न निर्माण झाले होते. धम्म चळवळ बाल्यावस्थेत होती. कोणताच आधार चळवळीला नव्हता. राजकीय आधार नव्हता, आर्थिक परिस्थिती बिकट होती. नवदीक्षितांची परिस्थिती दयनीय होती. आर्थिक बळ नाही, राजकीय सामर्थ्य नाही. अशाही अवस्थेत बौद्ध उपासक, उपासिका, सामाजिक कार्यकर्ते, भिक्खु संघ, विविध संघटनांनी धम्मप्रसाराचे कार्य चालू ठेवले. यामध्ये मुंबईतील सर्व संस्था-संघटनांचा सिंहाचा वाटा आहे. उदा. बौद्ध जनपंचायत समिती, समता सैनिक दल, अखिल भारतीय बौद्ध सभा महिला संघटना, बौद्ध विहारे इत्यादी.

- **मुंबईतील धम्म परिषदा आणि अधिवेशने :**

इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर भारतात बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करण्यासाठी विविध परिषदा-अधिवेशने यांचे आयोजन करण्यात येऊ लागले. मुंबईमध्ये दिनांक २९ मे १९६० रोजी नायगाव दादर येथे पुरंदरे स्टेडियमवर अधिवेशन भरविण्यात आले होते. कारण ''धर्मांतरानंतर नवबौद्धांना अस्पृश्य म्हणून राज्यघटनेने जे अधिकार, हक्क प्राप्त झाले आहेत ते मिळणार नाहीत, नौकरी, शिक्षण क्षेत्र इ. ठिकाणच्या राखीव जागा नवबौद्धांना मिळणार नाहीत असा भारत सरकारने निर्णय घेतला होता. नवबौद्धांचे हक्क त्यांना परत मिळवून देण्यासाठी हे अधिवेशन भरविण्यात आले होते. नवबौद्धांना हे हक्क प्राप्त व्हावेत अशी मागणी यावेळी या अधिवेशनात मांडण्यात आली होती. त्याचबरोबर दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकरांचे स्मारकासाठी जागा देण्यात यावी असाही ठराव यावेळी मांडण्यात आला होता. याच अधिवेशनात शिरगणतीमध्ये (Census) आपला धर्म

बौद्ध आहे हे निर्भयपणे लिहिण्याचे आवाहनही करण्यात आले होते.''[९९] ''या अधिवेशनातील बाराव्या ठरावानुसार बुद्धपोर्णिमेची सुट्टी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी जाहीर करावी अशी विनंतीही दोन्ही सरकारांना केली. त्याचबरोबर तेराव्या ठरावानुसार डॉ. बाबासाहेब जयंती आणि महापरिनिर्वाणदिनाची सुट्टी जाहीर करावी अशी मागणी केली होती.''[१००]

दिनांक २९ फेब्रुवारी १९७६ मध्ये मुंबईत राजा ढाले यांच्या अध्यक्षतेखाली बौद्ध साहित्य संमेलन भरविण्यात आले होते. याची सविस्तर माहिती 'जातक' या नियतकालिकामध्ये इ.स. १९७६ मध्ये देण्यात आली होती.

भारतीय बौद्ध महासभा धम्मप्रसारासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करते. सभेने राष्ट्रीय पातळीवर तीन धम्म परिषदा आयोजित केल्या होत्या. दिनांक २७/२८/२९ नोव्हेंबर १९९२ दादर-चैत्यभूमी येथे भारतीय बौद्धांची राष्ट्रीय स्तरावर बौद्ध परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्‌घाटक जागतिक बौद्धांचे धम्म गुरू दलाई लामा हे होते. ''या संमेलनामधे बौद्धांच्या चालीरीती-रिवाज, बौद्धासाठी स्वतंत्र कायदा तसेच धर्मांतरित बौद्धांच्या अनेक प्रश्नावर विचार करण्यात आला होता.''[१०१] या परिषदेचे अध्यक्षपद मीराताई आंबेडकर यांनी भूषविले होते. दिनांक ५ डिसेंबर १९९२ रोजी रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली कामगार क्रीडाभवन, प्रभादेवी येथे जागतिक धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते. या अधिवेशनाला जागतिक धम्मगुरू उपस्थित होते. दिनांक २७ व २८ मे २००६ रोजी डॉ. आंबेडकर मैदान वरळी येथे राष्ट्रीय अधिवेशन भरविण्यात आले होते. भारतीय भिक्खू महासंघ आणि अखिल भारतीय बुद्धगया महाबोध महाविहार मुक्ती आंदोलन समिती, मुंबई प्रदेशाचे वतीने हे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय अधिवेशन भरविण्यात आलेले होते. या अधिवेशनाला भारतातून विविध राज्यांतून तसेच श्रीलंका, जपान, थायलंड, ब्रम्हदेश, बांगलादेश, भूतान, कंबोडिया, व्हिएतनाम, तिबेट, अशा अनेक देशांमधून सुमारे पाचशे बौद्ध भिक्खू, भिक्खुणी उपस्थित होत्या. या अधिवेशनात प्रामुख्याने बौद्ध तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन करण्यात आले होते. धम्मचक्र परिवर्तन महोत्सवी वर्षातील आणखी एक महत्त्वाची जागतिक बौद्ध परिषद मुंबईमध्ये दादर येथे भरविण्यात आली होती. डॉ. भालचंद्र मुणगेकर, कल्पना सरोज यांच्या प्रयत्नाने ही जागतिक बौद्ध परिषद २००६ मध्ये पार पडली होती.

दिनांक १६ जानेवारी ते २६ जानेवारी २००९ या दहा दिवसीय बुद्धिस्ट फेस्टीवलचे आयोजन मुंबई वडाळा येथे करण्यात आले होते. मुंबईतील प्रसिद्ध भन्ते भदंत राहूल बोधी महाथेरो तसेच इतर भंतेजींच्या उपस्थितीत हो उत्सव पार पडला. या परिषदेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्वधर्मसमभाव संमेलन घेण्यात आले होते. त्यामध्ये हिंदू, ख्रिस्ती, मुस्लीम, जैन, शीख इ. धर्मगुरुंचाही समावेश होता. दहा दिवसांच्या या फेस्टीवलमध्ये धम्मप्रवचनाबरोबर स्पर्धात्मक कार्यक्रम, परिसंवाद, कविसंमेलन इ. आयोजित करण्यात आले होते. त्याचबरोबर महिला परिषद, कामगार मेळावा, धम्म परिषद, आरक्षण परिषद, राष्ट्रीय एकात्मता अशा विविध विषयांवर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

दि. २२ आणि २३ फेब्रुवारी २००९ मध्ये नाहूर येथे अधिधम्मा एज्युकेशन ॲन्ड सोशल ईस्ट, मुंबई या संस्थेने अखिल भारतीय बौद्ध परिषद भरविली होती. भारताच्या विविध भागांतून तसेच बौद्ध राष्ट्रामधून भिक्खूसंघ उपस्थित होता. या परिषदेत विविध ठराव मांडण्यात आलेले होते. उदा. बुद्धगया महाविहाराचा ताबा, मुंबईमध्ये पाली विद्यापीठाची स्थापना, बौद्धांची वेगळी जनगनणा व वेगळे आरक्षण, बौद्धलेण्या गुंफा, शिलालेख यांचे संरक्षण, बौद्धांचा स्वतंत्र विवाह व वारसा कायदा, बौद्धांना खाजगी क्षेत्रात आरक्षण, राष्ट्रीय स्मारक म्हणून चैत्यभूमीचा विकास इ. अशा प्रकारे विविध परिषदा भरवून धम्मप्रसाराचे कार्य चालू आहे. या ठिकाणी फक्त प्रातिनिधिक उदाहरणे दिलेली असून विविध संस्था संघटना धम्म संस्था शैक्षणिक संस्था धम्म परिषदा भरवून धम्मप्रसाराचे कार्य करत आहेत.

**बौद्धांची कैफियत**[१०२] :

इ.स. १९५६ नंतर बौद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी एक कैफियत मांडण्यात आली होती. ही कैफियत एका छोट्या पुस्तक स्वरूपात मांडून ती राज्याचे मुख्यमंत्री, पंतप्रधान व गृहमंत्री यांना पाठविण्यात आली होती. ही कैफियत मा. ॲड. बी. सी. कांबळे आणि महाथेरो एस. परमशांती यांनी मांडली होती. त्यामध्ये खालीलप्रमाणे महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या होत्या. (१) धम्मप्रसारासाठी बौद्धांचा स्वतंत्र कायदा असावा. (२) पुरातन काळातील लेण्या-विहारे यांचा धार्मिक कार्यासाठी उपयोग करून द्यावा. (३) बौद्ध विहारातील आक्रमण थांबवावे. (४) बौद्ध विहार बांधण्यासाठी सरकारने सवलती घ्याव्यात. (५) बौद्धांचा कागदोपत्री बौद्ध हाच

उल्लेख करावा. (६) त्यांच्या पूर्वाश्रमीच्या जातीचा उल्लेख करू नये. (७) बुद्धजयंती, आंबेडकर जयंती यांची सार्वजनिक सुट्टी द्यावी. (८) धार्मिक प्रवासाठी देश-परदेशात जाण्यासाठी सवलती देण्यात याव्यात. (९) धम्मप्रसारासाठी आकाशवाणी प्रसारमाध्यमात सवलती द्याव्यात.

या कैफियतीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये नमूद केले होते की, यासर्व मागण्या मागत असताना कोणाचाही हिताला बाधा येणार नाही, तर प्रेम आणि सद्‌भावना राखून या मागण्या मांडण्यात आल्या. यांपैकी बऱ्याच मागण्या मान्य झालेल्या असल्या तरी काही महत्त्वाच्या मागण्या मात्र मान्य झालेल्या दिसत नाहीत. बौद्धांची ही कैफियत म्हणजे इ.स. १९५६ या धर्मांतरांतर बौद्धांची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी झाली होती. परंतु सरकारच काय पण बौद्ध संघटनांनी सुद्धा यावर त्या काळात फारसा विचार केला नाही.

- **दि. १४ ऑक्टोबर १९५६ नंतरचे मुंबईतील दीक्षा समारंभ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला मुक्कामी मुंबई इलाखा परिषदेत धर्मांतराची घोषणा केली होती. त्यानंतर दि. ३० मे ते दि. २ जून १९३५ या काळात मुंबईच्या नायगांव मैदानातील परिषदेत धर्मांतरास पाठिंबा देणारा ठराव पास करण्यात आला होता. त्यानंतर जवळजवळ २१ वर्षांनी म्हणजे दि. १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्मचक्र प्रवर्तन केले, या ऐतिहासिक घटनेनंतर धर्मांतराची लाट संपूर्ण महाराष्ट्रात आणि भारतात निर्माण झाली. या प्रसंगी लाखो आंबेडकर अनुयायांनी धम्म दीक्षा घेतली. ‘‘डॉ. भवानी शंकर नियोगी, एम. बी. चिटणीस, बी. एच. वराळे, यशवंतराव आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, सविता आंबेडकर, अ. रा. कुलकर्णी, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, आमदार जी. टी. परमार, सदानंद फुलझेंडे, इ. महत्त्वाच्या व्यक्तींनीसुद्धा धम्मदीक्षा घेतली होती.’’[१०३] ज्या स्थळावर धम्मचक्र प्रवर्तन घडून आले ते पवित्र स्थळ म्हणजे ऐतिहासिक दीक्षाभूमी होय. या दीक्षा समारंभानंतर लगेचच ‘‘दि. १६ ऑक्टोबर १९५६ रोजी चंद्रपूरचा ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळा पार पडला होता. या प्रसंगी डॉ. आंबेडकरांनी स्वतः त्रिशरण, पंचशील आणि बावीस प्रतिज्ञा देऊन तीन लाख लोकांना धम्म दीक्षा दिली.’’[१०४]

दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे धम्मदीक्षेचा समारंभ झाल्यानंतर दि. १६ डिसेंबर रोजी मुंबईमध्ये दीक्षा समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यासाठी संपूर्ण मुंबई

कामाला लागली होती. यावेळी मुंबई शहर व आसपासच्या परिसरातील लोक दीक्षा घेण्यासाठी मुंबईत येणार होते. दीक्षा घेण्याचा कार्यक्रम करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा तयारीला लागलेली होती. बाबासाहेबांचे उपस्थितीत हा सोहळा होणार होता, परंतु तत्पूर्वीच बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. दि.६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीतील निवासस्थानी त्यांचे निर्वाण झाल्यानंतर त्यांचे पार्थिव शरीर सात डिसेंबर रोजी मुंबई येथील त्यांच्या राजगृह या निवासस्थानी आणले. याच दिवशी सायंकाळी मुंबई दादर चौपाटीवर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. त्याअगोदर ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र देहाला साक्षी ठेवून लाखो लोकांना भिक्खू आनंद कौशल्यायन यांनी दीक्षा दिली. या प्रसंगी पाच लाख लोकांनी दीक्षा घेतली.''[१०५] त्यानंतर दि. ९ डिसेंबर १९५६ रोजी सकाळी दादर स्मशानभूमीवर ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी गोळा करण्याचा विधी अत्यंत गंभीर वातावरणात पार पडला. त्यावेळी ज्या लोकांना बाबासाहेबांचे अंत्यदर्शनासाठी येता आले नव्हते अशा साडेतीन लाख लोकांना भदंत आनंद कौसल्यासन यांनी दीक्षा दिली होती.''[१०६]

''दि. ३१ डिसेंबर १९५६ रोजी नगर येथे असाच दीक्षा समारंभ झाला होता एस. एस. गायकवाड, दा. ता. रुपवते, पी. जे. रोहम, यांच्या उपस्थीतीत हा कार्यक्रम झाला होता.''[१०७] ''दि १५/३/१९५९ रोजी मुंबईतील कामासाठी पुरा तेथे तेराव्या गल्लीत किसन देवदास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली वाघ्या-मुरळींनी धम्मदीक्षा स्वीकार केला होता.''[१०८]

**२००६ ची रेसकोर्सवरील धम्मक्रांती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे धम्मदीक्षा घेतल्यानंतर लगेचच मुंबईमध्ये दि. १६ डिसेंबर रोजी धम्मदीक्षेचा सोहळा आयोजित केला होता. परंतु त्यांच्या अकाली निधनाने धम्मदीक्षेचा हा कार्यक्रम होऊ शकला नाही. परंतु त्यानंतर पन्नास वर्षांनी म्हणजे धम्मचक्र परिवर्तनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात दि. २७ मे २००६ रोजी लक्ष्मण माने यांनी बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले. ''लक्ष्मण माने यांनी एकूण ४२ भटक्या विमुक्त जातींतील लाखो लोकांना बौद्ध धम्माचा मार्ग दाखविला. त्याअगोदर दि. २० ऑक्टोबर २००६ रोजी धम्मचक्र परिवर्तनाचे सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून नागपूर येथे लक्ष्मण माने, शिवराज कोळीकर, विमलताई वाघमारे, एम.डी. खिल्लारे, बबन इंगोले, निमकुमार डोंगरे, दिनकर गोस्वामी, एकनाथ दुतोंडे, रामकृष्ण

कसबे, दत्ता गडलवार, रमेश वाघमारे शाहीर साबळे, विठ्ठल हनवते, सूर्यकांत कांबळे, चंद्रा ठाकरे, मालाताई समुद्रेकर, राजन पाखरे, लता पाखरे, निशाताई डोंगरे, सुषमा अंधारे इत्यादी भटक्या, विमुक्त आणि मातंग समाजातील नेत्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला होता.''[१०९] ''भंन्ते सुरई ससाई यांच्या नेतृत्वाखाली दीक्षा समारंभ पार पडला होता.''[११०]

धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव समितीच्या वतीने मुंबईमध्ये महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावर दीक्षा समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक वंदनीय भिक्खू संघ उपस्थित होते. ''भदंत राहूल बोधी, भदंत धम्मविरीयो महाथेरो, समता सैनिक दलाचे वसंत म्हस्के, तसेच ४२ भटक्या जातींचे हजारो बांधव उपस्थित होते. या सर्वांना पूज्य भदंत धम्मविरियो यांनी धम्मदीक्षा दिली होती. खासदार रामदास आठवले यांनी बावीस प्रतिज्ञा दिल्या.''[१११] या प्रसंगी विपश्यनाचार्य गोयंका गुरुजी हेही उपस्थित होते.

या घटनेची नोंद टाइम्स ऑफ इंडियाने घेतली होती. 'Wheels of Change'[११२] या मथळ्याखाली दिली होती. महालक्ष्मी रेसकोर्स मैदान पांढऱ्या शुभ्र रंगाने सुशोभित झालेले होते. आर.पी.आय.चे झेंडे आणि पंचशीलाचे झेंडे असे सर्व वातावरण बुद्धमय झालेले होते.

● **इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर वाढलेली मुंबईतील बौद्धांची लोकसंख्या :**

**प्रस्तावना :**

इ.स. १९५६ हे वर्ष गौतम बुद्धजयंतीचे २५०० वे वर्ष म्हणून भारत सरकारने नवी दिल्लीमध्ये 'बुद्धजयंती पार्क'ची स्थापना केली होती. या प्रसंगी उद्‌घाटन करताना देशाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले की, ''The 2500 Buddha Jayanti Celebration signify the home cominhng of Buddha.''[११३] १९५६ हे वर्ष भगवान बुद्धांचा २५०० व्या जयंतीचे वर्ष केंद्र सरकारने शासकीय स्तरावर विशेष रूपाने साजरे केले होते. ''या दिवसाप्रित्यर्थ दोन तिकिटांचे प्रकाशनही करण्यात आले होते.''[११४]

भारत सरकारतर्फे २४ मे १९५६ रोजी भगवान बुद्धांची २५०० वी जयंती (बुद्ध पोर्णिमा) प्रित्यर्थ गौरवग्रंथ प्रकाशित केला होता. '2500 Years of Buddhisum' प्रो. पी. व्ही. बापट हे ग्रंथाचे संपादक होते. हाच उत्सव डॉ. आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा देऊन साजरा केला होता त्यामुळे 'भारतीय बौद्ध - युगप्रवर्तन'[११५] म्हणून त्यांच्या नावाची

इतिहासात नोंद घेतली गेली. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर 'Ambedkar Era of Indian Buddhisum'[११६] ची सुरुवात झाली. वास्तविक पाहता इ.स. १९५६ च्या अगोदर म्हणजे आंबेडकरपूर्व काळातच भारतामध्ये बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य चालू झालेले होते. ''प्रा. धर्मानंद कोसंबी, पंडित राहूल सांकृत्यायन, भदंत आनंद कौसल्यावत आणि जगदीश काश्यप, भिक्खू धर्मरहित इत्यादी विहारांनी धम्माचा स्वीकार करून धम्म प्रचार प्रसार कार्याची सुरुवात केलेली होती.''[११७] तसेच इ.स. १८८१ मध्ये अनागरिक धर्मपाल यांनी महाबोधी सोसायटीची स्थापना केली होती. ते आधुनिक काळातील पहिले बौद्ध प्रसारक मानले जातात. परंतु ते जास्त लोकांना बौद्ध धर्माकडे आकर्षित करू शकले नाहीत. जेवढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांना बौद्ध धम्माकडे आकर्षित केले एवढ्या लोकांनी एकाच वेळी एकाच ठिकाणी एका व्यक्तीच्या सांगण्यावरून धर्म बदलल्याचे या अगोदरच्या धार्मिक इतिहासात उदाहरण सापडणार नाही, हे खालील लोकसंख्येच्या वाढीवरून समजते.

**बौद्धांच्या लोकसंख्येत झालेली वाढ :**

''इ.स. १८९१ मध्ये भारतात ५०,००० बौद्ध लोक होते. त्यानंतर साठ वर्षांनी म्हणजे इ.स. १९५१ पर्यंत ९,८०,८२३ एवढे बौद्ध होते. त्यातील ९० टक्क्यांपेक्षा जास्त बौद्ध पारंपरिक बौद्ध होते आणि ते आसाम, पश्चिम बंगाल, आणि हिमालय पर्वतरांगांमध्ये उंचावर रहात होते.''[११८] ''इ.स. १९३१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहरात एकही बौद्ध असण्याची नोंद नाही.''[११९] या जनगणनेमध्ये मुंबईत हिंदू, मुस्लिम, जैन, झरोस्ट्रियन, ख्रिश्चन, ज्यू आणि इतर धर्मियांची नोंद आहे. इ.स. १९५१ च्या जनगननेनुसार मुंबईमधे बौद्धांची संख्या खालीलप्रमाणे होती.

| | पुरुष स्त्रिया |
|---|---|
| ''१. कुलाबा फोर्ट, बोरीबंदर, मांडवी, डोंगरी, उमरवाडी | ३०२ + ५५ |
| २. खरा तलाव, कुंभारवाडा, मार्केट, धोबी तलाव, फगसवाडी | २३ + ९ |
| ३. गिरणगांव, खेतवाडी, वाळकेश्वर, महालक्ष्मी, ताडदेव | ३७७ + २०८ |
| ४. कामाठीपुरा, नागपाडा, मासगांव, भायखळा, वेस्ट ईस्ट | २९१ + १५३ |
| ५. घोरपदेव, शिवरी, लालबाग, परेल, नायगांव | २० + ६ |

६. माटूंगा, सायन, लव्ह ग्रोव्ह, लोअर परेल, वरळी १५ + ३

७. प्रभादेवी, दादर, माहीम ६ + ०

८. बांद्रा, परेल, अंधेरी, जुहू १२ + ९

९. घाटकोपर, कुर्ला, आणि ३८ गांवे २ + ९

म्हणजे एकूण बौद्ध स्त्रिया आणि पुरुषांची संख्या मुंबईमध्ये १४९७ एवढी होती.''[१२०] ''याच वेळी मागास जातीवर्गीय जमातींची लोकसंख्या २,१०,१२७ एवढी होती''[१२१] (पहा परिशिष्ट क्र. २) ''महाराष्ट्रामध्ये १९६१ च्या जनगननेनुसार बौद्ध धर्मिय लोकांची संख्या २७,८९,५०१ एवढी होती.''[१२२] इ.स. १९६१ च्या जनगननेनुसार मुंबई शहरामध्ये भारतातील इतर प्रातांतून धर्मानुसार जी स्थलांतरे झाली त्यामध्ये सर्वाधिक स्थलांतरे महाराष्ट्रामधून बृहन्मुंबईत झालेली असून त्यात मोठ्या प्रमाणात बौद्धांनी स्थलांतर केले आहे. ''जवळजवळ ११.८% बौद्धांचे स्थलांतराचे प्रमाण असून ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत.''[१२३] एवढया मोठ्या प्रमाणात इ.स. १९६१ नंतर मुंबईमध्ये बौद्धांचे स्थलांतर झालेली दिसते. कारण ''Rural urban migration is not only an intergral part of industrialization and economic development but it may also become a Major instrument of social Change.''[१२४]

म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा प्रभावामुळे गावगाडा समाजव्यवस्था नाकारून बौद्ध समाज मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये स्थलांतरित झालेली दिसतो. धर्मांतरानंतर झालेल्या इ.स. १९६१ च्या जनगणनेमधे चमत्कारिकरीत्या परिणाम झालेली दिसतात. ''इ.स. १९५१ मध्ये १,८०,८०० असलेली बौद्धांची लोकसंख्या इ.स. १९६१ मध्ये ३२,५०,००० एवढी झाली. म्हणजेच १६.७१ टक्के इतकी वाढ झाली.''[१२५] ''इ.स. १९६१ पासून भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रात बौद्ध धर्मियांची संख्या वाढताना दिसते. ही वाढ डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या प्रभावामुळे निर्माण झालेली आहे.''[१२६] १९५६ च्या धर्मांतरानंतर बौद्धांच्या लोकसंख्येत कशी वाढ होत गेली हे खालील पाच जनगणनेतून स्पष्ट होते. ''इ.स. १९६१ मध्ये बौद्धांची भारतातील एकूण लोकसंख्या ३२,५६,०३६ एवढी होती.''[१२७] ''१९७१ च्या जनगणनेनुसार ती ३८,१२,३२५ एवढी झाली १९८१ च्या जनगणनेमध्ये ४७,१९,७९६ आढळते. १९९१ च्या गनगणनेत ही संख्या ६३,८७,५०० इतकी झालेली असून इ.स. २००१ मध्ये सर्वात जास्त म्हणजे ६९,५५,२०७ इतकी बौद्धांची संख्या झालेली आहे.''[१२८]

''१९८१ च्या जनगणनेप्रमाणे बृहन्मुंबईतील नवबौद्धांची लोकसंख्या ४,३३६ असून त्यामध्ये २३३९ पुरुष आणि १९९७ महिला आहेत. एकूण भारतीय लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये ०.०५ एवढे प्रमाण आहे.''[१२९] १९८१ च्या जनगणनेनुसार मुंबईमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने बौद्धधमिर्यांचा तिसरा नंबर लागतो, हे खालील कोष्टकावरून लक्षात येईल.

| | |
|---|---|
| ''बौद्ध | ४,६७,७१६ |
| ख्रिश्चन | ३,९४,६८७ |
| हिंदू | ५७,१२,४४३ |
| जैन | ३,४१,९८० |
| मुस्लीम | १२,१९,९३० |
| शीख | ५,१८,०८ |
| इतर | ५,४०,१७ |
| धर्म न सांगितलेले | ८,२४''[१३०] |

''मुंबई जिल्ह्यामध्ये एकूण सर्व धर्मांची लोकसंख्या ८४,०७३ एवढी असून त्यामध्ये हिंदू ८२,११९, मुस्लीम ७००, ख्रिश्चन ४८५, शीख ९४, बौद्ध ४१३, जैन ४०, आणि इतर २७ आहेत.''[१३१] शेड्युल्ड ट्राइबमध्ये एकूण ४६ जाती आहेत. त्यांपैकी खालील जातींमध्ये बौद्धांचे प्रमाण दिलेले आहे.

''भैना-६, भटरा-७, ढोली भिल्ल-५, चोधार-२९, धनवर-६, धोंडिया-७, गौंड राजगोंड अरखा-२९, हलबी-१, कोकणी-कोकण-कुरुणा-१४, कोळी माधव-४, कोळी मल्हार-२५, पारधी/आडवी जिंजर -२''[१३२] एवढे बौद्ध आहेत.

इ.स. १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाने धर्मांतरित बौद्ध लोकांना अनुसूचित जातींच्या सर्व प्रकाराच्या सवलती दिल्या व त्यांचा अनुसूचित जातीमध्ये समावेश केला. परंतु इ.स. १९७१ च्या जनगणनेत त्यांची दखल घेतली नाही. पुढे केंद्र सरकारने व राज्य सरकारने दि. ३१ जुलै १९९० मध्ये एक पत्रक काढले होते. त्यानुसार नवबौद्धांना शेड्युल्ड कास्टमध्ये समाविष्ट करण्यात आले. हे परिपत्रक नवबौद्धांना सर्व सवलती मिळाव्यात म्हणून त्यांना अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट करणारे होते. त्यानुसार ''समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र.

सी.बी.एस. १०९०/२/१२४८ (४२०) जावक क्र. ५ महाराष्ट्र शासनाने १४ जानेवारी १९९० रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवून बौद्धांना अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करण्याचे सूचित केले. तसेच केंद्र सरकारने देखील दि. ३१/७/१९९० रोजी पत्र क्र. १२०/६/२८/९० (S.D.C.) द्वारे आदेश काढून केंद्रातही अनुसूचित जातींच्या सवलती धर्मांतरित बौद्धांना देण्याचा निर्णय घोषित केला. तसेच धर्मांतरीत बौद्धांचा नवबौद्ध म्हणून उल्लेख टाळून केवळ बौद्ध असा उल्लेख करण्याचे आदेश नमूद केले.''[१३३] त्यानुसार ''इ.स. २००१ मध्ये केलेल्या जनगणनेत महाराष्ट्रात बौद्धांची लोकसंख्या ५८,३८,७१० असून मुंबईमध्ये ती १,६१,४१७ असून मुंबई उपनगरांमध्ये ४,६४,३५४ आहे. म्हणजेच एकूण बौद्धांची मुंबई शहर व उपनगरात लोकसंख्या ६,१५,७७१ एवढी आहे.''[१३४]

''१९९१ च्या जनगणनेनुसार संपूर्ण भारतातील बत्तीस राज्यांपैकी महाराष्ट्रात सर्वात जास्त बौद्धांची संख्या आहे ५०,४०,७८५ आहे त्याचवेळी भारतातील बौद्धांची लोकसंख्या ६३,८७,५०० आहे.''[१३५] ''जम्मू-काश्मीर जनगणना झाली नव्हती.''[१३६] ''महाराष्ट्रामध्ये एकूण तीस जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त बौद्धांची लोकसंख्या मुंबईत असून ती ५,५७,०८९ एवढी आहे.''[१३७]

''There is a slight change in the definition of scheduled caste in 1991 upto 1981 scheduled cases could belong to hindu or sikh religion only but for 1991 census in addition to hindu and sikh religions scheduled casted may belong to Buddhist and Nav Buddhist religion also''[१३८] या प्रमाणे '' १९८१ च्या जनगणनेत बौद्ध आणि नवबौद्ध यांची वेगळी जनगणना केलेली आढळते.''[१३९] १९९१ च्या जनगणनेनुसार बृहन्मुंबईतील एकूण लोकसंख्या धर्मानुसार

| | |
|---|---|
| ''बौद्ध | ५,५७,०८९ |
| ख्रिस्ती | ४,४१,३३८ |
| हिंदू | ६७,४७,६७६ |
| जैन | ३,५३,६१३ |
| मुस्लिम | १९,७०,१७० |
| शिख | ७६,८९२ |
| इतर | ६०,१६५ |
| धर्म न सांगीतलेले | १८,९४८''[१४०] |

या तक्त्यावरून ''मुंबईमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने बौद्धांचा तिसरा क्रमांक लागतो. तसेच महाराष्ट्रात सर्वात जास्त बौद्धधर्मीय बृहन्मुंबईमध्ये राहतात. त्यानंतर नागपूरचा क्रमांक लागतो.''[१४१]

''२००१ च्या जनगणनेनुसार बौद्धांची महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९ कोटी ६८ लाख ७८ हजार ६२७ आहे. त्यामध्ये बौद्धांची लोकसंख्या ५८ लाख ३८ हजार ७१० आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ६ टक्के आहे.''[१४२] २००१ च्या जनगणनेनुसार मुंबई शहर व उपनगरात पुढीलप्रमाणे बौद्धांची व इतर धर्मियांची लोकसंख्या होती.

''Total Religious Population in Maharashtra/Mumbai and Mumbai Suburb 2001 census.''

| **Religion** | **Maharashtra** | **G. Mumbai** | **Mumbai Subrub** |
|---|---|---|---|
| "Hindu | 37859385 | 2719750 | 5953475 |
| Muslim | 10270485 | 734484 | 1488987 |
| Chrictain | 1058313 | 106237 | 340166 |
| Buddhist | 5838710 | 161717 | 464354 |
| Jain | 1301843 | 159021 | 319339 |
| Other | 236841 | 40792 | 20877 |
| Not Stated | 97713 | | |
| Total | "96878627" [१४३] | "3338031" [१४४] | "8640419"[१४५] |

"Growth fo major community in two decades 1971-81 in Greater Bombay 1971-1981 & 1981-1991"[१४६]

| **Religion** | **1971-1981** | **1981-1991** |
|---|---|---|
| Hindu | 38.96 | 18.12 |
| Muslim | 44.65 | 36.91 |
| Buddhist | 64.51 | 19.11 |
| Jain | 39.74 | 3.40 |
| Chrictain | 5.18 | 11.82 |
| Shikha | 20.87 | 48.42 |

इ.स. १९०१ आणि १९६१ मध्ये कुलाब्यातील सर्व धर्मांची तुलनात्मक स्थिती खालीलप्रमाणे होती.

| | १९०१ | १९६१ |
|---|---|---|
| बौद्ध | ---- | ४.३६ |
| ख्रिश्चन | ०.२१ | ०.१४ |
| हिंदू | ९४.२३ | ८८.९६ |
| मुस्लिम | ४.८५ | ५.९५ |
| इतर | ०.४३ | ०.२४ [१४७] |

''हिंदूंचे प्रमाण १९०१ मध्ये ९४.२३ टक्के होते. ते १९६१ मध्ये ८८.९६ टक्क्यापर्यंत आले. या काळात बौद्धांचे प्रमाण ४.६६ टक्क्यांनी वाढलेले दिसते. हिंदूच्या प्रमाणात जेवढी घट झाली तेवढीच साधारणपणे बौद्धांच्या संख्येत वाढ झाली.''[१४८] ''बौद्धधर्मियांच्या प्रमाणात जी वाढ झाली ती पूर्वीच्या हिंदू अनुसूचित जातींमधील बऱ्याच लोकांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे झाली असावी. गेल्या ६० वर्षात ख्रिश्चनांचेही प्रमाण घटले आहे.''[१४९] ''इ.स. १९५१ मधे कुलाबा जिल्ह्यात एकही बुद्धिस्ट नसल्याची नोंद आहे.''[१५०]

अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांच्या धम्मस्वीकारानंतर बौद्धांचे प्रमाण संपूर्ण देशामध्ये पर्यायाने महाराष्ट्रात वाढलेले आहे. ''परंतु संख्येच्या गणिताने ते लाखो असतील तरी टक्केवारीच्या समीकरणात इ.स. २००१ च्या जनगणनेनुसार केवळ सहा टक्के आहेत.''[१५१]

- **धर्मांतराच्या प्रभावाने झालेली दलित साहित्यातील स्थित्यंतरे :**

भारतामध्ये ब्रिटिश कालखंडात आधुनिक प्रबोधनाची सुरुवात झाली, त्याचाच एक परिणाम म्हणून मराठी साहित्याची निर्मिती या कालखंडात झाली. परंतु या साहित्यातून दलित-पीडितांचा विचार झालेला नव्हता. विसाव्या शतकात मात्र डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळीमुळे हा समाज जागा झाला. तो शिकू लागला, संघटित होऊ लागला, जागृत होऊ

लागला, आणि तो लिहू लागला. त्यातून मराठी साहित्यात एक नवे साहित्य निर्माण झाले. ते म्हणजे दलित साहित्य होय. या साहित्याचा उगम हाच मुळात डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी समता संग्रमातून झालेला आहे. त्यामुळे या साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. आंबेडकर आहेत. म्हणजेच ‘‘आंबेडकरांनी उभारलेल्या वैचारिक आंदोलनाच्या आविष्कारातून दलित साहित्याचा जन्म झाला.’’[१५२] डॉ. आंबेडकरांच्या समता संग्रामाचे शेवटचे हत्यार म्हणजे त्यांचे धर्मांतर होय. त्यांनी आपलया लाखो अनुयायांसोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर या नवदीक्षित समाजात आमुलाग्र बदल झाले. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर ही एक सांस्कृतिक चळवळ होती. ‘‘महाराष्ट्रातील केवळ धर्मांतरीत अस्पृश्यांनी ही चळवळ जिवंत ठेवण्याचे धाडस दाखवले. बाकी जे अधर्मांतरित होते, ते दलित असूनही धर्मांतराचे विरोधक आहेत.’’[१५३] म्हणूनच दलित साहित्यिकांमध्ये बौद्ध धम्माचा स्वीकार केलेले साहित्यिक जास्त प्रमाणात आहेत.

**धम्मप्रचाराची साधने :**

‘‘प्राचीन काळापासून जेव्हा एखाद्या धर्माच्या, पंथाच्या, किंवा संप्रदायाच्या प्रवर्तकाला, विचारवंताला समाजात काही वेगळे सांगावयाचे असेल त्यावेळी या प्रर्वतकाने लोकांमध्ये प्रचलित असलेल्या माध्यमांचा वापर केला आहे.’’[१५४] डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनीदेखील धम्मप्रसारासाठी या माध्यमांचा वापर केलेला आहे. ‘‘प्रत्येक माध्यम हा एक संदेश असतो. या माध्यमांचा जनमानसावरील प्रभाव लक्षात घेता धर्मप्रसारातील त्याचे महत्त्व तपासणे आवश्यक आहे.’’[१५५] म्हणून डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या प्रभावानचे संशोधन करण्यासाठी प्रचलित साधनांचा-माध्यमांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ही साधने लिखित-अलिखित आणि प्रतीक इत्यादी स्वरुपांमध्ये आहेत. या ठिकाणी धर्मांतरांचा प्रत्यक्ष प्रभाव पडलेल्या साहित्य या क्षेत्रावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**धर्मांतराचा साहित्य क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

साहित्याकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आहेत. उदा. सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच ऐतिहासिक इत्यादी. संशोधनाची उपयुक्तता लक्षात घेऊन या ठिकाणी मी ऐतिहासिक दृष्टीने साहित्याचा विचार केलेला आहे. साहित्याचा वाङ्मयीन टीका अथवा वाङ्मयीन समीक्षा या दृष्टीने विचार केलेला नाही. साहित्याच्या स्वरूपात विविधता असते. त्यामध्ये मानवी मनाच्या अनेकविध

प्रवृत्तींचे दर्शन होते. उदा. ललित साहित्य आणि वैचारिक साहित्य. ''वैचारिक साहित्यामध्ये एखाद्या विशिष्ट तत्त्वाला किंवा तत्त्वज्ञानाला प्रमाण मानून साहित्य निर्माण केले जाते. तर ललित साहित्यामध्ये एखाद्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष आविष्कार असण्यापेक्षा मानवी मनाच्या गुंतागुतीचे चित्रण, समाजचित्रण, निसर्गचित्रण इत्यादी गोष्टींना महत्त्व दिले जाते.''[१५६] उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व साहित्य हे वैचारिक आहे. ते म्हणत ''मी, साहित्य मनोरंजासाठी कधीच वाचत नाही.''[१५७] त्यांचे साहित्य स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या तत्त्वप्रणालीवर आधारित आहे. आणि म्हणून धर्मांतरांच्या प्रेरणेने जे साहित्य निर्माण झाले त्याला तात्त्विक बैठक आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर प्रक्रियेला तात्त्विक बैठक होती. याउलट दलित साहित्य हे ललित साहित्य असल्यामुळे त्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा प्रत्यक्ष प्रभाव दिसत नाही. ''स्वप्नरंजन किंवा कल्पनेच्या जगात वावरणे हा बाबासाहेबांचा लेखनधर्म नव्हता. मानवी स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा, आणि मानवी मूल्य हे त्यांच्या लेखनाचे आधार होते.''[१५८] परंतु धर्मांतराचा अप्रत्यक्ष प्रभाव दलित साहित्यावर पडलेला दिसतो. कारण दलित साहित्याचे प्रेरणा स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून ''दलित साहित्य निर्मितीची कारणे धर्मांतरामुळे घडवून आणलेल्या मानसिक क्रांतीत आहेत.''[१५९]

''दलित साहित्याला आंबेडकरांच्या विचारप्रणालीचा वारसा मिळाला आहे. वास्तविक पाहता, दलित साहित्य निर्माण होण्याअगोदरही अनेक कवी, शाहीर, कथाकार होते. परंतु ते सर्व एकाकी पडलेले वा पाडलेले शब्दप्रभु होते.''[१६०]

**दलित साहित्य संघाची निर्मिती :**

इ.स. १९४० पासून दलित साहित्य लिहिण्याची सुरुवात झालेली आहे. '' 'दलित सेवक' या वृत्तपत्रातून दलित साहित्यावर लेख, कथा, कादंबरी, लघुनिबंध छापले जात असत.''[१६१] ''इ.स. १९४८ मध्ये मुंबईतील आंबेडकर अनुयायांनी दलित सेवक साहित्य संघाची स्थापना केली.''[१६२] ''इ.स. १९५० साली संघाचे अधिवेशन मुंबईमध्ये वरळीमध्ये झाले होते. बी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे अधिवेशन भरविण्यांत आलेले होते. या अधिवेशनात संघाचे नाव 'दलित साहित्य संघ' असे ठेवण्यांत आले.''[१६३] दलित साहित्य संघाची ध्येय्ये आणि उद्‌दिष्टे म्हणजे ''साहित्य संमेलने भरविणे, संघाच्या जिल्हावार शाखा स्थापन करणे, साहित्य निर्माण करणे, सांस्कृतिक कार्यक्रम घडविणे आणि संशोधन करणे''[१६४] ही होती. पुढे दि. १९ जुलै १९५६ रोजी

संघाचे नांव 'महाराष्ट्र दलित साहित्य संघ'[१६५] असे ठेवण्यात आहे. आणि धर्मांतरानंतर १९६१ मध्ये हा संघ 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद'[१६६] या नावाने ओळखला जाऊ लागला. अशा रीतीने दलितांच्या पहिल्या साहित्य संघटनेच्या नावामध्ये धर्मांतराच्या प्रभावामुळे परिवर्तन झालेले दिसते.

**दलित साहित्यातील वैचारिक स्थित्यंतरे :**

इ.स. १९५० ते २००६ या कालखंडात दलित साहित्यामध्ये वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. ''इ.स. १९५० मध्ये दलित साहित्य प्रवाह १९६१ मध्ये बौद्ध साहित्य प्रवाह, १९६७ साली पुन्हा दलित साहित्य प्रवाह, १९७६ मध्ये आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य प्रवाह, इ.स. १९९२ मध्ये आंबेडकरवादी साहित्य प्रेरणेचा प्रवाह आणि २००६ पर्यंत आंबेडकरवादी साहित्य म्हणजेच बौद्धसाहित्य प्रवाह यावर भर देण्यात येत आहे. या सर्व वाङ्मयीन संकल्पना असून या सर्व संकल्पनांमध्ये सरमिसळ होताना दिसते.''[१६७] हा संशोधनाचा स्वतंत्र विषय आहे. प्रस्तुत संशोधनात विषयाची उपयुक्तता लक्षात घेऊन दलित साहित्यातील संकल्पनांच्या स्थित्यंतराचे तीन कालखंड पाडण्यात आले आहेत. या कालखंडात साहित्यावर धर्मांतराचा प्रभाव कितपत पडला आहे, यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

१. बौद्ध साहित्य प्रवाह इ.स. १९५६ ते इ.स. १९६७

२. दलित साहित्य प्रवाह इ.स. १९६७ ते इ.स. १९९०

३. आंबेडकरवादी साहित्य प्रवाह इ.स. १९९० ते २००६

**१) बौद्ध साहित्य :**

इ.स. १९५६ ते इ.स. १९६७ : बौद्ध साहित्य म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यावर आधारित आहे. ''जे बहुजन हिताय बहुजन सुखाय आहे ते साहित्य म्हणजे बौद्ध साहित्य होय.''[१६८] इ.स. १९५६ नंतर बौद्ध मानासिकता स्वीकारून जे साहित्य निर्माण झाले, त्या साहित्याचा या कालखंडात समावेश होतो. हा कालखंड धर्मांतरानंतरचा सांस्कृतिक संक्रमणाचा आहे. धर्मांतरामुळे सांस्कृतिक मूल्ये बदलली. मानसिकतेमध्ये विलक्षण बदल घडून आला. सामाजिक क्षेत्रात वैचारिक बदल घडून आले या सर्वाचा साहित्यावर प्रभाव पडला. या काळात जे बौद्ध साहित्य निर्माण झाले, ते प्रामुख्याने बौद्ध धम्म समजून घेण्यासाठी झाले. यामध्ये प्रामुख्याने

डॉ. आंबेडकरांच्या लिहिलेल्या साहित्याचा समावेश होतो. ‘‘ज्याच्या नावाचं निशाण मराठी साहित्यात एकविसाव्या शतकात निर्विवादपणे फडकत राहील अशा तीन/चार थोर लेखकांचे वास्तव्य मुंबईत होते. ते म्हणजे केशवसुत, काकासाहेब खाडिलकर, हरिभाऊ आपटे, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर.’’[१६९] या काळातील डॉ. आंबेडकरांनी लिहिलेला अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ‘भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म’ हा होय. ‘‘हा ग्रंथ लिहून बाबासाहेबांनी सम्यक क्रांतीचा जाहीरनामा जनतेसमोर ठेवला.’’[१७०] नवबौद्धांचा हा ग्रंथ महत्त्वाचा धार्मिक ग्रंथ मानला जातो. इ.स. १९५६ साली हा ग्रंथ बाबासाहेबांनी लिहून पूर्ण केला होता. त्यानंतर अल्पावधीतच त्यांचे निर्वाण झाले. हा ग्रंथ मूळ इंग्रजीत होता, ‘‘इ.स. १९५७ मध्ये या ग्रंथाचे प्रकाशन मुंबईमध्ये करण्यात आले. या ग्रंथाचे प्रकाशन मुंबईतील पीपल्स एज्युकेशन सोसायटीने केले होते. त्यानंतर जवळजवळ चौदा वर्षांनी म्हणजे इ.स. १९७० मध्ये या ग्रंथाचे मराठीमध्ये भाषांतर पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ प्रकाशनाने केले.’’[१७१] हा ग्रंथ लिहिण्यासाठी बाबासाहेबांनी त्रिपिटकांचे भाषांतरे, मूळ पाली ग्रंथ, बुद्धचरित्र तसेच इंग्रजी ग्रंथांचा अभ्यास केला होता. तसेच ‘‘त्यांनी नवबौद्धांना धम्माचे संस्कार करण्यासाठी बुद्ध पूजापाठ नावाची संस्कारपुस्तिका धर्मांतरापूर्वीच दि. १५ डिसेंबर १९५० मध्ये लिहिली होती. या पुस्तिकेचे प्रकाशन महाबोधी संघाचे अध्यक्ष वा. ना. राजभोज यांनी केले होते.’’[१७२] या उपासना पाठामध्ये बुद्धांचे तत्त्वज्ञान आहे. त्रिशरण, पंचशील, त्रिवंदना धम्मवंदना, संघवंदना, पुष्पपूजा, धातुपूजा आणि जप यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाने इ.स. १०७६ साली डॉ. आंबेडकर चरित्रग्रंथ प्रकाशन समितीची स्थापना करून डॉ. आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे यांचे वीस खंडांमध्ये प्रकाशन केले आहे. या ग्रंथांच्या लाखो प्रती विकल्या जातात. या साऱ्या तपशीलावरून डॉ. आंबेडकर हे बेस्ट बुक सेलर आहेत.’’[१७३] ‘‘या काळातील प्रसिद्ध लेखक शंकरराव खरात यांनी अनेक कथा-कादंबऱ्या लिहिल्या त्यांची ‘माणुसकीची हाक’ ही कादंबरी आणि बंधू माधव यांची ‘मुस्ती यही पथे’ या ग्रंथाद्वारे धर्मांतरावर प्रकाश टाकला आहे.’’[१७४] या काळातील साहित्यिक बौद्ध संस्कृतीला महत्त्व देणारे होते. या साहित्यिकांमध्ये अण्णा भाऊ साठे, दीनबंधु शेगावकर, शरद महातेकर, वामनदादा कर्डक, दिनेश लखमाथुरकर, वसंत राजस, सुखाराम हिवराळे आणि ॲड. बी. सी. कांबळे,[१७५] इत्यादी.

परंतु मराठी साहित्याने इ.स. १९६६-६७ पर्यंत, या काळातील साहित्याची दखल घेतली नाही. ''ॲड. बी. सी. कांबळे, यांच्यासारख्या आंबेडकरवादी विचारवंताची वाङ्मयीन क्षेत्रामध्ये विचाराची बैठक आहे. त्यांची भूमिका ठाम आहे. त्यांचे निश्चित असे वैचारिक बल आहे.''[१७६] त्यांनी इ.स. १९५८ च्या महाराष्ट्र दलित साहित्य परिषदेच्या संमेलनात आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले होते की, ''वास्तविक आपण दलित नाही. दलित नाव हे कशाला दिलेले आहे.''[१७७] पुढे धर्मांतरानंतर या परिषदेत महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद असे नाव देण्यात आले. परंतु या काळात फारसे साहित्य निर्माण झाले नाही. जेवढ्या प्रमाणात इ.स. १९६७ नंतर दलित साहित्य लिहिले गेले त्यात ''या काळातील चळवळीचे नेतृत्व करणारे बी. सी. कांबळे, दा. ता. रुपवते, घनःशाम तळवटकर, शंकरराव खरात हे लेखक होते. त्या काळचा इतिहास त्यांना शब्दबद्ध करणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे नव्हते. परंतु यांपैकी कोणीही हे काम केले नाही. त्यानंतर लेखकांचे भरघोस पीक आले. पण त्यांनी आत्मकथने लिहिण्याचा सपाटा लावला. या लेखकांपैकी कोणीही इतिहासाचा मागोवा घेण्याचे धाडस केले नाही.''[१७८] असे असले तरी जे थोडे साहित्य या काळात निर्माण झाले त्यात बी. सी. कांबळे, भाऊसाहेब अडसूळ, आप्पा रणपिसे, विजय सोनावणे, राजा ढाले, इत्यादींनी बौद्ध साहित्य विचार स्वीकारून डॉ. आंबेडकरांशी प्रामाणिकता ठेवली व वैचारिक लेखन बौद्ध तत्त्वज्ञानाच्या निष्ठेतून केले. बी. सी. कांबळे, यांनी रिपब्लिकन, रिपब्लिक, बुद्धघोष या नियतकालिकांमधून वैचारिक लेखन केले. हरिष खंडेराव यांनी 'प्रवर्तक काव्यमीमांसा' हा बौद्ध साहित्यात भर टाकणारा महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. मानवतावादी साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांनी अनेक कथा, कांदबऱ्या लिहून आंबेडकरांचे बंडखोर तत्त्वज्ञान साहित्यातून प्रकाशमान केले. राजा ढाले यांनी धम्मलिपी मासिक लिहून बौद्ध साहित्य आणि संस्कृतीच्या दिशा विस्तृत केल्या. प्रा. गंगाधर पानतावणे आणि यशवंत मनोहरांनी अस्मितादर्श व समुचित चालवून आंबेडकरी साहित्यात अनेक लेखक, विचारवंत निर्माण केले. वामन ओव्हाळ यांनी आंबेडकरी चळवळीची कथा लिहिली. वामनदादा कर्डक यांनी आंबेडकरांच्या विचारांना कवितेतून प्रस्तुत केले. त्यांनी भीमगीते आणि बुद्धगीते गायली. ''दीनबंधू शेगावकरांनी आपल्या काव्यातून बुद्ध आंबेडकरांचे दर्शन घडविले तर विजय सोनावणे यांनी आपल्या असंख्य लेखांतून व्याख्यानातून साहित्य-संमेलनातून, भाषणांद्वारे बौद्ध साहित्य, संस्कृती, लेणी यावर प्रकाश टाकला.''[१७९]

**दलित साहित्य :**

इ.स. १९६७ ते इ.स. १९९० : डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतून जे मराठी साहित्य निर्माण झाले, त्याला मुंबईतील साहित्यिक मित्रांनी सुरुवातीच्या काळात, सामान्यतः इ.स. १९५० मध्ये 'दलित साहित्य' म्हटले.[१८०] इ.स. १९५६ नंतर आंबेडकरी साहित्य आणि बौद्ध साहित्य लिहिले गेले.[१८१] ''यापैकी दलित साहित्याची निर्मिती ही साठोत्तर मराठी साहित्यातील एक अभूतपूर्व घटना आहे.''[१८२] या काळात अनेक कवी, लेखक, नाटककार, आत्मचरित्रकार यांनी आपली आत्मकथने, नाट्यकृती, कविता इत्यादींच्या माध्यमातून साहित्य निर्माण केले. या साहित्यावर धर्मांतराचा प्रत्यक्ष प्रभाव दिसत नाही, कारण या साहित्यांमध्ये धर्मांतरापूर्वीचे जीवन रेखाटलेले आहे. असे असले तरी धर्मांतरानंतर दलितांच्या वेदनांची जाणीव होऊन ही वेदना त्यांनी साहित्यामध्ये मांडली. ''दलित चळवळीच्या पहिल्या कालखंडात चळवळीमध्ये विद्रोह नाही, तर सुधारणा आहेत. तर दुसऱ्या कालखंडात सर्वच स्तरावर विद्रोह आहे. हा विद्रोह स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांसाठी आहे''[१८३] असे प्रसिद्ध समाजशास्त्राचे अभ्यासक डॉ. पी. जी. जोगदंड म्हणतात. या कालखंडातील महत्त्वाचे साहित्यिक म्हणजे, ''बाबुराव बागूल, वामनराव निंबाळकर, अर्जुन डांगळे, प्रा. केशव मेश्राम, वसंत मून, दत्ता भगत, त्र्यंबक सकपाळे, प्रल्हाद चेंदवणकर, शरणकुमार लिंबाळे, नाराण सुर्वे, नामदेव ढसाळ, प्रज्ञा लोखंडे, दामोदर मोरे, डॉ. योगेंद्र मेश्राम, प्रा. भगवान भोईर इत्यादी. या सर्व साहित्यिकांनी धर्मांतरानंतर स्वतःला दलित साहित्यिक म्हणून घेतले.''[१८४] वास्तविक पाहता, दलित साहित्य आणि बौद्ध साहित्य या दोघांच्याही प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. परंतु दलित साहित्याची आंबेडकर प्रेरणा ही धर्मांतरापूर्वीची आहे. धर्मांतरानंरची बौद्ध आयडेंटिटी त्यात दिसत नाही. हे वाङ्मय धर्मांतरापूर्वीचे जीवन सतत रेखाटताना दिसते. या साहित्यातून बंड, विद्रोह, नकार व्यक्त होतो. वास्तविक पाहता बौद्ध आयडेंटिटी मिळाली असूनही दलित साहित्य एव्हाना मोठ्या प्रमाणात निर्माण झाले की, ''मराठी वाङ्मयाला छेद करणारे साहित्य निर्माण झाले.''[१८५] थोडक्यात, ''दलित साहित्यिक आंबेडकरवाद प्रेरणा म्हणून स्वीकारतात आणि बौद्ध संस्कृती विषयी उदासीनता दाखवितात.''[१८६] असे असले तरी, ''Dalit writers do not belive in fate, holy book, rebirth and dicord and ennity in human being They have faith in universal humanism they stand for the change and altimetely revolution''[१८७] असे प्रसिद्ध

साहित्यिक गंगाधर पानतावणे लिहितात. तर यशवंत मनोहर याचे मते, ''धम्मस्वीकारमुळे अन्याय, अत्याचाराविरुद्ध दलित पँथरसारखी लढाऊ संघटना इ.स. १९७२ मध्ये जन्मास आली.''[१८८] रावसाहेब कसबे यांचे मते, ''दलित पँथरच्या उदयाला पार्श्वभूमी म्हणून एक महत्त्वाची चळवळ दलित समाजात निर्माण झाली. ती राजकीय नव्हती. दलित समाजात उदय पावलेल्या स्वातंत्र्योत्तर काळातील लेखक व कलावंतानी विचारवंतांची चळवळ होती. ही चळवळ एका सांस्कृतिक आवश्यकतेपोटी उदयास आलेली होती.''[१८९]

**'दलित साहित्याचे स्वरूप'**[१९०] :

दलित साहित्याविषयी लिहिणाऱ्या काही लेखकांच्या विचारवंताच्या व्याख्या-स्वरूप अभिप्राय -

पु. ल. देशपांडे : ''दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू, अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रुंचे मोल हे सर्वात मोठे असते. सामान्यांच्या भाषेत तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य होय.''

डॉ. म. ना. वानखेडे : दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांनाविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

बाबुराव बागूल : 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे वंश, वर्ण, आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय.''

प्रा. केशव मेश्राम : यांच्या मते हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्याला दलित साहित्य म्हणावे.''

प्रा. गंगाधर पानतावणे : 'दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्ती संग्राम आहे. स्वतःला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे हे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य होय.''

राजा ढाले : यांच्या मते 'जो जो या समाजरचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरुद्ध लढणारा दृष्टिकोन घेऊन साहित्यनिर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणेल ते

दलित साहित्य असेल आणि त्याचे साहित्य दलितांच्या दृष्टिकोनातून लिहिलेले असेल.'' ''दलित साहित्याची मागणी आर्थिक किंवा राजकीय नाही, तर ती मूलतः सामाजिक-सांस्कृतिक आणि नैतिक समानतेची आहे.''[१९१] ''दलितांचे साहित्य हे एकीकडे शोषण करणाऱ्या संस्कृतीविरुद्ध विद्रोह पेटविते, तर दुसरीकडे स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा बाळगणाऱ्या जगातील सर्व पीडित लोकांचा संवाद साधण्याचा प्रयत्न करतो.''[१९२]

**दलित साहित्यावर पडलेला धर्मांतराचा प्रभाव :**

**१) कथा :**

धर्मांतराचा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेल्या साहित्यात, ''कथाकारांमध्ये शंकरराव खरात यांच्या बारा बलुतेदार, सांगावा, भार, दौंडी, पाणी, बहिष्कार, पूजा, या कथांमध्ये आंबेडकरी विचारांच्या प्रेरणा आहेत. बंधुमाधव, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, वामन होवाळ, अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, अभिमान, योगेद्र मेश्राम यांच्या लेखात आंबेडकरी प्रेरणा आहेत.''[१९३] उदा. 'पाणी' या कथेत महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, पूजा या कथेत मंदिरप्रवेशाचा प्रश्न 'बहिष्कार' नाटकात महारांनी धर्मांतर केल्यानंतर गावकीच्या कामावर टाकलेला बहिष्कार इ. प्रसंगावर कथा लिहिल्या आहेत. तसेच धर्मांतरानंतर बौद्ध समाजात शिक्षणामुळे एक पांढरपेक्षा वर्ग निर्माण झालेला आहे. त्यावरील समस्यांवर 'साहेब' कथेतून प्रकाश टाकण्यांत आला आहे. 'बुद्ध मरून पडला आहे' यामध्ये बौद्ध आणि मातंग समाजाच्या मतभेदावर कथा लिहिली आहे. तर यादवी या कथेत डॉ. आंबेडकरानंतर बौद्ध समाजातील गटबाजीचे वर्णन केलेले आहे. अमिताभ यांच्या 'पड' कथासंग्रहात धर्मांतराचा प्रत्यक्ष प्रभाव दिसतो. या कथासंग्रहात बौद्ध धम्म स्वीकारण्यापूर्वी आणि नंतरची परिस्थिती सांगितली आहे. धर्मांतराचा प्रत्यक्ष प्रभाव कुठेच दिसत नसत तरी अप्रत्यक्ष प्रतिबिंब मात्र दिसते. दलितांच्या धर्मांतरानंतर त्यांना आपल्या वेदनांची जाणीव होऊन या वेदना साहित्यरूपात मांडण्याची स्फूर्ती त्यांना मिळाली.''[१९४] दिलीप चित्रे दलित साहित्याबदल लिहितात, ''The term was first used in the 1960 for the writing that has come chiefly from ex-untouchales, many of them in Maharashtra are now Buddhist or oppressed group."[१९५]

**२) कादंबरी :**

दलित कांदबरीमध्ये अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे, नामदेव व्हटकर,

ना. ब. जाधव, हि. गो. पवार, हरिभाऊ पगारे, निशिकांत शेंडे, भीमसेन देठे, भि. शि. शिंदे. सुधाकरराव गायकवाड, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, अशोक व्हटकर, मुरलीधर भेसेकर, इत्यादींनी मोलाची भर घातली आहे. यामध्ये हिं. गो. बनसोडे, यांनी 'मुक्तिसंग्राम' या कादंबरीमध्ये धर्मांतर केलेल्या नवबौद्धांनी गुलामगिरीची कामे नाकारून स्वाभिमानाचे जीवन स्वीकारल्यामुळे पुढे कसा संघर्ष करावा लागतो याचे चित्रण केले आहे. ज. वि. पवार यांच्या 'बलिदान' या कांदबरीमध्ये समाजातील गटबाजीवर प्रकाश टाकला आहे. हरिभाऊ पगारे यांनी डॉ. आंबेडकरांवर लिहिलेल्या आत्मनिवेदनात्म 'युगप्रर्वतक' या कांदबदीत धर्मांतरानंतर नवबौद्ध आणि गावकरी यांच्यातील संघर्षाची दखल घेतली आहे. तर सुधाकर गायकवाड यांनी 'शुद्र' या कांदबरीत बौद्ध तत्त्वज्ञानाची चर्चा केली आहे.

दलित कादंबरीत डॉ. आंबेडकरांचे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे विचार व्यक्त झालेले दिसतात. शंकरराव खरातांनी इ.स. १९५८ मध्ये दलितांच्या धर्मांतरांवर लिहिलेली 'माणुसकीची हाक' ही कांदबरी तसेच बंधू माधव यांची 'मुक्ती यही पथे' या कादंबरीत धर्मांरानंतरचे चित्र उभे केले आहे.

**३) आत्मकथा :**

दलित साहित्यामध्ये सर्वात जास्त प्रसिद्ध झालेला साहित्यप्रकार म्हणजे आत्मकथा होय. दया पवार, प्र. ई. सोनकांबळे, माधव कोंडविलकर, शंकरराव खरात, उत्तम तुपे, ना. स. सोडगे, इत्यादींची आत्मचरित्रे प्रसिद्ध असून यामध्ये बाबुराव बागूल यांच 'बलुतं' हे आत्मचरित्र महार समाजाचे शहर आणि खेड्यातील जीवन चित्रण करते. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा मुंबई शहरावर कसा प्रभाव पडला हे सांगताना ते लिहितात, 'मुंबईच्या दीक्षेच्या वेळी स्त्रियांना पांढरी पातळ लागत. त्या काळी व्यापाऱ्यांनी खूपच धंदा केला. पांढऱ्या साड्या म्हणून पुरुषांची धोतरं विकली, दामदुप्पट किंमत देऊन आई आणि बायकोला पांढऱ्या साड्या उधारीने विकत घेतल्याचे आठवते.''[१९६]

'दया पवारांचे 'बलुतं'मध्ये धर्मांतराचा दृश्य परिणाम आणि तोही व्यावहारिक स्तरावर दिसतो. लग्नात पांढऱ्या साड्या नेसणे, प्रेताला माती न देता जाळणे, पूर्वीचे घरातले, देव गुंडाळून ठेवणे, यातून धर्मांतराचे बदल दिसतात.''[१९७] गेल्या पन्नास वर्षातील महार समाजातील सांस्कृतिक बदलांचे निवेदन म्हणजे बलुतं.''[१९८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक चळवळीमध्ये दलित समाजातील स्त्रियांचा सहभाग होता. चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून धर्मांतरापर्यंतच्या सर्व चळवळीमध्ये त्यांनी आपली भूमिका बजावली होती. 'शिका, संघटित व्हा, संषर्घ करा' या डॉ. आंबेडकरांच्या विचारसूत्राचे मोठ्या प्रमाणात पालन महार समाजाने केले होते. म्हणूनच या समाजातील स्त्री-पुरुष जलद गतीने शिक्षित झाले आणि विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढे आले. यामध्ये स्त्रियासुद्धा आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढे आल्या. परिणामतः वाङ्मयाच्या क्षेत्रातही त्यांचे प्रमाण अन्य दलित मागासवर्गीय स्त्रियांच्या तुलनेत जास्त आहे.''[१९९] डॉ. आंबेडकर हेच त्यांचे प्रेरणास्थान आहेत ''दलित स्त्री-आत्मकथनकारांमधे प्रामुख्याने आजच्या बौद्ध आणि पूर्वाश्रमीच्या महार समाजातील स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण आंबेडकरी चळवळीचा आणि विचारांचा प्रभाव या समाजावर जास्त आहे.''[२००] या आत्मकथनकरांमध्ये प्रामुख्याने जुन्या सामाजिक परंपरा रूढी यांचे वर्णन केलेले दिसते. पण त्याचबरोबर परिवर्तन हेही आढळते. डॉ. आंबेडकरांनी धम्माचा स्वीकार केल्यानंतर जी प्रगत मानसिकता या समाजाने स्वीकारली होती त्यांची नोंद या आतमकथनांमध्ये दिसते. उदा. बेबीताई कांबळे, आपल्या 'जिणं आमचं' या आत्मकथनात लिहितात, ''डॉ. भीमराव आंबेडकरांची फूल उदबत्ती लावून पूजाअर्चा केलेली नाही, बाबांनी प्रत्येक सभेत टाहो फोडून सांगितलेल्या तत्त्वांची पुजारीण झाले, शील, सत्त्व नीतीनं, येणाऱ्या प्रसंगांना टक्कर दिली. गरिबीत राहून, त्यांतच सुख मानलं पण घर सोज्वळ बनवलं. वाईट मार्गाचा कुठलाच माझ्या घराला गंध नाही. नीती नियमांचे पालन सगळीच तंतोतंत करत आहेत. पुढे त्या लिहितात, ''डॉ. बाबासाहेबांनी बुद्धधर्म घेतला तो कशासाठी ? बुद्ध धर्म म्हणजे चारित्र्याची घडण, बौद्ध धर्माची तत्त्व सांगणारा मुळी तत्त्वनिष्ठ पाहिजे, सोज्वळ राहणीमान शुद्ध घराणं पाहिजे.''[२०१] या आत्मकथनाच्या प्रस्तावनेत मॅकसिन बर्नसन म्हणतो, 'आंबेडकरांबद्दल लिहित असताना बेबीताईंच्या भाषेची सहजता कमी कमी होऊन प्रबोधनाचा सूर उमटवयाला लागतो.''[२०२] दलित स्त्रियांची आणखी महत्त्वाची आत्मचरित्रे म्हणजे शांताबाई कांबळे, यांचे 'माझ्या जलमाची चित्तरकथा, जनाबाई गिऱ्हे यांचे 'मरणकळा', मुक्ता सर्वगौड यांचे 'मिटलेली कवाडे', 'शांताबाई दाणी यांचे 'रात्र दिन आम्हा', कुमुद पावडे यांचे 'अंतस्फोट', 'जनूबाई गावीत यांचे 'आहेर' ही आत्मचरित्रे या कालखंडातील महत्त्वाची स्त्री-आत्मचरित्रे आहेत.

अशा प्रकारे दलित साहित्य चळवळीने वाङ्मयीन क्षेत्रात महत्त्वाचे योगदान केले, या चळवळीतील अनेक लेखक, विचारवंतांनी पुढील काळात साहित्य चिकित्सा करण्यास सुरुवात केली. धर्मचिकित्सा करण्यास सुरुवात केली. कथा, कांदबऱ्या, एकांकिका, नाटक यांच्या माध्यमातून आपले अनुभव मांडले. हे साहित्य जीवनवादी साहित्य आहेत कल्पना, मनोरंजन या दृष्टीने लिखाण केलेले नाही. या चळवळीतूनच आप्पासाहेब अडसूळ, यशवंत मनोहर अशी अनेक साहित्यमंडळी निर्माण केली. त्यांनी आंबेडकरवादी साहित्यात भर टाकली.

इ.स. १९६७ ते इ.स. १९९२ या कालखंडात बौद्ध साहित्य ही पर्यायी संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला, परंतु पर्यायी संकल्पना सर्वसंमत होऊ शकली नाही. धर्मांतरित दलितांना बौद्ध साहित्य संकल्पनेचे महत्त्व पटलेले आहे. परंतु अधर्मांतरित व स्वार्थी दलित (साहित्यिकांता डॉ.आंबेडकर हे इ.स. १९५६ पर्यंतचे प्रमाण असून) बौद्ध धम्म व धर्मांतरित आंबेडकर त्यांना रूजत नाहीत.''[२०३] त्यामुळे ''डॉ.आंबेडकरांनी घडवून आणलेल्या धम्मचक्र परिवर्तनाची अभुतपूर्व सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक घटना यांचे पडसाद मराठी साहित्यात प्रकर्षाने जाणवले नाहीत.''[२०४] या संदर्भातील प्रा. मे. पु. रेगे यांचे अस्मिता मासिकातील विचार महत्त्वाचे वाटतात. ते म्हणतात, ''ज्याने आधुनिकता स्वीकारलेली आहे, असा माणूस आपल्या परंपरागत मूल्यांविरुद्ध बंड करीलच. दुर्दैवाने आपल्या समाजात प्रामाणिक बंड झालच नाही. दर वेळेला एक प्रकारची तडजोड करून जुनी मूल्ये तशीच ठेवून वरवरचा देखावा पालटून किंवा ह्या मूल्यांना आध्यात्मिक स्वरुप देऊन ऐहिक जीवनाच्या संदर्भातून वेगळे करून परंपरागत मूल्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. पण नवबौद्धांना त्यांच्या सामाजिक परिस्थितीमुळे जे बंड करावे लागले ते त्या प्रकारचे नाही. या नवबौद्धांच्या साहित्यात वास्तविक सामाजिक चित्रण जर प्रामाणिकपणे प्रभावीपणे चित्रित झाले तर एक नव्या प्रकारचं साहित्य मराठीत निर्माण होईल. या प्रकारच साहित्य कोणताही वर्ग निर्माण करू शकणार नाही.''[२०५] प्रा. चिटणीस यांचे विचारही या संदर्भात उद्बोधक आहेत. ते म्हणतात, ''बौद्ध धम्म म्हणजे लोकशाहीचा एक जीवनमार्ग आहे. हा धर्म स्वीकारल्यामुळे दलितवर्गीय लेखकांच्या जाणिवा लोकशाहीतील नागरिकांपेक्षा वेगळ्या राहू नयेत. त्या वेगळ्या असल्याचे कारण ते अद्यापी संक्रमाणाच्या उंबरठ्यावर आहेत. हिंदू धर्मातील अन्यायाचे ओझे अद्यापी त्यांच्या पाठीवर आहे. आणि जोपर्यंत बौद्धधर्म स्वीकारूनही त्यांचे ओझे

हलके होण्याऐवजी वाढतच राहिले तर त्यांच्या जाणिवात बौद्ध धर्माच्या प्रभावापेक्षा हिंदू धर्म व हिंदू संस्कृतीची प्रतिक्रियात्मक चीडच अधिक राहील. तेव्हा अस्पृश्यतेचे ओझे नाहिसे करा. म्हणजे मन आणि वाङ्मय स्वच्छ होईल.''[२०६]

''विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात दलित साहित्य बौद्ध साहित्याच्या निर्मितीस हानिकारक आहे हे दलित साहित्यिकांना समजले.''[२०७] त्यातूनच इ.स. १९९१ नंतर बौद्ध साहित्याच्या संकल्पनेचा विचार करू लागले. त्यातूनच आंबेडकरवादाची निर्मिती झाली.

**३) आंबेडकरवादी साहित्य इ.स. १९९० ते इ.स. २००६ :**

'स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्यायाचा उद्‌घोष करणारे, प्रज्ञा शील, करुणा आत्मसात करण्यात प्रेरणादायी ठरणारे, ज्ञानग्रंथ आणि धर्मभेद समूळ नष्ट करण्यास वचनबद्ध असणारे नीतीमूल्यांची जोपासना करणारे आणि बौद्ध धम्म हा जीवन मार्ग आहे असे शिकविणारे साहित्य म्हणजे आंबेडकरवादी साहित्य होय.''[२०८] अशी व्याख्या जेष्ठ आंबेडकरी प्रवर्तकवादी साहित्यिक हरिश खंडेराव यांनी केली आहे. 'बुद्ध + फुले + आंबेडकर = आंबेडकरवाद, आंबेडकरावादात बुद्ध तत्त्वज्ञान दडलेले आहे.''[२०९] आंबेडकरवादी साहित्याची निर्मिती इ.स. १९९१ पासून सुरू होते. कारण इ.स. १९६७ ते १९९१ पर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडात कोणत्याही साहित्यिकाने स्वतःला आंबेडकरवादी म्हणलेले दिसत नाही. ''आंबेडकरवाद हा बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्यक्ष आंदोलने आणि त्यांची ग्रंथसंपदा यामधून विकसित झालेली विचारप्रणाली, तत्त्वप्रणाली आहे.''[२१०] डॉ. आंबेडकरांचे शेवटचे आंदोलन म्हणजे धर्मांतराचे आंदोलन आहे. इ.स. १९५६ साली धम्मदीक्षा घेतल्यानंतर पूर्वाश्रमींचे अस्पृश्य अथवा दलित ज्यांनी धर्मांतर केले ते सर्व बौद्ध झाले. या बौद्ध झालेल्या साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले ते दलित साहित्य कसे ? असा विचार इ.स. १९६०-६१ पासून उमटू लागला. टी. पी. अडसूळ, विजय सोनवणे, राजा ढाले इ. साहितिकांनी दलित या शब्दाला विरोध केला. दलित साहित्याऐवजी बौद्ध साहित्य हा पर्याय पुढे आला. परंतु त्यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून मग साहित्यिक राजा ढाले यांनी 'आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य'[२११] हा पर्याय सुचविला. मात्र आंबेडकरवादी साहित्य याला चांगला प्रतिसाद मिळाला आणि आंबेडकरवादी साहित्य ही संज्ञा पुढे आली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि नीती यावर आधारित, धर्मनिरपेक्षतावाद, इहवाद, विज्ञाननिष्ठा, विवेकनिष्ठा, आणि मानवतावाद हाच

फुले-आंबेडकरवाद आहे.''[२१२] असे साहित्यक्षेत्रात महत्त्वाचे परिवर्तन धर्मांतराच्या प्रभावामुळे झालेले दिसून येते.

अशा प्रकारे इ.स. १९५० नंतरचा दलित साहित्यापासून इ.स. १९९१ पर्यंतच्या आंबेडकरवादी साहित्यापर्यंत आंबेडकरी साहित्यात जी वाटचाल झाली, ती प्रामुख्याने डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे झालेली आहे. दलित हा शब्द 'हरिजन' या शब्दासारखा आता कालबाह्य होत आहे.

इ.स. १९५६ नंतर दलित साहित्य संकल्पनेमध्ये स्थित्यंतरे होत गेली. २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात 'आंबेडकरवादी बौद्ध धम्म' ही संज्ञा मोठ्या प्रमाणात प्रचलित होऊ लागली आहे. बौद्ध संस्कृतीचे पुनरुज्जीवन हे आंबेडकरवादी बौद्ध साहित्याचे प्रमुख ध्येय, उद्दिष्ट आहे. आंबेडकरवादी बौद्ध धम्म, बौद्ध साहित्य इत्यादी संकल्पनांचा विचार नवबौद्ध करताना दिसतात.

थोडक्यात इ.स. १९६० नंतर धर्मांतर करूनही दलित आयडेंटिटी जोमाने पुढे आली आणि इ.स. १९५६-६० मधील बौद्ध आयडेंटीटी मागे पडली. दलित समाज, दलित चळवळ, दलित साहित्य, दलित पँथर या संकल्पना निर्माण झाल्या. इ.स. १९९० नंतर पुन्हा बौद्ध साहित्य संकल्पना आंबेडकरवादी संकल्पनेच्या स्वरूपात आली, आणि बौद्ध समाज, बौद्ध चळवळ, बौद्ध साहित्य, बौद्ध धम्म या संकल्पना पुढे आल्या. आंबेडकरी साहित्य हेच बौद्ध साहित्य असून ''आंबेडकरवादी साहित्य आणि बौद्ध साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.''[२१३] हा विचार पुढे येऊन साहित्यनिर्मिती होऊ लागली. ''थोडक्यात, ऐतिहासिक धर्मांतर सोहळ्याशिवाय आणि प्रामुख्याने बौद्ध धम्माशिवाय आंबेउकरवादाची व्याख्याच अपुरी आहे. आणि आंबेडकरवादाचा प्रचार-प्रसार म्हणजेच धम्माचा प्रसार प्रचार होय.''[२१४]

**आंबेडकरवादी साहित्यिक :**

यामध्ये जेष्ठ साहित्यिक भाऊसाहेब अडसूळ, विजय सोनावणे, आप्पासाहेब रणपिसे, विश्वासराव भोसले, भदंत आनंद थेरो, भदंत अंगलीमाल, डॉ. प्रभाकर गणवीर, प्रा. डॉ. नरवडे, डॉ. डोंगरगावकर, प्रा. आनंद जावडेकर, मा. रा. मोरे, वसंत धावारे, डॉ. प्रकाश खरात, एस. डी. भवर, प्रा. औचरमल, सुशीला खाडे, अरुणा सोनावणे, प्रा. आशालता कांबळे, अरविंद सुरवाडे, बुद्धप्रिय म्हस्के, व्ही. बी. तायडे, नारायण सोनकांबळे, इत्यादी साहित्यिक नव्या उमेदीने लिहित

आहेत. दलित साहित्यिकांना बौद्ध साहित्याच्या संदर्भात अनुत्तरणीय जे प्रश्न राहिले आहेत त्यांची पूर्तता करत आहेत.''[२१५]

बौद्ध साहित्यात महत्त्वाचे योगदान असणारी संस्था म्हणजे अस्मिता ललित कला केंद्र ही होय. इ.स. १९७९ मध्ये या संस्थेची स्थापना सुनील सोनावणे आणि नारायण सोनकांबळे यांनी केली. पुढे ''इ.स. १९८१ मध्ये संस्थेचे नावव अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्यिक चळवळ असे ठेवण्यात आले.''[२१६] या संस्थेने अनेक अधिवेशने, चर्चासत्रे, कविसंमेलने, नृत्य-कला प्रदर्शन, एकांकिका प्रयोग, साहित्यिक व्याख्याने, इ. विविध कार्यक्रम केले आहेत. संस्थेचे युगंधर नावाचे अनियतकालिक असून बौद्ध साहित्य प्रकाशनाचे कार्य ही संस्था करते आहे. नवबौद्धांना साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून दिलेले आहे. सुनील सोनावणे यांचे या संदर्भातील कार्य उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात पाली वाङ्मयाला वाहिलेली महत्त्वाची संस्था म्हणजे मुंबईतील पाली पाठ संस्था ही होय. दि. १०/४/१९७१ मध्ये मुंबईत स्थापन झालेल्या या संस्थेची मुख्य उद्दिष्टे म्हणजे, पालीभाषा परिचय व अध्ययन याचे दर रविवारी वर्ग चालविणे, पाली वाङ्मयावर संशोधन करणे, पाली ग्रंथाचे मराठीत भाषांतर करणे, पाली भाषेचा इतर भाषांवरील प्रभावाचे संशोधन करणे, पाली मराठी शब्दकोश करणे, संस्कार केंद्र चालविणे, पाली अंकलिपी प्रसिद्ध करणे, पाली भाषेचा इतिहास लोकांसमोर आणणे, अधिवेशणे भरविणे इत्यादी. संस्थेचे 'बुद्धवस' हे त्रैमासिक असून धम्मप्रसाराचे व प्रचाराचे काम संस्था करत आहे.

**आंबेडकरवादी कला :**

आंबेडकरी कलावंतानी लोककला, तमाशा, नाटक, पथनाट्य जलसा इत्यादींच्या स्वरूपात कलेचा आविष्कार करून आंबेडकरी चळवळ सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचविली. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतील महत्त्वाचे माध्यम म्हणजे मौखिक पद्धतीचे वाङ्मय होय. या काळामध्ये आंबेडकरी समाज अक्षरशून्य होता. तेव्हा मौखिक पद्धतीने आंबेडकरांचे विचार सर्वसमान्य लोकापर्यंत पोहोचविण्याची अत्यंत महत्त्वाची भूमिका या कलाकारांनी केली. यामध्ये प्रामुख्याने जलसाकार, शाहीर, भजनी मंडळी, गायक, कलापथके, कव्वाल पार्टी आणि नाटककार यांची महत्त्वाची भूमिका आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक, आणि धर्मांतर चळवळी हे या

साहित्याचे प्रमुख प्रेरणास्थान आहेत. हे सर्व साहित्याचे मनोरंजासाठीचे नसून प्रबोधन हा एकमेव उद्‌देश होता. या माध्यमातून डॉ. आंबेडकरांचे विचार खेडोपाडी, शहरांमधून, घराघरांमध्ये पोहोचविण्याचे कार्य करण्यात येत असे. लिखित साहित्य वाचण्याएवढा शिक्षित समाज त्यावेळी नव्हता. खेड्यापाड्यातून, महाराष्ट्राच्या विविध भागातून दलित समाज मुंबईमध्ये उपजीविकेसाठी येत होता. मुंबईतील मिल, गोद्या, रेल्वे इत्यादी ठिकाणी तो काम करीत होता. त्यामुळे मुंबई हे आंबेडकर चळवळीचे एक सांस्कृतिक व्यासपीठ मिळाले होते. दलित कलावंतांनी लोकप्रबोधन, लोकशिक्षण, लोकजागृती, लोकसंघटन करण्यासाठी कला हे प्रभावी माध्यम बनविले होते. या सर्व लोककलांवर धर्मांतराचा प्रभाव पडून त्यामध्ये बदल झालेला दिसतो. काही प्रातिनिधिक लोककलांचा संदर्भ येथे देण्यांत आलेला आहे.

**जलसा :**

इ.स. १९३१ ते १९५६ या काळात जलसाकारांनी आंबेडकरांचा इतिहास गीत, संगीत व नाट्याच्या स्वरूपात अक्षरबद्ध केला होता. आंबेडकरी चळवळीतील विविध आशयघन जागृती करण्याचे महान कार्य केले. ''स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या लोकशाही मूल्यव्यवस्थेत दलितांना जगता यावे यास्तव त्यांचे सम्यक उद्‌बोधन करणे हेच या जलसा चळवळीमागील प्रयोजन होते.''[२१७] मुंबईमधील अस्पृश्य समाजात वस्त्यांमध्ये प्रबोधनाचे कार्य जलसाकारांनी केले होते. इ.स. १९३१ ते १९४५ या काळात मोठ्या प्रमाणात जलसे होत असत. इ.स. १९५६ च्या सुमारास आंबेडकर जलसा कलापथकांच्या माध्यमातून बौद्ध धर्म प्रसारास चालना देण्याचे कार्य जलसांनी केले. या जलशाचे वेगवेगळे फार्स असत. विषय असत. १९५६ नंतरचा धर्मांतराचा फार्स महत्त्वाचा आहे. याशिवाय आंबेडकरी चळवळीतील वेगवेगळ्या घटनांवर फार्स असत. उदा. सत्याग्रह फार्स, शिक्षण फार्स, समता सैनिकदल फार्स, करार धर्म फार्स, इमारत फंड फार्स. धर्मांतर फार्स आणि धर्मांतरानंतर हा फार्स. यातील धर्मांतर फार्समध्ये धर्मांतराचे महत्त्व पटवून दिले जाई. तर धर्मांतरानंतर या फार्समध्ये धर्मप्रसाराचे कार्य केले जाई. याबरोबर जनजागृतीचे कार्यदेखील वेगवेगळ्या फार्समधून केले जाई. उदा. अंधश्रद्धा फार्स, कुटुंब नियोजन फार्स इत्यादी.

धर्मांतरानंतरच्या फार्समध्ये 'धम्मचक्रप्रवर्तन तू घडविलेसी भीमराया दलितांना उद्धारिले, बौद्ध धर्म स्वीकारुनिया.''[२१८] यामधून धम्माचे महत्त्व सांगण्यांत आलेले होते. धर्मांतरानंतरचा

आणखी एक महत्त्वाचा फार्स म्हणजे, बुद्धपूजा फार्स, आणि बौद्ध म्हणून नाव नोंदवा फार्स हे होय. बुद्धपूजा फार्समध्ये नवबौद्ध महिलांना बौद्धपूजेचे महत्त्व सांगितले आहे. तर बौद्ध म्हणून नाव नोंदवा या फार्समध्ये जनगणनेमध्ये आपले नाव बौद्धधर्मीय म्हणून नाव नोंदवा असा संदेश दिलेला आहे.

**जलसांचे बदलते स्वरूप :**

धर्मांतरानंतर जलशांचे आशय बदललेले दिसतात. इ.स. १९५६ अगोदर जलशांचे विषय हे आंबेडकरी चळवळीतील वेगवेगळे प्रसंग हे होते. धर्मांतरानंतर मात्र जलशांचा आशय बदलून बौद्ध धम्मप्रसाराला महत्त्व देण्यात आले.

उदा. जलसाकार अहिर आपल्या जलशामध्ये सांगतात,

*'दीक्षाविधी पाळलिस आज्ञाग्रहण करिसी बावीस प्रतिज्ञा*
*भवंतांच्या खऱ्या दिलाचा धम्म घेतला पंचशिलाचा*
*विसरलाशी खरा सांगणार भिम ज्ञानाचा झरा'* [२१९]

बौद्ध धम्मातील पंचशीलाचे महत्त्व सांगितले आहे. तर भीमराव कर्डक यांनी धम्मचक्र प्रर्वतन या फार्समधून ऐतिहासिक नोंद केली आहे. ते लिहितात,

*'धम्मचक्र प्रर्वतन तू घडविलेसी भिमराया.*
*दलितांना उद्धारिले बौद्ध धर्म स्वीकारुनिया''* इत्यादी.

धर्मांतरानंतर जलशाच्या प्रारंभी भीमवंदनाबरोबर बुद्धवंदना करण्यात येऊ लागली. मुंबई हे डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे केंद्र होते. त्यामुळे मुंबईमध्ये बरीच जलसा मंडळे होती. इ.स. १९३१ ते १९४६ या काळात मुंबईत जवळजवळ १६५ जलसा मंडळे होती.''[२२०] डिझाइल रोड नायगाव, चंदनवाडी, ताडदेव, वरळी, माजगांव, परळ, माटुंगा, कुलाबा रेतीचा धक्का, शिवडी इत्यादी ठिकाणी जलसा मंडळे होती.

**मुंबईतील महत्त्वाचे जलसाकार :**

भीमराव कर्डक हे आंबेडकरी जलशाचे संस्थापक असून १९५३ पर्यंत त्यांनी आंबेडकरी जलसे सादर केले. त्याचा धर्मांतराचा आणि महारकीचा जलसा त्यावेळी फार प्रसिद्ध होता. डॉ. आंबेडकरांनी स्वतः त्यांचा जलसा ऐकल्यानंतर असे उद्‌गार काढले की, 'माझ्या दहा सभा मिटिंगा आणि कर्डकादी मंडळींचा एक जलसा बरोबर आहे.''[२२१] भीमराव करडक यांच्यानंतर केशवराव

अहिर, रामचंद्र सोनावणे, पांडुरंग पवार, रामचंद्र अडागळे, डोळस, शिवराम गडकरी, पांडुरंग साळवे, संभाजी अडसूळ, काशिनाथ अहिर, केरू घेगडे, से. के. साळवे, आर. डी. खंडागळे, एम. के. लोखंडे सीताराम अडसूळ, अर्जुनराव गायकवाड, रामा पवार, धोंडू पवार, लक्ष्मण केदार, आणि शिंदे, इत्यादींनी महत्त्वाचे योगदान दिले.

''इ.स. १९५६ नंतर आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे जलसा आणि शाहिरांनी जोर धरला, परंतु ही चळवळ नंतर थंड झाली.''[२२२] जलशांचा आशयामध्ये सुद्धा बदल झाले. उदा. एम. के. कांबळे यांनी धर्मांतरानंतर समता प्रवर्तक जलसा मंडळ स्थापन केले.

**कलापथके :**

इ.स. १९५६ नंतर जलशांचे रूपांतर कलापथक, भीमप्रसाद मंडळे, भजनी मंडळे, गायन पार्टी यामध्ये झाले. जलसा हा लोककलेचा प्रकार जवळजवळ बदंच झाला. धर्मांतरानंतर गावोगावी या कलावंतांनी धम्मप्रचाराचे कार्य केले. बहुतेक जलसाकारांनी आपल्या जलसाचे नाव बदलून घेतले व कलापथक असे म्हणू लागले. मुंबईतील काही कलापथककारांची नावे म्हणजे पांडुरंग वनमाळी, पी. आत्माराम, दीनबंधू गुरुजी. दीनबंधू गुरुजींनी इ.स. १९६० मध्ये धर्मांतरावर आधारित 'अशोक विजय' या हिंदी नाटकाचे मराठीत रूपांतर केले होते. तसेच 'संघमित्र' हे नाटक प्रसिद्ध केले होते.

''इ.स. १९५६ नंतर गावोगावी, वाड्यावाड्यातून कलापथके, गायक पार्ट्या उभ्या करण्याचे व गीत संगीताच्या माध्यमातून बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन भन्ते, बौद्ध भिक्खू करू लागले.''[२२३] इ.स. १९५० नंतर आंबेडकरी शाहिरांनी गायन पार्ट्या काढल्या. या गायन पार्ट्यांमधून भीमकीर्ती, बौद्ध तत्त्वज्ञान, बाबासाहेबांचे चरित्र गायले जाऊ लागले, गायन पार्टीचे प्रणेते म्हणजे वामनदादा कर्डक यांची भीमगीते आणि बुद्धगीते गावोगावी गायली जात. त्यांचे प्रसिद्ध भीमगीत म्हणजे,

*''उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जनमामुळे ।*
*झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे ।*
*बुद्धाकडे जनता वळे, भीमा तुझ्या जन्मामुळे''* [२२४]

दुसऱ्या एका गीतात ते म्हणतात, 'हिंदू धर्माची फेकून द्या कांबळी. घ्या बुद्धाच्या समतेची शाल निळी.''[२२५]

आणखी काही महत्त्वाचे गीतकार म्हणजे, राम मोरे - 'जीवनाच्या मंदिरी बांधा पूजा समतेची, अनुसरा शिकवण बुद्धाची', गणपत शिंदे - 'बुद्धाच्या चरणावरती विजयादशमी दिनी दीक्षा आम्हा दिली भीमाने, मंगल दिन हो जनी', गणपत शिंदे 'कणाकणांनी ज्ञान वेचून प्रबुद्ध हो मानवा' इत्यादी. या गायकांची गाणी घरोघरी पोहचविण्याचे कार्य प्रल्हाद शिंदे यांनी केले.''[२२६]

गायन पार्टीप्रमाणेच भीम प्रासादिक भजनी मंडळींनीही आंबेडकरी चळवळीत महत्त्वाचे योगदान केले होते. मुंबईमध्ये फुलाली बुवा, साटमबुवा, इ. पारंपारिक पद्धतीची भजनी मंडळे प्रसिद्ध होती. यामध्ये डिझाइल प्रासादिक भीम मंडळ प्रसिद्ध होते. शिवाय कीर्तनकारही थोड्या प्रमाणात होते. इ.स. १९६० नंतर कलापथक, गायनपार्टी या सर्वाचे स्वरूप बदलून कव्वाल पार्टी आल्या. मुंबईमधे नारायण जगताप यांची कव्वाल पार्टी होती. धर्मांतरानंतर या सर्व कला हळूहळू कमी होत गेल्या. 'आजकाल जयंतीगीत, महापरिनिर्वाणगीत, बुद्धगीते, भीमगीते, कव्वालीच्या ऑडिओ-व्हिडीओ कॅसेट निघाल्या आहेत. त्यामुळे लोककला हळूहळू मागे पडत आहेत. असे असले तरी या लोककलांचे महत्त्व कमी होत नाही. कारण ज्या वेळी धम्म चळवळ चालविण्यासाठी भिक्खू संघ आणि भिक्खू नव्हते, प्रशिक्षित उपासक नव्हते, त्या काळात बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन हे शाहीर गायक आणि भजनी मंडळी बुद्ध विचाराची, धम्माची रुजवन गावोगावच्या नवबौद्ध समाजात आपापल्यापरीने पोहोचवित होते.''[२२७] बुद्ध धम्म चळवळीच्या पायाभरणीच्या कार्यामध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यावरच आजचा बौद्ध समाज उभा आहे.

**दलित रंगभूमीतील स्थित्यंतरे :**

ज्याप्रमाणे आंबेडकरी जलशांनी डॉ. आंबेडकरांचे विचार खेड्यापाड्यात पोहोचविण्याचे कार्य केले, त्याप्रमाणे रंगभूमी, पथनाट्य, चावडी नाटकांनी हे कार्य केले. दलित रंगभूमीची स्थापना इ.स. ३१ डिसेंबर १९८९ रोजी पुणे येथे शिवले या ठिकाणी झाली. त्याअगोदर पुण्यामध्येच दलित नाट्य अकादमीची स्थापना झाली होती. 'पुणे अखिल भारतीय दलित नाट्य परिषदे'ची स्थापना इ.स. १९८४ मध्ये करण्यात आली.''[२२८] नंतर अखिल भारतीय नाट्य परिषद आणि दलित रंगभूमीऐवजी अखिल भारतीय बोधी नाट्य परिषद आणि बोधी रंगभूमीची संकल्पना पुढे आली.''[२२९] आणि २००३ मध्ये दलित नाट्य परिषदेचे मुंबई अधिवेशनात अखिल भारतीय बोध नाट्य परिषद व बोधी रंगभूमी असे नामकरण झाले.[२३०]

**नाटकांचा सुवर्ण काळ :**

इ.स. १९८० ते १९९० या काळात जवळजवळ १०० नाटके निघाली. त्यामुळे हा कालखंड नाटकांचा सुवर्णकाळ समजला जातो. इ.स. १९६० ते इ.स. १९८० या दोन दशकांमध्ये जी थोडीफार नाटके झाली ती आंबेडकरी विचारांची नव्हती. इ.स. १९४४ मध्ये आंबेडकरी विचारांचे पहिले नाटक 'युग यात्रा' म. भि. चिटणीस यांनी लिहिले. या नाटकाचा प्रयोग धर्मांतराच्या दिवशी नागपूर दीक्षाभूमीवर झाला होता. स्वतः डॉ. आंबेडकरांच्या उपस्थितीत सात लाख लोकांसमोर हा प्रयोग झाला होता. त्यानंतर आंबेडकरी विचारांचे नाटक येण्यास इ.स. १९८० चे वर्ष लागले. या काळातील नाटकांमध्ये धर्मांतराचा स्पष्ट प्रभाव असल्याचा दिसून येतो. उदा. इ.स. १९७८ मधील भि. शि. शिंदे यांचे 'भिक्षुणी वासवदत्ता', इ.स. १९७९ चे प्रकाश त्रिभुवन यांचे 'आम्रपाली', इ.स. १९८० मधील टेक्सास गायकवाड यांचे 'प्रबुद्ध जलसे', प्रेमानंद गजवी यांचे 'घोटभर पाणी', रामनाथ चव्हाण, संजय जिवने यांचे 'सिद्धार्थ गौतम', जॉनी मेश्राम यांचे 'बुद्धम् शरणम् गच्छामि', मा. शा. कांरडे यांचे 'जयबौद्ध', मोरेश्वर तांबे यांचे 'महाराची सून', इत्यादी. थोडक्यात ''इ.स. १९७८ पासून आंबेडकरांच्या संकल्पनेत बसणारी नाटके होऊ लागली.''[२३१]

जुन्या पिढीतील नाटककार म्हणजे किसन फागुजी बनसोडे, हरिभाऊ तोरणे, भीमराव कर्डक, केरुबुवा गायकवाड, दीनबंधू शेगांवकर, प्रभाकर इपाटे, नामदेव व्हटकर, तसेच हेगडे अडागळे, इत्यादी होत.

नाटककार प्रेमचंद गजवी यांनी बोधी रंगभूमीच्या माध्यमातून धम्मज्ञान लोकांपर्यंत पोचविले. धम्मदीक्षा सुवर्णमहोत्सवी वर्षात भगवान हिरे यांनी जाणीवपूर्वक 'साधू' नावाचे नाटक निर्माण करून धम्मप्रसाराचे कार्य केले. सि. टी. देवकर यांनी 'वादळातील नौका' या दोन अंकी नाटकाच्या माध्यमातून प्रबोधन केले. बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रचार कार्यामध्ये उर्मिला पवार, प्रगती नाईक यांचे 'स्वयंसिद्ध', उषा परक यांचे 'सारेगाव', प्रज्ञा राणे यांचे 'प्रगतीचे पाऊल', कमल अडकीणे लिखित 'स्त्री', प्रज्ञा लोखंडे यांचे 'खैरलांजी एक धांदात सत्य' इत्यादी.''[२३२] महिलांनी नाटकाच्या माध्यमातून जागृतीचे कार्य केले आहे. बौद्ध नाट्य परिषद मुंबई या संस्थेने बौद्ध नाटकाला नवीन स्वरूप दिले. सम्यक थिएटरनेसुद्धा मोलाचे कार्य केले. प्रेमचंद गज्वी, डॉ. राजीव नाईक, जयंत पवार, उर्मिला पवार अरविंद मोघे, वामन तावडे इत्यादी अनेक लेखकांनी महत्त्वाची भूमिका बजाविली आहे.

धर्मांतराच्या महोत्सवी वर्षाच्या दशकात आंबेडकरी संस्कृती चळवळीत महानाट्यांचे आगमन झाले. प्रा. सुनील रामटेके यांचे 'महासूर्य', संजय जिवने यांचे 'धम्मपद' आणि शैलेंद्र कृष्ण बागडे यांच 'तथागत' ही तीन महानाट्ये प्रयोगात आहेत.''[२३३] नाट्यसंस्थांमध्ये बोधिनाट्य परिषद, बुद्धिस्ट आर्ट अकॅडमी सम्यक थिएटर इत्यादींचे महत्त्वाचे योगदान आहे. बौद्ध नाट्य क्षेत्रात मुंबईचे दीनबंधू शेगावकर, प्रेमानंद गज्वी, प्रा. दत्ता भगत, भि. शि. शिंदे यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

बौद्ध नाट्य परिषदने मुंबई नाट्याला नवीन स्वरूप दिले. बोधि नाट्य परिषदेनी सादर केलेली महत्त्वाची नाटके म्हणजे 'सिद्धांर्थ तांबे यांचे जात नाही जात', महेंद्र सुळे यांचे कु. सौ. कांबळे', प्रेमानंद गज्वी यांचे 'काळोखाची लेक', अरुण मिरजकर यांचे 'निब्बाण', दत्ता भगत यांचे 'गोष्ट गोधराजाची', भि. शि. शिंदे यांचे 'मिलिंद पन्ह', गौतम निकाळजेंचे 'खेळ', आंबादास कांबळे यांचे 'गाव हरविलेली माणसे', अशोक हेडोरे यांचे 'उत्खनन', डॉ. राजीव नाईक यांचे 'जनक आणि भगवान', हिरे यांचे 'साधू', इत्यादी नाटके महत्त्वाची आहेत.''[२३४]

**धर्मांतरानंतर मुंबईतील नियतकालिकांचे बदलते स्वरूप :**

इ.स. १९५० ते इ.स. १९९२ या कालखंडात जे दलित साहित्य निर्माण झाले, त्यांचे प्रमुख कारण म्हणजे नियतकालिके होय. यामध्ये साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, वार्षिक, इत्यादींचा समावेश होतो. मराठीतले पाहिले नियतकालिक 'दर्पण' हे इ.स. १८३२ साली सुरू झाले. तर दलितांचे पहिले नियतकालिक इ.स. १९०८ मध्ये उदयास आले. ते म्हणजे शिवराम जानबा कांबळे यांचे 'सोमवंशीय मित्र' हे मासिक होय. मुंबईमध्ये इ.स. १९२० पासून दलितांच्या नियतकालिकांची सुरुवात झाली. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' या पाक्षिकाने ती सुरुवात केली.

**नियतकालिकांचे महत्त्व आणि त्यांनी बजावलेली भूमिका :**

नियतकालिके, डॉ.आंबेडकरांनी सुरू केलेल्या समतेच्या संग्रामाची, चळवळीचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे साधन होते. नियतकालिकांमधून कथा, कांदंबरी, कविता इत्यादींमधून जनजागृतीचे कार्य केले जात असे. अनिष्ट रूढी-परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा दूर करून हळूहळू नवीन बदल करण्याची भूमिका पार पाडली. दलित समाजात सामाजिक, आर्थिक राजकीय, धार्मिक

समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले. या नियतकालिकांमधून वैचारिक क्रांती सुरू होऊन त्यातून धडाडीचे विचारवंत, लेखक साहित्यिक निर्माण झाले. उदा. व. ना. वानखेडे, म. भि. चिटणीस, शंकरराव खरात, आर. डी. भंडारी, बी. सी. कांबळे, नामदेव व्हअक्र इत्यादींनी वैचारिक लेखन केले. या नियतकालिकामुळे ललित वाङ्मयात भर पडली. निबेध, कविता, कथा व कादंबरी यांमधून जनजागृतीचे कार्य नियतकालिकांमधून होऊ लागले.

**दलितांची नियतकालिके :**

इ.स. १९०८ ते इ.स. १९५० पर्यंत सुमारे पंचवीस नियतकालिके होती. इ.स. १९५० ते १९८५ पर्यंत ही नियतकालिकांची संख्या सुमारे शंभरपर्यंत गेली. अर्थात हा डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेचा प्रभाव होता. इ.स. १९५६ अगोदर त्यांचा प्रेरणेचा प्रभाव होता, तर १९५६ नंतर त्यांच्या धर्मांतर चळवळीचा प्रभाव होता. डॉ. आंबेडकरांचा प्रभाव असणारी मुंबईतील नियतकालिकांचाच फक्त येथे उल्लेख करण्यात आलेला आहे.

**मुंबईतील नियतकालिके (इ.स. १९२० ते इ.स. १९५६) :**

| | | | |
|---|---|---|---|
| १९२० | मूकनायक | पाक्षिक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| १९२४ | आत्मोद्धार | मासिक | म.अ. कांबळे |
| १९२४ | अस्पृश्यता निवारण | साप्ताहिक | दा.ना. पटवर्धन |
| १९२७ | बहिष्कृत भारत | पाक्षिक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| १९३० | जनता | साप्ताहिक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| १९४९ | सिद्धार्थ | पाक्षिक | चंद्रकांत गायकवाड |
| १९५० | निर्धार | साप्ताहिक | आर.डी. भंडारी |
| १९५१ | नजर | नियतकालिक | नामदेव व्हटकर |
| १९५५ | भिमगर्जना | | अडसूळ/रणपिसे |
| १९५६ | प्रबुद्ध भारत | | यशवंत आंबेडकर, जनता ऐवजी''[२३५] |

**धर्मांतरानंतरची मुंबईतील नियतकालिके :**

मुंबई आणि तिच्या उपनगरातील नियतकालिकांच्या तुलनेत बौद्धाची नियतकालिके हाताच्या बोटावर मोजण्याएवढीसुद्धा नाहीत. 'मुंबईमध्ये एकूण, दैनिके-७७४, साप्ताहिके-९४, पाक्षिक- ५६,

मासिके-४२०, त्रैमासिके-१७१, आणि वार्षिक-५३ एवढी नियतकालिके निघतात. मुंबई उपनगरामध्ये एकूण दैनिके ४८, साप्ताहिके-१२६, पाक्षिक-५७, मासिके-१०३, त्रैमासिके-२५, आणि वार्षिक-२८.''[२३६] एवढ्या मोठ्या प्रमाणात बौद्धेत्तरांची नियतकालिके निघतात. मुंबईतील धम्मप्रसार करणारी नियतकालिके, मुंबईमध्ये प्रसिद्ध होणारे दि व्हीजन इंडिया हे एक त्रैमासिक धम्मप्रचाराचे कार्य करीत आहे. इ.स. १९९८ मध्ये या मासिकाची निर्मिती झाली असून याचे संपादक डॉ. अमिताभ हे आहेत. मुंबईतील आणखी एक महत्त्वाचे मासिके म्हणजे 'सद्धम्म पत्रिका' होय. इ.स. १९९९ मध्ये या मासिकाची निर्मिती झाली असून प्रा. आनंद देवडेकर हे या मासिकाचे संपादक आहेत. या मासिकाच्या माध्यमातून बौद्ध धम्माच्या इतिहासाची चिकित्सक, सूत्रबद्ध शिस्तबद्ध माहिती उपलब्ध होते. यामधील वैचारिक लेखनाच्या माध्यमातून धम्मप्रसाराचे कार्य हे मासिक करीत आहे.

धर्मांतरानंतरचे अत्यंत महत्त्वाचे मासिक म्हणजे 'धम्मयान' हे होय. भारतीय बौद्ध महासभा या मासिकाचे प्रकाशन करते. याशिवाय मैत्रेय संघ मासिक, झेप शब्दक्रांती पाक्षिक ही मासिके धम्मप्रसाराचे कार्य करीत आहेत.

या सर्व नियतकालिकांची मुख्य प्रेरणा डॉ. आंबेडकर आहेत. इ.स. १९५६ नंतरच्या नियतकालिकांचे स्वरूप, उद्देश, आणि कार्य धर्मांतरामुळे बदलत आहे. इ.स. १९५६ या अगोदरचा नियतकालिकांमध्ये 'दलितांना स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व मिळवून द्यावे या उद्देशाने उदयास आलेली होती. हे ध्येय प्राप्त करण्यासाठी वैचारिक, ललित आणि संकिर्ण अशा तीन प्रकारच्या लेखनाचा आश्रय घेऊन प्रकाशित होत होती.''[२३७] हेच कार्य १९५६ नंतरही नियतकालिके करीत आहेत. बाबासाहेबांच्या मूकनायक पाक्षिकाने दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडली. त्यांच्या बहिष्कृत भारताने धर्मांतराच्या पूर्वीची पार्श्वभूमी निर्माण केली तर समनाने समाजात समतावादाच्या विरोधात असल्याचा विरुद्ध अग्रलेख विहीर्य जनतामधून 'धर्मांतराशिवाय तरणोपाय नाही' हे विचार प्रसिद्ध केले होते.

धर्मांतरानंतर नवबौद्धांची नियतकालिके/अनियतकालिके आजही महत्त्वाची कामगिरी बजावत आहेत. त्यांनी केलेले वाङ्मयीन कार्य हा शोधप्रबंधाचा विषय नाही. प्रस्तुत ग्रंथात विषयानुरुप धर्मांतराच्या नंतरचा नियतकालिकांचा फक्त प्रातिनिधिक उल्लेख केला आहे.

नियतकालिकांप्रमाणेच वृत्तपत्र यांचीही महत्त्वाची भूमिका आहे. मुंबईला १९ व्या शतकापासूनचा वृत्तपत्रांचा इतिहास आहे. बॉम्बे हेरॉल्ड हे मुंबईतील पहिले वृत्तपत्र इ.स. १९७९ मध्ये निघाले होते.''[२३८] वृत्तपत्राचे महत्त्व सांगताना बाबासाहेब म्हणतात, ''आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास, तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग, त्यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी दुसरी भूमी नाही.''[२३९] बाबासाहेबांना राजकीय पत्रकारिता आणि सामाजिक पत्रकारिता अभिप्रेत होती. ''त्यांच्या जोडीस समाज बदलण्यास आणि नवसमाजनिर्मितीस हातभार लावण्यास पत्रकारिता ही महत्त्वाची वाटत होती.''[२४०]

वृत्तपत्रांचे हे महत्त्व आळखून धर्मांतरांतर डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी वृत्तपत्रे निर्माण केली. यामध्ये मुंबईतील महत्त्वाचे वृत्तपत्र म्हणजे 'दैनिक सम्राट' होय. दि. ५ एप्रिल २००३ मध्ये या वृत्तपत्राची स्थापना झाली. या वृत्तपत्राचे संपादक बबन कांबळे हे असून त्यांचे वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य बघून मुंबईमधील संकल्प वेलफेअर ट्रस्टतर्फे 'शिवगौरव पुरस्कार' २००८ मध्ये देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला.''[२४१] दै. सम्राटच्या माध्यमातून बौद्धांना हक्काचे वर्तमानपत्र मिळाले आहे. आंबेडकरी चळवळीत मुखपत्र मिळाले आहे.''[२४२] बौद्ध समाजाला एकसंघ करण्याचे कार्य हे वृत्तपत्र करत आहेत. 'दर रविवारी बुद्ध विहारात जा' हे आवाहन करून सांस्कृतिक ऐक्याबरोबर वैचारिक परिवर्तनाचे कार्य करीत आहे. याशिवाय बौद्ध धर्म, बौद्ध साहित्य, बौद्ध वाङ्मय आणि बौद्ध तत्त्वज्ञान यांचा प्रसार करण्याचे कार्य हे वृत्तपत्र करत आहे. 'सम्राट वर्तमानपत्र सुरू झाले आणि आंबेडकरी चळवळीमध्ये पुन्हा एकदा चैतन्य निर्माण झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आंबेडकरी अनुयायी एक नवा उपक्रम आखला.''[२४३] तसेच नितिन मोरे यांच्या 'महानायक' दैनिकांमधून धम्माचे कार्य चालू आहे.

१९५० ते १९८५ या काळात दलिताची सुमारे शंभर नियतकालिके निघाली. त्यांच्या नावरून धर्मांतराच्या प्रभावाची आपल्याला कल्पना येते. उदा. जातक, धर्मदीप, धर्मयान, धर्मदूत, बोधीसत्व, बौद्ध भारत, सिद्धार्थ, संबोधि, पंचशील, पज्ञानंद, प्रमेय, प्रज्ञा, प्रबुद्ध, भारत, समता''[२४४] इत्यादी प्रातिनिधिक उदाहरणे दिलेली आहेत. पूर्वीची नियतकालिके आंबेडकरांचे विचार पसरविण्याचे कार्य करत होते. धर्मांतरानंतर या नियतकालिकांची भूमिका बदलली. धम्मज्ञान, धम्मप्रसार, धम्मप्रचारासे कार्य या नियत-अनियतकालिकांमधून चाललेले आहे.

'आम्ही मैतरिणी' - यशोधरा महिला मंडळ, बांद्रा या महिला मंडळाच्या अध्यक्षा मीनाक्षी मून यांनी चालविलेले हे मासिक असून धम्मप्रसाराचे कार्य या मासिकाद्वारे चाललेले आहे. मीनाक्षी मून म्हणतात " I spread Buddhism through our trimestrial magazine Ambi Maitrani.''[२४५]

धम्म प्रसार-प्रचारासाठी प्रसारमाध्यमे अत्यंत आवश्यक आहेत. ही प्रसारमाध्यमे तीन प्रकारांत आहेत.

१) Vocal मौखिक - प्रवचने, सत्संग इत्यादी

२) Print media - वर्तमानपत्र, नियतकालिका वैगेरे

३) Electronic media - टी.व्ही.सारखे इलेक्ट्रॉनिक माध्यम.

वरील तीनही मीडिया आपल्या हातात नाहीत.

मुंबईसारख्या महानगरात फक्त तीन दैनिके निघतात.

१) सम्राट - संपादक बबन कांबळे

२) विश्वसम्राट - नितिन मोरे

३) महानायक - सुनीता खोब्रागडे

● **धर्मांतराचा स्थापत्य आणि कला क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

धर्मांतराचा ठळक प्रभाव पडणारे आणखीन एक क्षेत्र म्हणजे स्थापत्य आणि कला हे होय. धर्मांतरानंतर बौद्ध स्थापत्यात विहार या वास्तुकलेची सातत्याने वाढ झालेली दिसते. या ठिकाणी फक्त विषयाची मर्यादा लक्षात घेऊन मुंबईतील विहारांवर व चैत्य विहारांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. मागील अडीचशे/तीनशे वर्षांमध्ये मुंबई शहरांत वेगवेगळ्या धर्माचे लोक येऊन स्थायिक झाले. त्या सर्वांनी आपापली उपासना स्थाने मुंबईत बांधली. ''जगातील बहुते सर्व पंथांच्या उपासना वास्तू असलेले मुंबई देशातील एकमेव महानगर आहे. या ठिकाणी बौद्ध, जैन, हिंदू, शीख, झुलेलाल भक्ती, मुस्लीम, ख्रिश्चन, यहुदी, पारशी, दाऊशी, बोहरा, स्वामीनारायण, रामकृष्ण मिशन, हरे रामकृष्ण संप्रदाय, आर्यसमाज इत्यादी नाना धर्म-पंथांची प्रार्थनास्थळे आहे.''[२४६]

डॉ. आंबेडकरांनी १९५६ साली बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांच्या लाखो अनुयायांनी देखील बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि आपली प्रार्थना स्थळे निर्माण केली. मुंबईमध्ये ज्या ज्या

ठिकाणी नवबौद्धांच्या वस्त्या आहेत, तेथे तेथे बौद्ध विहारे बांधण्यात आली. त्यामुळे बौद्ध विहार संस्कृतीची सुरुवात होऊन खऱ्या अर्थाने बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनास सुरवात झाली. वास्तविक पाहता प्राचीन काळापासून मुंबईला बौद्ध संस्कृतीचा, बौद्ध स्थापत्याचा मोठा इतिहास आहे. परंतु ११ व्या शतकात मुंबई परिसरातील लेण्यांचे खोदकाम बंद झालेले दिसले. नंतर ब्रिटिश कालखंडात मुंबईमध्ये पुन्हा बौद्ध उपासनेचा वास्तू विहारांच्या स्वरूपात निर्माण झाल्या होत्या. त्यातील महत्त्वाच्या उपासना वास्तुंचा संदर्भ देणे महत्त्वाचे आहे. कारण या उपासना वास्तुंना ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व आहे.

**इ.स. १९५६ पूर्वीची मुंबईतील चैत्य-विहारे :**

१) कवांगकुग बौद्ध मंदिर - माझगाव : ''हे बौद्ध मंदिर अठराव्या शतकातील असून या काळात चिनी लोक मुंबईत आले होते. त्यातील बरेच चिनी लोक मासगाव येथे राहात होते. त्यांनी या भागात हे मंदिर बांधले होते. हे मंदिर म्हणजे मुंबईतील चिनी लोकांची परंपरा व संस्कृती यांचे प्रतीक आहे. या प्रकारचे मंदिर भारतात इतरत्र कोठेच आढळत नाही. अपवाद म्हणून फक्त कोलकत्त्यात अशा प्रकारचे मंदिर आढळते.''[२४७]

२) निपॉनझान म्योहोजी बौद्ध मंदिर - वरळी : जपानी बौद्ध संप्रदायाचे भिक्खू निचित्ये फूजी बौद्ध धर्माच्या जन्मस्थानाला भेद देण्याकरिता इ.स. १९३५ साली भारतात आले होते. ते महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वाने भारावून गेले होते. ते गांधीजींबरोबर साबरमती आश्रमात एक वर्षभर राहिले होते. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ते सतत प्रार्थना करीत असत. त्याबद्दल त्यांच्या कृतज्ञनेच्या भावनेत महात्मा गांधीजींचे सहकारी शेठ जुगल किशोर बिर्ला यांनी मुंबईत एक बौद्ध मंदिर बांधण्याची तयारी दाखविली आणि त्यासाठी वरळीची जागा देण्यांत आली. ''या ठिकाणी दुसऱ्या महायुद्धातील जपानी युद्धकैद्यांनी प्रार्थनेसाठी तात्पुरते लाकडी मंदिरे बांधलेले होते.''[२४८] सध्या हे मंदिर फुजींच्या जपानी पंथाला समर्पित करण्यांत आले आहे. इ.स. १९५६ नंतर तो विहार पक्का बांधण्यांत आला. या ठिकाणी बुद्धप्रतिमांची पूजाअर्चा केली जाते.

३) बहुजन बौद्ध विहार परळ : ''श्रीलंकेच्या बौद्ध समाजाचे भारतातील धर्मगुरू पुज्या के. आनंद महाथेरो यांनी भारतीय महाबोधी सोसायटीची स्थापना इ.स. १९३० मध्ये केली होती. प्रख्यात उद्योगपती आणि दानशूर जुगल किशोर बिर्ला यांनी या विहारासाठी अर्थसाहाय्य केले

होते.''[२४९] इ.स. १९३७ मध्ये साली या बौद्ध विहाराची स्थापना केली होती बौद्ध धर्माचे गाढे अभ्यासक आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी या कामात पुढाकार घेतला होता. हा स्तूप बौद्ध धम्माचे श्रीलंकेमध्ये आगमन झाले, त्याप्रित्यर्थ बांधला होता. बौद्ध गणनेप्रमाणे २६६ साली म्हणजे दोन हजार दोनशे पन्नास वर्षापूर्वी श्रीलंकेत बौद्ध धर्मांचे आगमन झाले होते.''[२५०] परदेशी लोकांनी बांधलेली ही सर्व बौद्ध विहारे, चैत्य प्रामुख्याने प्रार्थना व पूजाअर्चा करण्याच्या दृष्टिकोनातून बांधलेली दिसतात. जनजागृती, धम्माप्रसार-प्रसारासाठी यांची निर्मिती झालेली नव्हती.

४) आनंदविहार डॉ. नायर यांनी मुंबई सेंट्रल येथे १९३१ मध्ये या विहाराची स्थापना केली होती. त्यांनी मुंबईमध्ये बुद्धा सोसायटीची स्थापना करून ''इ.स. १९३३ मध्ये 'बुद्धप्रभा' नावाचे मासिक सुरू केले होते.''[२५१] इ.स. १९९२ साली श्रीलंकेचे के. आनंद महाथेरो यांनी आणलेल्या मूर्तीची प्रतिष्ठापना येथे करण्यांत आली होती. सध्या या विहाराचे सर्व अधिकार येथील सिद्धार्थ अपार्टमेंटकडे आहेत.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन ट्रस्ट, वरळी बुद्धविहार, चाळ, इ.स. १९५६ मध्ये आर. एन. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा बौद्ध विहार बांधण्यात आला होता. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव चव्हाण यांचे हस्ते या विहाराचे उद्घाटन झाले होते. या वेळी यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. आंबेडकरांनी बोधीवृक्षाचे रोपण केले होते.

माझगाव सारीपुत्त बुद्धविहार लवकेन : इ.स. १९५६ च्या धर्मांतरांच्या अगोदरचा हा एक महत्त्वाचा बुद्धविहार असून या ठिकाणी माता रमाबाई सांस्कृतिक केंद्राचा माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन या ठिकाणी केले जाते. धम्म प्रचार-प्रसाराबरोबर प्रबोधनाचे कार्य केले जाते. सामुदायिक प्रार्थना, वर्षावासाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीदेखील बुद्धविहारांच्या निर्मितीला प्राधान्य दिले होते. ''बुद्धविहारे धम्म चळवळीची केंद्र झाली पाहिजे म्हणून गाव तेथे बुद्धविहार''[२५२] ही संकल्पना त्यांनी मांडली होती. त्यांनी पुणे येथे देहूरोड या ठिकाणी बुद्धविहाराची स्थापना करून तेथे बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना केली होती. ''इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे नव्या धम्मजाणिवा निर्माण झाल्या. या नवदीक्षितांनी आपल्या जुन्या रूढी, परंपरा, चालीरीती, रीतीरिवाजांचा त्याग केला. पिढ्यान्पिढ्या खोलवर रुजलेल्या जुन्या संस्कारांना टाकून

दिले. आपण आता बौद्ध आहोत या जाणिवेतून त्यांच्यामध्ये बदल घडून आले. त्याचबरोबर नवीन मूल्ये, संस्कार, रीतीरिवाज हे समाजात रुजविणे गरजेचे होते. त्यासाठी धम्मसंस्कार करणाऱ्या बौद्ध संघाची आणि बौद्ध विहारांची गरज निर्माण झाली. मुंबई आणि तिच्या उपनगरामध्ये बौद्ध विहार निर्मितीची एक लाट धर्मांतरानंतर निर्माण झाली. मुंबई आणि तिच्या उपनगरांमध्ये लहान-मोठी १९५० विहारे आहेत. तसेच ४० ते ५० बौद्ध भिक्खू आहेत.''[२५३] मुंबईच्या प्रत्येक उपनगरात पिनकोड असलेल्या प्रत्येक भागात ८ ते १० बुद्धविहारे आढळतात. ''या बौद्ध विहारांमध्ये कमिटींची स्थापना केलेली असून जवळजवळ पाचशेपेक्षा जास्त कमिटी कार्यरत आहेत.''[२५४] ही सर्व बौद्ध विहारे भारतीय बौद्ध महासभा, बौद्ध पंचायत समिती, भिक्खू संघ, रिपब्लिकनपार्टी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, तसेच विविध बुद्ध विहार समितीतर्फे कार्य करतात.

**इ.स. १९५६ नंतरचे मुंबईतील पहिले चैत्यगृह :**

**प्रस्तावना :**

'भारतात आजही अस्तित्वात असलेली सर्वात प्राचीन स्मारके म्हणजे बौद्ध कोरीव लेणी ही आहेत.''[२५५] या लेण्यांची निर्मिती भगवान गौमत बुद्ध आणि भिक्षूसंघ यांना वर्षावासात असताना वस्ती करण्यासाठी निर्माण करण्यात आली होती. गावाच्या बाहेर डोंगर-टेकड्यांवर शांत ठिकाणी या लेण्या खोदलेल्या आहेत. या लेण्यामध्ये भिक्खूंना राहण्यासाठी विहार असे, तसेच पूजाअर्चा करण्यासाठी उपासनेसाठी प्रार्थनागृह म्हणजे चैत्य असे. चैत्य म्हणजे केंद्रस्थानी स्तूप असलेले प्रार्थना मंदिर होय.''[२५६] चैत्यगृहे ही पूज्य वस्तुच्या (अवशेष) उपासनेसाठी निर्माण झालेल्या बांधिव स्तूप मंदिराची प्रतिकृती आहेत. तर त्यांच्या सभोवतालच्या भिक्खूंना वास्तव्यासाठी असण्याचा छोट्या कुटिरांची विहार हे प्रतीक आहे.''[२५७] प्राचीन काळातील मुंबईमधील महत्त्वाची चैत्यविहारे म्हणजे कोंडिवटे आणि महाकाली ही आहेत. तर इ.स. १९५६ नंतरचे मुंबईतील पहिले चैत्यगृह म्हणजे दादर चैत्यभूमी हे आहे.

**चैत्यभूमी :**

दादर चैत्यभूमीनिर्मितीअगोदर मुंबईमध्ये जी चैत्यगृहे बांधली होती, ती प्रामुख्याने चीन, श्रीलंका आणि जपानी या बौद्धधर्मियांनी बांधलेली होती. उदा. माझगाव, परळ आणि वरळी. दादर चैत्यभूमी ही आधुनिक बौद्ध स्थापत्याचा एक वेळा आविष्कार आहे. या ठिकाणी बौद्ध स्थापत्याची

जी चार प्रमुख वैशिष्ट्ये आहेत, त्या सर्वांचा एकाच ठिकाणी मिलाफ झालेला दिसतो. तो म्हणजे चैत्य, विहार, स्तूप आणि स्तंभ. बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धातू अवशेषावर हा स्तूप बांधण्यात आला असून स्तुपाच्या आतील पोकळ भागात चैत्य आणि विहारे आहेत. मुंबईमध्ये नंतर जी बौद्ध विहारे निर्माण झाली ती याच धर्तीवर निर्माण झालेली आहेत. स्तुपामध्ये भगवान बुद्धांची मूर्ती तसेच बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असते. स्तूप हे बौद्धांचे उपासनेचे प्रतीक आहे. त्या दृष्टिकोनातून चैत्यभूमीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**चैत्यभूमीची निर्मिती :**

दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर दि. ७ डिसेंबर रोजी त्यांचा पार्थिक शरीरावर दादर येथे अत्यंसंस्कार करण्यात आले. ''त्याचे महापरिनिर्वाण होण्यापूर्वी अवघ्या दीड महिने अगोदर त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केलेला होता. म्हणून त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्याचा बाबासाहेबांच्या काही अनुयायांनी त्यावेळेस आक्षेप घेतला होता.''[२५८] त्यांच्या मते अत्यंसंस्कार हा शिवाजी पार्कच्या मैदानात केला जावा असे होते. परंतु तेव्हाच्या मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी मान्यता दिली नाही. त्यामुळे शेवटी अंत्यसंस्कार डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन संस्थेच्या वडाळा येथील महाविद्यालयासमोर करण्याचे ठरले व नंतर तेथे भव्य स्मारक बांधावे असेही ठरले. परंतु शेवटी बाबासाहेबांचे एक निष्ठावंत अनुयायी रावसाहेब बोले यांनी त्यांच्या ताब्यातील दादर स्मशानभूमीजवळची जागा अंत्यसंस्कार करण्यासाठी दिली. या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्याचे सर्वांचे एकमत झाले. महानगरपालिकेनेही डॉ. आंबेडकरांच्या अंतिम संस्कारासाठी वेगळी स्वतंत्र जागा मान्य केली. दि. ७ डिसेंबर १९५६ रोजी दादरच्या या नियोजित जागेत बाबासाहेबांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी दादर येथे स्वतंत्र स्मारक बांधण्यासाठी महानगरपालिकेकडे जागा मागितली होती. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे पुत्र यशवंतराव आंबेडकर हे अग्रक्रमी होते. त्यांनी महानगरपालिकेत पत्रव्यवहार करून स्मारकासाठी दादरला ४० × ४० ची जागा मागितली, पण महानगरपालिकेने त्यांना फक्त ८ × ८ एवढी जागा दिली. तेव्हा भैय्यासाहेब चिडले व मागणीपेक्षा एक इंचही जागा कमी घेणार नाही असा त्यांनी पवित्रा घेतला. याच काळात मुंबई महानगरपालिकेमध्ये सत्तापालट झाले. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार निवडून आले होते.

त्यांची नेमणूक विविध समितींवर करण्यांत आलेली होती. त्यांपैकी, पि. टी. बोराळे हे महापौरपदी विराजमान झाले. मुंबई पालिकेच्या हद्दीतील जागा देणे हे त्यावेळी इंप्रूव्हमेंट कमिटीचे काम होते. आणि एन. एम. कांबळे त्या वेळी या कमिटीचे सदस्य होते. त्यांनी ४० × ४० ची जागा मान्य केली. जागा मिळाली, पण स्मारक बांधण्याचे काम आंबेडकरी जनतेने करावयाचे होते. स्मारक बांधण्याच्या ध्येयापोटी आर.पी.आय. पुन्हा एकत्र झाली. गटाचे राजकारण विसरून सर्वांनी कार्य केले. ही जागा समता सैनिक दलाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी श्रमदानाने विकसित केली. या जागेवर स्मृतिस्मारक बांधण्यासाठी बौद्ध जनतेने रांगा लावून स्मारक निधी जमा केला होता. अखिल भारतीय बौद्ध महासभेने देखील यामध्ये महत्त्वाचे कार्य केले. या सर्वांच्या प्रयत्नाने दादरच्या चौपाटीवर स्मारक उभे राहिले. या स्मृतिस्थळाला 'चैत्यभूमी' हे प्रेरणादायी नाव सर्वसंमत होऊन देण्यात आले. १४ एप्रिल १९६६ रोजी आंबेडकरांच्या अमृतमहोत्सवी वर्षात चैत्यभूमी हे राष्ट्रीय स्मारक म्हणून उभे राहिले.

दरवर्षी दि. ६ डिसेंबर रोजी चैत्यभूमी स्मृतिस्थळाला भेट देण्यासाठी लाखो आंबेडकर अनुयायी भारताच्या कानाकोपऱ्यातून येतात व आपल्या श्रद्धास्थळाला भेट देतात आणि जाताना ज्ञानाची शिदोरी बरोबर घेऊन जातात. ५ डिसेंबर पासूनच या ठिकाणी पुस्तकांचे अनेक स्टॉल लागलेले असतात. लाखो रुपयांची उलाढाल पुस्तकविक्रीतून होते. 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पुस्तकाच्या विक्रीची विक्रमी नोंद झाली आहे. ज्ञानोपासकांची कोट्यावधी रुपयांची ग्रंथखरेदी होते. दीडशे ते दोनशे पुस्तकांचे स्टॉल इथे असतात. विविध प्रकाशांची दुकाने लावलेली असतात. उदा. सुगावा, ग्रंथाली, सुगत कौश्यल्य, संबोधी इत्यादी.

एअर इंडिया, एअर लाईन्स, भारत पेट्रोलयम, हिंदुस्थान पेट्रोलिअम, ओ.एन.जी.सी., बी.ए.आर.सी., टी.आय.एफ.आर., राष्ट्रीयकृत बॅंका, बी.पी.टी. इन्कम टॅक्स, सेल्स टॅक्स, मंत्रालय, मुंबई महानगरपालिका, आर.सी.एम., रेल्वे अशा अनेक सरकारी, निमसरकारी संघटनांच्या वतीने कर्तव्यभावनेने येथे मदत केली जाते.

भारताच्या शहरांमधून खेडेगावांतून लाखोने येणाऱ्या या जमावाचे वैशिष्ट्य म्हणजे कसल्याही प्रकारची अंधश्रद्धा अथवा कर्मकांड न करता आपल्या उद्धारकर्त्याच्या स्मृतिस्थळाला आदरांजली वाहण्यासाठी येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिधातूंचे दर्शन घेतात आणि जाताना

बरोबर एक तरी पुस्तक/ग्रंथ खरेदी करतात. शुभ्रवस्त्र परिधान केलेला, हातात पंचशीलाचा झेंडा आणि आर.पी.आय.चा झेंडा घेतलेला, छातीवर आंबेडकरांचे बेजेस लावलेला हा महासागर पाहिला की, धर्मांतराचा किती प्रचंड प्रभाव पडला आहे याची प्रचिती येते.

**इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतरची मुंबईतील बौद्ध विहारे :**

बौद्ध धम्मप्रसाराचे आणि प्रचाराचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे विहार होय. विहाराचा अर्थ वेगवेगळ्या विद्वानांनी लावलेला आहे उदा. 'एडनर्टनच्या मते विहार म्हणजे भिक्षूंचे निवासस्थान, डी. के. बारुआ यांचे मते 'भारतीयांच्या जीवनात आणि विचारधारणेत विहारांचा मोठा वाटा आहे. आचार्य प्रसन्न कुमार म्हणतात, विहार म्हणजे विनयाचे नियम पाळण्याचे ठिकाण, सुत्त निपातात विहार म्हणजे, दूरवर असलेले भिक्षूंचे वास्तव्यस्थान, भन्ते संघराक्षित म्हणतात, तीन रत्नांचे निवासस्थान म्हणजे बुद्धविहार. आचार्य बुद्धघोष म्हणतात, विहार म्हणजे संघाराम जेथे भिक्षू रातात आणि विनयाचे पालन करतात.''[२५९] इ.स. १९५६ च्या धर्मांतरानंतर जी बौद्ध विहारे निर्माण झाली ती त्यांच्या स्वरूपात मात्र बदल झालेला दिसतो. विहारांचा प्रामुख्याने उपयोग भिक्खूंच्या वास्तव्यासाठी केला जाई. परंतु १९५६ नंतर बौद्ध विहारांचे स्वरूप बदलले आणि विहारे ही बौद्ध धर्मांची संस्कार केंद्रे बनली. १९५६ नंतर या बौद्ध विहारांचे मुंबई शहर, उपनगरात सातत्याने वाढ होताना दिसते. ही विहारे बौद्ध भिक्खू संघ, त्रैलोक्य संघ, बौद्ध पंचायत समिती, अखिल भारतीय बौद्ध महासभा, इत्यादी विविध संघटनांमार्फत धम्मप्रसार-प्रचाराचे कार्य करीत आहेत.

**सर्वोदय बुद्धविहार :**

भिक्खू संघात युनायटेड बुद्धिस्ट मिशनचे सर्वोदय बुद्धविहार हे बृहन्मुंबईमध्ये धम्मप्रसाराबरोबर सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सामाजिक पुनरुत्थानाचे कार्य गेली पंचवीस वर्षे करीत आहे. या संस्थेची स्थापना इ.स. १९८३ मध्ये झालेली असून, भदंत राहूल भंदे महाथेरो या संस्थेचे संस्थापक आहेत. ते भारतीय भिक्खू संघाचे जगप्रसिद्ध भिक्खू असून त्यांनी इ.स. १९७१ मध्ये जगविख्यात महापंडित महास्थिंवीर डॉ. भदंत आनंद कौस्यायन यांचे हस्ते श्रामणेरची दीक्षा घेतली होती. तेव्हापासून सतत ४० वर्षे ते धम्मसेवा करीत आहेत. त्यांच्या अथक् प्रयत्नांचे मूर्त स्वरूप म्हणजे मुंबईतील सर्वोदय बुद्धविहार होय.

भदंत राहूल बोधी यांच्या नेतृत्वाखाली १ जुलै २००९ साली महाधम्म अभियान करण्यात आले होते. या वेळी समता बुद्धभाव धम्मरथाचे आयोजन करण्यांत येऊन हा रथ ठाणे, मुंबई, कल्याण, नवी मुंबई या ठिकाणी फिरविण्यात आला होता. त्यावेळी प्रत्येक ठिकाणच्या बौद्ध विहारांना भेटी देण्यात आल्या होत्या. बौद्ध समाजात धार्मिक शिस्त आणि शास्त्र प्रशिक्षण देण्याचे उद्‌देशाने हा कार्यक्रम राबविण्यांत आला होता.

''विहाराच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, मूकबधीर मुलांसाठी लायब्ररी आहे. सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी मोठा हॉल या ठिकाणी असून बौद्ध संस्कार करण्याचे कार्य येथे केले जाते. विपश्यना, ध्यानसाधना, संस्कार शिबिर, पाली भाषेचे वर्ग, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.''[२६०]

''भविष्यकाळात सर्वोदय विहारामार्फत सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पुनरुत्थान केंद्र निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहे. मुंबई आणि तिच्या उपनगरातील सर्व बौद्ध विहारांची केंद्रिय समिती स्थापन करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.''[२६१] या विभागात जवळपास आठशे बौद्ध विहारे आहेत. ही बौद्ध विहारे भारतीय बौद्ध महासभा, बौद्ध जनयेचायन समिती, आर.पी.आय., स्थानिक संघटना, भिक्खूसंघ, बुद्ध विहार समिती, इत्यादींद्वारे चालविली जातात. हाच उद्‌देश ठेवून भदंत राहूल बोधी यांनी दि. १८ व १९ एप्रिल २०१० रोजी बौद्ध अधिवेशन भरविले होते. मुंबईमध्ये कामगार मैदान, परेल येथे राष्ट्रपती प्रतिभाबाई पाटील यांच्या उपस्थितीत हे अधिवेशन संपन्न झाले.

बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी श्रामणेर आणि भिक्खूंच्या प्रशिक्षणाची व्यवस्था येथे केली जाते. धम्मदीक्षा देण्याचे महत्त्वाचे कार्य येथे केले जाते. ''धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी पाच श्रामणेर कोलंबोला सर्वोदय विहाराने रवाना केले होते.''[२६२] बौद्ध धम्म मार्गदर्शिका या पुस्तकाद्वारे बौद्ध संस्कार केले जातात. तसेच बौद्ध धम्मावरील अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत. ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट प्रकाशित करून धम्मसंस्कार करण्याचे कार्य संस्था करीत आहे. या विहाराच्या दुसऱ्या शाखा नाहीत. बौद्ध भिक्खूंमार्फत कार्य करणाऱ्या या विहाराचे धम्मप्रसार-प्रसार कार्यातील धर्मांतरानंतरचे योगदान उल्लेखनीय आहेत.

त्रैलोक्य बौद्ध महासंघ सहाय्यक गण मुंबई ही एक जागतिक धम्म चळवळ असून उरसेन

संघरक्षित हे या संस्थेचे संस्थापक आहेत. ''उरसेन संघरक्षित यांनी इ.स. १९४९ मध्ये कुशीनगर येथे भंते चंद्रमणी यांचे हस्ते धम्मदीक्षा घेतली होती. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर इ.स. १९५९ मधे ते महाराष्ट्रात आले आणि धम्माचे कार्य करू लागले. इ.स. १९६७ मधे लंडन येथे त्यांनी Friends of Western Buddhist Order (F.W.Bo) या संस्थेची स्थापना केली.''[२६३] ''त्रैलोक्य बौद्ध महासंघाचे कार्य या संस्थेतर्फे चालते. जगातील प्रत्येक खंडात युरोप, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि आशिया खंडात महासंघाच्या शाखा आहेत.''[२६४] 'नमो त्रिरत्न' हे त्याचे बोधवाक्य आहे. ही आध्यात्मिक चळवळ आहे. ध्यान, मैत्री, संपर्क, शारीरिक सौंदर्य, आध्यात्मिक सौंदर्य प्राप्त करणे हे संघाचे ध्येय आहे. या संस्थेची मुख्य केंद्र पुणे येथे दापोडी या ठिकाणी असून मुंबई मधे चुनाभट्टी येथे संस्थेचे मोठे केंद्र आहे. तसेच भाजे, वर्धाव, नांदेड, येथेही संस्थेच्या शाखा आहेत. पुण्याजवळील भाजे या ठिकाणी धम्मदीक्षेचा कार्यक्रम होतो. ''त्रैलोक्य बौद्ध महासंघाचे कार्य दोन विभागात चालते. धार्मिक कार्य आणि सामाजिक कार्य. या दोन्ही कार्यक्रमांची सरमिसळ होत नाही. सामाजिक कार्यासाठी धम्ममित्र हे कार्य करतात. तर आध्यात्मिक कार्य धम्माचारी करतात.''[२६५] ''त्रैलोक्य बौद्ध महासंघाचे वैशिष्ट म्हणजे हे विहार बौद्ध भिक्खू संघ चालवित नाहीत, तर धम्मचारी चालवितात. निळे वस्त्र हा त्यांचा पेहरावाचा रंग आहे.''[२६६]

धम्मप्रसार आणि प्रचारासाठी विविध कार्यक्रम राबविले जातात. भांडूप, अंधेरी, आणि वडाळा या ठिकाणी संस्थेचे सोशल प्रोजेक्ट राबविले जातात. संस्थेची पाच ठिकाण स्टडी क्लासेस आहेत. वरळी, वडाळा, अधेरी, भांडूप आणि चुनाभट्टी येथे वाचनालय असून मुलांसाठी शिल्पग्राम नावाचा प्रोजेक्ट राबविला जातो. त्याचप्रमाणे मुलांना करमणुकीसाठी टॉय लायब्ररी, इनडोअर आऊटडोअर खेळ खेळण्याची येथे सोय आहे. सुट्टीमध्ये मुलांना लाकूड व मातीपासून वस्तू बनविण्याचे शिक्षण दिले जाते. आजीबाईचा बटवासारखा पोटली नावाचा प्रोजेक्ट राबवला जातो व मुलांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो.

मुंबई चुनाभट्टी येथे संस्थेचे विपश्यना केंद्र असून, ''मुंबई शहर सरकारने विपश्यनेला सुरक्षितता दिली असून प्रकृती स्वास्थ्यासाठी विपश्यनेची गरज असल्याचे मान्य केले आहे.'' धम्मकार्याचे धम्मशिबिरे, ध्यानसाधना, दीक्षाविधी, इत्यादी कार्यक्रम केले जातात. त्रैलोक्यबौद्ध

महासंघाचे त्रिरत्न प्रकाशन असून अनेक ग्रंथाचे, पुस्तकाचे प्रकाशन संस्था करते. उदा. एस. धम्मो सुनन्नयो, आर्य अष्टांग मार्ग, आंबेडकर और बौद्ध धर्म आणि श्रद्धा''[२६७] इत्यादी. नुकताच संस्थेचा वर्धापनदिन दि. ६ एप्रिल २००९ रोजी संपन्न झाला. ''त्रैलोक्य बौद्ध महासंघाच्या अनुयायांची मानसिकता आंबेडकरवादी असून डॉ. आंबेडकर यांच्या अनुयायांप्रती असलेला जिव्हाळा यामुळे डॉ. आंबेडकरांनी भारतात आरंभलेल्या धम्माच्या पुनरुत्थानाच्या कार्याला ते समर्थपणे मदत करत आहेत.''[२६८]

**ग्लोबल विपश्यना केंद्र, गोराई पॅगोडा :**

बौद्ध धम्माच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारे मुंबईतील महत्त्वाचे विपश्यना केंद्र म्हणजे, ग्लोबल विपश्यना केंद्र होय. आचार्य सत्यनारायण गोयंका गुरुजी या विपश्यना केंद्राचे संस्थापक असून विपश्यना क्षेत्रात जागतिक स्तरावर ते कार्य करीत आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये इगतपुरी येथे त्यांनी विपश्यना विश्व विद्यापीठाची स्थापना केलेली असून त्याची इतर केंद्रे स्थापन केली आहेत. त्यांच्या संकल्पनानुसार मुंबई बोरीवली येथे गोराई बीचवर हा भव्य दिव्य विश्वस्तूप साकारण्यात आला आहे.

विसाव्या शकातील जगातील एक मोठी कलाकृती म्हणजे मुंबईतील हे विपश्यना केंद्र आहे. जागतिक शांती आणि ऐक्याचे ते प्रतीक आहे. यासाठी एस्सेल समुदायाचे अध्यक्ष सुभाष चंद्र गोयल यांनी ही जमीन ग्लोबल विपश्यना फाउंडेशनला दान म्हणून दिली. इ.स. १९९७ पासून या पॅगोडाच्या बांधकामास सुरुवात झाली होती. यासाठी शंभर कोटी रुपये खर्च आला आहे. या प्रकल्पासाठी देशातील आणि परदेशातील अनेक धम्मबांधवांनी दान केले.

**भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी धातू :**

हा पॅगोडा म्हणजे बौद्ध स्थापत्याचा एक आदर्श नमुना असून जवळजवळ तेरा एकर परिसरात हा पॅगोडा बांधलेला आहे. अरबी समुद्राच्या उत्तर-पश्चिमेला गोराई येथे हा पॅगोडा असून येथे अनेक इतर इमारतींचा समूह आहे. मुख्य पॅगोडाचा परिघ २८० फूट व उंची ९० फूट आहे. त्याच्या बाजूला दोन छोटे पॅगोडे असून त्यांची उंची ९० फूट आहे. पॅगोडावर लावलेला सोनेरी रंग थायलंडच्या एका उपासकाने दिला असून हा पॅगोडा म्यानवार येथील प्रसिद्ध थिडॅयोन पॅगोडाची प्रतिकृती आहे. आंतमर्धये ६००० हजार फूटांचा हॉल असून याला मधे एकही खांब नाही.

पॅगोडामध्ये वरच्या बाजूस भगवान गौतम बुद्ध यांच्या पवित्र अस्थीधातूंचे जतन केले आहे. हे अस्थीधातू भारतीय बौद्धमहासभा आणि श्रीलंका सरकारने दिलेल्या आहेत. पॅगोडामध्ये सोन्याने मढविलेले सोन्याचे धम्मचक्र असून आठ दिशांना आठ चंदनाचे दरवाजे आहेत. हे दरवाजे बर्मामधील लोकांनी दान केलेले आहेत.

**बौद्ध साहित्यनिर्मिती :**

ग्लोबल विपश्यना फाउंडेशनने मोठ्या प्रमाणात बौद्ध साहित्याची निर्मिती केली असून, धम्मप्रसार व प्रचार कार्याला मोठे योगदान दिले आहे. पाली त्रिपिटकांचे टीका ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्यांचे काही ग्रंथ तालिबानने प्रसिद्ध केले आहेत. स्वतः गोयंका गुरुजीनी अनेक ग्रंथ लिहिलेले असून काहींचे अनुवाद केले आहेत. त्यांनी निर्मलधारा, धर्मकी प्रवचन सारांश, जागे पावण प्रेरणा, जागे अंतर्बोध, धर्म आदर्श धारण करे सो धर्म, क्या बुद्ध दुःखवादि थे ? धम्मवाणी संग्रह, सुत्तसार सुरक्षा, गणतंत्र की सुरक्षा कैसी हो ? शाक्य और कोतिया के गणतंत्र कताश क्यो हुआ ? इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत.''[२६९]

**बौद्धजन पंचायत समितीची बौद्ध विहारे :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापना केलेल्या सामाजिक संस्थामधील ही एक महत्त्वाची संस्था डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या या संस्थेचे नाव महारज्ञानी पंचायत समिती असे होते. धर्मांतरानंतर म्हणजे इ.स. १९५७ मध्ये या संस्थेचे नाव बौद्धजन पंचायत समिती असे ठेवण्यात आले. ''मुंबईमध्ये समितीच्या साडेपाचशे शाखा असून त्यातील जवळजवळ निम्या शाखांमध्ये बौद्ध विहारे आहे.''[२७०] या विहारांमधून धम्म संवर्धनाचे कार्य केले जाते. तसेच समाज प्रबोधनी केले जाते. काही बुद्धविहारातून वाचनालय, बालवाड्या, अभ्यासवर्ग अशी कामे केली जातात. बौद्ध धम्म लोकांपर्यंत पोहोचविण्यासही पंचशील नावाचे त्रैमासिक चालविले होते. ''बौद्ध पद्धतीने विधी पार पाडण्यासाठी बौद्धाचार्य वर्गाची निर्मिती केली आहे.''[२७१] मुंबई जिल्हा उपनगरात अनेक बुद्धविहारे असून धम्मप्रसाराचे व प्रचाराचे कार्य येथे केले जाते. बौद्ध जन सेवा पंचायत समितीने अद्वितीय कार्य केले आहे व करीत आहे.

**अखिल भारतीय बौद्ध महासभेची बौद्ध विहारे :**

इ.स. १९५५ अखिल भारतीय बौद्ध महासभेची स्थापना झाली. डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनंतर सभेचे त्यांचे पुत्र यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर अध्यक्ष झाले. त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नी सभेच्या अध्यक्षा असून त्या बौद्ध धम्मप्रचाराचे व प्रसाराचे कार्य करीत आहेत. महाराष्ट्र हे सभेच्या मुख्य ऑफिस असून दिल्ली, आग्रा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात, पंजाब, बंगालमध्ये सभेच्या शाखा आहेत. मुंबईमध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या २४४ शाखा असून त्यांचे अंतर्गत अनेक विहारे आहेत. भारताला बौद्धराष्ट्र बनविणे, तसेच बौद्धाचार्य बनविणे हे सभेचे महत्त्वाचे कार्य आहे.

अशा प्रकारे बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करणारी विविध संस्थांची एकूण १००० बुद्धविहारे मुंबईमध्ये आहेत. त्यांच्या कार्याचे स्वरूप साधारणतः सामाजिक आणि सांस्कृतिक विकास करणे हे आहे. बहुतेक विहारांबरोबर महिला मंडळ देखील धम्मविषयक आणि सामाजिक कार्य करीत आहेत.

धम्मविषयक कार्य खालीलप्रमाणे केले जाते. अनेक विहांमध्ये विपश्यना केंद्र, श्रामणेर भिक्खू टेनिंग सेंटर, पाली भाषा वर्ग प्रशिक्षण केंद्र, ध्यानसाधना केंद्र, धम्मअभ्यास वर्ग पाली भाषा वर्ग, प्रशिक्षण केंद्र, धम्मध्यान साधना, धम्म परिचय शिबिरे इत्यादींचे आयोजन केले जाते. कांही विहारांमध्ये दीक्षा देण्याचे कार्यक्रम होतात. सांस्कृतिक कार्यक्रम नामकरण संस्कार, धम्म संस्कार, गर्भमंगल दिन, वाढदिवस इत्यादी भंत्तेजींच्या हस्ते होतात. काही विहारांमध्ये भंतेजींचे वास्तव्य असते, तर काही विहारांमध्ये उपासक वर्गाकडून कारभार चालतो. सामाजिक कार्यक्रमांमध्ये बालवाडी प्रकल्प, आरोग्य, बालविकास, एड्स जागृतीसारखे कार्यक्रम विहारांमधून होतात. सामाजिक जागृतीच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य केले जाते. शैक्षणिक उपक्रम काही विहारांतून राबविले जातात.

सर्व बौद्ध विहारांतून संविधान गौरवदिन, डॉ. आंबेडकर जयंती, बुद्धजयंती, पोर्णिमा, धम्मचक्रपरिवर्तनदिन साजरे केले जातात. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यापासून या समाजात सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात खूप प्रगती झाली. ''बौद्ध धम्माचा स्वीकार करण्यापूर्वी आपल्याकडे एकही बुद्धविहार नव्हता. आज मुंबईसारख्या शहरात ३८७ बुद्ध विहारे''[२७२] तर आहेतच, परंतु गाव, तालुका, जिल्हा अशा अनेक ठिकाणी हजारो बुद्धविहार निर्माण झालेले आहेत. हा धर्मांतराचा फार मोठा सांस्कृतिक प्रभाव आहे. बुद्धविहारांप्रमाणेच धर्मांतरापूर्वी आपल्याकडे भिक्षूसंघ नव्हता.

धर्मांतरानंतर भारतामध्ये जवळजवळ एकूण १२५० भिक्खू राहात असून त्यात जवळजवळ १००० भिक्षू आंबेडकरी बौद्ध आहेत. आणि ते पूर्वाश्रमीचे महार होते.''[२७३] भिक्खू सुमेध लिहितात, ''He was first mahar to have joined the Buikka sangha.''[२७४]

अशा प्रकारे इ.स. १९५६ च्या धर्मचक्रपरिवर्तनानंतर भारतीय समाजात एक स्वतंत्र बौद्ध समाज निर्माण होऊन धम्म संस्कारासाठी शेकडो बुद्धविहारे निर्माण झाली. त्याचबरोबर भिक्खू संघातही वाढ झाली. नवीन बौद्ध संकल्पना निर्माण झाल्या. उदा. धम्ममित्र, धम्मसेवक, धम्मचारी, बौद्धाचारी इत्यादी. इ.स. १९५६ नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाने प्रसिद्ध झाले.

विहार स्थापत्यनिर्मितीप्रमाणेच धर्मांतराचा बौद्ध चित्रकला क्षेत्रावरही प्रभाव पडलेला दिसतो. चित्रकलेच्या माध्यमातून आंबेडकरी समाजाचे प्रतिबिंब पडू लागले. धर्मांतरानंतर नवबौद्धांच्या चित्रकलेवर धम्मस्वीकाराचा प्रभाव दिसतो. उदा. ''बौद्ध साहित्यात पुस्तकांच्या मुखपृष्ठाच्या आणि त्यातील चित्रांचा चित्ररेखाटनांचा अभ्यास केला तर त्यातील प्रतिमा रंगसंगती, चिन्ह, प्रतीके आणि मोटिव्हज् खास बौद्ध तत्त्वज्ञानाशी, बौद्ध संस्कृतीशी संबंधित असतात. गृहसजावर, शोभेच्या वस्तू, ग्रिटिंग्ज, कॅलेंडर, फोटो, ज्ञापक इत्यादींमध्ये बौद्धकलेचा प्रत्यय येतो.''[२७५]

- **धर्मांतराचा शैक्षणिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

''मागासवर्गीय जाती आणि जमाती यांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सरकारने १९५५ च्या नागरी कायदा, अॅट्रॉसिटी कायदा तसेच राखीव जागा धोरणानुसार त्यांचा विकास करण्याचे धोरण आखले आहे. राज्य सरकार व केंद्र सरकारतर्फे ही धोरणे राबविली जातात. बऱ्याच योजना नवव्या प्लॅननुसार पुन्हा करण्यात आल्या आहेत. या सवलतीनुसार फीमध्ये सवलत, पुस्तके, वह्या, पोशाख, शिष्यवृत्त्या, वसतिगृहे, वैद्यकीय व तांत्रिक महाविद्यालयांत राखीव जागा, वरिष्ठ श्रेणीतील नोकऱ्यांसाठी होणाऱ्या परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी साहाय्य, परदेशात शिक्षण घेण्यासाठी सवलती अशी विविध प्रकारे मदत केली जाते.''[२७६] परंतु तरीदेखील या समाजाचा फारसा विकास झालेला दिसत नाही. शासकीय नोकरीत अजूनही मागासवर्गीय लोक शिपाई, सफाई कामगार तसेच कारकून म्हणून काम करतात. उच्च पदावर अजूनही त्याचे फारसे प्रमाण नाही.

मागासवर्गीय जातीजमातींमध्ये बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे महार जातीचे साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसते. प्राथमिक शिक्षण ६३%, माध्यमिक शिक्षण १२.६%, उच्च माध्यमिक शिक्षण १४.३%, आणि उच्च शिक्षण १४.३% आहे. धम्म स्वीकारानंतर मोठ्या प्रमाणात बौद्धांनी बाबासाहेबांच्या आदेशाचे पालन करून खेडी सोडली आणि शिक्षणाचा फायदा घेऊन शैक्षणिक प्रगती केली. धम्म स्वीकारानंतरच्या पिढीत उच्च शिक्षणावर जास्त भर दिलेला दिसतो. या पिढीने आपल्या मुलांना अत्यंत कष्टात, पोटाला चिमटा घेऊन शिकविले, उच्च शिक्षित केले. आज पन्नास ते साठ वयाची असलेली ही पिढी जिने बाबासाहेबांना पाहिले नाही, परंतु या पिढीवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव दिसतो. उदा. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू भालचंद्र मुणगेकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात इत्यादी.

धम्म स्वीकाराच्यावेळी मुंबईमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची एक-दोन कॉलेजेस होती, परंतु आता संख्या वाढलेली असून विद्यार्थ्यांची संख्याही वाढलेली आहे. शेकडो विद्यार्थी पदवीधर होऊन येथून बाहेर पडतात, शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतल्यास लक्षात येते की हे धर्मांतराचे फलित आहे. ''इ.स. १९५६ मध्ये या समाजात साक्षरतेचे प्रमाण अवघे ३% होते. २००१ सालात ते ७२.७% एवढे झाले. भारतात २००१ च्या जनगणनेनुसार बौद्धांची लोकसंख्या आठ दशलक्ष (०.८१) असून साक्षरतेचे प्रमाण ७२.७% आहे. धर्मांतरानंतर नवदीक्षितांमध्ये हा जो शिक्षणाचा प्रसार झाला तेव्हढा हिंदू धर्माच्या अंतर्गत कोणत्याच मागास जातीमध्ये झालेला नाही.''[२७७] ''१९२१ च्या जनगणनेनुसार हिंदूमध्ये साक्षरतेचे प्रमाण ६५%, मुस्लिमांमध्ये ५९%, ख्रिश्चनांमध्ये ८०.३%, शिखांमध्ये ६९.४%, जैनांमध्ये ९४.१%, पारशीमध्ये ४७%, आणि बौद्धांमध्ये ७३% आहे.''[२७८] तर देशामध्ये सर्वात जास्त बौद्धांची लोकसंख्या महाराष्ट्रात असून त्यांचे साक्षरतेचे प्रमाण ७६.२% आहे.''[२७९] आणि महाराष्ट्रात सर्वात जास्त बौद्धांचे प्रमाण मुंबईमध्ये आहे. शैक्षणिक बाबतीत, 'सध्या स्पर्धा सरळसरळ ब्राह्मण आणि बौद्ध समाजात आहे.''[२८०] बौद्ध समाजातील लोकांनी मागासवर्गीय जातीमध्ये सर्वात जास्त पांढरपेशा व्यवसाय स्वीकारलेला दिसतो. उदा. कारकुनी, वकिली, शिक्षकी, डॉक्टरी पेशा, इंजिनिअरिंग पेशा, इत्यादी.

बाबासाहेबांच्या वेळी ''मुंबई विभागातील पाच लाख महारांपैकी पाच हजार पुरुष व तीनशे स्त्रिया साक्षर होत्या. त्यांपैकी २८८ जणांना इंग्रजीशी तोंडओळख होती व त्यात बाबासाहेब

काय ते एकमेव ग्रॅज्युएट म्हणजे पदवीधर होते.''[२८१] इ.स. १९५६ नंतर धर्मांतरीत बौद्ध समाजाची शैक्षणिक प्रगती किती झाली, हे खालील तक्त्यावरून समजते.

**तक्ता २. ''महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाणः''[२८२]**

| Mahar | Total | Rural | Urban | Litrate | Primary | Mariculation | Higher Education |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1961 | 782008 | 108020 | 673988 | 122692 (15.68) | 49930 (6.38) | 3416 (0.43) | 485 (0.06) |
| 1971 | 107187 | 903577 | 167510 | 283608 (26.47) | 311416 (29.07) | 15512 (1.44) | 2013 (0.18) |
| 1981 | 1648269 | 1294094 | 354175 | 632563 (38.73) | 190173 (11.53) | 200294 (12.14) | 16030 (0.97) |

Higher Edcucation includes graduation, Post graduation diploma in technical, non technical, Medicine engineering, Agriculture and teaching etc.

मुंबई शहर आणि उपनगरात अनेक सामाजिक संस्था तसेच सांस्कृतिक केंद्र शैक्षणिक कार्य करत आहेत. उदा. ''घाटकोपर येथे सम्यक विचारमंच आणि दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या ठिकाणी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट सुरू करण्यात आलेली आहे. या संस्थेच्या वतीने रमाबाई आंबेडकर नगरात मोफत वाचनालयही चालविण्यात येते. पी. एल. लोखंडे मार्गावरील रमाबाई उत्कर्ष संघाच्या वतीने इयत्ता ९ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालविण्यात येते. तेथील ग्रंथालयात शालेय पुस्तके ठेवण्यात येतात. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. मोफत वह्यांचे वाटप करण्यातात येते. प्रागतिक विद्यार्थी संघ यांचे वतीने विद्यार्थ्यांसाठी एक पुस्तक पेढी चालविण्यात येते. या संघाची एक बालवाडी असून वाचनालयही आहे. बालवाड्या, अंगणवाड्या, चालविणाऱ्या अनेक संस्था या वस्तीत आहेत. संघाचे अनेक उपक्रम आहेत, परंतु आर्थिक अडचण हा त्यांच्यासमोरील मोठा प्रश्न आहे. इ.स. १९८० मध्ये रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते चंद्रकांत हंडोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलची स्थापना केली असून येथे वाणिज्य शाखेचे कनिष्ठ महाविद्यालयही आहे.''[२८३]

अशा प्रकारे त्रैलोक्य बौद्ध महासंघ, सर्वोदय बौद्ध विहार, बौद्ध पंचायत समिती, तसेच अखिल भारतीय बौद्ध महासभा इत्यादी धम्म प्रसारक संस्था देखील विविध भागात शैक्षणिक कार्य करीत आहेत. त्या सर्वांच्या कार्याचा उल्लेख स्वतंत्रपणे देण्यात आला आहे.

- **धर्मांतराचा आर्थिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

''इ.स. १९११ च्या जनगणनेमध्ये हिंदू जाती व त्यांचे व्यवसाय (Principal occupation) दिलेले असून महार ही जमात Village Servant म्हणून नमूद करण्यात आली होती.'' याच महार जातीने २० व्या शतकात सामुदायिक धर्मांतर केलेले आढळते.

भारतातील समाजव्यवस्था ही जातिव्यवस्थेवर अवलंबून होती, तसेच ती अर्थव्यवस्थेचेही वैशिष्ट्य होती. कोणी कोणता व्यवसाय करावा हे ठरलेले होते. मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथात याचे विश्लेषण केलेले होते. या मनुस्मृतीत अस्पृश्य वर्गाच्या तसेच वर्गव्यवस्थेतील चवथ्या वर्गाचा विकास होऊ नये, याची पुरेपूर दक्षता घेतलेली होती.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत म्हणजेच 'गावगाड्यातील'[२८४] अनुत्पादित वर्ग म्हणजे महार होय. त्याचा परंपरागत व्यवसाय म्हणजे गावाची सेवाचाकरी करणे हा होता. ग्रामीण अर्थव्यवस्थेत असणाऱ्या प्रत्येक जातीकडे काहीना काही धंद्याचे कसब होते. महार जातीकडे मात्र कोणतेच व्यावसायिक कसब नव्हते. उच्चवर्णीयांची सेवा करणे हे एकच काम त्यांचेकडे होते. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर महार जमातीने हिंदू समाजरचनेलाच विरोध केला. त्याचे धर्मग्रंथ नाकारले. ''बौद्ध धम्माच्या स्वीकारामुळे जातिव्यवस्थेच्या चौकटीतून ते पूर्णपणे बाहेर पडले. त्यांनी आपली पारंपारिक येसकी, वतनदारी, बलुतेदारी यांचा त्याग केला आणि उपजीविकेसाठी शहरांकडे स्थलांतर केले. इतर जातींच्या मानाने बौद्धांचे शहरातील प्रमाण जास्त आहे, कारण शहरातील महारांनी अधिक प्रमाणात धर्मांतर केले असण्याची शक्यता आहे.''[२८५] ''महार लोकांची गावाशी कोणतीच नाळ जोडलेली नसल्यामुळे (Land Roots) हा समाज मोठ्या प्रमाणात शहरी समाज म्हणून उदयास आला.''[२८६] गावातील महार वतन या गुलागिरीच्या बेड्या आहेत म्हणून 'गांव सोडून शहरांकडे चला' असा संदेश डॉ. आंबेडकरांनी महार समाजाला दिला. ते स्वतःएक अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी महार वतनविरोधी बिल मांडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव या जनतेवर होता. त्यांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेपासूनच शेकडो लोकांनी गावगाड्यातील परंपरागत व्यवसाय सोडून दिले होते आणि शहरांमध्ये स्थलांतर केले होते.

इ.स. १९३८ मध्ये मुंबईतील अस्पृश्य समाजाची पाहणी प्रधान यांनी केली होती. त्यांनी मुंबईतील ९५४ महार कुटुंब प्रमुखांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यावेळेस त्यांच्या निदर्शनास

आलेल्या पाहणीनुसार ''४६.३% लोक रेल्वेमधे कुलीचे काम करत होते, तर २४.६% लोक गँगनचे काम करत होते. सर्वात जास्त लोक मीलमध्ये म्हणजे ८२.६% लोक मिलमध्ये कामगार होते, मिलमधे रग डिपार्टमेंटमध्ये ते मोठ्या प्रमाणात काम करत होते, तर ६२.३% लोक महानगरपालिकेत झाडू खात्यात होते व १३.३% कुली होते.''[२८७] महार समाज प्रामुख्याने सरकारी नोकरीमध्ये आणि कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात होता. इ.स. १९६७ नोकरी करणाऱ्यांची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार ''महार- १८३, चांभार- ३७, मांग - ३७, ढोर - १५, होलार - ३ आणि भंगी - ९, एवढे नोकरी करत होते.''[२८८] पूर्वाश्रमीच्या महार समाजाने धम्मस्वीकारानंतर गावातील पारंपरिक व्यवसाय सोडून दिलेले आहे. गावामध्ये फक्त एक ते दोन टक्के महार गावकीचे काम करतात.

मुंबईमध्ये आलेल्या लोकांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे तसेच विशिष्ट व्यवसायाचे कसब नसल्यामुळे व्यवसायासाठी पुरेशे भांडवल नसल्यामुळे आणि व्यावसायिक दृष्टी नसल्यामुळे नोकरीसाठी सर्वच नवबौद्धांचा (बी.एम.सी.) बृहन्मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे जास्त ओढा आहे. महानगरपालिकेत चतुर्थ श्रेणीमध्ये कामगारांचे प्रमाण जास्त आहे. खाजगी कंपन्यांमध्ये वॉचमन, गार्ड, हेल्पर, अशी अकुशल कामगारांचे कामे करतात. मुंबईतील टेक्सटाइल मिल, गोदी कारखाने, यामध्येही नवदीक्षितांचे प्रमाण मोठे आहे.

बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असून सरकारी नोकरीमध्ये वरिष्ठ श्रेणीच्या पदांवर, तसेच पांढरपेशा व्यवसायात मोठ्या प्रमाणत वाढ झालेली आहे. मुंबईतील नवदीक्षित बौद्ध समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारली असून त्यांचे दरडोई उत्पन्न वाढलेले आहे. पांढरपेशा वर्गाची निर्मिती झालेली आहे.

बौद्धांचा मूलभूत प्रश्न आर्थिक आहे. मुंबईसारख्या शहरामधे अजूनही अत्यंत बिकट परिस्थिती आहे. परंतु ''Conversion many not improve the economic Status of the Converts but it must be noted that poverty is never the problem of the untouchables. There problem is denial of human rights, dignity self respect, Deprivation and conversion imstantly restores all these conversion therefore Has hecome the first step in the long march of Dalit towards libration.''[२८९]

● **धर्मांतराचा महिलांवर पडलेला प्रभाव :**

''स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे''[२९०] या डॉ. आंबेडकरांच्या विचाराला मानून, महाडच्या समतासंग्रामापासून ते धम्म क्रांतीपर्यंतच्या सर्व लढ्यामध्ये आंबेडकरी महिलांनी मोठे योगदान दिले होते. इ.स. १९३५ ते इ.स. १९५६ या कालखंडात महाड सत्याग्रह नासिक मंदिरप्रवेश सत्याग्रह, पर्वती मंदिरप्रवेश सत्याग्रह इत्यादी सर्व सत्याग्रह चळवळींमध्ये महिलांचा मोठ्या सहभाग होता. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा जबरदस्त पगडा या महिलांवर होता. महाड सत्याग्रहाचे वेळेस बाबासाहेबांनी जेंव्हा त्यांना उद्देशून भाषण केले होते तेव्हा त्या इतक्या भारावून गेल्या होत्या की एका क्षणात जुन्या गोष्टींचा त्याग करण्यास तयार झाल्या. आपल्या जुन्या रूढी-परंपराचा त्याग करून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या लढ्यात स्वतःला झोकून दिले. घरी परत जाताना स्वतःला पूर्णपणे बदलून घेतले. पुढे १९३० मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रहात अटक होणारी पहिली तुकडी ही महिलांची होती. १९३५ च्या येवला धर्मांतर घोषणेच्या सभेत महिलांनी नुसता सहभागच घेतला नाही, तर धर्मांतराच्या घोषणेला त्यांनी पाठिंबासुद्धा दिला होता. याप्रसंगी कु. राजाबाई गायकवाड यांनी आपणही धर्मांतरास पाठिंबा देत आहोत असे जाहीर करून सांगितले होते की, ''ज्यांनी अस्पृश्य वर्गाला खरेखुरे राजकीय हक्क मिळवण्याकरीता अर्हनिश झगडा केल्या त्यांच्यासोबत आम्हीही धर्मांतर करू, ज्या धर्मात आम्हाला वीरमाता, वीरभगिनी, वीरपत्नी होण्याची संधी मिळेल तोच धर्म बाबासाहेबांनी आम्हास द्यावा.''[२९१] धर्मांतरांच्या घोषणेनंतर धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देणारी संमेलने, सभा भरू लागल्या. दिनांक ३० व ३१ मे १९३६ रोजी मुंबईमध्ये पुरंदरे स्टेडियमवर मुंबई इलाखा महार परिषद घेण्यात आली होती. तेव्हा भागीरथी तांबे या महिलेने सांगितले होते, ''जो धर्म आपल्याला आमच्या बंधुवर्गाप्रमाणेच समाजात स्वातंत्र्याने वावरू देईल तोच धर्म आम्ही स्वीकारू. तसेच ज्या धर्मात सत्य, प्रेम, समता, स्वातंत्र्य आहे, ज्यात शौर्य आहे पण क्रौर्य नाही, ज्यात शिस्त असेल व जो धर्म रूढीपरंपरांना पाळत नाही अशा धर्मात बाबासाहेबांनी आम्हास न्यावे.''[२९२]

१६ जून १९३६ मध्ये धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देण्यासाठी मुंबई येथे परळमधील दामोदर हॉलमध्ये परिषद भरविण्यात आली होती. यावेळी देवदासी मुरळ्या, जोगातिणी,

आराधिणी, पोतराज यांनी घोषणेला पाठिंबा दिला. ''या प्रसंगी बाबासाहेब या महिलांना धर्मांतराशिवाय दुसरा उपाय नाही हे पटवून दिले. त्यानंतर धर्मांतराच्या वेळेस ज्या देवदासींनी धर्मांतर केले, त्यांनी पुढे लग्ने केली.''[२९३]

अमरावती येथील अंदाबेदी मंदिरप्रवेश सत्याग्रहात देखील स्त्रियांनी सहभाग घेतला होता. या सत्याग्रहात पंजाबराव देशमुख यांचाही सहभाग होता. मंदिरप्रवेश मिळावा म्हणून अस्पृश्य समाजाने एक निवेदन देवस्थान कमिटीला दिले होते. परंतु कमिटीने मंदिरप्रवेश काही अटींवर दिला. सत्याग्रहींना ते मान्य नव्हते. बाबासाहेबांनी त्यावेळी एक परिषद घेतली होती. या परिषदेत पन्नास स्त्रिया उपस्थित होत्या.

**धम्मदीक्षा समारंभातील स्त्रियांचा सहभाग :**

दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे पार पडलेल्या दीक्षा समारंभात हजारोंच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, खेड्यामधून मिळेल ते वाहन करून तर काही पायी प्रवास करून या महिला दीक्षा समारंभाला नुसत्या उपस्थित राहिल्या नाहीत, तर त्यांनी स्वतः धम्माची दीक्षा घेतली होती आणि आपले गुलामगिरीचे जीवन सोडून दिले होते. स्वतः दीक्षा घेतल्यानंतर या महिला आपआपल्या गावामध्ये/शहरामध्ये जाऊन धम्मप्रचाराचे कार्य करू लागल्या. यामधील काही प्रातिनिधिक नावे मी देत आहे - राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, अंजनीबाई भ्रत्रार, गीताबाई गायकवाड, शांताबाई दाणी, सुलोचनाबाई डोंगरे, किर्तीबाई पाटील, इंदिराबाई पाटील आणि आंबेडकरांच्या स्नुषा मीराताई आंबेडकर या सर्वांनी इतिहास घडविला. मीराताई आंबेडकरांनी तर आजतागायत धम्माची धुरा सांभाळलेली आहे.

**धम्मस्वीकारानंतर महिलांचा राजकारणातील सहभाग :**

''धम्मकार्याबरोबरच राजकारणात देखील महिलांचा सहभाग आहे. रिपब्लिकन पक्षामध्ये आज जरी गटाचे राजकारण असले या प्रत्येक गटातून स्त्रियांना आंबेडकरी चळवळीचे प्रतिबिंब दिसत होते. म्हणूनच त्या कार्य करीत होत्या व अजूनही कार्य करत आहेत.''[२९४] मुंबईमध्ये प्रत्येक आर.पी.आय.च्या गटांमध्ये स्त्रियांचा सहभाग दिसून येतो. रिपब्लिकन पक्षाच्या पहिल्या आमदारीण म्हणून शेवंताबाई चौरे यांना मान मिळतो. ''इ.स. १९५७ साली मुंबई विधानसभेसाठी निवडणूक झाली होती. यावेळी शे.का. फेडरेशनचे सतरा उमेदरवार उभे होते. त्यापैकी खडकी मतदार

संघातून पी. एम. चौरे निवडून आले होते. परंतु त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या पत्नी शेवंताबाई चौरे यांना उमेदवारी देण्यात आली होती. यावेळी त्या प्रचंड मताने निवडून आल्या होत्या. यावेळी आर.पी.आय.ने त्यांना उमेदवारी दिली होती. त्या आर.पी.आय.च्या पहिल्या आमदारीण ठरल्या. त्यानंतर १९६७ मध्ये शांताबाई दाणी यांचा विधान परिषदेत, तर सुलेखाताई कुंभारे यांचा विधानसभेत प्रवेश झाला. परंतु या दोन्ही निवडणुकांना काँग्रेसचा हातभार लागला होता.''[२९५]

**महिला मंडळे आणि परिषदा :**

धम्मस्वीकारामुळे बौद्ध समाजातील स्त्रियांमध्ये जागृती होऊ लागली. त्यांनीसुद्धा सामाजिक आणि धार्मिक कार्याची जबाबदारी स्वीकारली. मुंबईमध्ये तसेच तिच्या उपनगरांमध्ये महिला मंडळाची स्थापना त्यांनी केली आणि धम्म चळवळीला एक व्यासपीठ निर्माण करून दिले. मुंबई मध्ये सर्वात प्रथम इ.स. १९२८ मध्ये एका महिला मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या महिला मंडळाची परिषद दि. २९ जानेवारी १९२८ रोजी झाली होती विशेष म्हणजे या परिषदेच्या अध्यक्षा रमाबाई आंबेडकर होत्या. या परिषदेच्या स्वागत मंडळाच्या पत्रकात म्हणले होते की, 'आपल्या समाजाची सुधारणा करण्यासाठी पुरुषांच्या चळवळीत हातभार लावण्यासाठी तसेच महिला समाजास उच्च ध्येयाची जाणीव उत्पन्न करून देण्यासाठी ही परिषद दामोदर हॉल परळ, मुंबई येथे आयोजीत करण्याचे ठरविले आहे.''[२९६] या पत्रकाचे हस्तलिखीत उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांना उपलब्ध झाले होते.

''दि. ६ मे १९५४ रोजी मुंबईमध्ये अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे तिसरे अधिवेशन भरविण्यात आले होते. त्यामध्ये स्त्री-पुरुष समानता आणि शिक्षण या विषयांवर भर देण्यात आला होता. तर दि. १४ जुलै १९४५ रोजी दादर नायगांव, येथे झालेल्या महिलांच्या सभेत स्त्री संघटना, बालसंगोपन इत्यादी विषयांवर भर देण्यात आला होता.''[२९७]

''दि. २ एप्रिल १९४८ रोजी मुंबईत सिद्धार्थ कॉलेजमध्ये देविकाबाई दामोदर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरविण्यात आली होती. या सभेत ठिकठिकाणी महिला मंडळे स्थापन करावीत असा ठराव संमत झाला होता. तसेच मुलांच्या शिक्षणाकडे जागरुकता दाखवावी असे विचार मांडण्यात आले होते.''[२९८]

**महिला समता सैनिक दल :**

''दि. ३० एप्रिल १९४० रोजी अस्पृश्य महिला समता सैनिक दलाची स्थापना करण्यात आली होती. दि. ३० सप्टेंबर १९६० रोजी आखिल भारतीय रिपब्लीकन्स पक्षाचे मुंबईमध्ये नायगांव येथे पुरंदरे स्टेडीयमवर अधिवेशन भरले होते. यावेळी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष मुंबई शहर, बृहन्मुंबई समता सैनिक दल आणि बृहन्मुंबई बौद्ध महिला मंडख यांच्या विद्यमाने धम्मचक्र प्रवर्तनादिन साजरा करण्यात आला होता.''[२९९]

महिला समता सैनिक दल आजही मुंबई मध्ये कार्यरत असून या दलाच्या एकूण १०७ शाखा कार्यरत आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिन, डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिन भीमा कोरेगांव स्मृतीदिन अशा विविध महिला समता दल कार्य करताना आढळते.

**महिला मंडळे :**

इ.स. १९५६ नंतर फार मोठ्या प्रभागात महिला मंडळाची स्थापना झालेली असून बहुतेक सर्व महिला मंडळे रजिस्टर केलेली आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात जेथे जेथे बौद्ध विहारे आहेत तेथे तेथे महिला मंडळे बौद्ध विहार संघटनेशी संलग्न असून धम्म कार्य एकत्रित करतात. धम्म सेविका म्हणून त्या अनेक विहारांमध्ये सहभागी आहेत. धम्म कार्यक्रमांच्या आयोजनापासून ते विहाराच्या प्रशासनामध्ये त्या हातभार लावताना दिसतात. प्रशासनामध्ये त्या निर्णयप्रक्रियेत सहभागी असतात.

प्रस्तुत प्रबंधास काही प्रातिनीधिक महिला मंडळांचा संदर्भ देण्यात आला आहे.

**१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रस्टचे महिला मंडळ :**

''हे महिला मंडळ वरळी बुद्धविहार बी.डी.डी. चाळ, मुंबई येथे असून या मंडळाच्या अध्यक्षा शांता गायत्री या आहेत. या महिला मंडळातर्फे सामाजिक, शैक्षणिक, तसेच धार्मिक उपक्रम राबविले जातात. वर्षावास महिलादिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजप्रबोधनाचे कार्यक्रम येथे राबविले जातात. गरजू विद्यार्थ्यांना शाळेच्या वस्तू मोफत वाटप करण्यात येते. विविध प्रकारची शिबिरे भरविली जातात. एस.एस.सी. व एच.एस.सी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.''[३००]

**२) यशोधरा महिला मंडळ, बांद्रा :**

''येथील बुद्धविहारात यशोधरा महिला मंडळ आणि विशाखा महिला मंडळाद्वारे कार्यक्रम राबविले जातात. महिलांना बोलते-लिहिते करण्याचे महत्त्वाचे कार्य हे महिला मंडळ करते. शिवाय आंबेडकर जयंती, बुद्ध जयंती साजरी करतात. वर्षावासानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संगीता कांबळे, कल्पना उघाडे, सुदिता सोन कांबळे, मीना जाधव, अशा अनेक मुली लेखनाकडे वळलेल्या आहेत. फुले-आंबेडकरी चळवळीची पिढी तयार करण्याचे कार्य हे महिला मंडळ करते.''[३०१]

३) ''सर्वोदय बुद्ध विहारामध्येच अनुराधा रोकडेंच्या अध्यक्षतेखाली महिला मंडळाचे कार्य चालते बाल संस्कार कार्यक्रम, संडे क्लासेसच्या माध्यमातून नवीन पिढीवर धम्म संस्कार करण्याचे कार्य केले जाते. विविध कार्यक्रमांचे आयोजन त्या करतात. धम्म परिषद भरवून धम्माचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यात पसरविण्याचे कार्य त्या करीत आहेत. भदंत राहूल बोधी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले आहे. बौद्ध राष्ट्रांना भेटी देऊन बौद्ध धम्माचे ज्ञान त्यांनी मिळविले आहे. अनेक पुस्तके, सिडी, कॅसेट त्यांनी स्वतः निर्माण करून धम्मप्रसारकार्यात मोठा हातभार लावला आहे.''[३०२]

४) विक्रोळी कन्नमवार येथे पंचशील महिला मंडळाच्या अध्यक्षा वृंदाताई वाघमारे यांनी धम्म परिषदेचे आयोजन केले होते. धम्म परिषदेचे आयोजन करण्यासाठी संबोधी हित संवर्धन मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या संस्थेमार्फत सात धम्म परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या.

''महिला मंडळाने एक मोठा हॉल बांधलेला असून या ठिकाणी वर्षावासाचे कार्यक्रम घेतले जातात. मंडळामध्ये दरवर्षी बुद्धगयेची सहल आयोजित केली जाते. वर्षावासाच्या तीन महिन्यांच्या काळात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.''[३०३] संपूर्ण वातावरण धम्ममय झालेले असते. सर्व महिला यामध्ये सहभागी होवून धम्मप्रसारात हातभार लावत आहेत.

५) सामाजिक कार्यकर्त्या नंदाताई सावंत या कुर्ला बुद्ध कॉलनी घाटकोपर, रमामाता कॉलनी, गोवंडीचे कामगार नगर अशा अनेक वस्त्यांमध्ये महिला जागृतीचे कार्य करतात. तसेच व्यावसायिक मार्गदर्शन करण्याचे काम करतात. ज्या स्त्रियांनी, पुरुषांनी शिक्षण अर्धवट सोडलेले आहेत त्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, टिळक मुक्त विद्यापीठ, या शिक्षणसंस्थांची

माहिती देवून शिक्षण पूर्ण करण्यास मार्गदर्शन करतात. त्यामुळे अनेकांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यातूनच त्यांना वेतनवाढ, बढती यासारखे फायदे प्राप्त झालेली उदाहरणे आहेत. महिलांच्या बाबतीत वेगवेगळ्या कोर्सविषयी मार्गदर्शनही त्या करतात. उदा. पोलीसभरती, डी.एड., बी.एड., ई. त्यांनी भारतीय सामाज प्रबोधीनी नावाची संस्था स्थापन करून विविध समाजाभिमुख कार्य करत आहेत. या ठिकाणी राजमाता जिजाऊ बाल संस्कार वर्ग चालविली जातात. त्यांना भारताचा, जगाचा इतिहासाची माहिती त्या देतात. या कार्याबद्दल त्यांचे अनेक सत्कार झालेले आहेत. उदा. ''महाराष्ट्र दलित साहित्य अकादमी, भुसावळ यांनी डॉ. आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार २००३ मध्ये दिला. या वर्षी 'भीमरत्न' हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.''[३०४] तसेच २००८ चा आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. मुंबई शहर आणि उपनगरात वस्त्या-वस्त्यांमध्ये दोनशेच्यावर महिला मंडळे आहेत. थोडया फार फरकाने या सर्वांचे कार्य चाललेले दिसते. सर्वांचा उद्देश मात्र एकच आहे, धम्माचा प्रसार व प्रचार करणे आणि प्रत्येकाला 'अत दिप भव बनविणे'.

**धम्म स्वीकाराल्यानंतर साहित्य क्षेत्रातील महिलांचा सहभाग :**

इ.स. १९५६ नंतर डॉ. आंबेडकरांची प्रेरणा घेऊन साहित्यातून समाजप्रबोधन करणाऱ्या स्त्रिया मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. समाजप्रबोधन हा त्यांचा लेखनाचा मुख्य उद्‌देश होता. इ.स. १९५६ अगोदर म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या काळात व नंतर विविध नियतकालिके समाजप्रबोधनाचे कार्य करीत होती. या नियतकालकांमधून दलित/अस्पृश्य स्त्रियांनी लेखन करण्यास सुरुवात केलेली होती. उदा. ताराबाई डोंगरे, शारदाबाई चव्हाण, सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मिन गजार्यधे, प्रा. कुमुद पावडे, नलिनी ढलके, डॉ. आशा थोरात, प्रा. अरुणा लोखंडे, नलिनी सोमकुँवर, उर्मिला पवार, मीनाक्षी मून, प्रा. उषा बोरकर, प्रा. लोखंडे, प्रतिभा इंगोले, उषा भालेराव, शांताबाई कांबळे, शांताबाई दाणी, बेबी कांबळे, प्रा.लोखंडे, प्रतिभा इंगोले, उषा भालेराव, शांताबाई कांबळे, शांताबाई दाणी, बेबी कांबळे, मुक्ता गौड, इत्यादी महिलांनी साहित्यात भर टाकली.

मुंबईमधून 'आम्ही मैतरणी' हे त्रैमासिक मीनाक्षी मून संपादित करतात. त्यांनी आम्हीही इतिहास घडविणार हा ग्रंथ लिहून साहित्यात मोलाची भर टाकली. 'आम्ही मैतरणी'च्या माध्यमातून नवीन लेखक लेखिकांना विचारमंच प्राप्त करून दिला.

साहित्य क्षेत्राप्रमाणेच सामाजिक कार्यात, उद्योगधंद्यामध्येही स्त्रियांनी आपले नांव इतिहासात अजरामर केलेले आहे. उदा. मुंबईच्या व्यापारी क्षेत्रातील कल्पना तसेच त्यांना सहयाद्री वाहिनीमध्ये हिरकणी हा पुरस्कार देण्यात आला होता. छोट्याशा उद्योगापासून साखर कारखान्याच्या डायरेक्टर पदापर्यंत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन केले. औद्योगिक क्षेत्रात कार्य करत असतानाच सामाजिक बांधीलकी त्या विसरल्या नाहीत. धम्म कार्यामध्ये पुढाकार घेऊन बुद्ध-आंबेडकर जागतिक संमेलने त्यांनी भरविली आहेत. अमेरिका, लंडन, थायलंड, मलेशिया, श्रीलंका, इथल्या बुद्ध विहारांना त्यांनी भेटी दिल्या आहेत. मुंबईमध्ये इ.स. २००६ मध्ये भालचंद्र मुणगेकर यांचे अध्यक्षतेखाली जागतिक बौद्ध साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. समाजातील गरिबांना छोटे-छोटे उद्योग उभारण्यासाठी त्या अर्थसाहाय्य करतात. उदा. ''शिलाई मशीन देणे, रिक्षा घेवून देणे, मूर्ती बनविण्याचे कारखाने उघडून देणे, इ. माध्यमातून त्या बेरोजगारांना साहाय्य करतात.''[३०५]

मंगलाताई लोंढे : मंगलाताई लोंढे यांनी भांडूप येथे भीमगर्जना महिला मंडळाची स्थापना करून त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. मंगलाताईंनी सतरा महिलांना एकत्र करून सुरुवातीला स्वयंसहाय्यता गटाची स्थापना केली. त्याला ज्ञान प्रेरणा बचत गट असे नांव दिले. त्यानंतर असे एकूण वीस-पंचवीस महिलांचे गट त्यांनी स्थापन केले. या सर्व बचतगटांना बांधून ठेवणाऱ्या शेजार समिती तयार केल्या. अशा ११ शेजार समित्या मिळून एक संस्था स्थापन केली. तिला कौशल समाज विकास संस्था असे नांव देण्यात आले. संस्थेतील महिलांना रोजगार मिळविण्यासाठी त्यांना व्यवसाय मार्गदर्शन दिले. आणि या महिलांना लोणचे, पापड, इ. खाद्य पदार्थ बनविण्याचे शिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिला. मॅक्सी प्रकल्प करून दिला, किराणामालाचे दुकान उघडून दिले.

''इ.स. २००७ मध्ये त्यांनी सर्व बचतगट आणि संस्था एका छताखाली आणली व त्याला 'सुवर्ण ज्योत मुंबई जिल्हा समाज विकास संघ' असे नांव दिले. आज भांडुपमध्ये ६००० महिला आणि एकूण तीन संस्था संपूर्ण मुंबईमध्ये कार्यरत आहेत.''[३०६]

डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा प्रभाव असणाऱ्या अशा हजारो महिला आहेत. त्यांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रांप्रमाणेच धम्म कार्यातही आपली भूमिका बजावली आहे. प्रस्तुत

संशोधनात फक्त मुंबई शहर व उपनगरातील काही प्रतिनिधीक उदाहरणे घेतली आहेत. धम्म स्वीकारामुळे स्त्रियांचे दलितपण नष्ट झाले आहे. त्यांच्यामध्ये स्वाभिमान, आत्मोद्धार, स्वावलंबन, यांचा स्वीकार झालेला आहे. धम्मस्वीकारामुळे त्यांच्यात मानसिक, सामाजिक, वैचारिक, परिवर्तन घडून आले आहे. त्यांची अस्मिता जागृत झाली आहे. त्या ताठ मानेने जगताना दिसतात. प्रसिद्ध साहित्यिका इंदिरा आठवले म्हणतात, ''धर्मच नाकरणाऱ्या बंडखोरांना धम्म क्रांतीमुळे बौद्ध स्त्रियांमध्ये आला. म्हणून तर तिने आपल्या घरातील देव देव्हारे, उद्‌ध्वस्त केले. नवस फेडणे, उपवास करणे सोडून देऊन शिक्षणाची कास धरली.''[३०७] त्या धार्मिक बंधनातून मुक्त झाल्या आहेत. धम्माचे संशोधन करत आहेत. त्यांचे फक्त रहाणीमानच बदलेले नाही तर त्यांच्यात वैचारिक क्रांती झाली आहे. थोडक्यात, बुद्ध धम्मस्वीकारानंतर महिला जुन्या धार्मिक बंधनातून मुक्त होत आहेत. नव्या रूढी परंपरांचा स्वीकार करत आहेत. धम्मसेविका म्हणून धम्मप्रसार-प्रचार कार्यात नेतृत्व करत आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानावर संशोधन करू लागल्या आहेत.

धम्मस्वीकाराचा सामूहिक प्रभाव सर्वसामान्यपणे खालीलप्रमाणे पडलेला दिसतो. सर्वसामान्य पाहणीनुसार -

- विषमतेवर आधारलेल्या जुन्या संस्कृतीचा त्याग करून नविन बौद्ध संस्कृतीचा स्वीकार केलेला आहे.
- शतकानुशतके चालत आलेले परंपरागत संस्कार सोडून दिलेले आहेत.
- नवविधीतांची नैतिक मूल्ये श्रद्धास्थाने बदलली आहेत.
- त्यांची आचारसंहिता म्हणून बावीस प्रतिज्ञांना मान्यता मिळालेली आहे.
- जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार बदलेले आहेत.
- अभिवादन करणाऱ्या पद्धतींमध्ये नमस्कार, जोहारऐवजी 'जयभीम'ने अभिवादन केले जाते.
- विपश्यना या ज्ञानसाधनेचे पुनरुज्जीवन झाले आहे.
- धम्मस्वीकारानंतर मुलांच्या नांवामध्ये, वस्तीच्या व संघटनांच्या नावामध्ये परिवर्तन झालेले दिसून येते.
- धम्मसंस्कार केंद्राची निर्मिती झालेली आहे.

- उदा. त्रैलोक्य बौद्ध सहाय्यक गण, बौद्ध पंचायत समिती, भारतीय बौद्ध महासभा, सर्वोदय इत्यादी धम्मविषय संस्था संघटना मुंबईमध्ये कार्यरत आहेत.
- छोट्या छोट्या पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येऊन धम्मसंस्कार रुजविले जात आहेत.
- धम्मस्वीकारानंतर वैचारिक क्रांती निर्माण झाली आहे.
- बुद्ध-कबीर-फुले यांच्याविषयी आस्था निर्माण झाली आहे.
- स्वातंत्र्य-समता-बंधुत्व यावर समाजाची तात्त्विक बैठक बसलेली आहे.
- अस्पृश्य समाजातील महार जमात मोठ्या प्रमाणात कमी झाली.
- खेड्यातून स्थलांतर करून गावगाडाव्यवस्थेतून बाहेर पडून मुंबईसारख्या मोठ्या शहरामध्ये वासतव करू लागले.
- मुंबईमध्ये कापडगिरण्या, कारखाने, गोदी, डॉक, मिल, रेल्वेमध्ये सर्वात जास्त लोक काम करू लागले.
- बौद्ध आयडेंटिटी निर्माण झाली.
- महारवाडे, चावडी वस्त्यांचे रुपांतर बौद्ध वसाहतींमध्ये झाले.
- विविध सामाजिक संघटना निर्माण झालेल्या आहेत. मुंबईमध्ये प्रत्येक बुद्धविहारात जोडून महिला मंडळे, युवक मंडळे धम्मकार्य करताना दिसतात.
- धम्मस्वीकारानंतर बौद्ध समाजाचे शिक्षणाकडे जास्त लक्ष दिलेले आहे. त्यातून आर्थिक विकास साध्य केलेला दिसतो.
- सामाजिक समतेबरोबरच स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार समाजाने केलेला आहे.
- जबरदस्त सामुदायिक ऐक्य निर्माण झालेले आहे. अन्यायाच्या विरोधात एकत्र येतात. उदा. भूमीहिनांचे आंदोलन असो, नामांतर आंदोलन असो कि घाटकोपर रमामाता कॉलनी पुतळा विटंबनाविरुद्ध आंदोलन असो. मात्र समाजात सर्वात जास्त जागृत असलेला समाज आहे. आपल्या हक्काविषयी जागृत आहे.

- त्यांची चळवळ हिंसक अथवा आक्रमक नसते.
- लोकशाही शासनव्यवस्थेवर प्रचंड विश्वास आहे. त्यादृष्टीनेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, घटनादिन साजरे करतात.
- डॉ. आंबेडकर जयंती, बुद्धजयंती आणि धम्मचक्र परिवर्तनदिन मोठ्या प्रमाणात साजरे करतात. या दिवशी धम्मप्रवचने, व्याख्यानांचे आयोजन केले जाते.
- धर्म स्थलांऐवजी स्मृतिस्थळांना भेटी देतात. धम्मयात्रांचे आयोजन केले जाते.
- मोठ्या प्रमाणात वाचन संस्कृती निर्माण झालेली आहे.

**४.६ सारांश :**

अशा प्रकारे बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर नवदीक्षित बौद्ध समाजाच्या जीवनात वरीलप्रमाणे आमुलाग्र बदल घडून आले. त्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक जीवनावर धम्मस्वीकाराचा प्रभाव पडला. गेल्या पन्नास वर्षात जे परिवर्तन त्यांच्यामध्ये झालेले आहे, ते लक्षणीय असून दखल घेण्यासारखे आहे.

## ४.७ संदर्भ :


१. Narke Hari, editor Dr. Ambedkar writing and speeches vol No.17, Part II Government Central Press, Mumbai, 2003, Page No.415. Times of India 1936.

२. खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, इंद्रायणी, पुणे आवृत्ती दुसरी, २००४, पृष्ठ क्र.१३१.

३. रायकर यशवंत, (संपादक), मुंबई ज्ञात-अज्ञात, राजहंस, पुणे, १९१९, पृष्ठ क्र.५०.

४. कित्ता, पृष्ठ क्र.६९.

५. गांजरे मा.फि.(संपादक), डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड एक, सुगावा, १९८५, पृष्ठ क्र.१०९.

६. कीर धनंजय, डॉ. आंबेडकर, पॉप्युलर, आवृत्ती चौथी, २००६ पृष्ठ क्र.५२२.

७. कीर धनंजय, तत्रैव.

८. पवार ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड एक, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.४२.

९. सोनवणे सुनील, बौद्ध कला आणि साहित्य, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक चळवळ, उल्हासनगर, १९९४, पृष्ठ क्र.४६.

१०. नातेकर विजय, आर.पी.आय. नेत्यांच्या शोधात, सुगावा, पुणे, २००६, पृष्ठ क्र.९१.

११. सोनवणे सुनील, बौद्ध कला आणि साहित्य, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक चळवळ, उल्हासनगर, १९९४, पृष्ठ क्र.४६.

१२. पगारे तुलसी, संकलन, भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना, सुगत, नागपूर,२००४, पृष्ठ क्र.८.

१३. कांबळे बी. सी., (संपादक), रिपब्लिकन साप्ताहिक, ९ जून, १९६०, मुंबई, पृष्ठ क्र.१३.

१४. कांबळे बी. सी., (संपादक), तत्रैव.

१५. कांबळे बी. सी., (संपादक), तत्रैव.

१६. कांबळे बी. सी., (संपादक), तत्रैव.

१७. पवार ज. वि., रिपब्लिकन ऐक्याची शोकांतिका, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, १९९४, पृष्ठ क्र.१०.

१८. महाराष्ट्र टाईम्स, २३ मे, २००९, पृष्ठ क्र.२.

१९. दैनिक लोकसत्ता, पुरवणी, २४ मे, २००९, पृष्ठ क्र.३.

२०. भोसले व. रा. (संपादक), महाराष्ट्र राज्य सांख्यिकी गोषवारा, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. ६२८.

२१. नातेकर विजय, आर.पी.आय. नेत्यांच्या शोधात, सुगावा, पुणे, २००६, पृष्ठ क्र.६८.

२२. गारे गोविंद, महाराष्ट्रातील दलित शोध आणि बोध, सहाय्यगन, मुंबई, १९७३, पृष्ठ क्र.६.

२३. पवार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड पहिला, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.९८.

२४. नातेकर विजय, आर.पी.आय. नेत्यांच्या शोधात, सुगावा, पुणे, २००६, पृष्ठ क्र.१०.

२५. पवार ज.वि.सूर्यपुत्र, भैय्यासाहेब आंबेडकर, अस्मिता कम्युनिकेशन, २०००, पृष्ठ क्र.७०.

२६. डॉ. आंबेडकर बी. आर., भगत सूर्यकांत (अनु.), जातिभेद निर्मूलन, सुधीर, वर्धा, २००९, पृष्ठ क्र.७०.

२७. Narke Hari, editor Dr. Ambedkar writing and speeches vol No.17, Part II Government Central Press, Mumbai, 2003, Page No.395.

२८. मून वसंत, (संपादक), डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.११.

२९. सुखाडे विजय, (संपादक), डॉ.बाबासाहेब आंबेडकर लोकवाङ्मय, आवृत्ती दुसरी, मुंबई, २००८, पृष्ठ क्र.१५४.

३०. Narke Hari, editor Dr. Ambedkar writing and speeches vol No.17, Part II Government Central Press, Mumbai, 2003, Page No.407.

३१. गजभिये संजय, सैनिक दल, इतिहास और संघर्ष, सम्यक, नई दिल्ली, २००८, पृष्ठ क्र.१७६.

३२. पवार उर्मिला/मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री उवाच, मुंबई, १९८९, पृष्ठ क्र.४८.

३३. कित्ता, पृष्ठ क्र.७४.

३४. पगारे तुलसी, संकलन, समता सैनिक दलाची घटना, शगुन, नागपूर, २००४, पृष्ठ क्र.१२.

३५. गजभिये संजय, सैनिक दल, इतिहास और संघर्ष, सम्यक, नई दिल्ली, २००८, पृष्ठ क्र.१५.

३६. मून वसंत, (संपादक), डॉ.आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग २, महाराष्ट्र राज्य, शासकीय मुद्रणालय, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.२४५.

३७. पवार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड दुसरा, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.२८.

३८. देवळेकर सूर्यकांत, (संपादक), बौद्धजन पंचायत समिती सुर्वण महोत्सव स्मरणिका, बौद्ध जैन पंचायत समिती, मुंबई, १९९१, पृष्ठ क्र.१९.

३९. देवळेकर सूर्यकांत, (संपादक), तत्रैव.

४०. भदंत राहूल बोधी, (संपादक), सर्वोदय महाविहार स्मरणिका, सर्वोदय बुद्ध विहार, मुंबई, २००९, पृष्ठ क्र.२०.

४१. पवार ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड दुसरा, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.२३.

४२. कित्ता, पृष्ठ क्र.४६.

४३. कित्ता, पृष्ठ क्र.२३.

४४. पवार ज. वि., तत्रैव, पृष्ठ क्र.२३.

४५. देवळेकर सूर्यकांत, (संपादक), बौद्धजन पंचायत समिती सुर्वण महोत्सव स्मरणिका, बौद्ध जैन पंचायत समिती, मुंबई, १९९१, पृष्ठ क्र.२३.

४६. तत्रैव.

४७. आसवारे व्ही.एस्., बॉम्बे शेड्युल्ड कास्ट इंम्प्रव्हमेंट ट्रस्ट बाईट प्रिंट, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.१३.

४८. तत्रैव.

४९. सामंत बाळ, (संपादक), बृहन्मुंबई शताब्दी विशेषांक, मुंबई महानगरपालिका, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र.१४५.

५०. आंबेडकर बाबासाहेब, घोडेस्वार देविदास अनु. दलितांचे शिक्षण, क्षितीज, नागपूर, आवृत्ती चौथी, २००४, पृष्ठ क्र.१००.

५१. सामंत बाळ, (संपादक), बृहन्मुंबई शताब्दी विशेषांक, मुंबई महानगरपालिका, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र.१४६.

५२. तत्रैव.

५३. आंबेडकर बाबासाहेब, घोडेस्वार देविदास अनु. दलितांचे शिक्षण, नागपूर, २००१ पृष्ठ क्र.१०८.

५४. कित्ता, पृष्ठ क्र. ९.

55. The Indian Journal of social work, vol. 60 (3), July, 1999, Page No.401.

56. Moon Vasant, editor, Dr. Ambedkar writing and speeches voI II education Dept. Maharashtra Govt., Mumbai, 1982, Page No. 407-408.

57. Narke Hari, editor Dr. Ambedkar writing and speeches vol II Government Central Press, Mumbai, 2003, Page No.431.

५८. सुरवाडे अरविंद, धम्मचक्र परिवर्तनाची फलश्रुती, सम्यक, मुंबई, २००७, पृष्ठ क्र.१९.

५९. मेश्राम केशव, धर्मांतराचे अर्धशतक, लोकवाङ्मय, मुंबई, आवृत्ती दुसरी, २००७, पृष्ठ क्र.३३.

६०. कांबळे बी. सी., रिपब्लीकन पक्षाने का लढावे? पुस्तिका, प्रकाशन, तारीख उपलब्ध नव्हती.

६१. कांबळे बी.सी., जगातील मानवाने बुद्ध धम्मच पसंद करावा असे मी का म्हणतो? रयत भारत प्रिटींग प्रेस, मुंबई, प्रकाशन वर्ष उपलब्ध नव्हते.

62. Narke Hari, editor Dr. Ambedkar writing and speeches vol 17/2 Maharashtra Government Press, Mumbai, 2003, Page No.478-479.

63. Ibid, Page No. 481.

६४. पवार ज. वि., सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर, दि बुद्धीष्ट सोसायटी ऑफि इंडिया, आवृत्ती दुसरी, २००४, पृष्ठ क्र.११४.

६५. कित्ता, पृष्ठ क्र.११९.

६६. गोटे चंदन, (संपादक), धम्मशासन, ठाणे, दि. ७ एप्रिल, २००९, पृष्ठ क्र.१२.

६७. कांबळे बबन, (संपादक), दैनिक वृत्तरत्न सम्राट, मुंबई, दि. ९ जानेवारी, २००९, पृष्ठ क्र.४.

६८. जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपादक), मराठी विश्वकोश, खंड ८, महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळ, १९८२, पृष्ठ क्र.४८.

६९. मेश्राम केशव, धर्मांतराचे अर्धशतक, लोकवाङ्मय, आवृत्ती दुसरी, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.८७.

70. Mutafa Faizan/Sharma Anurag, Conversion : Constitutional and Legal Implication, Kanishka, Delhi, 2003, Page No.63.

७१. जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपादक), मराठी विश्वकोश, खंड ८, महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळ, १९८२, पृष्ठ क्र.४८.

७२. जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपादक), तत्रैव, पृष्ठ क्र.४८.

७३. कित्ता, पृष्ठ क्र.४९.

७४. जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपादक), मराठी विश्वकोश, खंड ७, महाराष्ट्र राज्य विश्वकोश मंडळ, १९७७, पृष्ठ क्र.८०२.

७५. कित्ता, पृष्ठ क्र.८०३.

७६. कित्ता, पृष्ठ क्र. ८०३.

७७. आसावरे व्ही. एस्., (संपादक), सम्यक संकल्प, पिपल्स इंम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.४४.

७८. संघरक्षित महास्थविर, धम्मचारी विमल किर्ती अनु, डॉ.आंबेडकर आणि बौद्ध धम्म, दि कार्पोरेशन बॉडी ऑफि बुद्धा एज्युकेशन फाउंडेशन, तैवान, २००६, पृष्ठ क्र.१५३.

७९. आंबेडकर बी. आर., घनःश्याम तळवटकर/रेगे (अनु.), सिद्धार्थ, मुंबई, १९७०, पृष्ठ क. ३५२.

८०. गुणसाटी विमलकिर्ती, दिव्यदर्शन, प्रज्ञा, पुणे, २००१, पृष्ठ क्र.३१.

८१. शिवजातक दादासाहेब, डॉ.आंबेडकर जयंती विशेषांक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, २००७, पृष्ठ क्र.१५९.

८२. कित्ता, पृष्ठ क्र.५६.

83. Robinsion Rowena, Religious convesion in India Modes, Motivations and Meaning, Oxford Uni. Press IInd impression, Delhi, 2008, Page No.193.

८४. लिंबाळे शरण कुमार, शतकातील दलित विचार, दिलीपराज, पुणे, २००१, पृष्ठ क्र.२४२.

८५. कित्ता, पृष्ठ क्र.२४३.

८६. जोगदंड पी.जी., दलित चळवळ, सिद्धांत आणि व्यवहार, प्रतिशब्द, मुंबई, २००६, पृष्ठ क्र. तक्ता, पृष्ठ क्र.

८७. Singh Yogendra, Modernization of Indian tradition, Rawat, Jaipur/New Delhi/Reprinted, 1999 Page No.7.

८८. Ibid, Page No.47.

89. Singh Songhesen, editor, Ambedkar Buddhist Conversion and the impact, Eastern Book Line leers, Delhi, 1990, Page No.19.

९०. म्हैसकर मनिषा(संपा.), लोकराज्य, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.२.

91. Zeliot Elinar, From untouchables to Dalit Eassys on the Ambedkar Movement, Manohar, Mumbai, 1992, Page No.94.

९२. खरात शंकरराव (संपादक), डॉ.आंबेडकरांचे धर्मांतर, इंद्रायणी, पुणे, २००६, पुनर्मुद्रण, पृष्ठ क्र. परिशिष्ट, पृष्ठ क्र.

९३. आंबेडकर बी.आर., बौद्ध उपासना पाठ, प्रभात प्रिटींग प्रेस, पुणे, १९५०.

९४. बौद्ध जीवन संस्कार पाठ, सुधारित आवृत्ती, दि बुद्धीष्ट सोसायटी ऑफि इंडिया, २००६.

९५. भदंत राहूल बोधी, धम्म मार्गदर्शिका, सर्वोदय बुद्ध विहार, मुंबई, २००९, आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र.१४१.

९६. रामटेके कांबळे, तारदाळकर, नागपूरची धम्मक्रांती, मुक्ती संग्राम, महाड, १९८१, पृष्ठ क्र.१३८

97. Beltz Johannes, Mahar, Dalits and Buddhist Religious, comersion, soci-political emancipation Manohar, Delhi, 2005, Page No.164.

९८. (संपादक), गायकवाड भा.कृ., प्रबुद्ध भारत, महानिर्वाण विशेषांक, १९५६, बुद्ध भूषण प्रेस, मुंबई, १९५७, पृष्ठ क्र.४५.

९९. कांबळे बी. सी., रिपब्लिकन साप्ताहिक, अंक ८ वा, दि. ९ जून, १९६०, पृष्ठ क्र.१२.

१००. कित्ता, पृष्ठ क्र.१७.

१०१. सोनावणे सुनील, संपा., युगंधर, महापरिनिर्वाण विशेषांक, १९९२, पृष्ठ क्र.९.

१०२. कांबळे बी.सी., संपा., बौद्धांची कैफियत, वैद्य ब्रदर्स प्रेस, मुंबई, १९५६, पृष्ठ क्र.२७,२८,२९.

१०३. मून वसंत, (संपा.), डॉ. आंबेडकर आणि धम्मक्रांती, फुलराणी साहित्य सहवास, मुंबई, १९७८, पृष्ठ क्र.१९.

१०४. म्हैसकर मनिषा, (संपा.), लोकराज्य अंक ८ वा, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.१४८.

१०५. गायकवाड भाऊसाहेब (संपा.), प्रबुद्ध भारत, बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९५७, पृष्ठ क्र.७.

१०६. गायकवाड भाऊसाहेब (संपा.), तत्रैव.

१०७. पवार ज. वि., आंबेडकरोत्त आंबेडकरी चळवळ, खंड १, कौशल्य, औरंगाबाद, आवृत्ती दुसरी, २००७, पृष्ठ क्र.२३.

१०८. उर्मिला/मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री उवाच, मुंबई, १९८९, पृष्ठ क्र.११८.

१०९. लोकनायक, दैनिक वृत्तपत्र, दि.१७ नोव्हेंबर, २००६, पृष्ठ क्र.४.

११०. गवई मधू, समाजवादी धम्मक्रांती, ड्रॅगन, बुलढाणा, २००७, पृष्ठ क्र.८७.

१११. सम्राट वृत्तपत्र, दि.२८ मे, २००७, पृष्ठ क्र.३.

112. The Times of India, Date 28 May, 2007, Page No.4.

113. Singh Sanghsen, editor, Ambedkar Buddhist Conversion and its impact, eastern Boom, leenleters, Delhi, 1990, Page No.7.

११४. (संपादक), एलिनार झेलिएट, चिंचाळ मेत्तानंद (अनु.), बौद्ध धम्म पुनर्शोध कार्य व डॉ.आंबेडकरांची धम्मदिशा, सुमेध, पुणे २००६, पृष्ठ क्र.९.

११५. गायकवाड भाऊराव, प्रबुद्ध भारत, आंबेडकर महानिर्वाण विशेषांक, मुंबई, १९५६, पृष्ठ क्र.२३.

116. Singh Sanghsen, editor, Ambedkar Buddhist Conversion and its impact, eastern Boom, leenleters, Delhi, 1990, Page No.8.

११७. एलिनार झेलिएट, चिंचाळ मेत्तानंद (अनु.), बौद्ध धम्म पुनर्शोध कार्य व डॉ.आंबेडकरांची धम्मदीक्षा, सुमेध, पुणे २००६, पृष्ठ क्र.१०.

118. Singh Sanghsen, editor, Ambedkar Buddhist Conversion and its impact, eastern Boom, leenleters, Delhi, 1990, Page No.8.

119. Census of India, 1931, Vol-8, Part I, General Report, Bombay Presidency Government Press, 1933, Page No.131.

120. Greater Bombay Diestrict Census, Handbook Bases on 1951 census, Government Press, Mumbai, 1956, Page No.131.

121. Ibid, Page No.132.

122. Patwardhan Sunanda, Changes Among India Harijan, Orient Laongman, Delhi, 1973, Page No.10.

123. Zacharia K.G.Migration in Greater Bombay, Demographic, Training and Research Center, Mumbai, 1964, Page No.221.

124. Ibid, Page No.503.

१२५. पाटणकर मनिषा, लोकराज्य, अंक ८ वा, महाराष्ट्र राज्य, २००६, पृष्ठ क्र.३२.

126. Patwardhan Sunanda, Changes Among India Harijan, Orient Laongman, Delhi, 1973, Page No.10.

127. Pandyan K. D., Dr. Ambedkar and Dynamics of New Buddhism, Gyan, New Delhi, 2009, Page No. 223.

128. Ibid.

१२९. कागळकर अ.कृ., महाराष्ट्र राज्य, सांख्यिकी गोषवारा, महाराष्ट्र शासन, १९८७-८८, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र.४८, परिशिष्ठ क्र.३.

१३०. भारताची जनगणना, १९८१, मालिका, १२, महाराष्ट्र, १९८४, चा प्रबंध एक, पृष्ठ क्र.४९.

131. Census of India, 1981, Series, 12, Maharshtra Part IX (iv) Special Table For Schedule tribes table, 54, Page No.1233.

132. Ibid, Page No.1237 to 1245.

१३३. सुरवाडे अरविंद, धम्मचक्र प्रवर्तन, फलश्रुती आणि आव्हाने, सम्यक, मुंबई, २००७, पृष्ठ क्र.६०.

१३४. कित्ता, पृष्ठ क्र.९४.

135. Census of India, 1991, Series, I, Part IV B (ii) Table C-9 For religion table, Page No.6.

136. Ibid, Page No.12.

137. Ibid, Page No.110 to 114.

138. Census of India, 1991, District Census Handbook Greater Bombay, Mumbai, 1996, Page No.39.

१३९. महाराष्ट्र राज्य, सांख्यीकी गोषवारा, महाराष्ट्र राज्य, १९८७-८८, मुंबई, १९९१, पृष्ठ क्र.४८.

१४०. महाराष्ट्र राज्य, सांख्यीकी गोषवारा, १९९९-२०००, महाराष्ट्र राज्य सरकार, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.५२.

१४१. कित्ता, पृष्ठ क्र.५८.

१४२. वृत्तपत्र दैनिक सम्राट, दि.६ जून, २००१, पृष्ठ क्र.१.

143. Census of India, 2001, District Census Handbook, Part XII A & B Series 28, Maharashtra, Mumbai Directorial Of census Page No.300.

144. Ibid, Page No.302.

145. Census of India, 2001, District Census 28 Maharashtra Part XII A & B, Mumbai, Page No.524-25.

146. Census of India, 2001, District Census Handbook, Series 28, Maharashtra Part XII A & B, Greater Bombay, Page No.60.

१४७. भारतीय जनगणना, १९६१, जिल्हा जनगणना निर्देशक ग्रंथ, कुलाबा, महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई, १९६६, पृष्ठ क्र.२२.

१४८. तत्रैव.

१४९. तत्रैव, पृष्ठ क्र.२३.

१५०. १९५१, कुलाबा जिल्हा सेन्सस, मुंबई सरकार, पृष्ठ क्र.११६-१७.

१५१. प्रधान राम, आंबेडकर काल आज उदया, मायबोली, औरंगाबाद, पृष्ठ क्र.५८.

१५२. (संपादक), ठगे सुशिल, मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा, पुणे, २००४, पृष्ठ क्र.३१.

१५३. कित्ता, पृष्ठ क्र. ४३.

१५४. दुनबळे त्र्यंबक, धर्मांतराचे अंतरंग, सुगावा, पुणे, २०००, पृष्ठ क्र.१००.

१५५. भाले भास्कर/किटाळ किशोर., बदलता महाराष्ट्र आवृत्ती दुसरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००३, पृष्ठ क्र.१३९.

१५६. मुलाखत : डॉ.सई देशपांडे, दि.२५/०२/२०१०.

१५७. मनोहर यशवंत, डॉ.आंबेडकर गौरव ग्रंथ, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९९१, पृष्ठ क्र.१४६.

१५८. पानतावणे गंगाधर., दलित साहित्य चर्चा आणि चिंतन, साकेत, औरंगाबाद, १९९३, पृष्ठ क्र.६.

१५९. देवडेकर आनंद., सदधम्म पत्रिका, दि.जानेवारी, २००६, पृष्ठ क्र.२७.

१६०. रा. ग., निळी पहाट, श्रीविद्या, पुणे आवृत्ती तिसरी, १९९१, पृष्ठ क्र.३८.

१६१. भाग्यवंत बबन, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय, औरंगाबाद, २००८, पृष्ठ क्र. २८.

१६२. मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य उद्‌गम आणि विकास, श्रीमंगेश, नागपूर, १९९८, पृष्ठ क्र. ४३.

१६३. अडसूळ भालेराव, आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य, सुगावा, पुणे, १९९६, पृष्ठ क्र. ५.

१६४. कित्ता, पृष्ठ क्र. ६.

१६५. सोनवणे सुनील/सोनकांबळे नारायण (संपा.), युगंधर मासिक, मासिक तिसरे, अंक ५ वा, धम्मविषयक शैक्षणिक साहित्य चळवळ, उल्हासनगर, १९९३, पृ. २२.

१६६. रणपिसे आप्पासाहेब, आंबेडकरी संप्रदायाचे समालोचन प्रणेता, द्वितीय आवृत्ती, मुंबई, १९९९, पृष्ठ क्र. प्रस्तावना पृ.

१६७. खंडेराव हरीष, आंबेडकरी कवितेचे अंतरंग, प्रज्ञा, उल्हासनगर, आवृत्ती दुसरी, २००१, पृष्ठ क्र.२४.

१६८. सोनावणे सुनील, बौद्ध साहित्य आणि सम्यक क्रांती, अस्मिता धम्मविषयक साहित्य चळवळ, उल्हासनगर, २००६, पृष्ठ क्र.१११.

१६९. सामंत बाळ, बृहन्मुंबई शताब्दी विशेषांक, मुंबई महानगरपालिका, मुंबई, १९२३, पृष्ठ क्र.१९३.

१७०. कांबळे बबन, वृत्तपत्र सम्राट, दि.१६ ऑक्टोंबर, २००८, पृष्ठ क्र.४.

१७१. आंबेडकर बी.आर., तळवटकर/चिटणीस/रेगे अनु.भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, सिद्धार्थ १९६०, मुंबई, १९६०, पृष्ठ क्र. प्रस्तावना, पृष्ठ क्र.

१७२. आंबेडकर बी.आर., बौद्ध उपासना पाठ, प्रभात प्रिटींग प्रेस, १९५०, पृष्ठ क्र.प्रस्तावना, पृष्ठ क्र.

१७३. नरके हरी, डॉ.आंबेडकर लेख आणि भाषणे, खंड २०,महाराष्ट्र शासन,मुंबई, २००५, पृष्ठ क्र.१३.

१७४. रणपिसे अप्पासाहेब, आंबेडकरी संप्रदायाचे समालोचन, प्रणेता, आवृत्ती दुसरी, मुंबई, १९९९, पृष्ठ क्र.प्रस्तावना, पृष्ठ क्र.

१७५. वाघमारे मोहन, आंबेडकरवाछी साहित्य समिक्षा, लुंबिनी, मुंबई, २०००, पृष्ठ क्र.६४.

१७६. कित्ता, पृष्ठ क्र.५८.

१७७. कित्ता, पृष्ठ क्र.५६.

१७८. ज. वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, आवृत्ती दुसरी, कौशल्य, औरंगाबाद, २००६, पृष्ठ क्र.८.

१७९. सोनावणे सुनील, उपसंपदा, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्य चळवळ, उल्हासनगर, २०००, पृष्ठ क्र.मनोगत पृष्ठ क्र.

१८०. मनोहर यशवंत, बौद्ध संस्कृती आणि साहित्य, युगसाक्षी, नागपूर, २००९, पृष्ठ क्र.५६.

१८१. सोनवणे सुनील, कला आणि साहित्य, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक चळवळ, उल्हासनगर, १९९४, पृष्ठ क्र.३९.

१८२. भोळे भास्कर., बदलता महाराष्ट्र आवृत्ती दुसरी, डॉ.आंबेडकर अकादमी, सातारा, २००३, पृष्ठ क्र.१३९.

१८३. जोगदंड पी.जी., दलित चळवळ, सिद्धांत आणि व्यवहार, प्रतिशब्द, २००६, पृष्ठ क्र.२०.

१८४. सोनवणे सुनील, बौद्ध साहित्य प्रेरणा आणि चळवळ, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्य चळवळ, उल्हासनगर, २००३, पृष्ठ क्र.१०४.

१८५. कऱ्हाडे सदा, दलित चिकित्सा स्वरूप, औरंगाबाद, २००१, पृष्ठ क्र.१३.

१८६. देवडेकर आनंद, सद्धम्म पत्रिका, मुंबई, जानेवारी, २००५, पृष्ठ क्र.१३९.

187. Patel Sujata/Thornier Alice, Editor, Bombay : Mosaic of Modern culture, Oxfort Uni. Press, Delhi-Culcutta-Madras, 1995, Page No.113.

१८८. मनोहर यशवंत, बौद्ध संस्कृती, युगसाक्षी, नागपूर, २००९ पृष्ठ क्र.८९.

१८९. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा, पुणे, १८८५, पृष्ठ क्र.२३९.

१९०. मेश्राम योगेश, दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्री.मंगेश, नागपूर, १९९४, पृष्ठ क्र.६० ते ६२.

१९१. मुरुगकर लता, दलित पँथर, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र.६४.

१९२. पानतावणे गंगाधर, दलित साहित्य आणि चिंतन, साकेत, औरंगाबाद, १९९३, पृष्ठ क्र.८१.

१९३. डोळस वसंत, दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप, अक्षरजुळणी, पुणे, १९९२, पृष्ठ क्र.३६.

१९४. ठगे सुशील, मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा, पुणे, २००४, पृष्ठ क्र.१०२.

195. Patel Sujata/Thornier Alice, Editor, Bombay : Mosaic of Modern culture, Oxfort Uni. Press, Delhi-Culcutta-Madras, 1995, Page No.113.

१९६. पवार दया, बलुत, ग्रंथाली, आवृत्ती सहावी, मुंबई, १९९५, पृष्ठ क्र.१५६.

१९७. धोंगडे रमेश, दलित आत्मचरित्रे साहित्य आणि समाज, मधूराज, पुणे, १९९४, पृष्ठ क्र.३१.

१९८. धोंगडे रमेश, तत्रैव.

१९९. पानतावणे गंगाधर, अस्मिता दर्श, वर्ष-३२, अंक-२, औरंगाबाद, १९९९, पृष्ठ क्र.२२.

२००. कित्ता, पृष्ठ क्र.२१.

२०१. कांबळे बेबी, जिण आमंच, सुगावा, आवृत्ती तिसरी, पुणे, २००८, पृष्ठ क्र. प्रस्तावना, पृष्ठ क्र.

२०२. कित्ता, पृ.

२०३. कऱ्हाडे सदा, दलित साहित्य : चिकित्सा, स्वरूप, औरंगाबाद, २००१, पृष्ठ क्र.६१.

२०४. मनोहर यशवंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गौरव ग्रंथ, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९९१ पृष्ठ क्र.१४९.

२०५. डांगळे अर्जुन, दलित साहित्य:एक अभ्यास, सुगावा, आवृत्ती दुसरी, पुणे, १९९८, पृष्ठ क्र.४८.

२०६. मेश्राम योगेश, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, श्रीमंगेश, नागपूर, १९९८, पृष्ठ क्र.३३८.

२०७. निर्मले हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा, पुणे, १९२७, पृष्ठ क्र.१५७.

२०८. वाघमारे मोहन, आंबेडकरवादी साहित्य समिक्षा, लुंबीनी, मुंबई, २०००, पृष्ठ क्र.४७.

२०९. औचरमल एल्. वाय., आंबेडकरवादी साहित्य आणि इतिहास पद्धती, वैभव, उल्हासनगर, २००१, पृष्ठ क्र.१६.

२१०. काटकर राजेंद्र, आंबेडकरवाद, सुधीर, वर्धा, २००९, पृष्ठ क्र.१९.

२११. मुरुगकर लता, दलित पँथर, सुगावा, पुणे, १९९५, पृष्ठ क्र.५.

२१२. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थितंतरे, आकांक्षा, नागपूर, २००९, पृष्ठ क्र.९८.

२१३. सोनावणे सुनील, बौद्ध साहित्य प्रेरणा आणि चळवळ, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक चळवळ, उल्हासनगर, २००३, पृष्ठ क्र.१११.

२१४. धम्मचारी लोकमित्र, बुद्धयान, अंक-२०, ऑक्टोबर, डिसेंबर, १९९४, पृष्ठ क्र.१९.

२१५. औचरमल एल्.वाय., आंबेडकरवादी सहित्य आणि इतिहास पद्धती, वैभव, उल्हासनगर, २००१, पृष्ठ क्र.४६.

२१६. सोनावणे सुनील, बौद्ध साहित्य प्रेरणा आणि चळवळ, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक चळवळ, उल्हासनगर, २००३, पृष्ठ क्र.१८.

२१७. ठाकूर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा, पुणे, २००५, पृष्ठ क्र.१०१.

२१८. कित्ता, पृष्ठ क्र.१३१.

२१९. कित्ता, पृष्ठ क्र.३४६.

२२०. कित्ता, पृष्ठ क्र.२९१.

२२१. भाग्यवंत बबन, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय, औरंगाबाद, २००८, पृष्ठ क्र.२४.

२२२. कित्ता, पृष्ठ क्र.२७.

२२३. ठाकूर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा, पुणे, २००५, पृष्ठ क्र.३१६.

२२४. कर्डक वामनदादा, भीमा तुझ्या जन्मापूर्वी, कौशल्य, औरंगाबाद, २००७, पृष्ठ क्र.५.

२२५. कर्डक वामनदादा, बुद्ध गीते, कौशल्य, औरंगाबाद, २००९, पृष्ठ क्र.२०.

२२६. (संपादक), वाघ गंगाधर, आंबेडकरी योद्धे, राहूल डोंबीवली, २००६, पृष्ठ क्र.९.

२२७. कर्डक वामनदादा, भीमा तुझ्या जन्मापूर्वी, कौशल्य, औरंगाबाद, २००७, पृष्ठ क्र.३.

२२८. मोकाशी मधुकर, दलित रंगभूमी, स्नेहवर्धत, पुणे, २००९, पृष्ठ क्र.६.

२२९. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा, नागपूर, २००९, पृष्ठ क्र.१४८.

२३०. कित्ता, पृष्ठ क्र.४२.

२३१. भाग्यवंत बबन, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय, औरंगाबाद, पृष्ठ क्र.७३.

२३२. कांबळे बबन, दैनिक सम्राट, दि.१६ डिसेंबर,२००६, पृष्ठ क्र.४.

२३३. मनिषा पाटणकर, लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचानलाय, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑक्टोबर, २००६, पृष्ठ क्र.१३३.

२३४. भाग्यवंत बबन, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय, औरंगाबाद, २००८, पृष्ठ क्र.२३९.

२३५. निर्मले हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा, पुणे,१९८७, पृष्ठ क्र.७/८.

२३६. भोसले व.रा., महाराष्ट्र राज्य, सांख्यिकी गोषवारा, २०००-२००१, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र.२१४ ते १९.

२३७. निर्मले हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा, पुणे,१९८७, पृष्ठ क्र.३१.

२३८. सामंत बाळ, मुंबई महानगरपालिका, शताब्दी अंक, मुंबई महानगरपालिका, मुंबई,१९९३, पृष्ठ क्र.१८२.

२३९. मून मीनाक्षी, ङ्कले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता, नागपूर, २०००, पृष्ठ क्र.

२४०. अहिरे गंगाधर, समता संग्रामाची पन्नास वर्षे, सम्यक, प्रबोधन सभा, नाशिक, २००६, पृष्ठ क्र.१२५.

२४१. कांबळे बबन, दैनिक सम्राट, दि.२३ नोव्हेंबर, २००६, पृष्ठ क्र.५.

२४२. सोनावणे सुनील, युगंधर, वर्ष १४, अंक ८२, अस्मिता दर्श शैक्षणिक साहित्यिक चळवळ, उल्हासनगर, २००४, पृष्ठ क्र.७.

२४३. वाघ गंगाधर, आंबेडकरी योद्धे, राहूल डोंबिवली, २००६, पृष्ठ क्र.१२६.

२४४. निर्मले हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा, पुणे,१९८७, पृष्ठ क्र.१५७.

245. Bletze Jphannes, Mahar Buddhist and Dalit Religion conversion and socio-political emancipation, Manohar, Delhi, 2005, Page No.225.

२४६. रानडे फिरोज/रानडे रश्मी, महिमा मुंबईचा, ग्रंथाली, मुंबई, २००४, पृष्ठ क्र.कव्हर पृष्ठ क्र.

२४७. कित्ता, पृष्ठ क्र.७५.

२४८. सामंत बाळ, बृहन्मुंबई शताब्दी विशेषांक, मुंबई महानगरपालिका, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र.४४.

२४९. झेलियट एलिनार, चिंचाळ मेत्तानंद, अनु.बौद्धधम्म पुर्नशोध कार्य व डॉ.आंबेडकरांची धम्मदीक्षा, सुमेध, २००६, पृष्ठ क्र.१८.

२५०. रानडे फिरोज/रानडे रश्मी, भीमा मुंबईचा, ग्रंथाली, मुंबई, २००४, पृष्ठ क्र.१४८-४९.

२५१. झेलियट एलिनार, चिंचाळ मेत्तानंद, अनु.बौद्धधम्म पुर्नशोध कार्य व डॉ.आंबेडकरांची धम्मदीक्षा, सुमेध, २००६, पृष्ठ क्र.२९.

२५२. भदंत राहूल बोधी, सर्वोदय महाबुद्धविहार स्मरणिका, मुंबई, सर्वोदय बुद्धविहार, मुंबई, २००७, पृष्ठ क्र.७.

२५३. मुलाखत, भदंत राहूल बोधी, दि.१२/०२/२०१०.

२५४. माहितीपत्रक सर्वोदय बुद्धविहार, मुंबई.

२५५. पाठक अरुणचंद्र, स्थापत्य कला, खंड १, भाग २, राज्य गॅझेटियर दर्शनिका विभाग, मुंबई, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.२.

२५६. रानडे फिरोज/रानडे रश्मी, महिमा मुंबईचा, ग्रंथाली, मुंबई, २००४, पृष्ठ क्र.९.

२५७. पाठक अरुणचंद्र, स्थापत्य कला, खंड १, भाग २, राज्य गॅझेटियर दर्शनिका विभाग, मुंबई, मुंबई, २००२, पृष्ठ क्र.५.

२५८. पवार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड पहिला, आवृत्ती दुसरी, कौशल्य, औरंगाबाद, २००७, पृष्ठ क्र.७९.

२५९. गोटे चंदन, धम्मशासन, मुंबई, दि.१८ ऑगस्ट, २००९, पृष्ठ क्र.४.

260. Patel Sujata/Thornier Alice, Editor, Thinking Science in India, Eassage in honour of Alice Thornier Sagar, New Delhi, 2002, Page No.403.

२६१. कांबळे बबन, दैनिक सम्राट, दि.२२ एप्रिल, २००९, पृष्ठ क्र.६.

२६२. भंतेजी राहूल बोधी, सर्वोदय, स्मरणीका, सर्वोदय महाबुद्धविहार, मुंबई, २००८, पृष्ठ क्र.११-१२.

263. Bletze Jphannes, Mahar Buddhist and Dalit Religious Conversion and Social Political Emancipation, Manohar, Delhi, 2005, Page No.208.

२६४. धम्मचारी लोकमित्र, बुद्धयान, त्रैमासिक, सीहनाद, नागपूर, ऑक्टोबर-डिसेंबर, १९९८, पृष्ठ क्र.७.

२६५. मुलाखत : खेमसेन धम्मचारी, दि.०३/११/२००९.

२६६. मुलाखत : धम्मचारी तेजवीर दि.०२/११/२००९.

267. Patel Sujata, Editor, Thinking Social Science in India, Eassage in honour of Alice Thornier Sagar, New Delhi, 2002, Page No.403.

२६८. गोटे चंदन, धम्मशासन, ठाणे, दि.१६ जून, २००९, पृष्ठ क्र.३.

२६९. गोटे चंदन, धम्मशासन, ठाणे, दि.१४ जून, २००८, पृष्ठ क्र.३.

२७०. देवळेकर सुर्यकांत, बौद्धजन पंचायत समिती विशेषांक, मुंबई, १९९१, पृष्ठ क्र.२२.

२७१. भदंत राहूल बोधी, स्मरणिका, सर्वोदय बुद्धविहार, मुंबई, २००६, पृष्ठ क्र.१६.

२७२. सावंत मंगेश, मुंबईतील विहारे आणि स्तूप : एक अभ्यास, १९५६-२००६, मुंबई विद्यापीठ, एम्.फिल.अप्रकाशित प्रबंध, २००९, पृष्ठ क्र.१०९.

273. Bletze Jphannes, Mahar Buddhist and Dalit Religious Conversion and Social Political Emancipation, Manohar, Delhi, 2005, Page No.199.

274. Ibid, Page No.198.

२७५. ठाकूर भगवान, आंबेडकरवादी साहित्य स्थिती आणि स्थितंतरे, आकांक्षा, नागपूर, २००९, पृष्ठ क्र.९४.

276. Chandra Ramesh/Mitra Sangha, Dalit Identity in the New Millenium, Commonwealth Vol X, New Delhi 2003, Page No.2.

२७७. सुरवाडे अरविंद, धम्मचक्र प्रवर्तन, फलश्रुती आणि आव्हाने, २००६, मुंबई, पृष्ठ क्र.१९.

२७८. कित्ता, पृष्ठ क्र.२०.

२७९. सुरवाडे अरविंद, तत्रैव.

२८०. मेश्राम केशव, धर्मांतराचे अर्धशतक, आवृत्ती दुसरी, लोकवाङ्मय, मुंबई, २००७, पृष्ठ क्र.३३.

२८१. मून मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळी समता, नागपूर, २००२, पृष्ठ क्र.७१.

282. Economic and Political Weekly, Vol.36 (18), May, 5, 2001, Page No.1554.

२८३. कुलकर्णी सुहास, अर्धी मुंबई, मॅजेस्टिक, मुंबई, २००४, आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र.१५२.

२८४. अत्रे त्रि.ना., गावगाडा पॉप्युलर, आवृत्ती तिसरी, १९५९, पृष्ठ क्र ६२ ते ६४.

२८५. ब्रह्मे सुलभा, दलितांच्या समस्या, साप्ताहिक मुद्रणालय, पुणे, १९७३, पृष्ठ क्र.६.

286. Patwardhan Sunanda, Change Among Indias Harijans, Orient Laongman, New Delhi, 1973, Page No.71.

287. Ibid, Page No.69.

२८८. Ibid, Page No.78.

289. Rajshekhar V.J., Brahminism Weapons to flight counter Revolution, Delhi Sahitya Acadamy, Banglow, 2004, Page No.51.

२९०. मून वसंत/नरके हरी, डॉ.आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग २, महाराष्ट्र शासन, २००२, मुंबई, पृष्ठ क्र.४२७.

२९१. मून मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ समता, नागपूर, २००२, पृष्ठ क्र.९६.

२९२. कित्ता, पृष्ठ क्र.६६.

२९३. कित्ता, पृष्ठ क्र.९८.

२९४. मून मीनाक्षी/पवार उर्मिला, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री उवाच, मुंबई, १९८९ पृष्ठ क्र.१२२.

२९५. पवार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड दोन, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, पृष्ठ क्र.१२१.

२९६. मून मीनाक्षी/पवार उर्मिला, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री उवाच, मुंबई, १९८९ पृष्ठ क्र.७२.

२९७. कित्ता, पृष्ठ क्र.१४५.

२९८. कित्ता, पृष्ठ क्र.८५.

२९९. कांबळे बी. सी. (संपा.), रिपब्लिकन, दि. २९ सप्टेंबर १९६०.

३००. मुलाखत : अनुराधा रोकडे, दि. १२/०२/२०१०.

३०१. मुलाखत : अनुराधा रोकडे, दि. १२/०२/२०१०.

३०२. मुलाखत : अनुराधा रोकडे, दि. १२/०२/२०१०.

३०३. धामणकर विनिशा, विस्तारलेले आकाश, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००९, पृष्ठ क्र.१०८-९.

३०४. तत्रैव, पृष्ठ क्र. ४८.

३०५. तत्रैव, पृष्ठ क्र. ७०-७१.

३०६. मुलाखत : मंगलाताई लोंढे, दि. १२ डिसेंबर, २००८.

३०७. सुरवाडे अरविंद, धर्मांतराची फलश्रुती आणि आव्हाने, सम्यक, मुंबई, २००७, पृष्ठ क्र. ४६.

❑❑

## प्रकरण पाचवे

# मूल्यमापन

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचा मुंबई शहर आणि उपनगरांवर पडलेला प्रभाव'' या प्रस्तुत प्रबंधाचा अभ्यास बौद्ध तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून केलेलला नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उद्देशाने धर्मांतर केले होते, तो उद्देश लक्षात घेऊन सीमित क्षेत्रापुरतेच विषयाचे मूल्यमापन करण्यात आले आहे. यामध्ये धर्मांतराच्या प्रभावक्षेत्राचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराला कारणीभूत ठरलेले प्रमुख घटक जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता हे असून त्यांच्या विविध परिणामांच्या परिघातून या विषयाचे मूल्यमापन केले आहे. त्या दृष्टीने धर्मांतराचा उद्देश सफल करण्यासाठी मुंबईतील सामाजिक व राजकीय संघटना कोणकोणते प्रयत्न करत आहेत याचे मूल्यमापन केले आहे. त्या निमित्ताने मुंबई शहर आणि उपनगरांतील महत्त्वाच्या बौद्धवस्त्यांना भेटी दिल्या. तेव्हा तेथील जे लोकजीवन, धार्मिक जीवन व सामाजिक-धार्मिक वातावरण अनुभवास आले त्यातून धर्मांतराच्या प्रभावाचे निरीक्षण करून मूल्यमापन केले आहे.

दि. १३ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे धर्मांतराची घोषणा भारतीय जातिव्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी केली होती. या धर्मांतर घोषणेचे उद्देश त्यांनी दि. ३० मे ते २ जून १९३६ या तीन-दिवसीय अखिल मुंबई इलाखा महार परिषदेमध्ये स्पष्ट केले होते. या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्ट्ये असून या जातिव्यवस्थेमुळे भारतातील एक फार मोठा वर्ग हजारो वर्षे सामाजिक, मानसिक, आर्थिक आणि धार्मिक गुलामगिरीमध्ये ठेवला गेला होता. या जातिव्यवस्थेमुळे त्यांचा कोणताच विकास होत नव्हता. या जातिव्यवस्थेला कंटाळून हजारो लोकांनी यापूर्वी धर्मांतरे केली होती. याला ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. यासाठी जातिव्यवस्थेतून बाहेर पडण्याचा धर्मांतर हा एकच मार्ग होता.

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे धर्मांतर केले त्यांची पार्श्वभूमीदेखील याच जातिव्यवस्थेमध्ये दिसून येते. या जातिव्यवस्थेला धर्मशास्त्राचा आधार देण्यात आलेला असून या जातिव्यवस्थेतून नंतरच्या काळात अस्पृश्यतेचा जन्म झाला आहे. अस्पृश्यतेचा उदय केव्हा झाला, याविषयी इतिहासकारांमध्ये विविध मतप्रवाह आहेत. या संदर्भात डॉ. आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचा उगम, तिची रचना आणि वाढ याविषयी संशोधनात्मक लिखाण केले होते. त्यानुसार भारतीय समाज हा आर्य, द्रविड, मंगोलियन, व सिंधीयन अशा वेगवेगळ्या वंशांच्या मिश्रणातून तयार झालेला आहे. या समाजात नंतरच्या काळात जातिव्यवस्था आणि नंतर अस्पृश्यता निर्माण झाली. अस्पृश्यतेचा जन्म ब्राह्मण आणि बौद्ध यांच्या संघर्षातून झाला असे डॉ. आंबेडकरांनी मांडले आहे.

अस्पृश्य समाजात महार, मांग, ढोर, चांभार आणि भंगी या जातींचा प्रामुख्याने समावेश होतो. एकोणिसाव्या शतकात म. फुलेंनी अस्पृश्य या शब्दाऐवजी अतिशूद्र ही संज्ञा वापरली होती. विसाव्या शतकात म. गांधींनी अस्पृश्यांचा उल्लेख हरिजन नावाने केला होता. ब्रिटिश काळात ज्यांच्या स्पर्शानेही विटाळ होते ते अस्पृश्य, असे स्पष्टीकरण करण्यात आले होते. इ.स. १९३१ मध्ये ब्रिटिशांनी जेव्हा मुंबई प्रांताचे जातीनुसार वर्गीकरण केले होते, त्यात पुढारलेल्या जाती, आदिवासी आणि दलित असे वर्गीकरणीही केले होते. पुढे इ.स. १९३५ च्या कायद्यान्वये अस्पृश्य जातींचा उल्लेख शेड्युल्ड कास्ट म्हणजेच अनुसूचित जाती असा करण्यात येऊ लागला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर याच नावाने या जाती ओळखल्या जाऊ लागल्या.

जातिव्यवस्थेतील स्पृश्य-अस्पृश्य कल्पनेमुळे समाजाचे सर्वच क्षेत्रांत नुकसान झालेले होते. म्हणूनच या वर्गातील लोकांनी बऱ्याचदा धर्मांतराचा मार्ग स्वीकारलेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर चळवळीचीदेखील हीच पार्श्वभूमी होती. डॉ. आंबेडकरांच्या सर्व चळवळींचे मुख्य केंद्र मुंबई होते. या ठिकाणी त्यांना चळवळीस आवश्यक ते वातावरण उपलब्ध झाले होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुंबईमध्ये जातिव्यवस्थेवर आधारित समाजरचना नव्हती. उलट ब्रिटिशांनी या ठिकाणी सहजीवनाचा पाया रोखला होता. त्यांनी केलेल्या औद्योगिकरण तसेच आधुनिकीकरणाचे फायदे मुंबईला मिळालेले होते. एक नवीन संस्कृती त्यांनी येथे प्रस्थापित केली होती. कायद्याचे राज्य हे या संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. त्यांनी केलेल्या सुधारणांमध्ये रेल्वे खाते,

पोस्ट खाते, पोलीस खाते, न्याय खाते, नगरपालिका व विद्यापीठे अशा अनेक नागरी सोयींचा फायदा स्पृश्यांप्रमाणेच अस्पृश्य वर्गालादेखील होऊ लागला. नोकरीची हमी आणि शिक्षणाच्या सोयी यामुळे अस्पृश्य समाजाने फार मोठ्या प्रमाणात मुंबईत स्थलांतर केले. याच ठिकाणी अस्पृश्य वर्ग संघटित होऊ लागला होता. त्याने आपल्या वसाहती निर्माण केल्या. मुंबईमध्ये गिरणी व रेल्वे येथे कर्मचारी चाळींमध्ये तो राहू लागला. तसेच रेल्वेलाइनच्या कडेला, खाड्यांच्या दलदलीमध्ये हा समाज एकत्र राहू लागला होता. अत्यंत बिकट परिस्थितीत जीवन तो संघटितरीत्या घालवीत होता. तो शिकू लागला होता, बोलू लागला होता. याच वसाहतींमधून भविष्यकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला या वर्गाने मनापासून पाठिंबा दिला होता.

प्राचीन काळापासून मुंबईचा प्रदेश तिच्या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे परकीय सत्तांचे आकर्षणाचे ठिकाण ठरला होता. या प्रदेशावर अनेक राजवटींनी राज्य केले हे ऐतिहासिक पुराव्यांवरून सिद्ध होते. विसाव्या शतकातील शेवटची परकीय राजवट म्हणजे ब्रिटिश राजवट होय. ही राजवट या सर्वांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरली. हिंदुस्थानात इंग्रजी सत्तेची प्रतिष्ठापना ही एक जागतिक घडामोड होती. या घडामोडीने नवीन मनू या देशात निर्माण केला. मुंबई ही ब्रिटिशांची सर्वात मोठी वखार असल्यामुळे एका गावाचे स्वरूप बदलून तिचे महानगरीमध्ये रूपांतर झाले. आज ती देशाची औद्योगिक राजधानी म्हणून ओळखली जाऊ लागली. जातीविरहित व निधर्मवादी समाजाची संकल्पना या काळातच येथे रुजली होती. मराठ्यांच्या अध्यात्मप्रधान, कृषिप्रधान, मध्ययुगीन ग्रामीण संस्कृतीचे चित्र महाराष्ट्रात दिसत असताना युरोपच्या विज्ञानातील भौतिकदृष्ट्या प्रगतीशील अशा वर्धिष्णू आणि जयष्णू संस्कृतीची चिन्हे मुंबईमध्ये दिसत होती.

ब्रिटिश वसाहतवादातील सुधारणांचा फायदा घेण्यासाठी अस्पृश्य समाज मुंबईकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर करू लागला होता. या अस्पृश्य समाजातील महार जातीने सर्वात जास्त प्रमाणात स्थलांतर केले होते. त्यांच्यामध्ये सामाजिक विकासाबरोबरच राजकीय जाणिवांचाही विकास होऊ लागला होता. त्यांनी राजकीय क्षेत्रात हक्क मिळविण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू केले होते. भारतातील ब्रिटिश भारतात शासनव्यवस्थेत इतरांप्रमाणेच अस्पृश्यांच्या सहभागाचाही विचार होऊ लागला होता. मुंबई हे ब्रिटिशांचे सर्वात जास्त प्रभावशाली कायदेमंडळ होते. याच कायदेमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ.स. १९२८ पासून सरकारनियुक्त सभासद म्हणून कार्य

करीत होते. या कायदेमंडळात राहून त्यांनी अनेक सुधारणा कायदे केले होते. तसेच अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणीदेखील याच कायदेमंडळातून केली होती.

ब्रिटिशांनी केलेल्या औद्योगिकरणामुळे भारतीय परंपरागत ग्रामीण अर्थव्यवस्थेत तसेच समाजव्यवस्थेलाही तडा गेलेला होता. मुंबई त्यांची औद्योगिक राजधानी असल्यामुळे औद्योगिकीरणाने होणाऱ्या सर्व गोष्टी येथे घडून आल्या होत्या. सामाजिक प्रबोधनाची येथे सुरुवात होऊन त्यातून सामाजिक सुधारणा चळवळ निर्माण झाली होती. त्यातूनच सामाजिक सुधारकांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यांनी सामाजिक संस्था स्थापन करून स्त्रीशिक्षण आणि अस्पृश्यतानिवारण या कार्यावर भर दिला. तसे पाहता, मुंबई इलाख्यात एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेचे वारे वाहू लागले होते. महात्मा फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, केळुस्कर गुरुजी, गोपाळ बाबा वलंगकर, विठ्ठल रामजी शिंदे, रावबहादूर सीताराम केशवराव बोले, तात्या पडवळ, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड इत्यादींचे कार्य महत्त्वाचे ठरले आहे. विषयाला अनुसरून त्यांच्या कार्याचा थोडक्यात परामर्श घेण्यात आला आहे. महात्मा फुले यांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य उल्लेखनीय असून ते कार्यशील समाजसुधारक होते. तसेच अस्पृश्य समाजातील महत्त्वाचे समाजसुधारक गोपाळबाबा वलंगकर आणि शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्य समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न केले. छत्रपती शाहू महाराज आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांचा प्रश्न राजकारण आणि समाजकारणात महत्त्वाचा बनविण्याचे प्रयत्न केले होते. अस्पृश्योद्धाराच्या चळवळीत ब्राह्मण सुधारकांना फारसे यश आले नसले तरी अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाला त्यांनी महत्त्व दिले हे नाकारता येणार नाही.

महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी समाजसुधारक अभ्यासाचे स्वतंत्र विषय आहेत. परंतु प्रबंधाची उपयुक्तता लक्षात घेऊन आवश्यक तो संदर्भ देण्यात आला आहे. या सर्व समाजसुधारकांनी आपापल्यापरीने अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. विसाव्या शतकात भारताच्या राजकीय आणि सामाजिक क्षितिजावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय झाला. आणि अस्पृश्यांना त्यांच्या रूपाने राष्ट्रीय नेता मिळाला.

ब्रिटिश शासनकाळात मुंबईतील अस्पृश्य समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीत बदलाचे वातावरण तयार झाले होते. जातिव्यवस्था थोडी सौम्य बनली होती.

अस्पृश्यतेचे पालन खेड्याप्रमाणे होत नव्हते. धार्मिक अधिकारापासून जरी अस्पृश्य समाज वंचित असला तरी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या होत्या. उदा. रोजगाराच्या संधी, शिक्षणाच्या सुविधा त्यांना येथे उपलब्ध झाल्या होत्या. कापड गिरण्या, गोदी, रेल्वे, महानगरपालिका, दवाखाने, इत्यादी सार्वजनिक ठिकाणी त्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला होता. त्यामुळे मुंबईतील अस्पृश्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत चालली होती. सामाजिक क्षेत्रात जातीयता असली तरी तिचे स्वरूप खेड्याप्रमाणे नव्हते. मंदिर प्रवेशासारखे प्रश्न इथे होते, परंतु त्यासाठी फारसा लढा करावा लागला नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समतेचे लढे मुंबईबाहेर केलेले दिसतात.

मुंबई शहर वसाहतवादी शहर म्हणून सुरुवातीपासून नावारूपाला आलेले होते. जातिव्यवस्थेवर आधारित ग्रामीण समाजरचना इथे नव्हती. त्यामुळे सर्वांना मिळणाऱ्या सोयींचा फायदा अस्पृश्यांनीही मिळत होता. ज्याप्रमाणे इतरांनी आपला विकास इथे घडविला तसाच अस्पृश्यांनीही आपला विकास इथे केला. इथे काम करणारा समाज वेगवेगळ्या जाती-धर्मांचा होता. तो एकत्र वसाहतींमध्ये राहत होता. उदा. मुंबईतील गिरणगांव हा फार मोठा परिसर होता. भायखळापासून ते कुर्लापर्यंत हा प्रदेश पसरलेला होता. अनेक कापड गिरण्या येथे होत्या. येथील कामगारांचा वर्ग आपल्या हक्कांसाठी धडपडत होता. त्यात रेल्वे, गोदी, पोस्ट खाते, महानगरपालिकेचे कर्मचारी यांचा विचार करता येईल. बी.डी.डी. चाळ, बी.आय.टी. चाळ, बी.पी.टी. चाळींमधून सर्व समाजाचे लोक एकत्र राहत असत, आजही राहत आहेत. खेड्यांमधील गावाबाइेर राहणारा अस्पृश्य समाज मुंबईमध्ये चाळींमधून व वसाहतींमधून राहू लागला होता. त्यामुळे त्यांच्यामध्ये सांस्कृतिकरणाची प्रक्रिया चालू झाली होती. या कामगारांमध्ये महानगरपालिकेमध्ये साफसफाईचे काम करणाऱ्याचा कामगारांचा भरणा होता. शिवाय रेल्वेमध्ये कुली मोठ्या प्रमाणात होते. अस्पृश्यांची आर्थिक तसेच शैक्षणिक स्थिती सुधारत चालली होती. याचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटिशांनी शिक्षण धर्मापासून वेगळे केले होते. ब्रिटिशांनी बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबईमध्ये आधुनिक शिक्षणाचा पाया घातला होता. त्यांनी सुरू केलेल्या शाळांमध्ये युरोपियन मुलांप्रमाणेच भारतीय मुलांनादेखील शिक्षण देण्यात येऊ लागले होते. अस्पृश्यांच्या मुलांसाठीही शाळा उघडण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यांच्या शिक्षणात अडसर निर्माण होऊ नये म्हणून काही कायदे देखील करण्यात आले होते.

ब्रिटिश शासनाप्रमाणेच अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात मिशनरींचे कार्य महत्त्वाचे आहे. ख्रिश्चन मिशनरींनी अस्पृश्यांच्या शिक्षण आणि आरोग्य सेवा या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष दिले होते. अस्पृश्यांच्या वस्त्यांमध्ये जाऊन हे मिशनरी एकरूप होत असत. ज्यांच्या स्पर्शानिसुद्धा विटाळ होत असे, अशा लोकांच्या वस्त्यांमध्ये जाऊन मिशनरी आपुलकीने त्यांची सेवा करत. त्यांच्या या लोकोपयोगी आणि समाजोपयोगी कार्यामुळे अस्पृश्यांच्या विकासाच्या वाटा मोकळ्या झाल्या होत्या. अस्पृश्यांच्या विकासास कारणीभूत ठरलेला अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांचा लष्करी पेशा होय. अस्पृश्यांना लष्करामध्ये भरती करून घेतल्यामुळे त्यांचा दर्जा आणखीन सुधारला होता. अस्पृश्य समाज ब्रिटिशांच्या सान्निध्यात आल्यामुळे शिक्षण, शिस्त, प्रतिष्ठा, व पैसा त्यांना सर्व मिळू लागला होता, त्यांची राहणीमानात सुधारणा होऊ लागली होती. भविष्यकाळात अस्पृश्यांच्या ज्या चळवळी उदयाला आल्या, त्यामध्ये अस्पृश्यांमधील लष्करी अधिकाऱ्यांचाही सहभाग महत्त्वाचा ठरला. अशाच लष्करी पेशा असणाऱ्या कुटुंबात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला होता.

अशा प्रकारे ब्रिटिश सरकार, भारतीय समाजसुधारक आणि ख्रिश्चन मिशनरी यांनी अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. या कामात त्यांना पूर्ण यश आले असे म्हणता येणार नाही. असे असले तरी त्यांच्या कार्याचे मोल कमी होत नाही. त्यांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या पार्श्वभूमीवरच विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पातळीवर अस्पृश्यांचे नेते म्हणून पुढे आले. त्यांच्या कार्याची सुरुवात मुंबईमधून झाली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण आणि शिक्षण मुंबईमध्ये झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण प्रामुख्याने मुंबईमध्येच झाली होती. इ.स. १९०१ ते इ.स. १९३५ या त्यांच्या मुंबईतील वास्तव्यात त्यांना अस्पृश्यतेचे अनेक कटू अनुभव आले होते. तरीही अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी देशाच्या प्रथमश्रेणीत नावलौकिक मिळविला. ही बाब त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण ठरले आहे.

जातिव्यवस्थेच्या गुलामगिरीतून अस्पृश्य वर्गाला बाहेर काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाची सुरुवात केली. इ.स. १९१९ मध्ये सर्वात प्रथम त्यांनी साऊथब्युरो कमिटीसमोर साक्ष दिली. ही साक्ष म्हणजे डॉ. आंबेडकरांचा राजकीय पातळीवरचा प्रवेश होता. ही साक्ष त्यांनी मुंबई इलाख्यातील अस्पृश्यांपैकी एक पदवीधर या नात्याने दिली होती. त्यांची ही साक्ष

अस्पृश्यांच्या राजकीय इतिहासात महत्त्वाची घटना ठरली. अस्पृश्यांचा राज्यकारभारात सहभाग होण्याचे हे महत्त्वाचे पाऊल होते. अस्पृश्यांना राजकीय अधिकार मिळाल्याशिवाय त्यांची गुलामगिरी नष्ट होणार नाही हे त्यांना माहीत होते. इ.स. १९१७ मध्ये भारतमंत्री मॉन्टेग्यू याने हिंदी लोकांना जादा राजकीय हक्क देण्याची घोषणा करून भारतात जबाबदार सरकारची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी साऊथब्युरो कमिटीची स्थापना करण्यात आली होती. त्यावेळी या संघटनेने एकूण छत्तीस प्रतिनिधींच्या साक्षी नोंदविल्या होत्या. दि. २४ जानेवारी १९१९ ते दि. ३१ जानेवारी १९१९ या काळात या साक्षी घेण्यात आल्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यावेळी अत्यंत विस्तृत स्वरूपाची साक्ष देऊन त्यामध्ये त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक विकृती व विषमतेचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे याची राज्यसंस्थेने काळजी घ्यायला हवी हे सांगितले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये अस्पृश्यांकरता १०० पैकी ९ जागांची मागणी केली होती व या सदस्यांमार्फत एक प्रतिनिधी दिल्लीच्या केंद्रीय विधान परिषदेकरिता निवडावा असे त्यांचे मत होते. साऊथब्युरो कमिटीने शेवटी मुंबई कायदेमंडळात एक अस्पृश्य सभासद नेमण्याचा निर्णय घेतला. अशाच प्रकारे इ.स. १९३० व इ.स. १९३२ साली झालेल्या राऊंड टेबल परिषदेत अस्पृश्यांचे दोन प्रतिनिधी घेण्यात आले. त्यांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक होते. या परिषदांमार्फत त्यांनी अस्पृश्यांचे प्रश्न जगासमोर मांडले. त्यामुळे अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा राजकीय सत्तेमध्ये प्रवेश किती गरजेचा आहे दाखवून दिले.

अस्पृश्योद्धारासाठी राजकीय पातळीवरून लढा चालू असतानाच त्यांनी सामाजिक समता प्राप्त करून घेण्यासाठी सामाजिक समतेचा लढाही चालू ठेवलेला होता. इ.स. १९२० ते इ.स. १९३५ या काळात लढलेला लढा हिंदू धर्माच्या अंतर्गत राहून सामाजिक समतेसाठी होता. या लढ्याचे शस्त्र होते सत्याग्रह. यामध्ये इ.स. १९२७ चा महाडचा सत्याग्रह आणि इ.स. १९३० चा नाशिक काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह, या लढ्यांना अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. अशाच प्रकारे पुणे पर्वती सत्याग्रह, मुखेडचा सत्याग्रह व अमरावती अंबादेवी मंदिर सत्याग्रह करण्यात आले होते. याच काळात डॉ. आंबेडकरांनी मुंबईमध्ये देखील मंदिरप्रवेश, तसेच पूजा करण्याच्या हक्कासाठी चळवळ केली होती. यामध्ये भुलेश्वर मंदिर व मुंबादेवी मंदिर प्रवेशासाठी त्यांनी ट्रस्टींना अर्ज केले होते.

राजकीय आणि सामाजिक पातळीवर लढा चालू असतानाच अस्पृश्य समाजामध्ये जागृती करण्याचे कार्य ते करीत होते. या काळात डॉ. आंबेडकरांनी ज्या विविध परिषदा भरविल्या होत्या, त्यामुळे अस्पृश्य समाज आंबेडकरांच्या चळवळीत ओढला जाऊ लागला होता. यामध्ये महिलांचाही मोठा सहभाग होता.

आपल्या सर्व पातळ्यांवरील चळवळी यशस्वी करण्याकरिता डॉ. आंबेडकरांनी इ.स. १९२० ते इ.स. १९५६ यामधील काही काळ वगळता सुमारे ३६ वर्षे सतत वृत्तपत्रे चालविली. ती म्हणजे -

| | | |
|---|---|---|
| मूकनायक | - | दि. ३१ जानेवारी १९२० ते दि. २३ ऑक्टोबर १९२० |
| बहिष्कृत भारत | - | दि. ३ एप्रिल १९२७ ते दि. १५ नोव्हेंबर १९२९ |
| समता | - | दि. १९ जून १९२८ ते दि. १५ मार्च १९२९ |
| जनता | - | दि. २४ नोव्हेंबर १९३० ते दि. २८ जानेवारी १९५६ |
| प्रबुद्ध भारत | - | दि. ४ फेब्रुवारी १९५६ ते दि. १ डिसेंबर १९५६ |

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक चळवळीच्या स्थित्यंतराचे प्रतिबिंब या वृत्तपत्रामध्ये दिसते. या वृत्तपत्राद्वारे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांचे प्रश्न जगासमोर मांडले तसेच अस्पृश्यांमध्ये जागृती केली.

इ.स. १९२० ते इ.स. १९३५ या काळात डॉ. आंबेडकरांनी केलेल्या चळवळींमुळे अस्पृश्य समाजात प्रचंड जागृती झाली होती. परंतु हिंदू समाजातील स्पृश्य लोकांकडून या चळवळींना विरोधच झाला. अपवादात्मक काही सवर्णांनी या चळवळीस मदत केली होती. सामाजिक समतेच्या लढ्यामध्ये ज्याप्रमाणे सवर्णांनी सहकार्य केले नाही, तसेच राजकीय हक्कासाठीसुद्धा पाठिंबा दिला नाही. स्पृश्य हिंदूंच्या मानसिकतेत काही बदल होणार नाहीत याची खात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पटली. अस्पृश्यता नष्ट करण्याचा एकच मार्ग त्यांना सापडला, तो म्हणजे हिंदू धर्माचा त्याग करणे. कारण स्पृश्य-अस्पृश्यतेचे नियम जोपर्यंत एखादी व्यक्ती हिंदू धर्मात आहे, तोपर्यंतच लागतात. परंतु जेव्हा तीच अस्पृश्य व्यक्ती ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्मात जाते तेव्हा तिला मानवतेचे सर्व अधिकार मिळतात. म्हणून दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे मुंबई इलाखा दलित परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली.

त्यांची ही घोषणा एकाकी नव्हती. हिंदू धर्मात राहून सतत दहा वर्षे लढा देऊनही अस्पृश्यांना साधे माणुसकीचे अधिकार देण्यास स्पृश्य समाज तयार नव्हता. उलट त्यांनी या सत्याग्रहींवर बहिष्कारासारख्या हत्याराचा वापर करून त्यांचे जगणे नामुष्कीचे केले होते. म्हणून अस्पृश्यांना गुलामगिरीत ठेवणारा, बहुजन समाजाला अज्ञान, दारिद्र्य, व रूढीपरंपरा यांच्या अंधारात ठेवणारा, तसेच स्त्रियांना माणुसकीतून उठविणाऱ्या धर्माचा त्याग करण्याची घोषणा त्यांनी केली. त्यानंतर धर्मांतराच्या घोषणेचा विचार करण्यासाठी अनेक परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. त्या सर्वांमध्ये दि. ३० मे ते दि. २ जून १९३६ ही मुंबईतील तीन-दिवसीय परिषद ऐतिहासिक ठरली. या मुंबई अखिल महार परिषदेत डॉ. आंबेडकरांनी केलेले अध्यक्षीय भाषण ''मुक्ती कोण पंथे? अर्थात धर्मांतर का?'' हे ऐतिहासिक भाषण ठरले. या भाषणात त्यांनी धर्मांतराच्या विविध कारणांचे स्पष्टीकरण केले होते. या परिषदेत अस्पृश्यांनी कोणता धर्म स्वीकारावा याचे संपूर्ण स्वातंत्र्य डॉ. आंबेडकरांना देण्यात आले होते. धर्मांतराच्या घोषणेला अस्पृश्य समाजातील महार जातीने सर्वात जास्त प्रतिसाद दिला होता. तसेच जगातील प्रमुख धर्मांच्या धर्मगुरूंनीदेखील त्यांच्या धर्मांतराचे स्वागत करून आपल्या धर्मात येण्याचे आवाहन केले होते. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची उद्दिष्टे ज्या धर्मात साध्य होतील तोच धर्म स्वीकारण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्यांनी वीस वर्षे सर्व धर्मांचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्या उद्दिष्टांची पूर्ती करणारा एकच धर्म होता, तो म्हणजे बौद्ध धर्म. म्हणून त्यांनी दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार करून, आपल्या पाच लाख अनुयायांनादेखील बौद्ध धम्माची दीक्षा दिली. डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची ही चळवळ अस्पृश्यांमध्ये पूर्ण बदल करणारी होती. तर याअगोदर त्यांनी केलेल्या सर्व चळवळी ह्या सुधारणावादी होत्या.

दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतरामुळे मुंबईमध्ये बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन झाले. मुंबईला बौद्ध धर्माचा प्राचीन वारसा असून मुंबईच्या सांस्कृतिक जीवनावर बौद्ध धम्माचा प्रभाव होता, हे मुंबई शहर आणि तिच्या उपनगर परिसरात असलेल्या पुरातत्त्वीय अवशेषांवरून तसेच वाङ्मयीन पुराव्यांवरून सिद्ध होते. या ठिकाणी बौद्ध धर्माच्या प्रसारास जे विविध घटक कारणीभूत होते, त्यामध्ये मुंबईचे प्राकृतिक स्थान हा महत्त्वाचा घटक आहे. सह्याद्री पर्वताच्या रांगा, नैसर्गिक बंदरे, बारामही वाहणाऱ्या नद्या यामुळे हा

प्रदेश नेहमीच देशी-विदेशी व्यापाऱ्यांसाठी आकर्षणाचा ठरला होता. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विदेशी व्यापार चालत असे. याच व्यापारी मार्गावर पर्वतरांगांमध्ये बौद्ध लेण्या कोरलेल्या आढळतात.

मुंबईच्या हा प्रदेश पूर्वी उत्तर कोकणात येत असे. रामायण तसेच महाभारतात या प्रदेशाचा उल्लेख असून, मौर्यकाळात सम्राट अशोकाने आपले धम्मप्रसारक येथे पाठविल्याचे पुरावे आहेत. या प्रदेशावर अनेक देशी-विदेशी सत्तांनी राज्य केले. त्यातील बऱ्याच राजवटी बौद्ध धर्मास अनुकूल होत्या. इ.स.पूर्व पाच ते इ.स. पाचव्या शतकांपर्यंत या ठिकाणी बौद्ध धर्माचा प्रभाव होता. आधुनिक काळात पोर्तुगीजांच्या राजवटीत मात्र येथून बौद्ध धर्माचा ऱ्हास झाला होता. तो जिवंत राहिला फक्त वाङ्मयीन आणि पुरातत्त्वीय रुपामध्ये. मुंबईतील बौद्ध प्रभावाची साक्ष देणारी लेणी म्हणजे कान्हेरी, महाकाली, मागठाणे, जिवदानी, मंडपेश्वर, जोगेश्वरी आणि घारापूरी. या प्रदेशात बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथील नवदीक्षित बौद्धांना प्राचीन वारसा आहे हे सिद्ध करून दाखविले.

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा मुंबईतील विविध क्षेत्रांवर प्रभाव पडलेला दिसतो. या क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सर्व संघटनांचा समावेश होतो. त्यांनी स्थापन केलेल्या बहुतेक सर्व संघटना डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीप्रमाणे कार्य करीत आहेत. या संघटना स्थापन करताना डॉ. आंबेडकरांचे काही उद्दिष्टे होती. त्यांनी राजकीय क्षेत्रात इ.स. १९३६ मध्ये स्थापन केलेला मजूर पक्षाचे ध्येय दलित, मजूर व शेतकरी यांना संसदीय कारभारात सहभागी करून घेऊन, वर्णविरहित, वर्गविरहित व जातीविरहित समाज निर्माण करणे हे होते. इ.स. १९४२ मध्ये स्थापन केलेल्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे ध्येय शासनकर्ती जमात निर्माण करण्याचे होते. ही शासनकर्ती जमात म्हणजे संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करण्यारी जमात त्यांना अभिप्रेत होती. इ.स. १९५७ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या पश्चात स्थापन झालेला राजकीय पक्ष म्हणजे भारतीय रिपब्लिकन पक्ष हा होय. हा राजकीय पक्ष आजही कार्यरत आहे. रिपब्लिकन पक्ष आणि धर्मांतर ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या उद्देशिकेवर आधारित हा राजकीय पक्ष दिला होता. या उद्दिष्टांची पूर्ती करणे हेच भारतीय रिपब्लिकन पक्षाचे मुख्य ध्येय आहे.

रिपब्लिकन पक्ष निवडणुकीच्या राजकारणात जरी अपयशी ठरत असला तरी इतर तीन वेगवेगळ्या आघाड्यांवर तो यशस्वीपणे काम करताना दिसतो. सामाजिक आघाडीमध्ये जातीजातींची समाजरचना फोडून समतेच्या पातळीवर समाज निर्माण करणे, आर्थिक आघाडीमध्ये दलित बौद्ध, आदिवासी, भटके विमुक्त, मागासलेले, शेतकरी, व मजूर यांच्यातील दारिद्र्य दूर करणे आणि आर्थिक विषमता दूर करणे तर राजकीय आघाडीमध्ये दलित, शोषित, पीडित यांना शासनकर्ती जमात बनविण्याचे प्रयत्न करीत आहे.

आर.पी.आय.चे सर्वच गट बाबासाहेबांना मानतात. प्रत्येक गट व त्यांचे नेते बाबासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, व आर्थिक तत्त्वप्रणालीला मानतात. प्रत्येक गटातील नेत्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे. धर्म म्हणून ते सर्व बौद्ध धर्मालाच मानतात. निवडणुकांमध्ये बाबासाहेबांच्या ध्येय, धोरणाचा प्रचार करतात. राजकीय जीवन व्यवहारात वागण्या-बोलण्याची प्रचार पद्धत एकच आहे. तरीसुद्धा हे लोक एकत्र येत नाहीत हा गंभीर प्रश्न आहे. रिपब्लिकन जनतेचा मात्र या नेत्यांवरचा विश्वास उडाल्याचे चित्र मुंबईमधील बौद्धवस्त्यांमध्ये दिसते.

बौद्ध लोक अल्पसंख्यांक असल्यामुळे राजकारणात युतीशिवाय त्यांना पर्याय नाही हे त्यांना माहीत आहे. युती करताना जातीवादी पक्षाशी युती करण्याच्या ते विरोधात दिसतात. म्हणूनच मुंबईमध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाशी युती करण्याच्या ते विरोधात दिसतात. मुंबईमध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाशी युती केलेली आढळते. संपूर्ण मुंबईमध्ये बौद्ध समाजाचे एकूण चार आमदार आहेत. १) चंद्रकांत हंडोरे - चेंबूर - काँग्रेस २) मिलींद कांबळे - कुर्ला - राष्ट्रवादी. ३) वर्षा गायकवाड - माटुंगा धारावी - काँग्रेस. ४) जाधव - पार्ला - काँग्रेस. तसेच एकच खासदार आहेत १) एकनाथ गायकवाड - काँग्रेस. अपवादात्मक, विनोद तावडे - जोगेश्वरी बीजेपी आमदार आहेत. उदा. एल. पी. लोखंडे मार्ग, चेंबूर, धारावी, घाटकोपर येथील बौद्ध नेत्यांनी काँग्रेसशी युती केलेली आढळते. या संदर्भात चंद्रकांत हंडोरे, माजी आमदार चेंबूर यांचा संदेश विचाराधीन आहे. राजकारणात कुठे आहात हे महत्त्वाचे नाही, तर बाबासाहेबांच्या तत्त्वाशी किती प्रामाणिक आहात हे महत्त्वाचे आहे. समविचारी पक्षाबरोबर युती करावी असे अनेकांना वाटते. रिपब्लिकन पक्षामध्ये ताकद आहे पण ती विखुरलेली आहे.

वास्तविक पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यापक सर्वसमावेशक असा अखिल भारतीय स्वरूपाचा पक्ष दिला होता. पक्षाचे नेतृत्व बौद्धांच्या बाहेर गेलेले दिसत नाही. आर.पी.आय.ने आता गटाचे राजकारण न करता एकजुटीने सामर्थ्यशाली संघटना बनविली पाहिजे. त्यातच त्यांचे भवितव्य आहे. आंबेडकरी जनता मात्र रिपब्लिकन पक्षाशी एकनिष्ठ दिसते. एक मात्र निश्चित आहे की, पक्षाच्या गटांमुळे धम्मकार्य दुर्लक्षित झालेले दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संस्थात्मक कार्याची सुरुवात करताना प्रथम इ.स. १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना मुंबईमध्ये केली होती. तिचे ब्रीदवाक्य होते 'शिका, संघटित व्हा, व संघर्ष करा'. इ.स. १९२७ मध्ये बाबासाहेबांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी 'समता समाज संघा'ची स्थापना मुंबईमध्ये केली होती. इ.स. १९२७ मध्ये अस्पृश्यांच्या सुरक्षिततेसाठी 'समता सैनिक दला'ची स्थापना केली होती. तसेच इ.स. १९४१ मध्ये 'बौद्ध पंचायत समिती'ची स्थापना मुंबईमध्येच केली होती. यापैकी समता सैनिक दल आणि बौद्ध पंचायत समितीचे कार्य आजही चालू आहे. डॉ. आंबेडकरांच्या समतेच्या लढ्यामध्ये समता सैनिक दलाने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. आज मुंबई शहर आणि उपनगरात दलाच्या शंभर शाखा असून बौद्ध समाजात सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य त्या करीत आहेत. डॉ. आंबेडकर जयंती, महापरिनिर्वाणदिन, भीमा कोरेगाव स्मृतीदिन, अशा विविध प्रसंगी सुरक्षिततेची जबाबदारी त्या पूर्णपणे पार पाडतात. सुरुवातीला आर.पी.आय. आणि समता सैनिक दलाच्या अध्यक्ष एकच होता, परंतु आर.पी.आर.मधील गटाचा परिणाम या संघटनांवरही झालेला दिसतो. वास्तविक पाहता, समता सैनिक दलाच्या घटनेत दलाचे उद्देश स्पष्ट केले असून वंश, धर्म, जात किंवा वर्ग यावर आधारित असमानता नष्ट करून समतेच्या तत्त्वावर आधारित समाजरचना करणे हे उद्दिष्ट आहे. येथेही दलाने आपले कार्य विशिष्ट समाजापुरतेच मर्यादित ठेवलेले दिसते. बौद्धांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध एकत्रित यायला हवे. समात सैनिक दलाच्या महिला गटाने महिलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली पाहिजे. कारण डॉ. आंबेडकरांनी समता सैनिक दलाच्या सैनिकाला तळ हातावर शीर घेऊन लढणारा योद्धा असे म्हणले होते.

सामाजिक क्षेत्रामध्ये आजही कार्यरत असणारी संघटना म्हणजे महार ज्ञाती पंचायत समिती होय. इ.स. १९४१ मध्ये मुंबईत स्थापन केलेल्या या समितीचे नांव धर्मांतरानंतर पंचायत समिती

असे ठेवण्यात आले. धर्मांतरानंतर समितीच्या नावाप्रमाणेच कार्याच्या स्वरुपातही बदल झालेला आहे. सुरुवातीला या समितीचे कार्याचे स्वरूप म्हणजे कोकणस्थ महार समाजातील अंधश्रद्धा, रुढी परंपरा, देवदेवस्की दूर करणे असे होते. धर्मांतरानंतरही समिती बौद्ध धर्माच्या प्रसार प्रचाराचे कार्य करत आहे. मुंबईमध्ये बौद्ध पंचायत समितीच्या ५०० शाखा असून सांस्कृतिकीकरणामध्ये तिचे महत्त्वाचे योगदान आहे. बौद्ध विहारे बांधणे, बौद्धाचार्य तयार करणे, बौद्ध साहित्य तयार करणे तसेच त्याचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यही उल्लेखनीय आहे. सध्या बौद्ध पंचायत समितीचे कार्य विवाह, नामकरण विधी, अंत्यसंस्कार विधी, वगैरेंपुरतेच मर्यादित असून त्यांची सामाजिक बांधिलकी फक्त पंचायत समितींच्या सभासदांपुरती मर्यादित झालेली दिसते आहे.

सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी शेड्युल्ड कास्ट, इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट ही एक संस्था असून धर्मांतरानंतर या संस्थेचे नाव 'दि पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट' असे ठेवण्यात आले आहे. इ.स. १९४४ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट मागासवर्गियांची आर्थिक उन्नती करणे हे होते. ही संस्था सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातही काम करते. व्यावसायिक शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन संस्था करते. विशेष म्हणजे, मुंबईच्या नायर हॉस्पिटलमध्ये कार्यक्रमांचे आयोजन संस्था करते.

ब्रिटिश काळात अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षणाची संधी थोड्या प्रमाणात का होईना मिळू लागल्या होत्या. समाजसुधारकांचे प्रयत्न आणि मिशनऱ्यांचे कार्यदेखील महत्त्वाचे आहे. परंतु अस्पृश्यांच्या शिक्षणाची खरी सोय विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे झाली. अस्पृश्य वर्गात शिक्षणाची जागृती निर्माण करण्यासाठी प्रथम त्यांनी इ.स. १९२२ मध्ये मुंबईत 'भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेची स्थापना केली होती. त्यानंतर दि. ८ जुलै १९४५ रोजी बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली. या सोसायटीचे ध्येय उद्देश केवळ शिक्षण देण्याचेच नाही तर शिक्षण अशा तऱ्हेने द्यावयाचे कि ज्यामुळे भारतात बौद्धीक, सामाजिक आणि नैतिक लोकशाहीची निर्माण होईल. संस्थेचे ब्रीदवाक्य प्रज्ञा व करुणा हे आहे. इ.स. १९५६ नंतर मुंबईमध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची सहा महाविद्यालये उघडण्यात आली असून मुंबईच्या बाहेर महाड, औरंगाबाद, पुणे, बंगलोर इ. ठिकाणी सोसायटीच्या शैक्षणिक शाखा आहेत. या संस्थेतून हजारो

विद्यार्थी पदवी घेवून येथून बाहेर पडत आहेत. धर्मांतरानंतर बौद्धांचे महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रमाण वाढलेले दिसते.

बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी इ.स. १९५५ मध्ये बौद्ध महासभेची स्थापना केली होती. या सभेचे सभासद होण्यासाठी बौद्ध धम्माची दीक्षा घेणे गरजेचे असते किंवा सभेच्या तत्त्वांशी सहमत असलेल्या कोणालाही सभासद होता येते. डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर यशवंतराव आंबेडकर बौ.म. सभेचे अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी मीराताई आंबेडकर अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी धम्म चळवळ जिल्हापातळीवरून गावपातळीवर पोहचविली आहे. धम्मप्रसारासाठी विविध शिबिरांचे करण्यात येते. तसेच बौद्ध साहित्याचे प्रकाशन बौ.म. सभा करते. बौद्ध महासभेच्या संपूर्ण एकवीस राज्यात शाखा असून महाराष्ट्रात पस्तीस जिल्ह्यांमध्ये सभेच्या शाखा आहेत. संपूर्ण मुंबई शहर आणि उपनगरात सभेच्या शंभर शाखा आहेत. त्यातील ७६ शाखा आज कार्यरत आहेत.

भारतीय बौद्ध महासभेचे कार्य विभागामध्ये चालते. ते म्हणजे समता सैनिक दल, संस्कार विभाग व महिला मंडळ. मुंबई शहर व उपनगरात सर्वत्र या विभागांमार्फत कार्य चालले आहे.

डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या वरील सर्व संघटनाचा उद्देश एकच होता तो म्हणजे भारतात स्वातंत्र, समता, बंधुत्व आणि लोकशाही तत्त्वांवर आधारित समाज बनविणे. या तत्त्वांना मानणारी व्यक्ती मग ती कोणत्या ही धर्माची असो, परंतु डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर मात्र या सर्व संघटनांना एकमुखी नेतृत्व नसल्यामुळे मतप्रवाह निर्माण झालेले आहेत. याचा परिणाम धम्म चळवळीवर होत असून या सर्व संघटनांनी एकत्र येऊन कार्य केले पाहिजे. तसेच घरोघरी जाऊन लोकांशी संपर्क साधला पाहिजे. तरच डॉ. आंबेडकरांचे या संघटना स्थापन करण्यामागचे उद्देश साध्य होतील.

धर्मांतराच्या प्रभावाचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्र होय. या क्षेत्रांवर धर्मांतराचा अत्यंत स्पष्ट प्रभाव पडलेला दिसतो. भारतावर शेकडो वर्षांपासून परकीय आक्रमणे झाली आहेत. त्यांनी या ठिकाणी आपल्या धर्माचा प्रसार केला होता. त्यामुळे भारतातील सांस्कृतिक व सामाजिक परंपरावर या आक्रमणांचा ठसा पडलेला दिसतो.

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सामुदायिक धर्मांतर केले. धर्मांतर या शब्दाचा शब्दशः अर्थ, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात विधीपूर्वक प्रवेश असा आहे. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर हे एका धर्मांतून बौद्ध धम्माचा स्वीकार या सीमित अर्थाने वापरण्यात येते. पारंपरिक बौद्ध धर्मामध्ये दीक्षा देण्याचा अधिकार फक्त भिक्खुंना होता. डॉ. आंबेडकरांनी मात्र उपासकाला धम्माची दीक्षा देण्याची प्रथा सुरू केली. तसेच दरेकाला दरेकाने बौद्ध धम्माची दीक्षा देण्याची प्रथा ही सुरू करून बौद्ध धम्माला बळकटी आणली. बौद्ध धर्मामध्ये दीक्षा विधी हे कोणतेही कर्मकांड नसून तो एक संस्कार आहे. परंतु धम्मदीक्षेचे महत्त्व अजूनही लोकांना समजलेले दिसत नाही. त्यामुळे कित्येक लोक दैनंदिन व्यवहारात दोन्ही धर्मांचे पालन करताना दिसतात. त्यामुळे हे धम्मप्रसार कार्याला हानिकारक आहे. म्हणून धार्मिक संघटनांनी धम्मदीक्षेचे महत्त्व सांगून घरोघरी जाऊन धम्मदीक्षा दिली पाहिजे. अर्थात दीक्षा घेण्याची इच्छा असणाऱ्या लोकांकडे प्रत्येक धर्मामध्ये दीक्षा देण्याचा विधी असतो.

इ.स. १९५६ नंतर दीक्षा घेतलेल्या बौद्ध समाजात सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया चालू झाली आहे. त्यांचे हे सांस्कृतिकीकरण पारंपरिक सांस्कृतिकरणाच्या व्याख्येत बसत नाही. या सांस्कृतिकीकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वातंत्र, समता, व बंधुत्व यावर आधारित असलेली संस्कृती प्रथापित करणे होय. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर नवदीक्षित समाजामध्ये भाषा, पोशाख, चालीरीती, वाङ्मय, व संस्कार विधी यामध्ये बदल झालेले आहेत. विविध धार्मिक, सामाजिक संघटना सांस्कृतिकीकरणाचे कार्य करत आहेत. सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत एकवाक्यता आणण्याची गरज आहे. उदा. संस्कार विधी, चालीरीती, वाङ्मय, पोशाख, भाषा, या सर्वामध्ये एक सुसूत्रता आणणे आवश्यक आहे. धम्म आचरणात कसा आणावा, तो वापरण्यात आणताना कोणत्या अडचणी येतात, याचे मार्गदर्शन करून या अडचणींवर मदत केली पाहिजे. अंतिम निर्णय घेणारी एका धम्म संस्थेची आवश्यकता आहे. बौद्ध संघटनेची आवश्यता आहे. तसेच भिक्खूसंघाची आवश्यकता आहे.

दि. १४ ऑक्टोबर १९५६ च्या धर्मांतरानंतर महाराष्ट्रात धर्मांतराची लाट आली. सर्वात प्रथम चंद्रपूर येथे दि. १६ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्मदीक्षेचा कार्यक्रम झाला. त्यात तीन लाख लोकांना धम्मदीक्षा देण्यात आली होती. मुंबईमध्ये दि. ७ डिसेंबर १९५६ या दिवशी धम्मदीक्षेचा

पहिला कार्यक्रम झाला होता, तो डॉ. आंबेडकरांच्या पार्थिव देहाला साक्षी ठेवून. या प्रसंगी पाच लाख लोकांनी धम्मदीक्षा घेतली होती. तसेच दि. ९ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांच्या अस्थींना साक्षी ठेवून साडेतीन लाख लोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्यानंतर छोटे छोटे दीक्षा घेण्याचे कार्यक्रम मुंबईत घेण्यात आले होते. धर्मांतराच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील सर्वात मोठे सामुदायिक धर्मांतर मुंबईमध्ये दि. २७ मे २००६ रोजी लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली झाले. या प्रसंगी बेचाळीस भटक्या-विमुक्त जातीच्या लाखो लोकांनी धर्मांतर करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला होता. लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली धर्मांतर केलेल्या बौद्धांचा स्वतंत्र अभ्यास झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर लगेचच मुंबईमध्ये मोठे विद्या समारंभ झाले.

इ.स. १९५६ नंतर मुंबईतील बौद्धांच्या लोकसंख्येत आश्चर्यकारक वाढ झालेली दिसते. महाराष्ट्रात सर्वाधिक बौद्धांची लोकसंख्या मुंबई शहर आणि उपनगरात आढळते. हे सर्व बौद्ध प्रामुख्याने आंबेडकरप्रणित बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. बौद्धांची वेगळी अनुसूची तयार केली पाहिजे. इ.स. १९८१-९१ च्या दशकात ठाणे, कल्याण, व नवी मुंबई ही धम्म चळवळीची नवीन केंद्रे निर्माण झालेली असून या परिसरात मुंबईमधून विस्थापित झालेल्या लोकांची मोठी संख्या आहेत. येथील धम्म चळवळीचा एक स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो.

विसाव्या शतकात दलित साहित्य पुढे आले. दलित साहित्याची ही चळवळ प्रथम मुंबईमध्ये सुरू झाली. नंतर ती महाराष्ट्रात सुरू होऊन त्यानंतर गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू या राज्यात पोहचली. सुरुवातीला 'दलित सेवक' या वृत्तपत्रातून दलित साहित्य लिहिले जायचे. पुढे इ.स. १९४२ मध्ये मुंबईतील आंबेडकरवादी अनुयायांनी 'दलित सेवक साहित्य संघा'ची स्थापना केली. त्यामुळे दलित साहित्यनिर्मिती होऊ लागली. या दलित साहित्यामध्ये विविध काळात वैचारिक स्थित्यंतरे झालेली आहेत. ही स्थित्यंतरे प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या प्रभावामुळे झालेली आहेत. दलित साहित्यामध्ये झालेल्या या वैचारिक स्थित्यंतराचे प्रामुख्याने तीन कालखंड पडतात. इ.स. १९५६ ते इ.स. १९६७, इ.स. १९६७ ते इ.स. १९९० आणि इ.स. १९९० ते २००६. पहिला कालखंड बौद्ध साहित्याचा कालखंड असून या कालखंडात इ.स. १९५६ धर्मांतरानंतर आंबेडकरप्रणित बौद्ध धम्म समजून घेण्यासाठी बौद्ध साहित्याची निर्मिती

होऊ लागली. या साहित्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरलिखित ‘भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म’ हा ग्रंथ बौद्ध साहित्याचा सरनामा असून हा ग्रंथ नवदीक्षित बौद्धांचा धर्मग्रंथ आहे. तसेच बौद्धांच्या जीवनमार्गाचा आचारधर्म आहे. या ग्रंथाचा मुख्य उद्देश म्हणजे उच्चतम जीवनमार्ग जगण्यासाठी तसेच बुद्ध धम्माचा अभ्यास करता यावा, त्यांना धार्मिक जीवन जगता यावे या उद्देशाने लिहिले असल्यामुळे नवबौद्धांच्या धार्मिक, सामाजिक व नैतिक जीवनाची दिशा मिळाली आहे.

या कालखंडात जे साहित्य निर्माण झाले त्यावर धर्मांतराचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. दुसरा कालखंड धर्मांतरानंतरचा सर्वात मोठा कालखंड आहे, परंतु या काळातील साहित्यावर धर्मांतराचा अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसून येतो. या कालखंडातील साहित्यिक प्रामुख्याने बौद्ध असूनही त्यांनी आपली ओळख दलित म्हणून केली व जे साहित्य निर्माण केले त्याला दलित साहित्य म्हणून संबोधले. या साहित्यामध्ये त्यांनी धर्मांरापूर्वीचे जीवनच रेखाटले. तिसरा कालखंड पुन्हा बौद्ध साहित्याचा आहे. या काळात दलित साहित्य हे बौद्ध साहित्य निर्मितीस हानीकारक आहे, असे साहित्यिकांना वाटू लागले. त्यातून आंबेडकरवादी साहित्याचा विचार पुढे आला. आंबेडकरवादी साहित्य म्हणजेच बौद्ध तत्त्वज्ञानावर आधारित साहित्य होय.

साहित्यामध्ये झालेल्या या वैचारिक स्थित्यंतराचा प्रभाव कथा, कादंबरी, आत्मकथा तसेच लोककलेवरही पडलेला दिसतो. साहित्यक्षेत्रामध्ये प्रभावीपणे काम करणाऱ्या संघटनांची स्थापना झाली. उदा. महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेची स्थापना मुंबईमध्ये भाऊसाहेब अडसूळ, आप्पासाहेब रणपिसे यांनी केली. या परिषदेने अनेक साहित्य संमेलने भरवून धम्मप्रचाराचे कार्य केले आहे.

बौद्ध साहित्य निर्माण करण्यामध्ये मुंबईमध्ये अनेक प्रकाशनांचे योगदान आहे. उदा. अस्मितादर्श कम्युनिकेशन - (पवार ज.वि.), शुभांगी प्रकाशन - (नाईक प्रदीप), प्रणाली प्रकाशन - (ढाले राजाभाऊ), भाष्य प्रकाशन - (भारती महेश), पद्मपाणी - (शाक्यरत्न) तसेच सम्यक - (दिलीप पगारे) इ. तसेच भारतीय बौद्ध महासभा सर्वोदय बुद्ध विहार, त्रैलोक्य बुद्ध विहार (त्रीरत्न) या धार्मिक संस्थादेखील बौद्ध साहित्याचे प्रकाशन करीत आहेत. धर्मांतरानंतरच्या बौद्ध साहित्याचा वाङ्मयीनदृष्ट्या अभ्यास होऊ शकतो.

साहित्याप्रमाणेच विविध नियतकालिके देखील धम्मप्रसाराचे कार्य मुंबईमध्ये करत आहेत. उदा. प्रबुद्ध भारत, विजीत संग्राम, सद्धम्म पत्रिका, व्हिजन इंडिया, पॉलीटीकल पॉवर, विश्व

लीडर, इत्यादी त्याचबरोबर मुंबईमधून एकूण तीन वृत्तपत्रे प्रकाशित होतात. सम्राट, विश्वसम्राट, आणि बहुजनरत्न लोकनायक. धम्मप्रसारासाठी आवश्यक असणारे प्रसारमाध्यम मात्र बौद्धांकडे नाही. याला अपवाद चक्र चॅनल होय.

धर्मांतरानंतर बौद्ध समाजात वाचनसंस्कृती निर्माण झालेली आहे. सुरुवातीला पंचशील आणि त्रिशरणाची माहिती असणारा समाज आता बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करू लागला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मांडणी व लिखाणाचे वाचन करू लागला आहे. सामाजिक, व धार्मिक संघटना बौद्ध परिषदांचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर परिषदा, चर्चासत्र व अधिवेशने यांचे आयोजन केले जात आहे. बौद्ध परिषदा, अधिवेशने याचा एकत्रित अभ्यास आवश्यक आहे.

इ.स. १९५६ नंतर संपूर्ण मुंबई शहर आणि उपनगरात सरकारी निमसरकारी खात्यात मागासवर्गीय जाती जमातीच्या कर्मचारी-अधिकारी संघटना स्थापन झालेल्या आहेत, उदा. रेल्वे, महानगरपालिका, पोस्ट, बँका, आर.सी.एफ. इत्यादी. यामध्ये रिपब्लिकन एम्प्लॉइज फेडरेशन, असंघटित कामगार युनियन, बहुजन अधिकारी कर्मचारी महासंघ, रिपब्लिकन सेना इ. संघटना काम करीत आहेत. या एस.सी./एस.टी. संघटनांचे नेतृत्व प्रामुख्याने बौद्ध कर्मचारी करताना दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व मानणाऱ्या या जाती-जमाती संघटित कार्य करताना आढळतात.

मुंबई शहरात आणि उपनगरात अनेक युवक संघटनादेखील धम्मप्रचाराचे कार्य करत आहेत. उदा. बुद्धीष्ट रिपब्लिकन संघटना - विवेक मोरे, यूथ रिपब्लिकन पक्ष - मनोज संसारे, भांडूप विकास आघाडी युवक संघटना, डॉ. आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस ॲण्ड पीस - नागसेन सोनार, सम्यक प्रतिष्ठान-प्रकाश आंबेडकर, दादासाहेब आंबेडकर सांस्कृतिक केंद्र-अंधेरी इत्यादी.

स्थापत्य आणि कलाक्षेत्रावर देखील धर्मांतराचा प्रभाव पडलेला असून मुंबईमध्ये विहार संस्कृती प्रस्थापित झालेली आहे. इ.स. १९५६ च्या अगोदर चार ते पाच बुद्धविहारे होती. तीही प्रामुख्याने चीन, जपान, श्रीलंका या राष्ट्रांमध्ये बांधलेली होती. धर्मांतरानंतर मात्र प्रत्येक बौद्ध वस्तीमध्ये विहारे बांधण्यात आलेली आहेत. ही बौद्ध विहारे फक्त उपासना वास्तू नसून ती संस्कार केंद्रे बनली आहेत. मुंबई व तिच्या उपनगरात तीनशे बुद्ध विहारे असून ती वेगवेगळया सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. विपश्यना या ज्ञानसाधनेचे पुनरुज्जीवन

झालेले आहे. गृहसजावट, प्रवेशद्वारा, पुस्तकांचे मुखपृष्ठ, शोभेच्या वस्तू, व भेट कार्ड यावर धर्मांतराचा प्रभाव दिसतो.

बौद्ध समाजात सामाजिक गतिशीलता निर्माण झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे दोन बाजू होत्या. एक हिंदू धर्माचा त्याग आणि दुसरी बौद्ध धर्माचा स्वीकार. त्यामुळे नवदीक्षित बौद्धांचे संपूर्ण सामाजिक जीवन बदलले आहे. त्यांचे सामाजिक स्थान बदलले दिसते. पूर्वाश्रमीचे महार आता बौद्ध म्हणून जगताना दिसत आहेत. जातिव्यवस्थेचा त्याग केलेला आहे. पारंपरिक धर्म या संकल्पनेला मानत नाहीत. स्त्री-पुरुष समानता स्वीकारली आहे. सामाजिक कार्याबरांबरच धम्मकार्यामध्ये स्त्रिया सहभागी आहेत. बौद्ध महासभेचे नेतृत्व एका महिलेकडे आहे, हे जगातील पहिले उदाहरण आहे. महिलांना दीक्षा देण्याचा अधिकार आहे. तसेच भिक्खुणी होता येते. त्यांची भाषा, पेहराव, राहणीमान, रूढी-परंपरा, शैक्षणिक क्षेत्र, आर्थिक क्षेत्रावर धर्मांतराचा प्रभाव दिसून येतो.

धर्मांतराच्या वेळची पहिली पिढी अडाणी अक्षरशून्य होती. परंतु या पिढीने शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्यासमोर आदर्श उदाहरण होते. या पिढीने बाबासाहेबांच्या ‘शिक्षा, संघटित व्हा व संघर्ष करा’ या आदेशाचे पालन करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलांना शिकविले. त्यांनी धर्मांतरानंतरची ही दुसरी पिढी चांगली शिकली. सरकारी नोकऱ्यांमध्ये मानाच्या जागा पटकावू लागली. याच पिढीतून ६० ते ७० च्या दशकात अनेक साहित्यिक, समाजकारणी, राजकारणी, व धम्मकारणी मुंबईमध्ये पुढे आले. मुंबईतील पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातुन पदवीधर बाहेर पडू लागले. पांढरपेशा वर्ग निर्माण झाला आहे. या वर्गातून अनेकांनी स्वतःच्या खाजगी शैक्षणिक संस्था काढून समाजात शिक्षणाचा प्रसार करीत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात धार्मिक संस्था देखील कार्य करत आहेत. जनगणना अहवालावरून मुलींचे शिक्षणाचे प्रमाण देखील वाढत आहेत. डॉक्टर, वकील, प्राध्यापक, व इंजिनियर अशा उच्च पदांवर बौद्ध काम करीत आहेत. सरकारी अनुशेष सर्व क्षेत्रात भरलेला आहे. स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु उच्च शिक्षणात मात्र महिलांचे प्रमाण वाढले आहे. बौद्धांनी मुंबईमध्ये शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. उदा. मुंबईमध्ये बौद्धांनी चालविलेल्या महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था १) नालंदा एजुकेशन ट्रस्टचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, चेबूंर, संस्थापक

चंद्रकांत हंडोरे २) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले डी.एड. आणि बी.एड. महाविद्यालय - विक्रोळी एकनाथ गायकवाड ३) शहीद जितेश भालेराव संस्थेचे बुद्धिस्ट एज्युकेशन सोसायटी - कुर्ला व गौतम बौद्धनगर, कुर्ला. बौद्धांच्या शिक्षणाचा तपशीलवार अभ्यास होऊ शकतो.

धर्मांतरानंतर बौद्धांनी खेड्यातील वंशपरंपरागत व्यवसाय सोडून दिले आणि शहरांकडे स्थलांतर केले. मुंबईमध्ये या स्थलांतर केलेल्या लोकांच्या वसाहती निर्माण झालेल्या दिसतात. उदा. घाटकोपर, चेंबूर, येथील बौद्ध वसाहतीच्या विकासाचा स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो. स्थलांतर केलेल्या लोकांनी मुंबईमध्ये विविध क्षेत्रांत रोजगार मिळविला आहे. त्याचे दरडोई उत्पन्न वाढलेले आहे. याला अपवाद आहे धारावी. येथे अजूनही त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. परंतु अस्पृश्यांचा गरिबी हा कधीच प्रश्न नव्हता. त्यांचा लढा समतेसाठीचा होता. तो धर्मांतरामुळे प्राप्त झालेला आहे.

धर्मांतरानंतर नवबौद्ध समाजात आर्थिक भरभराट झालेली आहे. धर्मांतराच्या वेळची पिढी गरीब, दरिद्री होती. ही पिढी शहरांकडे आल्यानंतर त्यांच्या दुसऱ्या-तिसऱ्या पिढीमध्ये आर्थिक विकास झालेला दिसतो. ज्या लोकांनी धर्मांतर केले त्यांनी वंशपरंपरागत व्यवसाय सोडून दिले. त्यांची मुलांचा आर्थिक विकास झालेला आहे.

डॉ. आंबेडकरांनी केलेल्या सर्व चळवळींमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग होता. महाडच्या मुक्तिसंग्रामापासून ते धर्मांतराच्या चळवळीपर्यंत त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या या योगदानावर मीनाक्षी मून आणि उर्मिला पवार यांनी 'आम्हीही इतिहास घडविला' हा ग्रंथ लिहून प्रकाश टाकला आहे. धर्मांतर चळवळीमध्ये त्यांनी सक्रीय भाग घेऊन स्वतः धर्मांतर केले होते. धर्मांतर करून आल्यानंतर त्यांनी मुंबईमध्ये महिला मंडळाची स्थापना करून धम्मकार्याला सुरुवात केली होती. त्या काळात धर्मांतर केलेल्या महिलांच्या मुलाखतींवरून धर्मांतराच्या पहिल्या पिढीवर धर्मांतराचा प्रचंड प्रभाव होता हे दिसते. धर्मांतरानंतर महिलांनी आपल्या कुलदैवताच्या पूजा करण्याचे सोडून दिले. देव समुद्राच्या पाण्यात टाकून दिले होते. सुरुवातीला बी.डी.डी. चाळीमध्ये गणपती बसत असत, परंतु धर्मांतरानंतर डॉ. आंबेडकर जयंती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. आंबेडकर बुद्धांची प्रतिमा ठेवली जायची. शुभ्र वस्त्र परिधान करून लोक येत असत. मुलांची लग्ने बौद्ध पद्धतीने लावली. साडी नेसताना उलटा कासोटा घालत ती पद्धती बदलली. राहणीमान बदलले. लग्नानंतर

जागरण, गोंधळ घालत नाही. सवाष्ण घालत नाहीत. लग्नाच्या आदल्या दिवशी सुत्तपाठाचा कार्यक्रम केला जातो.

धर्मांतरानंतर लगेचच दोन वर्षांनी मुंबईतील बौद्ध महिलांचा अभ्यास करण्यात आला होता. त्यानुसार धर्मांतराचा किती जबरदस्त प्रभाव महिलांवर पडला होता हे समजते. त्यानुसार नवबौद्ध समाजातील महिलेचे जीवन हे ध्येयचित्र बनून राहिले आहे. जीवनाची गुंफण फुले-आंबेडकर यांच्याभोवती झाली आहे. चालीरिती वेगळ्या झाल्या आहेत. लग्न समारंभ, लग्नाची सुटसुटीत आवश्यक आणि मंगल अशी पद्धती पुढे आली. ते पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करतात. विवाहात वर-वधुंना निवड करण्याची मोकळीक आहे. विवाह भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साक्षीने होतात. भिक्खु किंवा उपासक विवाह लावतात. पंचशिलाचे पालन केले जाते. नववधू-वर भावी आयुष्यासाठी शपथा घेतात. विवाहपूर्व साक्षगंध, बारसे इत्यादी सर्व विधी साक्षीने होतात. बौद्ध महिला वैशाख पौर्णिमा, बुद्ध जयंती, आंबेडकर जयंती साजरी करतात. पौर्णिमेला ठिकठिकाणी व्याख्याने ठेवून समारंभ करतात. वेगवेगळ्या संघटना स्थापन करून दुसऱ्याचे दुःख दूर करण्याचे प्रयत्न करतात. प्रत्येक सणांमधून नवबौद्ध स्त्री आज काहीतरी मिळवीत आहे, शिकत आहे. अवघड चालीरीतींचा फाफटपसारा तिने मांडला नाही. आपली सारी शक्ती, उत्साह, व जोम ती तत्त्वप्रधान जीवनात गुंतवून टाकीत आहे.

मुंबई शहर आणि उपनगरात प्रत्येक ठिकाणी महिला मंडळे असून ही महिला मंडळे बौद्ध विहारांशी संलग्न कार्य करत आहेत. सांस्कृतिकीकरणामध्ये त्याचे महत्त्वाचे योगदान असून सर्व महिला मंडळाचे सर्वसाधारण खालीलप्रमाणे कार्यक्रम होतात. वर्षावासाचे कार्यक्रम, धम्म परिषदांचे आयोजन, शैक्षणिक मार्गदर्शन, सर्व बौद्ध सणांचे आयोजन करणे, संस्कार वर्ग चालविणे, बचतगट, बालवाड्या चालविणे, तसेच कुटीर उद्योगांमार्फत रोजगार उपलब्ध करून देणे इत्यादी, थोड्याफार फरकाने सर्व महिला मंडळे हे कार्य करतात. स्त्रीसबलीकरणाचे विविध कार्यक्रम राबविले जातात. उदा. घाटकोपर रमामाता कॉलनीत महिला मंडळातर्फे पन्नास बचत गट चालविले जातात. विविध कोर्सेसचे प्रशिक्षण क्लास आहेत. आंगणवाड्या, व बालवाड्या महिला चालवितात. ब्युटी पार्लर, शिवणकाम, ज्वेलरी मेकींग, व मेणबत्ती बनविणे असे व्यावसायिक कोर्सही चालविले जातात. महिला मंडळे सामाजिक आणि सांस्कृतिक केंद्र बनली आहेत.

प्रस्तुत विषयाच्या निमित्ताने धर्मांतराच्या विविध क्षेत्रांवरील पडलेल्या प्रभावाचे केलेले संशोधन, धर्मांतर चळवळीचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शक तसेच उपयुक्त ठरेल.

संसदीय लोकशाही यशस्वी करण्याचे सामर्थ्य या समाजात आहे, परंतु समाजात एक जीवन पद्धती, एकजिनसीपणा येण्याची गरज आहे. एक केंद्र सत्ता करून तिच्या नेतृत्वाखाली विविध क्षेत्रातील संघटनांच्या कार्याचे वाटप केले पाहिजे. संघटनेचे पदाधिकारी लोकशाही पद्धतीने निवडले पाहिजेत. धर्मसत्तेच्या वर्चस्वाखाली सामाजिक संस्था, व धार्मिक संस्थांचे कार्य झाले पाहिजे. यामुळे एक आदर्श समाज निर्माण होईल.

❑❑

# प्रकरण सहावे

# सारांश

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रामध्ये राजकीय व सामाजिक चळवळी सुरू होऊन आजच्या वैचारिक महाराष्ट्राची ती पार्श्वभूमी ठरली. या चळवळींमधून महाराष्ट्रात प्रबोधनाची सुरुवात झाली. हे प्रबोधन घडवून आणण्यास विविध घटक कारणीभूत ठरले. त्यांपैकी ब्रिटिश शासन हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरला. तसेच ख्रिश्चन मिशनरी, भारतीय समाजसुधारक, वृत्तपत्रे, इत्यादी विविध घटक प्रबोधनास कारणीभूत ठरले. सामाजिक सुधारणांचे नवे पर्व या काळात सुरू झाले. सामाजिक सुधारकांचा एक वर्ग निर्माण झाला त्यांनी भारतीय समाजातील सामाजिक समस्यांवर बोट ठेवले. स्त्री-शिक्षण, अस्पृश्यता निवारण यासारख्या सामाजिक प्रश्नांकडे लक्ष दिले. या प्रबोधन कार्यात ब्राह्मणेतर समाज मोठ्या संख्येने उतरला होता.

मुंबईमध्ये अस्पृश्यांची जी प्रबोधन चळवळ सुरू झाली ती सुरुवातीला दलित सेवक संघाच्या माध्यमातून सुरू झाली होती. आणि मुंबईतील दलितांचे प्रबोधन हे आंबेडकरी चळवळीचे फळ आहे. अस्पृश्यांची ही प्रबोध चळवळ सुरू होण्यास प्रामुख्याने ब्रिटिश वसाहतवाद कराणीभूत ठरला. तर भारतीय समाजातील जातिव्यवस्था ही या चळवळीची पार्श्वभूमी ठरली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची जी चळवळ उभी केली तिची पार्श्वभूमी ही जातिव्यवस्थाच आहे. डॉ.आंबेडकरांनी अस्पृशोद्धासाठी विविध पातळींवर ज्या चळवळी केल्या त्याचे मुख्य केंद्र मुंबई होते. कारण मुंबईमध्ये त्यांना आपल्या सर्व चळवळींना आवश्यक अशी अनुकूल परिस्थिती प्राप्त होती. ब्रिटिशांची केलेले विविध कायदे, त्यांचे शैक्षणिक धोरण, औद्यागिकरण, व्यापार, दळणवळणाच्या सोयी इत्यादीमुळे मुंबईतील अस्पृश्यांची सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थिती इतर ठिकाणच्या अस्पृश्यापेक्षा चांगली होती. मुंबईतील समाजसुधारकांनी बदलत्या काळाची गरज ओळखून सनातनी विरुद्ध पुरोगामी असा लढा पुकारलेला होता. या संदर्भात दादोबा पांडुरंग वर्खडकर, गोपाळ हरि देशमुख, कृष्णराव अर्जुन केळुस्कर, गोपाळबाबा वलंगकर, विठ्ठल रामजी

शिंदे, रावबहादूर सीताराम केशवराव बोले, तुकाराम तात्या पडवळ, राजर्षी शाहू महाराज यांचे मुंबईतील योगदान महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी मुंबईतील अस्पृश्य समाजास एकत्र आणण्याची चळवळ मुंबईमधून सुरू केली आणि नंतर संपूर्ण महाराष्ट्रात आणि भारतात ही चळवळ पसरत गेली. त्यामुळे डॉ. आंबेडकर अखिल भारतीय अस्पृश्य समाजाचे राष्ट्रीय नेतृत्व म्हणून ओळखले जाऊ लागले.

मुंबईमध्ये जातिव्यवस्था खेड्यांप्रमाणे कठोर नव्हती. सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी अस्पृश्यांना सत्याग्रहाची गरज निर्माण झाली नाही. काही ठिकाणी सार्वजनिक हक्कासाठी चळवळी केल्या गेल्या, परंतु सरकारी धोरणांमुळे तसेच समाजसुधारकांमुळे बरेच प्रश्न या ठिकाणी सुटलेले दिसतात. याउलट खेडी ही जातिव्यवस्थेची ठिकाणे असल्यामुळे अस्पृश्यतेच्या जाचाला कंटाळून अस्पृश्यांनी मोठ्या प्रमाणात मुंबईसारख्या शहरांमध्ये स्थलांतर केलेले दिसते. मुंबईमध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात गिरणी, गोदी, कारखाने, रेल्वे, महानगरपालिका, दवाखाने इत्यादी ठिकाणी रोजागार उपलब्ध झालेला होता. तसेच येथे शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होत्या. अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे सरकारने फारसे लक्ष दिल नव्हते, परंतु मिशनरींनी मात्र अस्पृश्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिलेले होते. या संदर्भात डॉ. विल्सन यांचे मुंबईतील योगदान महत्त्वाचे आहे, मिशनरींच्या प्रयत्नांमुळे अस्पृश्यांना त्यांचा विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या. मिशनरींनी अस्पृश्यांसाठी शाळांप्रमाणेच दवाखाने उघडून मोफत उपचाराच्या सोयी उपलब्ध केल्या होत्या. अशा प्रकारे शहरातील विविध सुखसोयी-सुधारणांचा फायदा त्यांना मिळू लागला. शिक्षणाचे महत्त्वही त्यांना समजू लागले. त्यामुळे आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक प्रगतीही होऊ लागली. मुंबईतील रेल्वे, गिरणी, गोदी, कारखाने इ. ठिकाणच्या चाळींमध्ये अस्पृश्य समाज मोठ्या संख्येने एकत्र राहू लागला. त्यांच्यामध्ये संघटन होऊन ऐक्याची भावना निर्माण झाली. याच विभागातून भविष्यकाळात डॉ. आंबेडकरांना पाठिंबा मिळाला. अस्पृश्याच्या विकासास कारणीभूत ठरलेला आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांचा लष्करी पेशा हा होय. ब्रिटिश काळात लष्करांमध्ये अस्पृश्य समाजाचा मोठा भरणा होता. त्यात महार ही जात सर्वात जास्त संख्येने भरती होत असे. ब्रिटिशांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांना चांगले शिक्षण, चांगली नोकरी, प्रतिष्ठा मिळू लागली होती. त्याचे राहणीमान सुधारले होते. वेचारिक पातळी सुधारली होती. या लष्करीपेशामधून निवृत्त

झालेल्या अधिकाऱ्यांनी अस्पृश्योद्धाराची चळवळ पुढे आणली. याच लष्करी पेशा असणाऱ्या कुटुंबात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला होता.

मुंबई शहर आणि तिच्या उपनगरांवर प्राचीन काळापासून बौद्ध धर्माचा प्रभाव होता. त्यामुळे मुंबईच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये बौद्ध धर्माचा मोठा वाटा आहे. हा उत्तर कोकणात येत असून प्राचीन काळापासून या प्रदेशावर विविध राजवटींनी शासन केले होते. त्यापैकी बऱ्याच राजवटी बौद्ध धर्माला अनुकूल होत्या, तर काही प्रतिकूल होत्या. त्यापैकी अकराव्या शतकातील पोर्तुगीज सत्ता बौद्ध धर्म या प्रदेशातून जवळजवळ नष्ट झाला. तो जिवंत राहिला तो वाङ्मय आणि स्थापत्य कलेच्या स्वरूपात. मुंबई शहर आणि तिच्या उपनगरात आजही अस्तित्वात असलेली चैत्य आणि विहारे याची साक्ष देतात. उदा. कान्हेरी, कोडिवटे, जीवदानी, मागठाण, पंचकोड, इ.

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन केले. त्यांच्या चळवळीचे मुख्य केंद्र मुंबई होते. या प्रदेशात नऊशे वर्षानंतर पुन्हा बौद्ध संस्कृती स्थापन करण्याचे कार्य त्यांनी केले. आणि येथील नवदीक्षित बौद्धांना किती मोठा प्राचीन सांस्कृतिक वारसा आहे हे सिद्ध करून दाखविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म अस्पृश्य समाजात महार जातीमध्ये झाला होता. त्याचे बालपण आणि शैक्षणिक जीवन प्रामुख्याने मुंबईमध्ये झाले होते. अस्पृश्यतेचे कटू अनुभव त्यांना इथेही आले होते. परंतु त्याचे स्वरूप मात्र ग्रामीण विभागासारखे नव्हते. त्यांनी अस्पृश्यांच्या मुक्ती संग्रामाची चळवळ मुंबईमधून सुरू केली होती. त्यासाठी त्यांनी सर्वात प्रथम मुंबईतील अस्पृश्यांना संघटित करण्याचे प्रयत्न करून संस्थात्मक कार्याची सुरुवात केली. आणि विविध पातळींवर अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचा लढा उभा केला. त्यांच्या या मुक्तिसंग्राम लढ्याचे दोन कालखंड पाडले जातात. इ.स. १९२० ते १९३५ आणि इ.स. १९३६ ते १९५६. पहिला कालखंड सामाजिक समतेचा आणि राजकीय हक्कासाठी होता. आणि या लढ्याचे शस्त्र होते सत्याग्रह. यामध्ये महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह यांना अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्राम लढ्याच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. तर राजकीय क्षेत्रात साऊथब्युरो कमिटी आणि सायमन कमिशनसमोरील साक्ष आणि गोलमेज परिषदेसमोर सादर केलेला अस्पृश्याचा खलिता यांना अस्पृश्यांच्या राजकीय इतिहासात महत्त्व आहे. दुसरा कालखंड धर्मांतरांच्या चळवळीचा आहे. इ.स. १९३५ पर्यंत डॉ.आंबेडकरांनी विविध पातळीवर प्रयत्न केले.

परंतु स्पृश्य लोकांनी त्यांना सहकार्य तर केले नाहीच, उलट तीव्र विरोध केला आणि त्यांनी इ.स. १९३५ मध्ये धर्मांतरांची घोषणा केली. अस्पृश्यांना धर्मांतराशिवाय दुसरा कोणता मार्ग नाही हे त्यांना समजले.

इ.स. १९३५ ते १९५६ या वीस वर्षांच्या कालखंडात डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराला योग्य असे वातावरण निर्माण केले. या संदर्भात त्यांनी इ.स. १९३६ मध्ये मुंबई नायगाव येथे केलेले भाषण ऐतिहासिक ठरले. त्यांचे हे भाषण, 'मुक्ती कोन पधे ?' अर्थात धर्मांतर का ? म्हणून प्रसिद्ध आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर घोषणेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरून प्रतिसाद मिळाला होता. विविध धर्मांच्या नेत्यानी त्यांना आपल्या धर्मात येण्याचे आवाहन केले होते. परंतु डॉ. आंबेडकरांनी धर्माविषयी काही कसोट्या ठरविल्या होत्या. जो धर्म त्या कसोट्यांमध्ये उतरेल त्या धर्माचा स्वीकार ते करणार होते. त्या दृष्टिकोनातून त्यांनी जगातील सर्व प्रमुख धर्मांचा अभ्यास केला. त्यांचा कसोटीला उतरणारा एकच धर्म त्यांना मिळाला तो म्हणजे बौद्ध धर्म. आणि म्हणून त्यांनी इ.स. १९५६ साली नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर या नवदीक्षित समाजाच्या विविध क्षेत्रांवर धर्मांतराचा प्रभाव पडला. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या विविध क्षेत्रांतील संघटना आणि संस्थांवर धर्मांतराचा पडलेला आहे. या नवदीक्षित बौद्धाची सांस्कृतिकरणाची प्रक्रिया चालू झालेली असून या सांस्कृतिकरणामध्ये बौद्ध धर्माची दीक्षा विधीला महत्त्व प्राप्त झाले आहे. हा दीक्षाविधी म्हणजे कर्मकांड नसून तो नवदीक्षित बौद्धांचा महत्त्वाचा संस्कार आहे. दीक्षा देण्याचा हा कार्यक्रम विविध धार्मिक संस्था करतात. मुंबईमध्ये त्रैलोक्य बौद्ध विहार, सर्वोदय महाविहार तसेच अखिल भारतीय बौद्ध महासभा इ. धार्मिक संस्था दीक्षा देण्याचे कार्य करत आहेत. भारतात सर्वाधिक बौद्ध मुंबई आणि तिच्या उपनगरात आहेत. सांस्कृतिकरणामध्ये नवबौद्धांनी आपले सर्व संस्कार बदलेले असून ब्राह्मणी धर्मातील संस्कारांचा हेतूपुरस्सर त्याग केलेला आहे. नवे संस्कार विविध धर्मसंघटना, संघटनांच्या माध्यमातून रुजविले जात आहेत. त्यामध्ये बौद्ध पंचायत समिती, भारतीय बौद्ध महासभा, भिक्षुसंघ, बुद्धविहारे, युवक मंडळे, महिला मंडळे इ. कार्य करीत आहेत. नवे संस्कार रुजविण्यासाठी, नवे बौद्ध साहित्य निर्माण करण्यासाठी साहित्यिकांचे प्रयत्न चालू आहेत. धर्मांतरानंतर फार मोठे साहित्य निर्माण झालेले आहे. या साहित्याला एक तात्त्विक बैठक

आहे. हे साहित्य वास्तववादी साहित्य असून मानवी स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा, आणि मानवी मूल्य हे या साहित्यिकांच्या लेखनाचे आधार आहेत.

धर्मांतरामुळे दलित साहित्यात इ.स. १९५० ते इ.स. २००६ या कालखंडात विधि वैचारिक स्थित्यंतरे घडून आलेली आहेत, ज्यामुळे दलित साहित्याचे स्वरूप बदलले. दलित साहित्यात जे विविध प्रवाह निर्माण झाले, ते म्हणजे दलित साहित्य-बौद्ध साहित्य-दलित साहित्य-आंबेडकरी साहित्य-आंबेडकरवादी साहित्य-बौद्ध साहित्य. नवदीक्षित बौद्धांच्या साहित्याचा सरनामा म्हणजे आंबेडकर लिखीत 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ होय. धर्मांतराला वैचारिक बैठक देण्यासाठी त्यांनी हा ग्रंथ लिहिला होता. हा ग्रंथ नवबौद्धांचा धार्मिक ग्रंथ असून जागतिक बौद्ध पंडितांमध्ये या ग्रंथाची चर्चा होणे गरजेचे आहे.

इ.स. १९५६ नंतर जे बौद्ध साहित्य निर्माण झाले त्यामध्ये डॉ. आंबेडकराचे लेखन आणि भाषणे महत्त्वाचे असून महाराष्ट्र शासनाने आंबेडकरांचे हे साहित्य वीस खंडांमध्ये प्रसिद्ध केले आहे. डॉ. आंबेडकरांचा कोणत्याहि लेखनाची अथवा भाषणाची मूळ बैठक तात्त्विक आहे. बौद्ध धर्मांचा त्यांच्यावरील प्रभाव त्यातून दिसून येतो. धर्मांतरानंतर त्यांची बैठकसुद्धा याच तत्त्वप्रणालीवर आधारित आहे. अनेक कथा, कादंबरी, आत्मकथा, लोककला, नियतकालिके यावर धर्मांतराचा प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दिसून येतो. साहित्यिकांची पिढी मुंबईमध्ये निर्माण झाली.

धर्मांतराचा प्रभाव शैक्षणिक क्षेत्रावर पडलेला असून नवदीक्षित बौद्धांचा शैक्षणिक दर्जा मागासवर्गीय जातीमध्ये उल्लेखनीय आहे. धर्मांतराच्या वेळची पिढी अडाणी, अक्षरशून्य होती. परंतु या पिढीने शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या मुलांना प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण दिले. त्यामुळे या समाजात साक्षरतेचे प्रमाण वाढलेले असून उच्च शिक्षणाचेही प्रमाण वाढत आहे. धर्मांतरांनंतर या समाजात पांढरपेशा वर्ग निर्माण झालेला आहे. संपूर्ण देशात बौद्धांची लोकसंख्या महाराष्ट्रात जास्त असून महाराष्ट्रात ती मुंबई व तिच्या उपनगरात सर्वाधिक आहे. त्यांचे साक्षरतेचे प्रमाण ७६.२ एवढे आहे. मुंबईमध्ये अनेक सामाजिक-धार्मिक-राजकीय संस्था शैक्षणिक कार्य करीत आहेत. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन संस्था, अखिल भारतीय बौद्ध महासभा, आर.पी.आय., त्रैलोक्य बौद्ध महासंघ, सर्वोदय बौद्ध महाविहार, बौद्ध पंचायत समिती, बौद्ध विहारे इ. विविध सामाजिक-शैक्षणिक केंद्रे मुंबई शहर व उपनगरात शैक्षणिक कार्य करीत आहेत.

धर्मांतराच्या प्रभावामुळे नवदीक्षित समाजाने भारतीय समाजव्यवस्थेतील पारंपारिक व्यवसाय सोडून दिलेला असून मुंबई शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर केलेले आहे. म्हणूनच मुंबई व तीच्या उपनगरात नवदीक्षित बौद्धांचे प्रमाण सर्वाधिक आढळते. या ठिकाणी आल्यानंतर त्यांची आर्थिक स्थिती फार सुधारली असे नाही. आजही नवदीक्षित बौद्ध मोठ्या प्रमाणात चतुर्थ श्रेणीमध्ये काम करीत आहेत. परंतु गरिबी अथवा आर्थिक परिस्थिती हा त्यांचा प्रश्न नव्हता. म्हणूनच खेड्यातील गावगाडा अर्थव्यवस्थेला नकार देऊन शहरांकडे स्थलांतर केले. मुंबईतील मिल, गोदी, कारखाने, रेल्वे, महानगरपालिकेत मिळेल ते काम करीत आहेत. त्याचे धर्मांतर आर्थिक उन्नतीसाठी नव्हते, तर ते आत्मसन्मान, मानवी हक्कांसाठी होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या अस्पृश्यांच्या मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. सामाजिक समतेच्या लढ्यापासून ते धर्मांतराच्या चळवळीपर्यंत महिलांनी सक्रिय योगदान दिलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचाराचा जबरदस्त प्रभाव महिलांवर होता. मुंबईमधील महिलांनी आंबेडकरांच्या धर्मांतर घोषणेला पाठिंबा देण्यासाठी विशेष परिषद भरवून धर्मांतराला पाठींबा दिला होता. तसेच दि. १४ आक्टोबर १९५६ च्या धम्मदीक्षा समारंभात त्या फक्त उपस्थितच राहिल्या नाहीत तर त्यांनी दीक्षा देखील घेतली होती. यामध्ये उल्लेखनीय नाव म्हणजे यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकरांच्या पत्नी मीराताई आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सध्या त्या अखिल भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय नेता असून मुंबईमधून त्या धम्मप्रसाराचे व प्रचाराचे कार्य करत आहेत. तसेच मुंबई शहर आणि उपनगरात सर्वत्र बौद्ध महिलांनी महिला मंडळांची स्थापना केलेली आहे. ही महिला मंडळे बहुतेक बौद्ध विहाराशी संलग्न असून धम्मकार्य करीत आहेत. साहित्य क्षेत्रातही त्याचे योगदान महत्त्वाचे आहे. या संदर्भात मुंबईमधून निघणारे आम्ही मैतरणी हे मीनक्षी मून यांचे त्रैमासिक महत्त्वाचे आहे. सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रातही त्या पुढे आहेत. उदा. मंगलाताई लोढें, कल्पना सरोज इ. विविध अधिवेशने आणि परिषदांचे आयोजन करून धम्मप्रसाराचे व प्रचाराचे त्या कार्य करीत आहेत.

❑❑

# संदर्भ साधने

**प्राथमिक साधने : इंग्रजी :**


1. Ambedkar B. R., Writing and Speeches, Vol. From 1 to 22, Government of Maharashtra, Higher Education Dept., Mumbai.
2. Ambedkar B.R. , Buddha and the future of his Religion, Bheempatrica, Panjab, 1970.
3. Ambedkar B.R., Bhagawan Gautam Buddha and his Dhamma, sidharth, Mumbai 1957
4. Census of India, 1931, VoL,. 8 Part I, General Report, Bombay Presidency.
5. Census of Maharashtra, 1991, Series I Part IV B Table-C-9 religion Table.
6. Census of India, 1991, District Census Hand Book Greater Bombay, 1996.
7. Census of India, 2001, Dist.Census,Handbook Part XII A & B Series-28.
8. Economic and Political Weekly, Vol. 36 (18) May 5, 2001.
9. Gazzeteers of Maharashtra, 1986, K.K. Chaudhary, Govt. of Maharashtra.
10. Gazzeteers of India, Greater Bombay, District Part 2 and 3 Maharashtra Govt. K.K. Chaudhare Mumbai 1986.
11. Home Department Fil : Letter to Police Commissioner, Bombay 1930.
12. Journals – The Indian Journal of Social Science Vol. 60 (3) July 1999.
13. Journal of Asiatic society of Bombay 1986.
14. Maharashtra State Statistics Record.
15. Maharashtra State Statistics Record.
16. Migration in Greater Bombay, Gemographic.
17. Maharashtra State Statistic Abstract 1999-2000.
18. News Papers – Times of India 2936.
    Times of India 15 Oct. 1956.
    Bombay Cronical 25 May 1941.
19. Spl. Home Dept. File, 6 Nov. 1929/1930.
20. Spl. Home 355 (64) III, Untouchables.
21. Spl. Home 355 (64) V., Untouchables and Temple Entry.

### दुय्यम साधने : संदर्भ ग्रंथ इंग्रजी :


1. Adward S. M., Rise of Bombay, Times of India Press Mumbai, 1902.
2. Arnold Edward, Light of Asia, Kegan Paul Trench Trubner & Co. Ltd. London, 1932.
3. Beltx Johanes, Mahar-Buddhist and Dalit Religious Conversion and Social Political Emancipation, Manohar, Delhi, 2005.
4. Chandra Ramesh/Mittra Sangha, Dalit Identity in the New Millennium, commonwealth, New Delhi, vol. X 2003.
5. Das Bhagawan, Thus spok Ambedkar, Bheempatrica, Punjab, 1969.
6. David M.D., History of Bombay-1661-1708. Univ. of Bombay, Bombay 1973.
7. Desai Devangana, edi, Journal of Asiatic Society of Bombay, The Asiatic Society of Bombay, Mumbai 1986.
8. Gokhale B.G., Buddhism in Maharashtra-A History-Populay, Mumbai 1976.
9. Kaykani L.V. , edi. The Speeches and Writings of Shree Narayan Chandawarkar, Manoranjan, Mumbai 1911.
10. Mutafa Faizan/Anurag Sharma, conversion : Constitutional and Legal Implication, Kanishka, Delhi 2003.
11. Mungenikar B., edi, International Buddhist Conference, Volume, Mumbai 2005.
12. Nagarju S., Buddhist Architecture of Western India, Agam Kala, Delhi, 1981.
13. Prasad Vijay, Untouchable freedom story of a Dalit Community, Oxford Uni. Press, New Delhi, 2000.
14. Patwardhan Sunanda, Changes Among Indian Harijans, orient Longman, Delhi 1973.
15. Patel Sujata, Edi. Thinking Social Science in India, Eassage in Honour of Alice Thorner, Sagar, New Delhi 2002.
16. Robinson Rawena, Religious conversiton in India : Modes, Motivations and meaning, Oxford Univ. Press. IInd impression, Delhi 2008.
17. Rajshekhar, Brahminisum Weapons to fight counter Revolution, Dalit Sahitya Acadamy, Banglore, 2004.
18. Sigh Sanghsen, edi, Ambedkar on Buddhist Conversion and its impact, Eastern book Leenleters, Delhi, 1990.

19. Singh Yogendra, Modernization of Indian Tradition, Rawat, Jaipur/New Delhi reprinted 1999.
20. Vidya Deheija, Early Buddhist Rock Temples, Thames and Husen, Londan, 1972.
21. Zeliot Eleanor, from untouchables to Dalit : Eassys on the Ambedkar Movement, Manohar, Mumbai 1992.

**प्राथमिक साधने : मराठी**

१. कुलाबा जिल्हा सेन्सस १९५१.

२. जोशी लक्ष्मण शास्त्री, संपा., महाराष्ट्र राज्य, विश्वकोश १९८८.

३. भारतीय जनगणना - १९६१ जिल्हा जनगणना निर्देशन ग्रंथ कुलाबा.

४. महाराष्ट्र राज्य, ठाणे जिल्हा गॅझेटिअर, १९८२.

५. महाराष्ट्र राज्य, सांख्यिकी गोषवारा, १९८७-८८.

६. स्थापत्य कला, महाराष्ट्र गॅझेटिअर, खंड १, भाग २, २००२.

**वृत्तपत्र :**

१. अस्मितादर्श त्रैमासिक

२. जनता

३. प्रबुद्ध भारत

४. बुद्धयान त्रैमासिक

५. महाराष्ट्र टाईम्स

६. मूकनायक

७. युगंधर नियतकालिक

८. रिपब्लिकन

९. लोकमुद्रा

१०. सम्राट

११. सद् धम्म पत्रिका मासिक,

**स्मरणिका :**

१. बौद्ध पंचायत समिती सुवर्ण महोत्सव स्मरणिका.

२. सर्वोदय बौद्ध विहार स्मरणिका.

**शताब्दी विशेषांक :**

१. पाटणकर मनीषा, (संपा.), लोकराज्य, महाष्ट्र शासन २००६.

२. पवार दया(संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य, साहित्य व संस्कृती मंडळ, द्वितीय आवृत्ती, मुंबई, १९९९.

३. मनोहर यशवंत, (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, नागपूर विद्यापीठ, १९९१.

४. सामंत बाळ (संपा.), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, शताब्दी विशेषांक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई १९९३.

**दुय्यम साधने : संदर्भ ग्रंथ मराठी :**

१. आंबेडकर बी. आर., सूर्यकांत भगत, (अनु.) जातीभेद निर्मृलन, सुधीर, २००४.

२. आचार्य, बा.बा./शिंगणे मो.वि. (संपा.), मुंबईचा वृत्तांत महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, पुनर्घटन मुंबई १९८०.

३. आपटे, वा.गो., बौद्ध पर्व, समता नागपूर, १९९५.

४. आसावारे व्ही.एस., बॉम्बे शेड्युल्ड कास्ट इंम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, बाईप प्रिंट, मुंबई २००६.

५. औचरमल, एल.वाय., आंबेडकरवादी साहित्य आणि इतिहास पद्धती वैभव, उल्हासनगर, २००१.

६. अहिरे गंगाधर(संपा.),समता संग्रामाची पन्नास वर्षे, सम्यक प्रबांधन सभा नाशिक, २००६.

७. आंबेडकर बी.आर. देविदास घोडेस्वार (अनु.), दलितांचे शिक्षण, क्षितीज, नागपूर, २००१.

८. अत्रे त्रिंबक, गावगाडा, पॉप्युलर आवृत्ती दोन, मुंबई, १९५९.

९. कीर धनंजय (संपा.), कृष्णराव अर्जुन केळुस्कर आत्मचिरत्र आणि चरित्र, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई १९७७.

१०. कीर धनंजय, लोककर्ते, बाबासाहेब बोले, पॉप्युलर, मुंबई १९७२.

११. केतकर श्री. व्यं., प्राचीन महाराष्ट्र, भाग एक, वरदा, पुणे, १९८९.

१२. कालेलकर गो. म., मुंबई इलाख्यातील जाती, श्री.लक्ष्मीनाराण छापखाना, मुंबई १९२८.

१३. केळकर य. न., वसईची मोहीम, आनंद मुंद्रणालय, पुणे, १९३०.

१४. केतकर श्री. व्यं., पश्चिम महाराष्ट्र वरदा, आवृत्ती दुसरी, सुगावा, पुणे, २००६.

१५. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, आवृत्ती दुसरी, सुगावा, पुणे, २००६.

१६. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर, आवृत्ती चौथी, मुंबई, २००६.

१७. कांबळे बी. सी., जगातील मानवाने बुद्ध धम्मच पसंद करावा असे मी का म्हणते ? रयत प्रिंटींग प्रेस मुंबई (प्रकाशन वर्ष उपलब्ध नव्हते).

१८. कऱ्हाडे सदा, दलित साहित्य-चिकित्सा आणि स्वरुप, स्वरुप, औरंगाबाद, २००१.

१९. कांबळे बेबी, जिणं आमचं, सुगावा, पुणे आवृत्ती, दुसरी, २००२.

२०. कर्डक वामनदादा, बुद्धगीते, कौशल्य, औरंगाबाद, २००७.

२१. कर्डक वामनदादा, भिमा तुझ्या जन्मापूर्व, कौशल्य, औरंगाबाद, २००७.

२२. काटकर राजेंद्र, आंबेडकरवाद, सुधीर, वर्धा, २००९.

२३. कांबेळे बी. सी., बौद्धांची कैफियत, वैद्य ब्रदर्स प्रेस, मुंबई, १९६५.

२४. कुलकर्णी सुहास, अर्धी मुंबई, मॅजेस्टीक, आवृत्ती दोन, मुंबई, २००४.

२५. खैरमोडे चां. भ., डॉ. आंबेडकर चरित्र, ग्रंथ १ ते १२, सुगावा, पुणे.

२६. खरात शंकरराव, डॉ. आंबेडकरांचे विरोधक.

२७. खाबडे दिनकर, आंबेडकरांचे विरोधक.

२८. खंडेराव हरीष, आंबेडकरी कवितेचे अंतरंग, प्रज्ञा, आवृत्ती दोन, उल्हासनगर, २००१.

२९. खांडेकर ताराचंद्र, आंबेडकरी तत्त्वज्ञान, प्रचीती आणि अविष्कार, संकेत, नागपूर, २००९.

३०. खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, आवृत्ती दोन, इंद्रायणी, पुणे २००४.

३१. खरात शंकरराव, (संपा.), डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर, ठोकळ, पुणे, १९६६.

३२. गेल ऑमव्हेट, दिघे पी.डी. (अनु.), वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा, पुणे, १९९५.

३३. गुळवणे वा. रा., ब्राह्मण सभेची साठ वर्षे, ब्राह्मण सभा, मुंबई १९४९.

३४. गरुड अण्णासाहेब/सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, कैलाश, औरंगाबाद.

३५. गायकवाड प्रदिप, (संपा.), डॉ. बी. आर. आंबेडकर, कामगार चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९५०.

३६. गायकवाड प्रदिप, (संपा.), दलितांचे शिक्षण, क्षितीज, आवृत्ती पाचवी, २००४.

३७. गणवरी रत्नाकर, (संपा.), बहिष्कृत भारतातील अग्रलेख, रत्नमित्रा, नागपूर, १९७६.

३८. गांजरे मा.प. (संपा), डॉ. आंबेडकर भाषणसंग्रह.

३९. गोरे गोविंद, महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध, सहाय्यगन, मुंबई, १९७६.

४०. गजभिये संजय, समता सैनिकदल, इतिहास और संघर्ष, सम्यक नई दिल्ली, २००८.

४१. गायकवाड भाऊराव, (संपा.), प्रबुद्ध भारत, बुद्धभूषण प्रिंटिग प्रेस, मुंबई, १९५७.

४२. जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा विवेचनात्मक इतिहास, मराठी साहित्य परिषद खंड चौथा पुणे, १९६५.

४३. झेजिएट ऐलिनार, भदंत मेत्तानंद चिंचाळ, (अनु.), बौद्ध धम्म पुनर्शोध कार्य व डॉ. आंबेडकरांची धम्मदीक्षा, सुमेध, पुणे, २००६.

४४. जाधव रा. ग., निळी पहाट, श्रीविद्या, आवृत्ती तिसरी, पुणे, १९९१.

४५. जोगदंड पी. जी., दलित चळवळ, सिद्धांत आणि व्यवहार, प्रतिशब्द, मुंबई, २००६.

४६. ठाकुर भगवान, आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा, नागपूर, २००९.

४७. ठाकुर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा, पुणे, २००५.

४८. डोळस वसंत, दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप, अक्षर जुळणी, पुणे, १९९२.

४९. डांगळे अर्जुन, (संपा.), दलित साहित्य एक अभ्यास, सुगावा, आवृत्ती दुसरी, १९९८.

५०. ढगे सुशिला, मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा, पुणे २००४.

५१. तळवटकर, चिटणीस, रेगे, (अनु.), भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म, सिद्धार्थ कॉलेज, मुंबई, १९६०.

५२. देव शां. भा., महाराष्ट्र गोवे शिलालेख ताम्रपत्राची वर्णनात्मक सूची, महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

५३. दळवी दाऊद, लेणी महाराष्ट्राची, ग्रंथाली, मुंबई, २००४.

५४. दुनबळे त्र्यंबक, धर्मांतराचे अंतरंग, सुगावा, पुणे, २०००.

५५.	धोत्रे सु.बा., बौद्ध कालीन मुंबई, सागरी व मुंबई बेटातील बौद्ध संस्कृती, पद्मपाणी, मुंबई.

५६.	धोंगडे रमेश, दलित आतमचरित्रे, साहित्य आणि समाज, मधुराज, पुणे, १९९४.

५७.	धामणकर विनिशा, विस्तारलेले आकाश, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००९.

५८.	नेहरु जवाहरलाल, (अनु.) साने गुरुजी, भारताचा शोध, कॉन्टिनेंटल, पुणे १९८९.

५९.	नाईक बाबुराव, (संपा.), मुंबईचा वृत्तांत, महाराष्ट्र राज्य, संस्कृती मंडळ, मुंबई १९८०.

६०.	निकुंभे सी. एच., आद्य अस्पृश्याद्धारक गोपाळबाबा वलंगकर, सुगावा, पुणे २००६.

६१.	नातेकर विजय, आर.पी.आय. नेत्याच्या शोधात, सुगावा, पुणे २००९.

६२.	निर्मळे हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा, पुणे, १९८७.

६३.	प्रिसोळकर अ. का., (संपा.), शतत्रे, लोकहितादी निबंध संग्रह, पॉप्युलर, मुंबई आवृत्ती दुसरी मुंबई १९६७.

६४.	पंडित नलिनी, स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना, पुणे १९७७

६५.	पाटणकर मनिषा, (म्हैसकर), (संपा.), लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, २००६.

६६.	पोखर्णिकर देविदास, (संपा.), डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड १.

६७.	पवार ज. वि., आंबेडकरोत्तर, आंबेडकरी चळवळ, खंड १, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई २००२.

६८.	पगारे तुलसी, संकलन, भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना, सुगन, नागपूर, २००४.

६९.	पवार ज.वि., रिपब्लिकन पक्षाची शोकांतिका, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, १९९४.

७०.	पवार ज.वि., सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, २००२.

७१.	पानतावणे, गंगाधर, दलित साहित्य आणि चिंतन, साकेत, औरंगाबाद, १९९४.

७२.	पवार दया, बलुतं, ग्रंथाली, आवृत्ती सहावी, मुंबई, १९९५.

७३.	पवार उर्मिला, मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडविला, स्त्री-उवाच, मुंबई, १९८९.

७४.	प्रधान राम, आंबेडकर, काल-आज-उद्यचा, मायबोली, औरंगाबाद.

७५.	पंडित नलिनी, डॉ.आंबेडकर, ग्रंथाली, मुंबई, १९९६.

७६.	फडके य. दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या, पुणे, १९९०.

७७. फाटक न. र., न्या. महादेव रानडे, दुसरी आवृत्ती, निलकंठ, पुणे १९५६.

७८. फडके भालचंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर, आवृत्ती दुसरी, मुंबई, २००६.

७९. बाळ प्रकाश, (संपा.), मुंबई कालची आणि आजची, न्यू प्रिंटिंग प्रेस, मुंबई १९९७.

८०. ब्रम्हे सुलभा, दलितांच्या समस्या, साप्ताहिक, मुद्रणालय, पुणे, १९७३.

८१. श्रीपाद भट्टाचार्य, ऋग्वेद संहिता, महाराष्ट्र विधि विज्ञान संशोधन, १९४०.

८२. भावे वा. कृ., मुसलमान पूर्व महाराष्ट्र, खंड १, वा. कृ. भावे, १९४६.

८३. भिक्षू धर्मरत्न, थेरगाथा, बॉम्बे युनिव्हर्सिटी, १९३९.

८४. भदंत महानाम, डॉ. आनंद कौसल्यायन, अनु. माहवंस, बुद्ध भूमी, नागपूर, २०००.

८५. भागवत एन. के., थेरगाथा, बॉम्बे युनिव्हर्सिटी, १९३९.

८६. भोळे भास्कर/किहाल किशोर, (संपा.), बदलता महाराष्ट्र, आवृत्ती २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, २००३.

८७. भाग्यवंत बबन, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय, औरंगाबाद, २००८.

८८. माटे श्री. म., भगवतगीता, परामर्श ठोकळ, पुणे.

८९. महास्थाविर संघरक्षिता, डॉ.आंबेडकर आणि बौद्ध धर्म, दि कॉर्पोरेट बॉडी ऑफ दी बुद्धा एज्युकेशन फौंडेशन, तैवारन, १९९६.

९०. माटे श्री. म., अस्पृश्यांचा प्रश्न, लोकसंग्रह, पुणे १९३३.

९१. मून वसंत, (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूक नायक, महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, मुंबई १९९०.

९२. मून मीनाक्षी, (संपा.), फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता, नागपूर.

९३. मनोहर यशवंत, बौद्ध संस्कृती आणि साहित्य, युगसाक्षी, नागपूर, २००९.

९४. मोरे मा. शे., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य आवृत्ती तिसरी, औरंगाबाद, २०००.

९५. मिराशी वा. वि., शिलाक्षर राजवंशाचा इतिहास व कोरीव लेणी, विदर्भ संशोधन मंडळ, १९७४.

९६. मिराशी वा. वि., पुस्तकावली, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४.

९७. मून वसंत, डॉ. आंबेडकर आणि धम्मक्रांती, फुलराणी, मुंबई, १९७८.

९८. मेश्राम योगेश, दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास, श्री मंगेश नागपूर, १९९८.

९९. रायकर यशवंत, मुंबई ज्ञान व अज्ञान, राजहंस, पुणे १९९९.

१००. राजवाडे वि. का., महिकावतीची बखर, ऊर्फ माहिमची बखर, चित्रशाळा प्रेस, पुणे, १८४६.

१०१. रानडे फिरोज/रानडे रश्मी, महिमा मुंबईचा, ग्रंथाली, मुंबई, २००४.

१०२. रणपिसे आप्पासाहेब, आंबेडकरी साहित्य संप्रदायाचे समालोचन प्रणेता, आवृत्ती दुसरी, मुंबई, १९१९.

१०३. रामटेके, कांबळे, तारदाळकर, नागपूरची धम्मक्रांती, मुक्ती संग्राम, महाड, १९९१.

१०४. लिंबाळे शरणकुमार, (संपा.), शतकातील दलित विचार, दिलीपराज, पुणे, २००१.

१०५. वैद्य द्वा. गो., नारायण गणेश चंदावरकर, कर्नाटक पब्लिकेशन हाऊस, मुंबई १९३७.

१०६. वाळिंबे रामचंद्र, १९ व्या शतकातील महाराष्ट्राची पुर्नघटना, प्रतिभा मुद्राणालय, पुणे १९६२.

१०७. वाघमारे मोहन, आंबेडकरवादी साहित्य, समीक्षा, लुंबिनी, मुंबई, २००२.

१०८. वाघ गंगाधर, (संपा.), आंबेडकरी योद्धे, राहूल, डोंबिवली, २००६.

१०९. शिंदे वि. रा., भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्य, आवृत्ती दुसरी, औरंगाबाद, २००३.

११०. सहस्त्रबुद्धे पु.ग.(संपा.),लोकहितवादीची शतपत्रे, कॉन्टिनेंटल, आवृत्ती सातवी,पुणे,२००६.

१११. सुखाडे विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय, मुंबई, २००८.

११२. सोनावणे सुनिल, बौद्ध कला आणि साहित्य, अस्मिता शैक्षणिक धम्म विषयक चळवळ, उल्हासनगर, १९९४.

११३. सुखाडे अरविंद, धम्मचक्र परिवर्तनाची फलश्रुती, सम्यक, मुंबई, २००६.

११४. सोनावणे सुनिल, उपसंपादक, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्य चळवळ, उल्हासनगर, २००२.

११५. सोनावणे सुनिल, बौद्ध साहित्य, प्रेरणा आणि चळवळ, अस्मिता शैक्षणिक धम्मविषयक साहित्य चळवळ, उल्हासनगर, २००३.

११६. हाडेकर डी. वा., आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे २००५.

११७. त्रिपाठी रामकुमार, स्वामी द्वारिकादस शास्त्री, (अनु.), दिपवंस-गाथा, बुद्ध आकार ग्रंथमाला, म. गांधी, काशी विद्यापीठ, १९५६.

❑❑

# परिशिष्ट १

## मुक्ती कोन पथे ?

- माणुसकी प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा.
- संघटना करावयाची असेल तर धर्मांतर करा.
- सामर्थ्य संपादन करावयाचे असेल तर धर्मांतर करा.
- समता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा.
- स्वातंत्र प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर धर्मांतर करा.
- संसार सुखाचा करावयाचा असेल तर धर्मांतर करा.
- जो धर्म तुमच्या माणुसकी काही किंमत देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता ?
- जो धर्म तुम्हाला देवळात जाऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता.
- जो धर्म तुम्हाला पाणी मिळू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहाता ?
- जो धर्म तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही का रहाता.
- जो धर्म तुमच्या नोकरीच्या आड येतो त्या धर्मात तुम्ही का राहता.
- ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो मर्ध नसून शिरजोरीची सजावट आहे.
- ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे.
- ज्या धर्मात अमंगल पशूचा स्पर्श झाला असताना चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही तो धर्म नसून वेडगळपणा आहे.
- जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करून नये, शस्त्रधारण करून नये, असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे.

संदर्भ : वसंत मून, नरके हरि, संपा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण, खंड १८, भाग दोन, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई २००२, पृष्ठ क्र. ४८.

# परिशिष्टे २

## प्राचीन काळातील व्यापारी मार्ग आणि बौद्ध लेण्या

| | Ports, Cities and Routes | Cave Sites |
|---|---|---|
| 1. | Dahanuka (Dahanu) Port to Nasik (Present Palaghar-wada Igatpuri-Nasik road) | Igatpuri, Tringalwadi, Nasik |
| 2. | Sopara, Kalyan Thane Ports up the Nana pass towards Junnar | Jivadana-Virar, Pulu Sonala, Nanaghat, Jivadhan, Junner |
| 3. | Sopara, Kalyan Thana ports up the ghat via Borghat and smaller passes like the sava | Kanheri, Kondivite, Ambivale Kondane, Bhaja, Karle, Bedsa, Induri, Pale, Shelarwadi |
| 4. | Chaul and other ports on the Nagotha creek towards Borghat | Chaul, Ramdharna, Nadsur, Karsamble, Gomashi |
| 5. | Chaul and other posts on the Rajpuri creek towards Mahad and up the Varandha pass leading further to Ter etc. | Kuda Mahad Kol, shirwal |
| 6. | Dabhol and chiplun ports to Karad Via the Kumbharli pass | Chiplun, Patna, Karad |
| 7. | Bharukachcha (Broach) port To paithan via probably prakasha And Bahal | Pitalkhora |
| 8. | High way from Ujjain through Mahishmati to Paithan | Ajanta |

Ref. : Nagarjun S., Buddhist Architecture of Western India, Agam Kala Prakashan, 1981, Delhi, Page No. 12

# परिशिष्ट ३

## बावीस प्रतिज्ञा

(१) मी ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(२) मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(३) मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(४) देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.

(५) बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.

(६) मी श्राद्धपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही.

(७) बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.

(८) कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांचे हातून करवून घेणार नाही.

(९) सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.

(१०) मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

(११) मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

(१२) मी बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.

(१३) मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.

(१४) मी चोरी करणार नाही.

(१५) मी खोटे बोलणार नाही.

(१६) मी व्यभिचार करणार नाही.

(१७) मी दारू पिणार नाही.

(१८) मी प्रज्ञा, शील आणि करूणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.

(१९) माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.

(२०) बुद्ध धम्म हा सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

(२१) माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.

(२२) इतःपर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

❑❑

# परिशिष्ट ४

## धर्मांतरापूर्वीचे संस्कार

१. जन्मविधी - बालकाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी सटवीची पूजा केली जाई. पाच दगड मांडून. बाराव्या दिवशी बारसे घालत. या कार्यक्रमात घुगऱ्या वाटत असत. बालकाची दोन नावे ठेवली जात एक नावरस आणि दूसरे आवडीनुसार.

२. साखरपुडा - मुलांची लग्न जुळवताना जवळपासच्या गावातील सोयरीक बनवत. सोयरीक पाहताना घरदार कुळ शील पाहिजे जाई तसेच वतनवाटा सोयरीक पाहून देण्याघेण्याचा प्रघात होता. लग्न ठरल्यानंतर साखरपुडा केला जात असे. सारखरपुडयाला घरबांधणी असे म्हणत. या कार्यक्रमात पानसुपारी तसेच साखर वाटली जाई. गावच्या भावकीची संमती दिली जाई.

३. लग्नविधी - लग्नसमारंभ विधी पाच दिवस चालत असे. या पाच दिवसात पाचविधी केले जात. लग्नाच्या अगोदर महिनाभर जाती पुजण्याचा कार्यक्रम चालत असे. जात्यावर हळद वैगेरे दळणे पत्यक्ष लग्न पाच दिवस चाले. पहिल्या दिवशी हळदीसमारंभ, दुसऱ्या दिवशी नेतात, तिसऱ्या दिवशी लग्न विधी, चौथा दिवस नेतात पाणी हा विधी असे पाचव्या दिवशी रूखवत आणि वरात असे. वरात वाजतगाजत गावाऱ्या वेशीचवळी मंदिरापर्यंत जात असे. पायरीजवळून देवाचे दर्शन घेतले जात असे. लग्नाच्या दिवशी देवकार्य देवकाची पूजा होई. लग्नविधी वधूवरांचे मध्ये आंतरपांट धरून होई मंगलाष्टके म्हणटली जात लग्नविधी महारातील पुरोहित, ढगूमेघूजी, गुरूबुवा, पंडित किंवा गावातील कर्ता माणूस लावत असे. ब्राह्मणाला बोलविण्याची प्रथा नव्हती. सप्तपदीची पद्धती नव्हती. लग्न झाल्यानंतर मुलाच्या घरी बाशिंग सुटणे हातातील गंडादोरा सोडणे इ. विधी होत असे मग सहाव्या दिवशी सर्व नातेवाईक आपापल्या घरी जात.

४. पुनर्विवाहाची प्रथा - महार समाजात मुलगा व मुलगी दोघानांही काही कारणास्तव घटस्फोट घेता येत असे तसेच दोघानांही पुनविवाह करण्याचा अधिकार होता त्यास गाठीचे लग्न म्हणत विधवा पुनर्विवाह होत असत.

५. अत्यंसंस्कार - गावाच्या जवळ शेतात अत्यंसंस्कार केले जात. प्रेताचे दफन केले जाई, बारा तेरा दिवस सुतक पाळत. वर्षश्राद्ध करत.

संदर्भ : महाराष्ट्रातील महारांचा इतिहास, शंकरराव खरात, इंद्रायणी, पुणे, २००३, पृ.११३-१२४.

❑❑

## परिशिष्ट ५

## धर्मांतरानंतरचे बौद्ध समाजातील संस्कार-विधी

(१) गर्भ मंगल विधी : मातेला गर्भधारणा झाल्यापासून तीन महिन्यानंतर हा संस्कार करावा हा संस्कार गर्भ रक्षणकरिता व बाळाच्या आणि मातेच्या कल्याणाकरिता असतो.

(२) नामकरण विधी : आपले धम्मगुरू बौद्ध भिक्खुंच्या आशिर्वादाने मुलाचे नामकरण करावे. महान धम्मपरंपरेचा आर्शिवाद आपल्या बाळास मिळायला हवा.

(३) विद्यारंभ विधी : लहान बाळाला विशिष्ट धम्म संस्काराने विद्यारंभ करण्यास सांगावे. मोठा लाभ होत असतो. बौद्ध धम्म विद्येची व प्रज्ञावंताची परंपरा आहे.

(४) वाढदिवस : (आवश्यकतेनुसार) हा कार्यक्रम काही महत्त्वाचा लाभ करीत असतात.

(५) साक्षगंध : लग्नापूर्वी हा संस्कार वधु पक्षाच्या घरी घेतला जातो.

(६) लग्नविधी : मुलामुलीने एक दुसऱ्याला आपला जीवनसाथी मानून सामाजिकरित्या या पवित्र संस्कारांनी विवाबद्ध होऊन संसार सुरू कराव्याचा असतो.

(७) अंत्यसंस्कार : व्यक्तीच्या मृत्युप्रसंगी ही विधी केली जाते. (अशा प्रसंगी डोक्याचे केस काढू नये.)

(८) जलदान विधी/पुण्यानुमोदन : मृत्युनंतरच्या सात किंवा दहा दिवसांनंतर हा विधी करायचा असतो. हा विधी धम्मगुरूच्या हस्ते करणे फार महत्त्वाचे असते.

(९) स्मृतिदिन, पुण्यतिथी : हा कौंटुबिक विधी असतो. व्यक्तीच्या महतीनुसार या विधीला समाजात मोठे महत्त्व येते. हा विधी शुद्ध महत्त्वाचा मानला जातो.

(१०) शुभ कार्यरंभ विधी : आपल्या जीवनातील कोणतेही शुभ कार्य आपण धम्मपूजा करून धम्माचे स्मरण करून करावे. दीर्घ स्वरूपात त्याचा मोठा लाभ होत असतो.

(११) पायाभरणी : कोणत्याही इमारतीची सुरूवात करतांना धम्मपूजा करून करावी. भविष्यात फार महत्त्वाची ठरते. ती जागा धम्माच्या पवित्र तरंगाने मंगलमय बनत असते.

(१२) गृहप्रवेश/वास्तुशांती : नवीन घरात राहायला जाते वेळी हा विधी केला जातो. आपण ज्या घरात राहात असतो त्या घरातील वातावरण धम्मपूजेने मंगलमय तयार करून तेथे वास्तव्य करणे मोठे हिताचे ठरत असते. हा फार महत्त्वाचा विधी असतो.

(१३) श्रामणेर दीक्षा विधी : लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर प्रत्येक मुलाने कमीतकमी २-३ महिन्याकरिता श्रामणेर दीक्षा घेणे बौद्ध देशात मोठे पवित्र मानले जाते.

(१४) रोग निवारण विधी : कोणत्याही आजाराच्या प्रसंगी घरी धम्मगुरुला बोलावून हा मंगल विधी केला जात असतो.

(१५) दिवंगत व्यक्तिच्या समाधिप्रसंगी विधी : मृत्युनंतर त्याच्या अस्थी धातुवर स्मारक स्वरुपात स्तुप किंवा चैत्य बांधण्याची बौद्ध परंपरा आहे. त्या प्रसंगी हा विधी केला जातो.

(१६) विहार दान विधी : बुद्ध विहार उपासक मंडळीने बांधायचे असते आणि ते भिक्खु संघाला दान करायचे असते. त्या प्रसंगी हा महत्त्वपूर्ण विधी केला जातो.

(१७) धम्मदीक्षा विधी : इतर धर्मीय जर बुद्ध धम्माची दीक्षा स्वयंप्रेरणेने स्वइच्छेने घेत असतील त्या वेळी हा विधी करावयाचा असतो. या विधीचे मोठे महत्त्व आहे.

(१८) अष्टशील उपोसथ व्रत ग्रहण विधी : पौर्णिमा, अमावस्या व अष्टमीला उपोसथ व्रताचे पालन उपासक, उपासिकांनी करायचे असते. त्या प्रसंगी हा महत्त्वाचा विधी घेतला जातो.

(१९) पुनर्विवाह विधी : बौद्ध संस्कृतीत पुनर्विवाहास मान्यता आहे. पती-पत्नीमधून कोणी एकाच्या मृत्युनंतर असा विधी पार पाडला जातो.

(२०) बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना विधी : बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना धम्मगुरुच्या हस्ते विधीवत करावयाची असते.

(२१) बोधिवृक्ष रोपण विधी : बोधिवृक्ष (पिंपळाचे झाड) मोठ्या पवित्र भावनेने पूजा करून लावण्याची प्रथा आहे. कोणत्याही विधी संस्कार करते वेळी कर्त्या उपासकाने नशापाणी मुळीच करू नये.

❑❑

# परिशिष्ट ६

# वधू-वर प्रतिज्ञा

### पतीने घ्यावयाच्या प्रतिज्ञा

१) मी माझ्या पत्नीचा सन्मान ठेवीन.

२) मी माझ्या पत्नीची अवहेलना, अपमान करणार नाही.

३) मी पंचशीलाचे पालन करीन, मी चोरी करणार नाही, दारू पिणार नाही, नीतीने वागेन इ.

४) मी माझ्या पत्नीस संसारी जीवनात सुखी व समाधानी ठेवीन.

५) मी माझ्या पत्नीस माझ्या ऐपतीप्रमाणे कपडलत्ता करीन, दागदागिने करीन व तीला सुखी ठेवीन.

### पत्नीने घ्यावयाच्या प्रतिज्ञा

१) मी माझ्या पतीची सेवा नम्रतापूर्वक करून, त्यांना सुखी व समाधानी ठेवीन.

२) मी शीलवान व चारित्रवान राहून नीतीने व विनयाने वागेन.

३) मी संसार प्रपंचातील कामे लक्षपूर्वक व संसार सुखाला पोषक अशा रितीने पार पाडीन.

४) मी माझ्या घरातील इतर मंडळीशी नम्रतेने वागेन.

५) मी माझ्या शेजाऱ्यांशी चांगल्या भावनेने वागेन.

संदर्भ : शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंद्रायणी, पुणे, २००६, पुनर्मुद्रण पृष्ठ क्र.२२५-२२६.

❑❑

# परिशिष्ट ७

## १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील नवबौद्धांची लोकसंख्या

| जिल्हा | लोकसंख्या |
|---|---|
| १. बृहनमुंबई | ४३३६ |
| २. ठाणे | ४६४७ |
| ३. रायगड | ७६७२ |
| ४. रत्नागिरी | १७१७७ |
| ५. सिंधदुर्ग | - |
| ६. नाशिक | १०,०३८ |
| ७. धुळे | २३२२ |
| ८. जलगाव | २७२० |
| ९. अहमदनगर | ६४२१ |
| १०. पुणे | २०,८७४ |
| ११. सातारा | २४,२८२ |
| १२. सांगली | ४,३५० |
| १३. सोलापूर | ५०४९ |
| १४. कोल्हापूर | ३१२३ |
| १५. औरंगाबाद | १५२९६ |
| १६. जालना | - |
| १७. परभणी | ६३८० |
| १८. बीड | ५९८८ |
| १९. नांदेड | ४८८५ |
| २०. उस्मानाबाद | ४५४३ |
| २१. लातूर | - |
| २२. बुलढाणा | १३८८ |
| २३. अकोला | ३२१३ |
| २४. अमरावती | २०,६६३ |
| २५. यवतमाळ | ४८०४ |
| २६. वर्धा | ९९०९ |
| २७. नागपूर | ३४४५ |
| २८. भंडारा | ७४२९ |
| २९. चंद्रपूर | २११० |
| ३०. गडचिरोली | - |
| एकूण | २,०३,०७५ |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य सांख्यिकी गोषवारा १९८७-८८, महाराष्ट्र शासन, मुंबई १९९१, पृष्ठ क्र.४२.

❑❑

## परिशिष्ट ८

### मुंबई शहर आणि उपनगरातील प्रत्येक वॉर्ड मधील मागासवर्गीय जातीची टक्केवारी.

### उतरत्या क्रमाने १९९१ च्या जनगणनेनुसार

| वॉर्ड नंबर | वॉर्डचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १) च/थ | प्रॉपर चेंबुर, माहूल ट्राम्बे, गोवडी, वडवली बोर्ला | १४.३२ |
| २) ऋ/छ | दादर, माहिम | १२.२६ |
| ३) ऋ/ड | प्रभादेवी, वरळी, चिंचपोकळी, लवग्रेव्ह | १०.४९ |
| ४) च/ए | चॅपर चेंबूर, माहूल, ट्रॉम्बे, गोवडी, चोर्ला | ९.५३ |
| ५) क/ए | खार स्किम, हिलरोड, एवं टर्नर रोड, सातांकूझ-पूर्व, बाजार चर्च, हॉल, नौपाडा, एवं सातग्राम. | ७.४४ |
| ६) छ | घाटकोपर, किरोत, घाटकोपर, पांजर पोळा, विक्रोळी | ७.१८ |
| ७) ङ | न्यू मील-कुर्ला, स्टेशन तकिया-कुर्ला स्वदेशी मील, चुनासही, बाजार चर्च हॉल नौपाडा, हवं साताक्रूझ. | ७.१८ |
| ८) ऋ/ड | परेल, शिवडी, नायगाव | ६.९४ |
| ९) झ/ड | गोरेगाव एव् ओशीग्राम, आरे, एकसर पालाडी. | ६.७० |
| १०) ड | विक्रोळी, माहूर, तुलसी, गुंडगाव, विहार भांडूप | ६.६३ |
| ११) अ | अप्पर कुलाबा, मिडल व लोअर कुलाबा, फोर्ट दक्षिण व उत्तर ...नेड | ६.३८ |
| १२) ढ | मुलूंड पूर्व आणि पश्चिम, नाहूर, तुलसी, गुंडगाव | ६.०६ |
| १३) ऊ | खेतवाडी, ताडदेव, गिरणगाव, चौपाटी. | ५.७६ |
| १४) ए | माझगाव, ताडवाडी, १ला नागपाडा, २रा नागपाडा, कामाठीपूरा, भायखळा | ५.४८ |
| १५) ऋ/छ | शिवडी, माटूँगा, सायन | ५.८७ |
| १६) इ | मांडवी, चकाला, उमरवाडी डोंगरी | ५.२७ |
| १७) ठ/ड | कांदिवली एव चार कोप, पोईसर एवं आकुर्ली | ५.२५ |
| १८) घ/ए | विलेपार्हे-पूर्व, अंधेरी पूर्व, जोगेश्वरी पूर्व | ४.१३ |
| १९) झ/छ | एरंगल एवं दासली, मालाड पश्चिम-पूर्व, कुरार दिंडोशी, चिंचोली, वठवण, वलफाई, मातवणी आकसे एव् मार्वे. | ३.७४ |
| २०) ठ/छ | बोरिवली एवं शिम्पोली, एकसर एव मंडपेश्वर, गोराई, एवं कुलवंम कान्हेरी, मागठाणे, दहिसर | ३.३६ |
| २१) घ/थ | विलेपार्ले पश्चिम, जुहू अंधेरी-पश्चिम, वर्सोवा, मढ, जोगेश्वरी पश्चिम. | ३.४७ |

| | | |
|---|---|---|
| २२) क/थ | स्लेटर हाऊस, हिलरोड एवं टर्नर रोड, सांताक्रूस पश्चिम, कोलीवाडा एवं ब्रांदा हिल, पाली हिल, दांण्डा, खार स्किम, साताक्रूस मध्य. | ३.३२ |
| २३) उ | खारा तलाव कुंभारवांडा, भुलेश्वर मार्केट, धोबी तलाव, फणसवाडी | १.२३ |

येथे सर्वांत जास्त मागासवर्गियांची टक्केवारी आहे. च/थ, ऋ/छ, ऋ/ड, च/ए येथे सर्वात कमी मागासवर्गियांची टक्केवारी आहे.

संदर्भ : Census of India 1991 series – 14 Maharashtra Part XII A & B Director of census Greater Bombay – 1996, P.No. 44

❑❑

# परिशिष्ट ९

**१९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वाधिक बौद्धांची लोकसंख्या मुंबईमध्ये आढळते.**

| | | १९९१ | १९८१ |
|---|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई | ५,५७,०८९ | ४,६७,७१६ |
| २. | ठाणे | १,९१,४४६ | १,२२,७४३ |
| ३. | रायगड | ७९,२९६ | ६७,७८७ |
| ४. | रत्नागिरी | १,१५,२९० | १,२६,८०५ |
| ५. | सिंधदुर्ग | २२,३२९ | - |
| ६. | नाशिक | ७३.२८५ | १,००,६७० |
| ७. | धुळे | १७,५६२ | ३५,७०२ |
| ८. | जळगाव | १,१५,४६४ | १,०७,८५४ |
| ९. | अहमदनगर | ३२,९३२ | ६१,४९५ |
| १०. | पुणे | २,६६,००२ | २,१५,१३२ |
| ११. | सातारा | १,२५,२२० | १,०२,९६९ |
| १२. | सांगली | ३१,४५२ | ४१,३५० |
| १३. | सोलापूर | ३७,०७१ | ४६,८०८ |
| १४. | कोल्हापूर | ४१,१६४ | २५,४०८ |
| १५. | औरंगाबाद | १,९३,१५३ | १,९२,०४९ |
| १६. | जालना | १,२०,१७५ | - |
| १७. | परभणी | २,५९,६३६ | २,१७,९८८ |
| १८. | बीड | ७८,७७० | ५४,९८२ |
| १९. | नांदेड | २,४०,११३ | १,७२,१११ |
| २०. | उस्मानाबाद | ४०,७२७ | ९४,७३८ |
| २१. | लातूर | ७१,७९१ | - |
| २२. | बुलढाणा | २,५६,९९२ | १,८६,७५२ |
| २३. | अकोला | ३,७१,६८९ | २,९६,११६ |
| २४. | अमरावती | ३,०१,२६० | २,१९,१२३ |
| २५. | यवतमाळ | १,९३,३३६ | १,४९,९३९ |
| २६. | वर्धा | १,५१,६५२ | १,२९,०२१ |
| २७. | नागपूर | ४,९३,२०८ | ३,४३,३३१ |
| २८. | भंडारा | २,५५,९६८ | १,७५,४७३ |
| २९. | चंद्रपूर | २,३९,७३७ | २,०२,२०७ |
| ३०. | गडचिरोली | ६३,९७६ | - |
| | एकूण | ५०,४०,७८५ | ३९,४५,१४९ |

संदर्भ : महाराष्ट्र सांख्यिकी गोषवारा, १९९९-२०००, महाराष्ट्र सरकार, मुंबई २००६. जनगणना १९९१, पृष्ठ क्र. ५८ आणि ७९.

❑❑

# परिशिष्ट ११

## १९६१ ते २००१ या काळातील भारतातील बौद्धांची लोकसंख्या

| India/States/Union territories | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 |
|---|---|---|---|---|---|
| India | 3,256,036 | 3,812,325 | 4,719,796 | 6,387,500 | 7,955,207 |
| Jammu & Kshmir | 48,360 | 57,956 | 69,706 | * | 113,787 |
| Himachal Pradesh | 6,308 | 35,937 | 52,629 | 64,081 | 75,859 |
| Punjab | 14,857 | 1,374 | 799 | 24,930 | 41,487 |
| Chandigarh | ** | 92 | 454 | 699 | 1,332 |
| Uttaranchal | $ | $ | $ | 12, 850 | 12,434 |
| Haryana | ** | 845 | 761 | 2058 | 7,140 |
| Delhi | 5466 | 8,720 | 7,117 | 13,906 | 23,705 |
| Rajasthan | 759 | 3,642 | 4,427 | 4,467 | 10,335 |
| Utter Pradesh | 12,893 | 39,639 | 54,542 | 208,583 | 302,031 |
| Bihar | 2,885 | 4,806 | 3, 003 | 2,073 | 18,818 |
| Sikkim | 49,894 | - | 90,848 | 110,371 | 152,042 |
| Arunchal Pradesh | 5,089 | 61,400 | 86,483 | 111,372 | 143,028 |
| Nagaland | 42 | 179 | 517 | 581 | 1,356 |
| Manipur | 325 | 495 | 473 | 711 | 1,926 |
| Mizoram | *** | 22,647 | 40,429 | 54,024 | 70,494 |
| Tripura | 33,716 | 42,285 | 54,806 | 128,260 | 98,922 |
| Meghalaya | *** | 1,878 | 2,739 | 2,934 | 4,703 |
| Assam | 36,513 | 22,565 | ** | 64,008 | 51,029 |
| West Bengal | 112,253 | 121,504 | 156,296 | 203,578 | 24,364 |
| Jharkhand | $$$ | $$$ | $$$ | 1,445 | 5,940 |
| Orrisa | 454 | 862 | 8,028 | 9,153 | 9,863 |
| Chhattisgarh | $$ | $$ | $$ | 48,651 | 65,267 |
| Madhya Pradesh | 113,365 | 81,823 | 75,312 | 168,016 | 209,322 |
| Gujarat | 3,185 | 5,469 | 7,550 | 11,615 | 17,829 |
| Daman & Diu | + | - | - | 31 | 126 |
| Dadra & Nagar Haveli | 2 | 73 | 189 | 200 | 457 |
| Maharashtra | 2,789,501 | 3,264,223 | 3,946,149 | 5,040,785 | 5,838,710 |
| Andhra Pradesh | 6,753 | 10,035 | 12,930 | 22,153 | 32,037 |
| Karnataka | 9,770 | 14,139 | 42,147 | 73,012 | 393,300 |
| Goa | 189 | 260 | 302 | 240 | 649 |

# परिशिष्ट १२

**मागासवर्गियांमध्ये एकूण एकोणसाठ जाती असून मुंबईमध्ये प्रमुख मागसवर्गिय जातींची लोकसंख्या १९८१-१९९१ च्या जनगणनेनुसार खालीलप्रमाणे आढळते.**

| | **जात** | **१९८१** | **१९९१** |
|---|---|---|---|
| १) | बाम्बी | १५५२६३ | १८८९७८ |
| २) | महार | ४७१७१ | १८७२५४ |
| ३) | भंगी | ३८८६२ | ४९२०३ |
| ४) | मांग | ३९१०४ | ५५८१४ |
| ५) | मेघवाल | २८१५६ | ३३८५९ |
| ६) | ढोर | १८४०८ | २२७९३ |
| ७) | पासी | ६८२० | ६७९८ |

संदर्भ : Census of India 1991 Director of census Hand Book, Greater Bombay, Maharashtra Census Director/ Bombay – 1996, Mumbai, P.No. 41

❑❑

## परिशिष्ट १३

## मुंबई परिसरातील नवीन विकसित होणाऱ्या धम्मकेंद्रांतील बौद्धांच्या टक्केवारीचे विभाजन, १९९१

| | |
|---|---|
| मुंबई | ५.५७ |
| मुंबई उपनगर | ५.६१ |
| ठाणे | ४.८१ |
| कल्याण | ५.६८ |
| उल्हासनगर | ५.९० |
| मीरा भाईदर | १.४० |
| नवी मुंबई | ७.८८ |

संदर्भ : Census of India . Series – 14 Maharashtra Part XII A & B Director of census Greater Bombay – 1996, P.No. 61.

❑❑

# परिशिष्ट १४

## दलित साहित्यिक

अण्णा भाऊ साठे - खुळवाडी, बरबाळया कंजारी, भानामती, फरारी, कृष्णकाठच्या कथा गजाआउ गुऱ्हाळ, लाखी जिवंत काडतूस, नवती, चिरागनगरी भूत,

शंकरराव खरात - बाराबलुतेदार, तडीपार, सांगावा, टिविचा फेरा, सुटका, दौंडी, आडगावच पाणि, गावशिव, मुलाखत, पाणि, बहिष्कार, पूजा इत्यादी.

ना. रा. शेंडे - सावली, डोंगरमाथ्यावरील दिवा, प्रतिध्वनी,

बंधुमाधवराव - जावे त्यांच्या वंशा, आम्हीही माणसे आहोत, महार जन्माची कथा, सारआभाळ फाटलय, कपाळी लिवल्याल कधी पुसल, कोणत्या पापाची शिक्षा, सव्वा रुपया कप, वरीले वाण सतिचे, कायद्याने घेतला बळी,

बाबूराव बागुल - जेव्हा मि जात चोरली, मरण स्वस्त होत आहे, सुड, विद्रोह, दसऱ्याचा रेडा, बोव्हाडा इत्यादी आंबेडकरी कथेचे सर्वोच्च शिखर गाठले.

केशव मेश्राम - खरवड, रुतलेली माणसे

वामन होव्हाळ - बेनवाड

अर्जुन डांगळे - बांधावरची माणस

योगीराज वाघमारे - उष्टेक, बेगड

अजिताभ - पड

योगेश मेश्राम - रक्ताळलेली लक्तरे

दया पवार - रक्त, ससाणा

शंकरराव सुरवडकर - हयाला सोडून कुणीही

भिमराव शिवराले - बंडा, हत्यार, पोळा, अज्जस

ताराचंद्र खेडेकर - तहान, विसावा

दलित साहित्यात प्रथम कविता आली.

| | | |
|---|---|---|
| नाराण सुर्वे | - | ऐसा ग मी ब्रम्ह पाहिला, माझे विद्यापीठ, जाहीरनामा |
| नामदेव ढसाळ | - | गोलपिठा, मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले, आमचे इतिहासातील एक अपरिहार्य पात्र, प्रियदर्शी, तुही इयत्ता कनची, तुही इयत्ता |
| केशव मेश्राम | - | उत्खनन |
| दया पवार | - | कोंडवाडा |
| वामन निंबाळकर | - | गावकुसाबाहेरच्या कविता |
| यशवंत मनोहर | - | उत्थान गुफा |
| त्र्यंबक सकपाळे | - | सुरुंग |
| प्रल्हाद चोंदवणकर | - | ऑडिट |
| ज.व्हि. पवार | - | नाकेबंदी |
| अर्जुन डांगळे | - | छावणी हलती आहे. |
| चोखा कांबळे | - | पिंपळ पान, ठिणगी |
| रविचंद्र हडसनकर | - | पौर्णिमा |
| हिरा बनसोडे | - | आकाश माती |
| देवानंद गोरडे | - | आमची कविता |
| मनोहर वाकोडे | - | शुरायान |
| सुखराम हिवराळे | - | अश्रुंचा उन्हाळा |
| शांताराम हिवराळे | - | दस्तखत |
| प्रकश जाधव | - | निखारे |
| निलकांत चव्हाण | - | रापि जेव्हा लेखणी बनते |
| राम दोतोंडे | - | होरपळ |
| भिमसेन देठे | - | युद्धाई |

❑❑

# परिशिष्ट १५

## आंबेडकरवादी साहित्यिक[१]

**आंबेडकरवादी कवी :** कविता हा आंबेडकरवादी साहित्याचा पहिला प्रकार वामनदादा कर्डक, नागोराव पाटणकर, राजानंद गडपायले, दिनबंधू शेगावकर, इ. लोकशाहीरांनी आपल्या कवितांमधून आंबेडकर घराघरात पोहचविले. सध्याच्या काळात प्रतापसिंग बोदेडे, प्रकाश पाटणकर, संभाजी भगत हे कार्य करत आहेत. याच वेळी बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, त्र्यंबक सकपाळे, प्रल्हाद चेंदणकर, वामन निंबाळकर, हिरा बनसोडे, अरुण काळे, ज्योती लांजेवार, प्रकाश जाधव, लोकनाथ यशवंत, मोतिराम कटारे, उत्तम कांबळे, शरणकुमार लिंबाळे, महेंद्र भवर, राम दातोंडे, भवंत एन. बोहीरला, धम्मपाल रत्नाकर इत्यादी अनेक कवींनी आंबेडकरवादी कवितेला समृद्ध केले आहे. आंबेडकरवादी गझलकार - आंबेडकरवादी गझल लिहीणारे भाऊ पंचभाई, प्रमोद वाळके, हृदय चक्रधर, सूर्यकांत मूनघारे, सिद्धार्थ भगत असे अनेक कवी आहेत.

**आंबेडकरवादी कथाकार :** आंबेडकरवादी कथेचे सर्वोच्च शिखर बाबुराव बागूलांनी गाठले त्यानंतर बंधू माधव, योगीराज वाघमारे, अमिताभ भीमराव हिरवाळे, अविनाश डोळस, प्रकाश मोगले, वामन होवाळ, दयानंद म्हस्के, गौतमी पुत्र कांबळे, प्रकाश खरात इ. अनेकांनी कथाक्षेत्र समृद्ध केले.

**आंबेडकरवादी स्वकथनकार :** आंबेडकरवादी स्वकथांनी पराक्रमांची नोंद केलेली दिसते दया पवार, प्र. ई. सोनकांबळे, लक्ष्मण माने, पार्थ पोकळे, माधव कोंडविलकर, लक्ष्मण गायकवाड, शरणकुमार पिंबाळे, किशोर शांताबाई काळे, वसंत मून, शंकरराव खरात, उत्तम कांबळे, इत्यादी तसेच शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, मुक्ता सर्वगोड, कुमुद पावडे, जनाबाई गिऱ्हे, शांताबाई दाणी, उर्मिला पवार, यशोधर गायकवाड इत्यादी.

**आंबेडकरवादी कादंबरीकार :** शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल, सुधाकर गायकवाड, शरणकुमार लिंबाळे, यशवंत मनोहर, इ. लेखकांनी महत्त्वाची साहित्य निर्मिती केली आहे.

**आंबेडकरवादी रंगभूमी** : नाटकाच्या क्षेत्रात प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, भि.शि. शिंदे, प्रकाश त्रिभुवन, प्रभाकर दूपारे, सिद्धार्थ तांबे, जयंत पवार, अरुण मिजरकर, भगवान हिरे, अशोक हंडोरे, संजय पवार, संजय जीवने, सुनिल रामटेके, इ. लेखकांनी महत्त्वाचे कार्य केले.

**वैचारिक निबंधकार** : वैचारिक भूमिका घेणारे म्हणजे डॉ. म.ना. वानखेडे, बाबुराव बागूल, म.भि. चिटणीस, भालचंद्र फडके, वसंत मून, भालचंद्र मुगणेकर, डॉ. रावसाहेब कसबे, राजा ढाले, सुधाकर गायकवाड, डॉ. यशवंत मनोहर, वी.डी. होडकर, उत्तम कांबळे, इ.

या सर्वांनी डॉ. आंबेडकरांना अपेक्षित धम्मविचार, समाजविचार आणि सांस्कृतिक विचार बदलत्या काळाच्या संदर्भात मांडला. या सर्वांनी आंबेडकरांना अभिप्रेत असे ललित साहित्य वैचारिक साहित्य आणि समीक्षा निर्माण केले. त्यांच्या साहित्याला आंबेडकरवादी साहित्य म्हणले जाते.'[१]

❑❑

## परिशिष्ट १६

## इ.स. १८६६ ते इ.स. २००६ बहुजन समाजाची काही महत्त्वाची नियतकालिके

दीनबंधू - महात्मा फुले बहुजनांचे पहिले वृत्तपत्र

विटाळ विध्वंस - गोपाळबाबा वलंगकर वृत्तपत्र

चोखामेळा - किसन फागू बनसोडे

मुकनायक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

बहिष्कृत भारत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

समता, जनता - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

महारठ्ठा बाबू - एल.एन. हरदास - साप्ताहिक

सिद्धार्थ - दि. मा. खैरकर - साप्ताहिक

मराठी हरिजन - गो. ना. काळे - साप्ताहिक

अरुण - नाशिकराव तिरपुडे - साप्ताहिक

सेवक - वृत्तपत्रे

लोकसेवक - वृत्तपत्रे

जयभिम - वृत्तपत्रे

लोकपित्र - वृत्तपत्रे

निर्धार - आर. डी. भंडारी - मासिक

सिद्धार्थ - बाभळे व्हटकर - मासिक

नजर - अप्पासाहेब रणपिसे - मासिक

भीम गर्जना - टी. पी. अडसूळ - मासिक

जनता

धर्मदीप - मासिक

धर्मदीप - मासिक

बोधिसत्व - मासिक

रिपब्लिकन - ॲड. बी. सी. कांबळे

सिंह गर्जना - म. बा. मेश्राम

अस्मिता - त्रैमासिक

प्रजासत्ताक - मॅगेसीन

रिपब्लिकन संदेश - मॅगेसीन

दीक्षाभूमी - मॅगेसीन

जयभीम - मॅगेसीन

प्रमेय - मॅगेसीन

निकास - मॅगेसीन

अस्तित्व - मॅगेसीन

सुगावा - मॅगेसीन

मागोवा - मॅगेसीन

विद्रोह - मॅगेसीन

तक्षक, संसद, जातक, मुस्ती, प्रतिमार्क, मासिके, इत्यादी.

❑❑

## परिशिष्ट १७

# मुंबईतील काही महत्त्वाची प्रातिनिधिक बौद्ध विहारे

१. तक्षशिला बौद्ध विहार-मानखुर्द पूर्व

२. पंचशील बुद्ध विहार-मानखुर्द पश्चिम

३. संघमित्रा बुद्ध विहार-मानखुर्द पूर्व

४. लुंबिनी बुद्ध विहार-बी.ए.आर.सी.

५. कपिलवस्तू बुद्ध विहार-गोवंडी पूर्व

६. मैत्रेय बुद्ध विहार-गोवंडी पूर्व

७. लुंबिनी बुद्ध विहार-गोवंडी पूर्व

८. नालंदा बुद्ध विहार-गोवंडी पूर्व

९. चंद्रमणी बुद्ध विहार-अशोकनगर, गोवंडी पश्चिम

१०. मध्यवर्ती बुद्ध विहार-शिवाजीनगर, गोवंडी पूर्व

११. प्रियदर्शी बुद्ध विहार-चेंबूर लोखंडे मार्ग

१२. ज्ञानयोगी बुद्ध विहार-चेंबूर

१३. चक्रवर्ती बुद्ध विहार-मुकुंदनगर चेंबूर

१४. तारकचंद् बुद्ध विहार-चेंबूर

१५. सर्वोदय बुद्ध विहार-टिळकनगर

१६. कपिलवस्तू बुद्ध विहार-सहादिप चेंबुर कॉलनी

१७. धम्मकुटी बुद्ध विहार-टिळकनगर

१८. आम्रपाली बुद्ध विहार-कुर्ला बुद्ध कॉलनी

१९. धम्मक्रांती बुद्ध विहार-चुनाभट्टी

२०. विश्वदीप बुद्ध विहार-घाटकोपर

२१. बुद्ध विहार-भांडूप

२२. भिमछाया बुद्धविहार-कालिना सांताक्रूझ

२३. नालंदा बुद्ध विहार-अंधेरी

२४. तक्षशिला बुद्ध विहार-बांद्रा

२५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विहार-फुले मार्केट व्हि.टी.

२६. नालंदा बुद्ध विहार-भोईवाडा, परळ

२७. आनंद बुद्ध विहार-वांद्र पश्चिम

२८. आनंद बोधी बुद्ध विहार-गोराई - बोरीवली

२९. लुंबिनी बुद्ध विहार-भांडूप पश्चिम

३०. पंचशिल बुद्ध विहार-सांताक्रुझ

३१. पौर्णिमा बुद्ध विहार-वांद्रे पश्चिम

३२. आंबेडकरनगर बुद्ध विहार-लालडोंगर चेंबूर

३३. तथागत बुद्ध विहार-लालडोंगर चेंबूर

३४. वैशाली बुद्ध विहार-लालडोंगर चेंबूर

३५. जेतवन बुद्ध विहार-घाटकोपर पूर्व

३६. गंधकुटी बुद्धविहार-घाटकोपर पूर्व

३७. श्रावस्ती बुद्धविहार-घाटकोपर पूर्व

३८. प्रगती बुद्धविहार-घाटकोपर

३९. नवचैतन्य बुद्धविहार-चेंबूर

४०. नालंदा बुद्धविहार-चेंबूर पश्चिम

४१. राजगृह बुद्धविहार-भांडूप

४२. सारनाथ बुद्धविहार-सांताक्रूझ पूर्व

४३. तक्षशिला बुद्धविहार-सांताक्रूझ पूर्व

४४. सिद्धार्थ बुद्धविहार-सांताक्रूझ पूर्व

४५. प्रज्ञा बुद्धविहार-सांताक्रूझ पूर्व

४६. समेय बुद्धविहार-सांताक्रूझ पूर्व

४७. जेलवन बुद्धविहार-कांदिवली पश्चिम

४८. बहुजन बुद्धविहार-परळ

४९. आनंद बुद्धविहार-मुंबई सेंट्रल

५०. चैत्यभूमी-दादर.

संदर्भ : सावंत मंगेश, मुंबईतील बुद्ध विहारे आणि स्तूप एक अभ्यास १९५६-२०००, मुंबई विद्यापीठ, प्रकाशित एम.फिल. प्रबंध, २००९, पृष्ठ क्र. ११३-१४-१५.

❑❑

## परिशिष्ट १८

## १९९१ च्या जनगणनेनुसार मागासवर्गीय जातींचे मुंबईतील साक्षरतेचे प्रमाण

| **वॉर्ड** | **व्यक्ती** | **पुरुष** | **महिला** |
|---|---|---|---|
| अ | ६८.६७ | ७८.७७ | ५६.९१ |
| इ | ७०.२६ | ८०.८७ | ५९.८० |
| उ | ८१.१४ | ८९.१३ | ७१.८८ |
| ऊ | ७७.०८ | ८८.७६ | ६४.६६ |
| ए | ७४.०१ | ८३.७१ | ६३.६० |
| ऋ/छ | ७६.३८ | ८७.१६ | ६३.३१ |
| ऋ/ड | ७५.३१ | ८६.३४ | ६१.७१ |
| ॠ/छ | ७८.७० | ८६.६० | ६८.६६ |
| ॠ/ड | ७४.१३ | ८४.८४ | ६१.५५ |
| क/ए | ७३.५७ | ८४.७४ | ६०.७६ |
| क/ऋ | ७६.६६ | ८५.४८ | ६७.०७ |
| घ/ए | ६६.४८ | ७६.८८ | ५४.५५ |
| घ/थ | ७१.१५ | ८२.२१ | ५८.९६ |
| ङ | ७०.७४ | ८१.१७ | ५८.८८ |
| च/ए | ६२.२८ | ७४.७१ | ४७.७० |
| च/थ | ६५.७६ | ७६.५० | ५२.८४ |
| छ | ७२.९७ | ८३.२७ | ६१.१५ |
| झ/छ | ६७.४६ | ७९.०८ | ५३.९८ |
| झ/ड | ६६.६९ | ७७.८१ | ५३.९५ |
| ठ/छ | ६५.४४ | ७६.८१ | ५१.७२ |
| ठ/ड | ६८.५७ | ७९.०१ | ५६.८६ |
| ड | ७५.९९ | ८५.५० | ६५.२३ |
| ढ | ७१.७१ | ८१.९९ | ६०.६८ |
| **एकूण वॉर्ड** | ७१.५८ | ८२.१२ | ५९.३९ |

संदर्भ : Census of India 1991 Series – 14 Maharashtra Part XII A & B Director of Census, Greater Bombay, 1996, P.No. 51.

❑❑

## परिशिष्ट १९

# महाराष्ट्रातील मागासवर्गीय जातीची शैक्षणिक आकडेवारी
# १९९९ ते २०००

| | | Male | | Female | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Primary Stage – Basic | | 32632 | + | 30970 | = | 63602 |
| Primary - I to V- | | 939176 | + | 869930 | = | 1809106 |
| - | VI to VIII- | 436469 | + | 364027 | = | 800496 |
| - | IX to X- | 217222 | + | 148115 | = | 365341 |
| - | H.S.C.- | 41876 | + | 30431 | = | 72307 |
| - | Pre Degree- | 40493 | + | 17328 | = | 57821 |
| - | B.A.- | 37881 | + | 20033 | = | 57914 |
| - | M.A.- | 6458 | + | 2900 | = | 9358 |
| - | B.Sc.- | 6185 | + | 3034 | = | 9219 |
| - | M.Sc.- | 936 | + | 400 | = | 1336 |
| - | B.Com.- | 8689 | + | 4998 | = | 13687 |
| - | M.Com.- | 1181 | + | 419 | = | 1600 |
| - | B.E./B.Sc.- (Enggineer/B.Arch.) | 5822 | + | 1317 | = | 7130 |
| - | B.Ed.- | 3413 | + | 1012 | = | 4425 |
| - | M.B.B.S.- | 1591 | + | 1256 | = | 2847 |
| Teaching Training schuds- | | 2407 | + | 1515 | = | 3922 |
| Politechnic Institution- | | 5706 | + | 1530 | = | 7236 |
| Tech/Industrial/Art & Craft- | | 14001 | + | 208 | = | 16082 |

**संदर्भ :** Selected educational statistic – 1999, 1999-2000, Goverment of India Ministry of Human Resource Development Department of Secondary education and Higher education planning Monitoring and Statastics Division, New Delhi 2001 P.No. 49 to 58.

❑❑

## परिशिष्ट २०

## २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील प्रमुख मागासवर्गीय जातीची शैक्षणिक स्थिती

प्रस्तुत संशोधनाच्या सोईसाठी बौद्धधर्मियांचा अनुसूचित जाती या वर्गात समावेश केला आहे.

| **मागासवर्गीय जातीचे नाव** | **साक्षरता** | **प्राथमिक पेक्षा कमी** | **प्राथमिक** | **प्राथमिक मध्य** | **एस... माध्यमिक** | **तांत्रिक** | **ग्रॅज्युएट** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व मागास जाती | २.१ | २९.४ | २६.३ | १६.६ | २०.५ | १०.४ | ४.८ |
| महार | २.० | २८.२ | २४.९ | १७.२ | २२.१ | ०.३ | ५.३ |
| मांग | २.८ | ३७.० | २९.३ | १४.१ | १४.२ | ०.२ | २.४ |
| बाली | १.८ | २६.३ | २६.७ | १६.५ | २२.२ | ०.७ | ५.६ |
| भंगी | १.८ | ३०.९ | ३३.३ | १८.८ | १३.५ | ०.१ | १.६ |

संदर्भ : Census India. Gov.in/Tables Published/SCST/dh SC Maha.pdf. (2001).

❑❑

# परिशिष्ट २१

## मुंबई विद्यापीठातील मागासवर्गीयांची महाविद्यालयीन विद्यार्थिसंख्या २००० ते १९९६

| | २०००-२००१ | |
|---|---|---|
| **महाविद्यालयाचे नांव** | **मुले** | **मुली** |
| डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय | ५५९ | १७८ |
| विवेकानंद महाविद्यालय | ६४ | ६७ |
| आचार्य महाविद्यालय | २४८ | १७६ |
| रमण महाविद्यालय | १४ | १४ |
| रिझवी महाविद्यालय | ८ | ३ |
| गुरुनानक महाविद्यालय | १७ | २ |
| भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय | ७४ | ८९ |
| शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी | १० | २३ |
| बुरहानी महाविद्यालय | २ | १ |
| मित्तल महाविद्यालय | ८ | ४ |
| रहेजा महाविद्यालय | १८ | २३ |
| खंडेलवाल महाविद्यालय | ५ | ३ |
| टोपे महाविद्यालय | १४० | १४ |
| विकास महाविद्यालय | २०९ | ७८ |
| अस्मिता महाविद्यालय (मुलींचे) | - | १४१ |
| सिडनॅहम महाविद्यालय | ६४ | ३३ |
| पोदार महाविद्यालय | ४० | ८१ |
| सिद्धार्थ महाविद्यालय | ३५८ | १०० |
| विल्सन महाविद्यालय | २९ | १६ |
| रुईया महाविद्यालय | १४५ | ९९ |
| सोफीय महाविद्यालय | - | - |
| सेंट सोव्हियर्स महाविद्यालय | २३ | ३ |
| किशनचंद चेराराम महाविद्यालय | ८ | - |
| साठे महाविद्यालय | १६९ | २२८ |

| | | |
|---|---|---|
| खालसा महाविद्यालय | १२९ | १०४ |
| सिद्धार्थ महाविद्यालय | ५७७ | २०३ |
| भवन्स महाविद्यालय | १५० | १०६ |
| जयहिंद महाविद्यालय | २ | ४ |
| रुपारेल महाविद्यालय | १०२ | १६८ |
| किर्ती महाविद्यालय | १२० | १६९ |
| मिठीबाई महाविद्यालय | ८ | १९ |
| सेट झव्हेरी महाविद्यालय | ५१ | ५७ |
| झुनसुनवाला महाविद्यालय | ६७ | ७९ |
| पाटकर महाविद्यालय | १११ | १५० |
| महाराष्ट्र महाविद्यालय | - | १ |

❑❑

# परिशिष्ट २२

## पीपल्स एज्युकेशन सोसायटीची महाविद्यालये

१) सिद्धार्थ कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्य अॅण्ड कॉमर्स, मुंबई १९४६

२) सिद्धार्थ नाईट स्कूल, मुंबई १९४७

३) मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड सायन्स, औरंगाबाद १९५०

४) सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकोनॉमी, मुंबई १९५३

५) मिलिंद मल्टिपर्पज हाईस्कूल, औरंगाबाद १९५५

६) सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ, मुंबई १९५६

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स, महाड

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड आर्ट्स, औरंगाबाद १९६३

९) सिद्धार्थ कॉलेज ऑफ मास कम्युनिकेशन, मुंबई १९६५

१०) मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, औरंगाबाद १९६५

११) सिद्धार्थ इन्स्टिटट्यूट ऑफ इंडस्ट्री अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेशन, मुंबई १९६७

१२) डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, औरंगाबाद १९६८

१३) डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकोनॉमी, वडाळा, मुंबई १९७१

१४) गौतम विद्यालय, पंढरपूर जि. सोलापूर १९७४

१५) मिलिंद मल्टिपर्पज प्रि-प्रायमरी अॅण्ड प्रायमरी स्कूल, औरंगाबाद १९७६

१६) डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, वडाळा, मुंबई १९७८

१७) पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्कूल, नवी मुंबई १९७८

१८) नागसेन हायस्कूल, नांदेड १९८१

१९) पीपल्स एज्युकेशन सोसायटी इंग्लिश मीडियम के.जी. स्कूल, मुंबई १९८३

२०) पीपल्स एज्युकेशन सोसायटी, नागसून नर्सरी स्कूल बंगलोर १९८४

२१) पी.ई.एस. कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन औरंगाबाद १९८४

२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्ट्स, येरवडा, पुणे १९८५

२३) पी.ई.एस. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, औरंगाबाद १९९४

२४) डॉ. आंबेडकर विचारधारा, नागपूर, १९९६

संदर्भ : गोटे चंदन (संपा.), धम्मशासन दि. २० नोव्हेंबर २००९, पृष्ठ क्र. ९.

❑❑

# परिशिष्ट २३

## मुलाखती

१. अंभोरे उषा - मराठी साहित्यिका, दि. ८/०२/२०१०

२. आघाणे काका - भारतीय बौद्ध महासभा, राष्ट्रीय सचिव, दि. १९/१/२०१०

३. आंबेडकर भीमराव - बुद्धभूषण प्रेस अध्यक्ष

४. आंबेडकर आनंदराज - बौद्ध पंचायत समिती अध्यक्ष

५. उबाळे नामदेव - घाटकोपर नगरसेवक, १९/२/२०१०

६. उबाळे शिला - महिलामंडळ अध्यक्षा, घाटकोपर, १९/२/२०१०

७. कांबळे शालीनी - गृहीणी बी.डी.डी. चाळ, वरळी, १६/२/२०११

८. कांबळे भीमराव हिराजी - धम्मचारी त्रैलोक्य, वरळी, १६/२/२०११

९. कांबळे रोहिणी - बी.डी.डी. चाळ, वरळी, १६/२/२०११

१०. कांबळे जगन्नाथ - चेंबुर, बुद्धविहार व्यवस्थापक

११. खेमचंद धम्मचारी, त्रैलोक्य, महाविहार, चुनाभट्टी, दि. ३/११/२००९

१२. गायकवाड इंदूताई - आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ती, माटूंगा लेबर कॅम्प

१३. गायकवाड लता - गृहिणी, दि. १६/०२/२०११

१४. जाधव लक्ष्मीबाई - माझगाव, भायखळा, कार्यकर्ती, दि. १४/४/२०११

१५. जाधव संदीप - परेल, कामगार शिक्षक, बृहन्मुंबई, दि. १४/४/२०११

१६. जाधव गौतम - आंबेडकर भवन, दादर, दि. १९/१/२०११

१७. जाधव प्र.भि. - बी.पी.टी.चाळ, वडाळा, दि. २७/२/२०११

१८. सवादकर रेखा - बी.डी.डी. चाळ, नायगाव बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, वडाळा रजिस्टार, दि. १६/४/२०११

१९. सवादकर अनिल - बी.डी.डी. चाळ, नायगाव, कार्यकर्ता, दि. १६/४/२०११

२०. सपकाळ मीनाक्षी - माझगाव भायखळा, सोशल वर्कर, दि. १४/४/२०११

२१. सावंत भाई - दादर, रिपब्लिकन सेना, सरचिटणीस, दि. १९/१/२०११

२२. सूर्यवंशी लक्ष्मीबाई - बी.आय.टी.चाळ, भायखळा, दि. २१/२/२०११

२३. सोनावणे शशिकला - बचत गट बी.आय.टी. चाळ, भायखळा, बचत गट प्रमुख

२४. सोनावणे बबन - भायखळा बी.आ.टी. चाळ पुस्तक विक्रेता

२५. सोनावणे सुनिल - उल्हासनगर, साहित्यिक, दि. १०/१०/२००९

२६. साळवी विवेक - बोरीवली, मुंबई, दि. १६/४/२०११ प्रदर्शन

२७. देठणकर - माजी शिक्षण अधिकारी, वरळी

२८. धिवार भीमराव - कुर्ला, बँक कर्मचारी, कार्यकर्ता, दि. ११/१२/२०१०

२९. पवार उर्मिला - कांदिवली, साहित्यिक, दि. ८/१२/२०१०

३०. पवार ज.वि. - साहित्यिक, कार्यकर्ते, दि. ८/१२/२०१० चर्चगेट

३१. पवार - वडाळा, आंबेडकर कॉलेज अधिकारी, दि. ११/१०/२०१०

३२. पंडित लक्ष्मण - बी.आय.टी.चाळ, भायखळा - आंबेडकरी चळवळीतील शाहीर, दि.२२/२/२०१०

३३. पडवळ तात्या - कुर्ला, जेष्ठ कामगार नेता, दि. ११/१२/२०१०

३४. बनसोडे सुरेंद्र - पुस्तकविक्रेता

३५. माने वसंत - वरळी, बुद्ध विहार, संचालक, दि. १६/२/२०११

३६. भन्ते राहूल बोधी - सर्वोदय महाबौद्ध विहार संचालक, टिळकनगर, दि. १२/२/२०१०

३७. रोकडे अनुराधा - उत्कर्ष महिला मंडळ अध्यक्षा, टिळकनगर, दि. १२/२/२०१०

३८. राठोड दलपन - बी.एम.सी. बेस्ट वसाहत, माझगाव, भायखळा, दि. १४/४/२०११

३९. डॉ. लंकेश्वर माधवराव - माजी वैद्यकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते

४०. लोंढे मंगलाताई - सामाजिक कार्यकर्ता, दि. ४/६/२००९

४१. हरिभक्त नारायण - रिटायर्ड प्रशासकीय अधिकारी, आंबेडकर चळवळीत कार्यकर्ते, दि.१४/५/२०१०.

❑❑

## परिशिष्ट २४

# प्राचीन बौद्ध लेण्या आणि धर्मांतरानंतरच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांची छायाचित्रे

### दि. १४ ऑक्टोबर १९५६ - धम्मदीक्षा समारंभ, नागपूर




नागपूर येथे धम्मचक्र प्रवर्तनाकरिता उभारण्यात आलेल्या सांचीच्या स्तूपाची प्रतिकृती असलेला भव्य मंच.




१४ ऑक्टोबर १९५६, दीक्षाभूमी नागपूर येथे महास्थविर चंद्रमणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांना दीक्षा देतांना.

# मुंबईतील बौद्ध लेणी




कोन्हेरी





मागठाण

कोंडिविटे




# पीपल्स एज्युकेशन सोसायटी, १९४५





पिपल्स् एज्युकेशन सोसायटीची स्थापना (१९४५) कार्यकारी मंडळ :- प्रा. व्ही.जी राव, प्राचार्य अ.बा. गजेंद्रगडकर, आचार्य मो.वा. दोंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राव बहादूर सी.के. बोले, डी.जी. जाधव व कमलाकर चित्रे



सिद्धार्थ महाविद्यालय (आनंद भवन)

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही,** भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# मंगल परिणय संस्कार २०१०, सर्वोदय



## धम्म परिषद

### राजगृह महाबुद्धविहार, नाहूर (दि. २२ व २३ फेब्रुवारी २००९)




### सर्वोदय बुद्धविहार, चेंबूर (दि. १८ व १९ एप्रिल २०१०)



# धम्मदीक्षा सोहळा, दि. २७ मे २००६

## महालक्ष्मी रेसकोर्स मैदान, मुंबई



(Top) Thousands of people (including some lashing themselves with iron whips, (above) to the Mahalaxmi racecourse to participate in the conversion ceremony


← ४२ भटक्या जमातींचे प्रतिनिधी





## तथागत गौतम बुद्धांची २५०० वी जयंतीनिमित्त

### भारत सरकारने काढलेले पोस्टाचे तिकिट



# इ.स. १९५६ चे अगोदरची मुंबईतील बुद्धविहारे



← चिनी बुद्धविहार, कवांगकुंग बौद्धविहार माझगाव, भायखळा



जपानी बुद्धविहार निपॉनझॉन म्योहोजो बुद्धविहार, वरळी, मंबई →



← श्रीलंका बुद्धविहार बहुजन बुद्धविहार, परळ, मुंबई

## इ.स. १९५६ नंतरचे मुंबईतील पहिले चैत्यागृह

### चैत्यभूमी, दादर




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मुंबईतील पहिला पुतळा


### जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई



# इ.स. १९५६ नंतरची काही बुद्धविहारे









## भिक्खु संघाज युनायटेड बुद्धिस्ट मिशन,

### सर्वोदय बुद्धविहार, चेंबूर, टिळकनगर, मुंबई



भि. सं. यु. बु. मिशनचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र भवन

## त्रैलोक्य (त्रिरत्न) बुद्धविहार

### चुनाभट्टी, मुंबई




## धम्मप्रसार - सण्डे स्कूल (धम्म स्कूल)

### सर्वोदय बुद्धविहार







## ग्लोबल विपश्यना केंद्र, गोराई, बोरीवली, मुंबई



# बौद्ध धम्म सूचक भेटकार्ड



## महिला मंडळे - सांस्कृतिक केंद्र

### रमाबाई आंबेडकरनगर, घाटकोपर, मुंबई






❑❑

# परिशिष्ट १०

## १९६१ ते २००१ या काळातील मुंबईतील सर्व धर्मियांनी लोकसंख्या

**Religion Table**

| **Religion** | **1961** | | | **1971** | | | **1981** | | | **1991** | | | **2001** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **P** | **M** | **F** | **P** | **M** | **F** | **P** | **M** | **F** | **P** | **M** | **F** | **P** | **M** | **F** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| All Religions | 4152056 | 2496176 | 1655880 | 5970575 | 3478378 | 2492197 | 8243405 | 4652646 | 3590759 | 9925891 | 5460145 | 4465746 | 11978450 | 6619966 | 5358484 |
| Hindu | 2869276 | 1758218 | 1111058 | 4110746 | 2427525 | 1683221 | 5712443 | 3265395 | 2447048 | 6747676 | 3749737 | 2997939 | 8073225 | 4505711 | 3567514 |
| Muslim | 538389 | 330419 | 207970 | 843358 | 501567 | 341791 | 1219930 | 688486 | 531444 | 1670170 | 929708 | 740462 | 2223471 | 1259642 | 963829 |
| Christian | 288023 | 155484 | 132539 | 375265 | 200312 | 174953 | 394687 | 204595 | 190092 | 441338 | 224769 | 216569 | 446406 | 222850 | 223556 |
| Sikh | 25440 | 15115 | 10325 | 42862 | 24303 | 18559 | 51808 | 28220 | 23588 | 76892 | 41684 | 35208 | 69601 | 37323 | 32273 |
| Buddhist | 192717 | 109072 | 83645 | 284303 | 157395 | 126908 | 467716 | 255914 | 211802 | 557089 | 292037 | 265052 | 625771 | 320706 | 305065 |
| Jain | 155747 | 87157 | 68590 | 244721 | 133282 | 111439 | 341980 | 182970 | 159010 | 353613 | 182196 | 171417 | 478360 | 243179 | 235181 |
| Other | 82464 | 40711 | 41753 | 68915 | 33707 | 35208 | 54017 | 26601 | 27416 | 60165 | 29385 | 30780 | 57315 | 27997 | 29318 |
| Religion not stated | -- | -- | -- | 405 | 287 | 118 | 824 | 465 | 359 | 18948 | 10629 | 8319 | 4301 | 2558 | 1743 |

संदर्भ : Census of India 2001, Greater Bombay, P.No. 6.